टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे,
तात्त्विक व सामाजिक शास्त्रेविद्याशाखेंतर्गत
इतिहास विषयात विद्यावाचस्पती (Docter of Philosophy)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

कोपरगाव परिसराचा स्थानिक इतिहास

(इ. स. १६०० ते २०००)

सादरकर्ता
श्री. कान्हू लक्ष्मण गिरमकर

मार्गदर्शक
डॉ. दीपक देशपांडे
प्राचार्य,
बाबासाहेब चितळे महाविद्यालय,
भिलवडी, ता. पलुस, जि. सांगली

एप्रिल २०१४

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, गिरमकर कान्हू लक्ष्मण यांनी 'कोपरगाव परिसराचा स्थानिक इतिहास (इ.स. १६०० ते २०००)' हा शोधप्रबंध पूर्ण केलेला आहे. विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी सादर केलेला हा शोधप्रबंध माझ्या सूचना व मार्गदर्शनानुसार त्यांनी पूर्ण केला आहे. त्यातील सर्व माहिती मी तपासून प्रमाणित केली आहे.

डॉ. दीपक देशपांडे
प्राचार्य,
बाबासाहेब चितळे महाविद्यालय,
भिलवडी, ता. पलुस, जि. सांगली

ठिकाण : पुणे

दिनांक : एप्रिल २०१४

प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, 'कोपरगाव परिसराचा स्थानिक इतिहास (इ.स. १६०० ते २०००)' हा शोधप्रबंध मी डॉ. दीपक देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन-साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच्.डी. (इतिहास) पदवीकरिता प्रस्तुत प्रबंध विद्यापीठास सादर करण्यात येत आहे. हा शोध-प्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे

कान्हू लक्ष्मण गिरमकर

दिनांक : एप्रिल २०१४

संशोधक

अनुक्रमणिका

प्रकरण क्रमांक	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
*	प्रमाणपत्र	
*	प्रतिज्ञापत्र	
*	ऋणनिर्देश	
१.	प्रास्ताविक	
२.	शिवकालीन व पेशवेकालीन कोपरगाव	
३.	आधुनिक कोपरगाव	
४.	कोपरगावमधील सहकार चळवळ	
५.	उपसंहार	
*	परिशिष्टे	
*	निवडक संदर्भ-साहित्य-सूची	

ऋणनिर्देश

'कोपरगावचा स्थानिक इतिहास' हा प्रस्तुत प्रबंधलेखनाचा विषय आहे. कोपरगाव शहर आज तालुक्याचे गाव आहे. प्रत्येक गावास ऐतिहासिक परंपरा असते. अर्थात ती कमी-अधिक प्रमाणात असते. कोपरगाव शहरास इतिहासपूर्व काळापासूनची परंपरा लाभली आहे. प्राचीन ते अर्वाचीन कालखंडापर्यंत कोठेही ही परंपरा खंडित झालेली नाही. या परंपरेच्या अभ्यासासाठी उपलब्ध साधनेसुद्धा विपुल व विविध प्रकारची आहेत. मात्र तरीही स्थानिक इतिहास अभ्यासासाठी सुयोग्य असूनही तुलनेने कोपरगावचा इतिहास हा अभ्यास-विषय दुर्लक्षित राहिला आहे. मी कोपरगाव येथे नोकरी करत असल्याने कोपरगावच्या इतिहासाविषयी स्वाभाविकपणे माझ्या मनात जिज्ञासा जागृत झाली. त्यामुळे मी या संशोधनाकडे वळलो. म्हणून प्रस्तुत विषयाची प्रबंध लेखनासाठी निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी डॉ. दीपक देशपांडे हे मला मार्गदर्शक म्हणून लाभले. प्रबंध लिहिताना इतिहासलेखनाच्या पद्धतीशास्त्रापासून ते शुद्धलेखनापर्यंत सर्व गोष्टी बिनचूक व्हाव्यात, असा त्यांचा आग्रह असतो. 'कोपरगावचा इतिहास' हा 'स्थानिक इतिहासा'चा एक भाग आहे. 'प्रादेशिक' व 'स्थानिक' इतिहासाच्या संकल्पना समजावून देऊन त्या मांडणीची आवश्यकता व उपयुक्तता किती महत्त्वाची आहे याबाबतचा व्यापक दृष्टिकोन आम्ही डॉ. राजा दीक्षित यांच्याकडून शिकलो. त्यांचे भाषांवरील प्रभुत्त्व आणि इतिहासाच्या घटितांपासून ते 'जुन्या-नव्या' विश्वांची व इतिहासाची विलक्षण जाण ही बाब महत्त्वपूर्ण आहे. पीएच्. डी. चे संशोधन हा आपल्या संशोधनाचा प्रारंभ आहे असे ते प्रतिपादन करतात. 'सहृदयता, साहित्याचा अभ्यास आणि संशोधन,' या गुणांचा सुरेख संगम त्यांच्यामध्ये झाला आहे. त्यांच्याविषयीचे कृतज्ञता भाव शब्दबद्ध करणे अवघड आहे.

कोपरगाव परिसरातील माझा आदरणीय मार्गदर्शक परिवार त्यात प्रामुख्याने मा. अशोकराव रोहमारे (अध्यक्ष, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी, कोपरगाव) ॲड. संजीव कुलकर्णी(सचिव, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी, कोपरगाव), श्री. संदिप रोहमारे (सदस्य, स्थानिक व्यवस्थापन समिती) यांचा मी ऋणी आहे.

मी गेली २२ वर्षे कोपरगाव येथे इतिहासाचा व्याख्याता म्हणून काम करतोय. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस्. यादव, इतिहासविभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत अभंग, यांनी माझ्या संशोधन कार्यात प्रोत्साहन दिले. तसेच माझ्या महाविद्यालयातील माझे सहकारी प्रा. डॉ. गणेश देशमुख, डॉ. विलास आवारी, प्रा. बाबासाहेब गव्हाणे, प्रा. विजय ठाणगे, प्रा. संतोष पगारे, प्रा. बाळासाहेब गायकवाड, डॉ. बापुसाहेब भोसले, डॉ. सतिश काळे, डॉ. सुरेश देवरे यांनी सर्वांनी संशोधनकार्यात मदत केली.

तसेच माझे मित्र ॲड. संजय वाखारे, ॲड. संजय भोकरे, प्रा. ए. टी. सानप, डॉ. एस्. पी. लवांडे, प्रा. बी. व्ही. नागवडे, प्रा. पी. बी. चौधरी, डॉ. जे. एस्. मोरे, प्रा. डॉ. बी. टी. राजदेव, प्रा. शरद फटांगरे तसेच माझे विद्यार्थी डॉ. लहू गायकवाड व प्रा. सुरेश काळे यांनी कोपरगावच्या इतिहासाची काही साधने उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी संदर्भ साधने शासकिय अभिलेखागार, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे व डेक्कन अभिमत विद्यापीठाचे ग्रंथालय, के. जे. सोमैय्या महाविद्यालय, कोपरगाव यांच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध झाली. या सर्व संस्थांचे चालक, ग्रंथपाल व सेवकवर्ग यांचा मी अत्यंत आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील माजी अधिष्ठाता मा. डॉ. विजय कारेकर, व विद्यमान अधिष्ठाता डॉ. श्रीकांत कार्लेकर, माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर, विद्यमान इतिहासविभागप्रमुख डॉ. संध्या पंडीत यांची मोलाची मदत झाली. त्याचप्रमाणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील संशोधन विभागातील प्रशासकिय कर्मचाऱ्यांची संशोधनासाठी मोलाची मदत केली. आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील इतिहासाचे प्राध्यापक डॉ. अमोल विद्यासागर यांचीही या कामात मदत झाली.

माझ्या शिक्षणासाठी कबाडकष्ट करणारे माझे वडिल कै. लक्ष्मण विठोबा गिरमकर माझी आई श्रीमती मालुबाई लक्ष्मण गिरमकर, बहिण सौ. राधाबाई बापूजी नवले यांच्या पाठबळामुळेच मी इथपर्यंत पोहचलो याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रबंध लिहिताना मी मागील पाच वर्षांमध्ये शनिवार व रविवार हे दिवस क्षेत्र-भेटींसाठी वापरले. घरामध्ये वेळ दिला नाही. मात्र माझ्या या संशोधन-प्रवासामध्ये माझ्या पत्नीने केव्हाही खंड पडू दिला नाही. मला प्रस्तुत काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्याबद्दल पत्नी सौ. संपदा, चि. ऋषिकेश यांचे ऋण शब्दबद्ध करणे अशक्य आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रबंधाचे टंकलेखन माझे मित्र प्रभू विठ्ठल ढोमे यांनी केले. या व्यतिरिक्त प्रस्तुत लघुशोध प्रबंधाच्या संशोधन कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे अनेकांचा हातभार लागलेला आहे. स्थलमर्यादेअभावी सर्वांचा उल्लेख करणे शक्य नाही. मात्र या संशोधनात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या सर्व व्यक्तींचे व घटकांचे मी मनापासून आभार मानतो.

ठिकाण : पुणे

दिनांक : एप्रिल २०१४ कान्हू लक्ष्मण गिरमकर

प्रकरण पहिले

प्रास्ताविक

इतिहास या शब्दाची फोड 'इति+ह+आस' म्हणजे 'असे असे घडले,'अशी केली जाते.[१] घडून गेलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावला की, इतिहास आकाराला येतो. इतिहास म्हणजे भूतकाळाशी केलेला संवाद, असे ई. एच. कार यांनी म्हटले आहे.[२] इतिहासाचा वेगवेगळा अर्थ लावला जातो, याचे कारण इतिहास ही एकच एक गोष्ट नसते. बऱ्याच वेळा असेही सांगितले जाते की, इतिहासकार गतकाळातील ठरावीक घटना निवडून त्याबद्दलचे स्वतःचे स्पष्टीकरण सादर करतो आणि त्यालाच इतिहास असे संबोधले जाते. म्हणजेच इतिहासकाराने इतिहासलेखन केल्यावरच इतिहास आकाराला येतो. त्याचबरोबर इतिहास हा विचारांचा इतिहास असतो, असेही म्हटले जाते. इतिहास विविध मूल्यप्रणालींनी आकाराला येतो. त्याचप्रमाणे विविध साधनांच्यामुळेही सिध्द होतो.

इतिहासाच्या व्याख्येत 'असे असे घडले' असे म्हटले जात असले, तरी काय झाले, कसे झाले हे सांगणारा अभ्यासक इतिहासकथनाच्या अथवा इतिहासलेखनाच्या प्रक्रियेत स्वतःचा स्वतंत्र तर्कसंगत दृष्टिकोन ठेवत असतो. मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन करण्यासाठी त्या प्रसंगाचा आविष्कार विशिष्ट कालाच्या आणि स्थलाच्या संदर्भात दाखविणे आवश्यक आहे. काल, स्थल व व्यक्ती या त्रयींची जी सांगड घातली जाते, तिलाच 'प्रसंग' व 'ऐतिहासिक' या संज्ञा देतात. इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या मते, ''विशिष्ट काल, विशिष्ट स्थल व विशिष्ट व्यक्तींचे विशिष्ट आचरण या तीन घटकांचा संघात झाला असता प्रसंग ही वस्तु बनली जाते व अनेक प्रसंगांच्या व्यवस्थित संततीपासून इतिहास म्हणून ज्या वस्तूस म्हणता येईल तिची निर्मिती होते.''[३] इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी केलेली इतिहासाची ही व्याख्या व्यापक आहे. केवळ राजकीय घटनांचा अभ्यास इतिहासात नसून इतिहास म्हणजे मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास होय. कालपर्यंत घडलेल्या घटना इतिहासाच्या कक्षेत येतात.

डॉ. राजा दीक्षित यांनी स्पष्ट केल्यानुसार व्यक्ती, समाज, स्थल आणि काल या अनुबंधचतुष्ट्यातील सर्वांगीण कहाणी म्हणजे इतिहास होय.[४] इतिहास कालचक्राबरोबर घडत राहतो. मात्र घडणाऱ्या इतिहासामधील जो लिहिला जातो, त्यालाच आपण इतिहास म्हणून ओळखतो. मानवी जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांची सुव्यवस्थितपणे ठेवलेली नोंद, म्हणजे इतिहास होय.

इतिहास म्हणजे केवळ पूर्वी होऊन गेलेल्या घटनांचे ज्ञान करून घेणे, त्यांची नोंद ठेवणे, नव्हे तर त्यांचा वर्तमानाशी संबंध जोडणे होय. प्रत्यक्षात घडलेली घटना अथवा तिचे वृत्त एवढाच त्याचा विषय नसून, घटनेचे किंवा वृत्ताचे संशोधन व लेखनसुद्धा इतिहासात समाविष्ट केले जाते. या संशोधनात व लेखनात अनुस्यूत असलेला प्रामाण्यविचार म्हणजेच साधनचिकित्सा व तर्कप्रक्रिया यांचा इतिहासात समावेश होतो. इतिहास कालचक्राबरोबर घडत असल्याने तो सातत्याने बदलणारा असतो. बदल हाच प्रकृतीचा स्थायीभाव आहे. सातत्याने होणारा बदल आणि प्रगतीच्या दिशेने झालेली वाटचाल म्हणजे 'इतिहास' अशीही इतिहासाची व्याख्या केली जाते.[५] इतिहास अंतिम किंवा अपरिवर्तनीय नाही व संपूर्णही नाही. ऐतिहासिक सत्य हे इतिहासकाराने गतकालीन घटना किंवा कृतीविषयीच्या पुराव्यांचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून प्रतिपादन केलेले सत्य असते. त्या अर्थाने इतिहास हा सत्याचा शोध आहे. इतिहासामध्ये नवीन पुराव्यांची उपलब्धता आणि सिद्धतेबरोबर ऐतिहासिक सत्याचे पुनर्निर्धारण होऊ शकते. त्याचप्रमाणे नवीन विचारप्रणाली निर्माण होऊन इतिहासाला नवीन संदर्भ लाभतात. इतिहासलेखन करताना इतिहासकार भूतकाळाचे वास्तविक वर्णन करतो व त्यावर भाष्य करतो. तो भूतकाळ मृत नसून कोणत्या तरी अर्थाने अद्याप जिवंत असतो. ऐतिहासिक लेखन करताना इतिहासकार खाली उल्लेखीत मुद्यांचा आधार घेतो -

१. प्रत्यक्ष घटनेचे ज्ञान,

२. घटना कशाप्रकारे घडली त्याची सविस्तर माहिती किंवा पुरावे,

३. घटना घडून येण्यासाठी कारणीभूत झालेला घटनांचा कालानुक्रम,

४. घटनेतील मानवी व्यवहारावरील परिणामांचे एकत्रित भाष्य.

या सर्व मुद्यांचा सांगोपांग अभ्यास करून त्या घटनेविषयी सम्यक इतिहास लिहिला जातो. केवळ भूतकालीन समाज कसा वागला, याचा अभ्यास करून इतिहासाचे लेखन करता येत नाही, तर भूतकाळातील घटनांचा अन्वयार्थ लावून इतिहासाची मांडणी शक्य होते. या भूतकाळाचे आकलन म्हणजे इतिहास. भूतकाळात घडलेल्या घटनांचा, विचारस्रोतांचा अभ्यास, त्याची चिकित्सा आणि अन्वयार्थ म्हणजे इतिहास. आपण वर्तमानकाळाच्या संदर्भात हा शोध घेत असतो. कारण हा वर्तमानकाळ गतक्षणांमधूनच परिणत होत आलेला असतो. आजचे वर्तमान हे भूतकाळाचे अपत्य आहे. त्यांच्यातील संबंध मोठा गुंतागुंतीचा आणि कधीही न संपणारा आहे. त्या दृष्टीने इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद आहे.[६]

चांगल्या इतिहासकाराचे किंवा इतिहास संशोधकाचे लक्षण काश्मिरी इतिहासकार कल्हण यांनी एका संस्कृत श्लोकामध्ये सांगितले आहे -

''श्लाघ्यःस एव गुणवान् रागद्वेषविवर्जितः

भूतार्थ कथने यस्य स्थैयस्येव सरस्वती''[७]

(भूतकाळातील वृत्तांत न्यायाधीशांप्रमाणे जो निर्लेप बुद्धीने सांगतो, तो इतिहास संशोधक श्लाघ्य होय.)

इतिहास हा सत्य घटना व यथायोग्य ऐतिहासिक साधनांवर आधारित असावा. इतिहास लिहिताना प्रामुख्याने तीन घटकांचा विचार करणे आवश्यक आहे -

१. भूतकाळात घडून गेलेल्या घटनेविषयीचे सत्यशोधन, म्हणजे घडलेली गोष्ट सत्य आहे की नाही याविषयीची खात्री करून घेणे,

२. घटनेविषयीच्या माहितीची योग्य पद्धतीने मांडणी करणे,

३. सत्याचा अन्वयार्थ लावणे, घडलेल्या घटनेचे परीक्षण करणे किंवा त्या घटनेची चिकित्सा करणे, तिचे महत्त्व, वैशिष्ट्य स्पष्ट करणे.

इतिहास हा सत्याचा शोध आहे. सत्य हे स्वतंत्र मूल्य आहे. सत्य हे दुसऱ्या

कोणत्याही मूल्यापेक्षा कनिष्ठ अथवा दुय्यम दर्जाचे असू शकत नाही.[८] म्हणून इतिहासामध्ये सत्यशोधन हा घटक म्हत्त्वाचा आहे. इतिहासलेखन करताना इतिहास संशोधक ज्याप्रमाणे न्यायधीशाची भूमिका करतो, त्याचप्रमाणे सत्यशोधन करताना शास्त्रज्ञाची भूमिका, जमविलेल्या माहितीची मांडणी करताना साहित्यिकाची भूमिका इत्यादी विविध प्रकारच्या भूमिका इतिहास संशोधकास साकार कराव्या लागतात. इतिहास ही निर्मितीप्रक्रिया आहे. इतिहासकाराच्या विचारपद्धतीचा प्रभाव त्याच्या लेखनावर पडणे स्वाभाविक आहे.

इतिहासलेखक किंवा अभ्यासक आवश्यकतेनुसार प्रादेशिक किंवा सांस्कृतिक मर्यादा निश्चित करतो. इतिहासलेखनासाठी निवडलेला प्रदेश किंवा काळ इतिहासलेखकाच्या विशिष्ट गरजेतून आणि विशिष्ट मनोभूमिकेतून निर्माण होत असतो. इतिहासलेखन ही दीर्घकाळ चालत आलेली आणि अखंड चालू राहणारी शोधयात्रा आहे. इतिहासलेखनात कोणाचाही व कोणताही शब्द अखेरचा नसतो. कोणतेही इतिहासलेखन परिपूर्ण नसते, कारण इतिहासलेखनाची प्रक्रिया ही रचना, विरचना आणि पुनर्रचना या त्रिविध घटकांनी बनलेली आहे. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग असतो. प्रत्येक स्तरातील व्यक्ती व घटना यांच्या माध्यमातून स्थलकालसापेक्ष इतिहास घडत असतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, 'जो समाज आपला इतिहास विसरतो, तो चांगले भविष्य घडवू शकत नाही.'[९] या आशयघन विधानातून डॉ. आंबेडकरांचे इतिहासभान समजते, त्याचप्रमाणे एक सामाजिक शास्त्र म्हणून इतिहासाची अपरिहार्यता लक्षात येते. इतिहासाचे स्वरूपच मुळी अन्वयार्थात्मक असल्यामुळे जसजसा काळ बदलतो, तसतसे इतिहासाच्या स्वरुपामध्ये बदल होत जातात.

प्रारंभी इतिहासाची संकल्पना पुराणे, महाकाव्ये, राज्यकर्ते व अनुषंगिक लढाया, राजकीय घटना आणि राजघराणे इत्यादींपुरती मर्यादित होती. आता मात्र इतिहासाची संकल्पना बदलली आहे. मानवी जीवनाच्या सर्वांगांना सामावून घेणारा असा इतिहासाचा पट झाला आहे. 'इतिहास म्हणजे केवळ गतकालीन राजकारण आणि वर्तमानकालीन राजकारण म्हणजे भविष्यातील इतिहास,' हा विचार आता मागे पडला आहे. इतिहासाच्या

अभ्यासामध्ये राजकीय बाजूंव्यतिरिक्त इतर सामाजिक व आर्थिक घटकांनाही महत्त्व प्राप्त झाले आहे. इतिहासकार आर. जी. कॉलिंगवुड यांच्या मते, 'सर्व इतिहास हा मानवी विचारांचा इतिहास असतो. इतिहासकार प्रत्येक घटनेला इतिहासामध्ये समाविष्ट करत नाही. तसेच काही घटनांचे फक्त उल्लेख केलेले असतात. कोणती घटना महत्त्वाची असून, ती इतिहासलेखनात समाविष्ट करणे किती आवश्यक आहे, हे त्या घटनेमागील मानसिक प्रक्रियेवरून ठरवतात, म्हणजेच इतिहासलेखनामध्ये मानवी वृत्ती महत्त्वाची ठरते.'[१०] डॉ. अरविंद देशपांडे यांच्या मते, 'इतिहास ही एक मानसिकता आहे.'[११]

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून इतिहासाला शास्त्राचे स्वरूप देण्याची प्रक्रिया सुरू झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक ब्युरी यांनी 'History is a Science, no more and no less.' या शब्दांत 'इतिहास हे शास्त्र आहे', असे ठामपणे प्रतिपादन केले.[१२] प्राध्यापक ब्युरी यांच्या इतिहासविषयक या एकाच वाक्याने इतिहास संशोधनाची दिशा बदलली. इतिहासाचे आज शास्त्र म्हणून अध्ययन सुरू झाल्यामुळे इतिहास अध्ययन, संशोधनाची व लेखनाची पद्धती उत्क्रांत झाली आहे. आजच्या ज्ञानविस्फोटाच्या आणि क्रांतीच्या युगात इतिहासलेखन, संशोधनाचे स्वरूप गतिमान झाले आहे. वर्तमानकाळ एवढा क्षणभंगुर आहे की, तो पूर्णपणे आकलन होण्याच्या अगोदरच भूतकाळात विलीन होतो. इतिहासाचे आकलन करून घेताना काळाची आणि इतिहासाची गतिमानता लक्षात घेणे आवश्यक आहे. इतिहास ही ज्ञानशाखा आहे. ज्ञानशाखा म्हणून इतिहासाचा विचार करताना त्याची विविध ज्ञानशाखांशी होणारी आंतरप्रक्रिया पाहणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्ञान आणि सत्ता यांचा परस्पर संबंध अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे. ज्ञानशाखा म्हणून बदलत जाणाऱ्या इतिहासलेखनशास्त्राचे भान अधिक अचूक होण्यासाठी घटना, अन्वयार्थ आणि त्यामधील परस्परसंबंध यांचा सूक्ष्म अभ्यास होणे आवश्यक आहे. त्या सूक्ष्म अभ्यासामुळेच इतिहासातून सर्वसाधारणपणे प्रस्थापित सिद्धांत, प्रस्थापित घटिते यांच्याविषयी आश्चर्य वाटेल इतके विविध निष्कर्ष हाती लागतात. इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास आणि विचारधुरिणांचे चिंतन यांच्या प्रभावामुळे नवनवीन विचारसरणी तयार होत आहेत. नव्या ज्ञानशाखा तयार होत आहेत. कलाशाखेतील समाजविज्ञान व इतिहास हे विषय महत्त्वाचे असून ते यास अपवाद नाहीत.

इतिहासाचा नव्या अर्थाने उपयुक्ततावादी पुनर्विचार करण्याची वेळ आलेली आहे.[१३] 'No Documents no History' म्हणणारे इतिहासतज्ज्ञही मौखिक परंपरा अभ्यासत आहेत. त्यातून रूढ इतिहासाला न दिसणाऱ्या दबलेल्या, अधःस्तरीय, वंचित किंवा सबाल्टर्न समाजगटांचा अभ्यास करत आहेत.

१९८० च्या दशकामध्ये 'सबाल्टर्न इतिहासलेखन' हा प्रवाह विकसित झाला. सबाल्टर्न या शब्दासाठी 'वंचित' हा मराठी शब्दप्रयोग डॉ. अरविंद देशपांडे यांनी वापरला. डॉ. उमेश बगाडे यांनी सबाल्टर्नसाठी 'शोषित व अंकित' असा शब्दप्रयोग वापरला आहे.[१४] 'दुय्यम जनसमूहांचा इतिहास' असाही शब्दप्रयोग सबाल्टर्न इतिहासाच्या बाबतीत उल्लेख केलेला आढळतो.[१५] भारताचा राजा-केंद्रित इतिहास हा जनसामान्य-केंद्रित इतिहास करण्यासाठी तळाकडून इतिहास या इतिहासलेखनप्रवाहाकडे सर्वजण पाहू लागले आहेत. कामगार, शेतकरी व बहुजन वर्गाच्या इतिहासालाही आता महत्त्व आले आहे.

इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासामुळेच आधुनिक काळात इतिहास अभ्यासाचे विविध प्रवाह निर्माण झालेले आहेत. इतिहासलेखनाच्या विविध प्रवाहांमध्ये प्रामुख्याने आंग्लवादी, प्राच्यविद्यावादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, जातजाणिवेला प्राधान्य देणारा इतिहासलेखन प्रवाह, इत्यादी इतिहासलेखन प्रवाह निर्माण झाले आहेत. प्रादेशिक व स्थानिक इतिहासलेखनाची प्रक्रियाही आता अधिक गतिमान झाली आहे. प्रस्तुत प्रबंधासाठीचे संशोधन हासुध्दा स्थानिक इतिहासाचा एक प्रकल्प आहे.

१.१ विषयाची निवड

१. 'कोपरगाव परिसराचा इतिहास स्थानिक इतिहास' (इ.स. १६०० ते २०००) हा विषय पीएच्.डी. च्या संशोधन प्रबंधासाठी निवडण्याची विविध कारणे आहेत. कोपरगाव शहरास मोठी प्राचीन व मध्ययुगीन सांस्कृतिक परंपरा आणि इतिहास आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव हे शहर गोदावरी नदीच्या तीरावर १९°५४ उत्तर अक्षांश व ७३° ३३, पूर्व रेखांशावर वसले आहे. गोदावरी नदीचा उल्लेख प्राचीन साहित्यामध्ये आढळतो.

२. महाराष्ट्राचे आद्य सम्राट सातवाहन यांच्या राजवटीमध्ये 'हाल' नावाचा एक राजा होऊन गेला. हाल राजाने लिहिलेल्या 'गाथा सप्तशती' या ग्रंथामध्ये हा उल्लेख आला आहे. कोपरगाव बेट ही लहान मात्र प्राचीन व पौराणिक वारसा असलेली वसाहत आहे. गोदावरी नदीने आपले पात्र बदलल्यामुळे त्यास 'बेट' ही संज्ञा प्राप्त झाली.

३. याच बेटामध्ये श्री कचेश्वर, श्री विष्णू व शुक्लेश्वर इत्यादी देवतांची मंदिरे आहेत. कोपरगावच्या पश्चिमेकडील जेऊर या गावी मंदिर स्थापत्याचा मोठा वारसा आहे. एकंदरीतच कोपरगाव शहरास सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक प्रगतीचा वारसा लाभला आहे. भारतीय मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना मंदिरांच्या रुपाने कोपरगावमध्ये अस्तित्त्वात आहे.

४. कोपरगावच्या पूर्वेस कोकमठाण या गावी जगदंबा देवीचे मंदिर आहे. इ.स. च्या तेराव्या शतकात हे मंदिर बांधले आहे.[१५] या मंदिराच्या भिंती प्रस्तर आणि शिखर विटांच्या साह्याने बांधले आहे. गर्भगृह तारकाकृती असून ते दोन विभागांमध्ये आहे. मंदिराचे वैशिष्ट्ये म्हणजे त्याच्या मंडपास खांब नाहीत. दोन्ही गर्भगृहांच्या प्रवेशद्वारावर गरुडमूर्ती, अंतराळाच्या रथिकांवर देवीच्या मूर्ती आहेत. याच प्रकारची अनेक देवतांची मंदिरे कोपरगाव परिसरात आहेत. या सर्व मंदिर स्थापत्याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये अभ्यास अपेक्षित आहे.

५. मध्ययुगीन इतिहासाच्या मोठ्या परंपरेसाठीही कोपरगावचा परिसर प्रसिद्ध आहे. इ.स. १४८४ ते १५२७ या कालखंडात बहमनी राज्याचे विभाजन होऊन बिदरची बरीदशाही, वऱ्हाडची इमादशाही, विजापूरची अदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही या पाच शाह्या निर्माण झाल्या. अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये कोपरगावचा समावेश होता.

६. मोगल राजवटीमध्ये व पुढे पेशवाईमध्ये कोपरगावला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. अशाप्रकारे कोपरगाव परिसरास पेशवे राजवटीचा इतिहास लाभला आहे.

७. पेशवाईच्या अखेरच्या टप्प्यामध्ये पेशव्यांची सत्ता टिकविण्यासाठी ज्या ज्या प्रमुख मराठी सरदारांनी प्रयत्न केले त्यामध्ये त्रिंबकजी डेंगळे या सरदाराचे मोठे योगदान होते. त्रिंबकजीचा कोपरगावाशी संबंध असल्याची पुष्कळ मोडी अप्रकाशित पत्र उपलब्ध झाली आहेत. या विविध घटना कोपरगावच्या इतिहासाशी निगडीत असल्याने कोपरगाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर होते, ही बाब स्पष्ट होते.

८. पुणे येथील शासकीय अभिलेखागारामध्ये कोपरगावाविषयीची माहिती देणारी मोडी कागदपत्रे उपलब्ध आहेत. ही अप्रकाशित कागदपत्रे प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासली आहेत.

९. कोपरगावच्या समग्र इतिहासाची माहिती देणारे संशोधन आजपर्यंत झालेले नाही. पुणे शासकिय अभिलेखागारामध्ये कोपरगाव विषयीच्या माहितीचे चिटणीसी दफ्तरात २० रुमाल, संशोधनासाठी निवडलेल्या कागदपत्रांध्ये ३२ रुमाल व त्यामधील विविध पुडक्यांमध्ये मोडी कागदपत्रे आहेत. ही सर्व कागदपत्रे कोपरगावच्या ग्रामीण जीवनाचा तपशीलवार अभ्यास करण्यास उपयुक्त आहेत.

१०. भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये कोपरगावाचाही सहभाग असल्याचे पुरावे आहेत. सविनय कायदेभंग आंदोलन आणि १९४२ च्या चले जाव चळवळीमध्ये कोपरगावजवळच्या राहता या गावी प्रक्षुब्ध जमावाने पोलीस स्टेशनवर नेलेला मोर्चा, पोलीस अधिकाऱ्यास केलेली दुखापत इत्यादी सर्व बाबी सूक्ष्मपणे अजून अभ्यासलेल्या नाहीत.[१७]

११. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरण बांधले. तेथून काढलेल्या कालव्याद्वारे शेतीस पाणीपुरवठा झाला. कोपरगावमधील शेतीचे रुपांतर आता बागायती शेतीत झाले. सर्वत्र ऊस लागवड होऊन साखर व गुळ उत्पादन वाढले. 'गुळाची बाजारपेठ' म्हणून कोपरगाव नावारूपास आले.

१२. कोपरगाव तालुक्यामध्ये १९३८ साली पहिला खाजगी तत्वावरील साखर कारखाना सुरु झाला. १९५७ साली सहकारी तत्त्वावरील साखर कारखाना उभा राहिला. अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात कोपरगावचा परिसर आर्थिक, सामाजिक, राजकीय शक्तीचे केंद्र म्हणून विकसित झाले आहे.

१३. प्रस्तुत संशोधकाने या विषयाची निवड करेपर्यंत 'कोपरगावचा स्थानिक इतिहास' या विषयासंबंधी कोणतेही संशोधनपर लेखन झालेले नाही. त्यामुळे या विषयाची निवड केली आहे.

१४. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. कोपरगावच्या स्थानिक इतिहास लेखनाने प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासलेखनात भर पडू शकेल. हा दृष्टीकोन कोपरगावचा स्थानिक इतिहास लिहिताना ठेवला आहे.

१५. कोपरगावच्या स्थानिक व समग्र इतिहासलेखनाने अहमदनगर जिल्ह्याच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या प्राचीन ते आधुनिक इतिहासलेखनात भर पडेल असा आशावाद याठिकाणी ठेवला आहे.

१६. कोपरगावशी निगडीत राघोबादादाचा संबंध व त्याच्या वाड्यातील वास्तव्याशी, व्यवहाराशी निगडीतच कागदपत्रे व घटना आतापर्यंत ज्ञात आहेत. याव्यतिरिक्त अप्रकाशित असलेला कोपरगावचा इतिहास पहिल्यांदाच मांडण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

१७. संभाजी महाराजांच्या कालखंडातील विविध मराठी सरदारांचे, पेशवेकाळातील पेशव्यांचे कोपरगावमधील विशेष राघोबादादा, आनंदीबाई व दुसरा बाजीराव यांचे कोपरगावमधील वास्तव्य, कोपरगावचे भौगोलिक, लष्करी व धार्मिक महत्त्व इत्यादीविषयी अधिक माहिती व्हावी या हेतूने याविषयाची निवड केली आहे.

१८. ब्रिटिशकालीन कोपरगाव, कोपरगावमध्ये नगरपरिषदेची स्थापना, या शहराच्या

आधुनिकीकरणातील स्थित्यंतराचा प्रवास याविषयीची माहिती स्थानिक लोकांना ज्ञात व्हावी यासाठी या विषयाची निवड केली आहे.

१९. मध्ययुगीन कोपरगाव ते आजचे कोपरगाव यांमधील सर्वंकष बदलांचा व त्यावेळच्या महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी सदर विषय उपयुक्त ठरू शकेल.

कोपरगाव संदर्भातील आजपर्यंतच्या साहित्याचे परिशीलन :-

कोपरगाव परिसराचा इतिहास (१६००-२०००) या विषयाचा आढावा तसेच विषय निवडीची उद्दिष्ट्ये स्पष्ट केल्यावर अशा स्वरुपाचा कोपरगाव संदर्भात झालेला अभ्यास आणि संशोधनाचा गोषवारा देणे अधिक योग्य होईल. हा गोषवारा पुढीलप्रमाणे -

१. डॉ. तानाजी हनुमंतराव निकम यांनी 'कोपरगावमधील पेशव्यांचे वाडे' असा एक लेख लिहिला आहे. या लेखामध्ये त्यांनी फक्त पेशवा राघोबादादाचा वाडा या एकाच घटकाचा अभ्यास केला आहे. कोपरगावच्या इतिहासविषयक कोणत्याच पैलूची त्यामध्ये माहिती नाही.[१८]

२. अपर्णा बोरावके यांनी 'पेशवेकालीन कोपरगाव' असा एक लेख लिहिला आहे. आहे. त्यामध्ये कोपरगावमधील पेशव्यांची राजवट साधारणपणे विशेषतः राघोबादादा व आनंदीबाई यांची कारकीर्द मांडली आहे. हा लेख १७९२ पर्यंतच्या ऐतिहासिक माहितीचा आहे. १७९२ ते १८१८ पर्यंतच्या कालावधीचा त्यात उल्लेख नाही. मात्र या लेखास तळटिपा देताना संदर्भग्रंथांची नावे लेखाच्या शेवटी दिली मात्र त्यांचे पृष्ठ क्रमांक दिले नाहीत त्यामुळे प्रस्तुत लेखामध्ये अचूकता नाही.[१९]

३. कोपरगावमधील के. जे. सोमय्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय छात्रसेनेचे माजी विभाग प्रमुख कॅप्टन सी. ए. कुलकर्णी यांनी 'संजीवनी भूमी कोपरगाव' हा लेख गोदातरंग या अंकामध्ये लिहिला. मात्र तो निव्वळ माहितीपर असून त्याला ऐतिहासिक संशोधनपद्धतीचा आधार नाही.[२०]

सारांश, कोपरगाव परिसराच्या समग्र इतिहासावर प्रकाश टाकणारे अप्रकाशित कागदपत्रांच्या साह्याने कोणतेही संशोधन झालेले नाही. म्हणूनच प्रस्तुत विषय संशोधनासाठी घेतला आहे.

प्रबंधाची संक्षिप्त रूपरेषा

प्रस्तुत प्रबंधाची विभागणी पाच प्रकरणांमध्ये केली आहे. पहिले प्रकरण प्रास्ताविक स्वरूपाचे आहे. या प्रकरणामध्ये इतिहासाची व्याख्या, संकल्पना, व्याप्ती, नवीन प्रवाह, विषयाची स्थलकाल मर्यादा, प्रादेशिक इतिहास आणि स्थानिक इतिहासलेखन प्रवाह इत्यादी मुद्यांविषयी मांडणी केली आहे. कोपरगाव परिसराच्या इतिहास संशोधन प्रकल्प हा स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाचा एक भाग आहे. संशोधनासाठी निवडलेल्या कालखंडातील ऐतिहासिक कागदपत्रांची उपलब्धता, विविध रुमाल आणि विषयाची निवड करण्यामागील उद्दिष्ट्ये इत्यादी मुद्यांविषयीची मांडणी पहिल्या प्रकरणामध्ये केली आहे.

दुसऱ्या प्रकरणात कोपरगावच्या परिसराचा शिवकालापासून ते पेशवेकाळापर्यंतच्या इतिहासाचा आढावा घेतला आहे. मध्ययुगातील बहमनी राज्यामुळे निर्माण झालेल्या शाह्यांपैकी अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना, त्यावेळचा परगणा म्हणून कोपरगावचा कारभार, निजामशाहीतील विविध सरदारांचा कोपरगावाशी आलेला संबंध, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाची मांडणी, तत्कालीन बांधकामे, विविध राजकीय, धार्मिक घडामोडींची माहिती अप्रकाशित मोडी कागदपत्रांच्या साह्याने दिली आहे.

पेशवेकाळातील पेशवे व सरदारांचे कोपरगावमधील वास्तव्य, कोपरगाव व हिंगणी गावातील पेशव्यांचे वाडे, कोपरगावमधील पेशवेकालीन बांधकामे इत्यादी घटकांची मांडणी केली आहे.

प्रबंधाचे तिसरे प्रकरण 'आधुनिक कोपरगाव' या शीर्षकाचे आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये १९०० ते २००० या कालावधीमधील कोपरगावच्या इतिहासाचा आढावा घेतला आहे. विविध ऐतिहासिक घटनांना तोंड देऊन मध्ययुग ते आधुनिक युग असे कोपरगावचे स्थित्यंतर कसे घडून आले याविषयीची चर्चा केली आहे. आधुनिक कोपरगावच्या विकासाचे टप्पे, कोपरगावची शैक्षणिक प्रगती, साजरे केले जाणारे विविध उत्सव, शेती व्यवसायातील

प्रगती, विविध वैद्यकिय सेवा पुरविणाऱ्या संस्था, ख्रिस्ती मिशनरी चर्चने कोपरगावमध्ये राबविलेली शुभवर्तमानवादी चळवळ, ब्रिटीशकालीन व स्वातंत्र्योत्तर कोपरगावबाबत ऐतिहासिक, सामाजिक संदर्भाच्या साह्याने मांडणी केली आहे.

तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात पेशवा दुसरा बाजीराव पराभूत झाल्यावर महाराष्ट्रात इंग्रजी राजवट प्रस्थापित झाली. पेशवाई संपून ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य महाराष्ट्रात सुरु झाल्यावर काही भौतिक व सामाजिक-सांस्कृतिक बदल घडणे अपरिहार्य होते. एलफिन्स्टनने महाराष्ट्रात अनेक नव्या प्रथा सुरु केल्या व नव्या कल्पना राबवल्या. एत्देशियांना त्या पटल्याच असे नाही तर त्यांनी इंग्रजविरोधी उठाव केले. इंग्रजांच्या राजवटीमध्ये शासकीय धोरणे, पाश्चात्य शिक्षण, एत्देशीयांचे आत्मपरिक्षण व नव्या ऐहिक आकांक्षा यांमुळे महाराष्ट्रात नव्या बौद्धीक-सांस्कृतिक घडामोडींना वेग आला. या सामाजिक व सांस्कृतिक घडामोडींचा तपशीलवार विचार प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये केला आहे.

१९२० मध्ये गांधीजींनी सुरु केलेले असहकार आंदोलन, १९३० चे सविनय कायदेभंग आंदोलन आणि १९४२ चे चले जाव आंदोलन या तीनही आंदोलनांमध्ये विशेषतः १९४२ च्या आंदोलनामध्ये कोपरगावकरांचा सहभाग इत्यादींचा आढावा घेतला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात कोपरगावची ओळख आता सहकारी चळवळीचे क्षेत्र अशी झाली आहे. गणपतराव औताडे, के. बी. रोहमारे, रावसाहेब बोरावके, बापूसाहेब जगताप, बाबुराव कडू, आप्पासाहेब देवकर, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, काशिनाथ पाटील धनवटे, धोंडीबा धारमाळकर, नामदेवराव परजणे, काका कोयटे इत्यादींच्या कार्याने वाढले आहे. या सर्वांची तपशीलवार मांडणी प्रबंधाच्या चौथ्या 'कोपरगावमधील सहकार चळवळ' या प्रकरणात केली आहे.

पाचवे प्रकरण समारोपाचे आहे. त्यामध्ये प्रबंधातील मांडणीचे सिंहावलोकन करुन संशोधनाचे निष्कर्ष मांडले आहेत.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी विविध प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे. प्राथमिक साधनांमध्ये चिटणिसी दफ्तरातील कागदपत्रे, संशोधनासाठी निवडलेले ५५०

अप्रकाशित कागदपत्रे , शाहू दफ्तर, जमाव दफ्तर इत्यांदीमधील अप्रकाशित कागदपत्रांचा समावेश आहे. प्रकाशित प्राथमिक साधनांमध्ये Epigraphia Indica, शाहू महाराजांची रोजनिशी, सर्व पेशव्यांच्या रोजनिश्या, शासकीय अहवाल, पेशवे दफ्तर, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, ऐतिहासिक फार्सी साहित्य, बादशाहनामा, मासिरे आलमगीरीचा अनुवाद, फुतूहाते-इ-आदिलशाहीचा अनुवाद, इंडो-इस्लामिका, इनाम कमिशनमधील कागद इत्यादी साधनांचा उपयोग केला आहे.

दुय्यम साधनांमध्ये प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशा विविध संदर्भग्रंथांचा समावेश आहे. प्रबंधासाठी उपयोगात आणलेल्या सर्व प्राथमिक व दुय्यम साधनांची सूची प्रबंधाच्या शेवटी दिली आहे. तसेच स्वतंत्रपणे परिशिष्टांमध्ये कोपरगाव तालुक्याचा नकाशा दिला आहे. तसेच काही अस्सल कागदपत्रेही दिलेली आहेत.

विषयाची स्थल, कालमर्यादा

'कोपरगाव परिसराचा स्थानिक इतिहास' (१६००-२०००) या शीर्षकामध्ये कालखंडाचा बोध होता. मात्र अधिक नेमकेपणाने सांगायचे झाल्यास साधारणपणे बहमनी राज्याच्या विघटनानंतर, शिवकाळ ते आधुनिक म्हणजे इ.स. २००० पर्यंतचा इतिहास या अभ्यासात समाविष्ट आहे.

कोपरगाव परिसरातील ऐतिहासिक स्थळे, मंदिरे, कृषीव्यवसाय, सहकार चळवळ, औद्योगिक विकास, व्यापारी संबंध इत्यादींची माहिती प्रस्तुत प्रबंधामध्ये आलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टये

१. कोपरगावच्या स्थानिक इतिहासाची ओळख संशोधकांना व आगामी काळातील अभ्यासकांना व्हावी.

२. नव्या पिढीस आपल्या गावाच्या इतिहासाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याची जाणीव प्रस्तुत इतिहासलेखनामधून करुन देणे.

३. कोपरगाव परिसरातील लोकांना आपल्या स्थानिक इतिहासाची, कोपरगावमधील पेशव्यांचा वाडा, मंदिरवास्तूकला, शेती, औद्योगिकीकरण इ. घटकांची ओळख करुन देणे.

४. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील कोपरगावचे लष्करी महत्त्व अधोरेखित करणे.

५. कोपरगावच्या स्थानिक इतिहास मांडणीतून अहमदनगर जिल्हा पर्यायाने प्रादेशिक इतिहासामध्ये भर घालणे.

६. कोपरगावमधील कचेश्वर मंदिर, कोकमठाणचे मंदिर यांचा अज्ञात असणारा इतिहास ज्ञात करुन देणे.

७. आधुनिक कोपरगावमधील बँका, पतसंस्था, सहकारी सोसायटी, वाचनालय इत्यादीं बाबतची माहिती उपलब्ध करुन देणे.

८. राघोबादादाच्या वाड्याचा इतिहास व तेथील पेशवेकालीन घडामोडींची माहिती करुन देणे.

९. कोपरगावच्या स्थानिक इतिहासामध्ये रोहमारे, औताडे, काळे, कोल्हे, कोयटे, बोरावके, सातभाई, परजणे या घराण्यांनी दिलेल्या योगदानाचा परिचय करुन देणे.

१०. कोपरगाव शहराच्या आधुनिकीकरणाच्या पूर्वीचा इतिहास वाचकांना ज्ञात करुन देणे.

११. पेशवेकाळात त्रिंबकजी डेंगळे यांनी कोपरगावचा कारभार उत्तमरित्या सांभाळला. होता. त्याची अप्रकाशित कागदपत्रांच्या आधाराने ऐतिहासिक मांडणी करणे.

१२. दुसऱ्या बाजीरावाचे वास्तव्य, चिमाजीच्या लग्नाचा हिशोब, दानधर्म, वास्तूंच्या बांधकामविषयक, ग्रंथालय उभारणीच्या सविस्तर नोंदी मोडी कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहेत. त्या प्रथमच मांडणे.

१३. माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनचे कोपरगावमधील वास्तव्य, त्याचा कोपरगावशी संबंधित कारभाराच्या नोंदी इ. चा अभ्यास मांडणे.

१४. कोपरगावच्या स्थानिक इतिहासाची मांडणी करताना आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतराचा आढावा घेणे.

कोपरगावच्या स्थानिक इतिहासाचे संशोधन करताना वरील हेतू व उद्देश ठरविण्यात आले आहेत.

संशोधनाची गृहितके

१. कोपरगाव परिसर धार्मिक, पौराणिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

२. कोपरगाव परिसराला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

३. पेशवे कालखंडात राजकीय व लष्करीदृष्ट्या कोपरगावला महत्त्व प्राप्त झाले होते.

४. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये कोपरगावमधील नागरिकांचा भरीव सहभाग होता.

५. सहकार चळवळ अल्प कालावधीतच कोपरगाव परिसरामध्ये रूजली आहे.

६. सहकार चळवळीमधून कोपरगाव परिसरातील ग्रामीण नेतृत्त्वाचा उदय झाला आहे.

७. कोपरगाव परिसराला दारणा धरणामधून पाटपाणी मिळाल्यामुळे या क्षेत्राचा संपूर्ण कायापालट झाला आहे.

८. कोपरगावच्या आर्थिक विकासाबरोबरच येथे सामाजिक विकास घडून आला आहे.

९. पर्यटन व्यवसायाच्यादृष्टीने हा परिसर अनुकूल आहे.

संशोधन पद्धती

ऐतिहासिक संशोधनामध्ये संदर्भ साधने गोळा करण्यासाठी, ती लिप्यंतरीत करण्यासाठी विविध संशोधनपद्धतींचा वापर केला जातो. इतिहास एक सामाजिक शास्त्र असल्याने सामाजिक शास्त्रामध्ये प्रचलीत असलेल्या संशोधन पद्धतींचा वापर प्रस्तुत संशोधनामध्ये केला जाणार आहे. या संशोधन कार्यासाठी प्रामुख्याने सर्व्हेक्षण, प्रश्नावली, मान्यवरांच्या मुलाखती, ऐतिहासिक वास्तूंना क्षेत्रभेटी, पुणे, व मुंबई याठिकाणच्या शासकीय अभिलेखागारातील ऐतिहासिक कागदपत्रे मिळविणे इ. पद्धतींचा वापर करण्याचे योजिले आहे.

१. सर्व्हेक्षण पद्धत-

कोपरगाव परिसरातील ऐतिहासिक वास्तूंना भेटी देऊन त्यांची माहिती गोळा केली. उदा. राघोबादादा व आनंदीबाई यांचा कोपरगावमधील व हिंगणीचा वाडा. याठिकाणी

प्रत्यक्ष भेटी दिल्यावर समजले की, कोपरगावचा वाडा आता मोडकळीस आला आहे. हिंगणीचा वाडा मात्र अपूर्ण आहे. त्याच्या केवळ तीन महाकाय भिंती उभ्या आहेत. बेटामधील पेशव्यांचा वाडा इंग्रजकाळातच पाडण्यात आला असून आता केवळ त्याचे अवशेष आहेत.

कोपरगाव परिसरातील दुसरी महत्त्वाची ऐतिहासिक वास्तू म्हणजे कोकमठाण, बेट, जुनी गंगा, जेऊर, कुंभारी येथील मंदिर समूह, राघोबादादाने उभारलेली लहान लहान मंदिरे ही मराठा स्थापत्यशैलीची उत्तम उदाहरणे आहेत. जुनी गंगा येथील जनार्दन स्वामींचे समाधी मंदीर व काशीविश्वेश्वराचे मंदिर त्याचप्रमाणे देवीचे मंदिर या ऐतिहासिक वास्तू स्थापत्यशास्त्रीयदृष्ट्या आजही उत्तम आहेत. कोपरगाव परिसरातील मंदिरांची प्रवेशद्वारे लहान गर्भगृह मात्र विशाल आहे. बांधकामात काळ्या दगडांचा वापर आणि काशिविश्वेश्वराच्या मंदिरासाठी लाल संगमरवरी दगडांचा वापर हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. या सर्व बाबींची माहिती सर्व्हेक्षणामधून मिळाली. सर्व्हेक्षणामधून आणखी पुढील बाबींची माहिती मिळाली.

१. परिसरातील मंदिरे कोणत्या कालावधीत बांधली.
२. याच मंदिरस्थापत्यशैलीची मंदिरे इतरत्र कोठे पहावयास मिळतात.
३. मंदिर व वाड्यांच्या वास्तूंची रचना कशी आहे.
४. कोकमठाणचे मंदिर इतर मंदिरांपेक्षा प्राचीन व भक्कम आहे.
५. राघोबादादाने वाड्याच्या बांधकामासाठी वापरलेले सागाचे लाकूड आजही सुस्थितीत आहे. लाकडावरील नक्षीकामावर मराठा चित्रकलेची मोहोर स्पष्टपणे दिसते.
६. उत्तर मराठा चित्रशैलीमध्ये कोणत्या प्रकारचे रंगकाम केलेले आहे.

या सर्व बाबींची माहिती वास्तूंच्या अभ्यासामधून मिळविली आहे.

प्रश्नावली पद्धती

प्रस्तुत प्रबंधासाठी प्रश्नावली पद्धतीचाही वापर केला आहे. प्रबंधामधील आधुनिक कोपरगाव व कोपरगावमधील सहकारी चळवळ या दोन प्रकारणांची मांडणी करण्यासाठी प्रश्नावली तयार करून ती योग्य त्या व्यक्तीकडून भरून घेतली आहे. कोपरगावमधील निवडणुका, स्थानिक राजकारण, कारखाना उभारणीतील लोकांचे योगदान, शिक्षणाचा प्रसार, अभियांत्रिकी शिक्षणाची सुविधा, स्थानिक इतिहासाची माहिती, ऐतिहासिक घराण्यांची कागदपत्रे इत्यादींची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली पद्धतीचा वापर केला आहे.

मुलाखत पद्धत

कोपरगावच्या विकासामध्ये रोहमारे, औताडे, नरोडे, वहाडणे, आढाव, कोऱ्हाळकर, सातभाई, काळे, फरांदे, सोमव्या, कोल्हे, परजणे, मुंदडा, कोयटे, ठोळे, गवारे, राठी, बोरावके इत्यादी परिवारांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. आधुनिक कोपरगावच्या जडणघडणीची मांडणी करताना निवडक व्यक्तींच्या योगदानाची माहिती मिळविण्यासाठी त्यांच्या मुलाखतीही घेतल्या आहेत. कोपरगावचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक मामा गवारे, शंकरराव कोल्हे, शंकरराव काळे, के. बी. रोहमारे यांच्याविषयीची माहिती मुलाखतीद्वारे मिळविली आहे.

मुलाखतीमधून मिळविलेली माहिती पुरावा म्हणून प्रबंधामध्ये समाविष्ट करण्यापूर्वी इतर समकालीन साधनांमधून तिची विश्वसनियता तपासून पाहिली आहे.

क्षेत्रभेट पद्धत

कोपरगाव परिसराच्या स्थानिक इतिहासाची मांडणी करताना तो इतिहासाच्या नूतन प्रवाहांपैकी एक आहे. स्थानिक इतिहासात भर पडली तर ती आपोआपच प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहास मजकूरामध्ये भर घालणारी ठरते. याविषयीचे भान याठिकाणी ठेवले आहे. स्थानिक इतिहासलेखन प्रकारामध्ये ऐतिहासिक वास्तूंचा इतिहास लिहिताना त्या सर्व स्थळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत. महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे घेतली आहेत. ती प्रबंधाच्या परिशिष्टांमध्ये समाविष्ट केली आहेत.

संदर्भ साधने

कोपरगाव परिसराच्या इतिहासासाठी विविध शासकिय अभिलेखागारामध्ये मोडी लिपीतील अप्रकाशित साधने उपलब्ध आहेत. त्यांची यादी पुढीलप्रमाणे -

पुणे शासकीय अभिलेखागारामधून शोध घेतला असता चिटणीसी दफ्तरातील रुमाल १, २, ४, ५, ६, ७, ९, १०, ११, १२, १३,१४, १५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३५, गो. स. सरदेसाई यांनी संपादीत केलेल्या पेशवे दफ्तराच्या पंचेचाळीस खंडांपैकी खंड २, ९, १०, १३, १६,१७, १९, ४३ आणि छत्रपती शाहू दफ्तरातील रुमाल क्र. ५, ८, १०, १३, १४, २५, २६, संशोधनासाठी निवडलेल्या कागदपत्रांमध्ये रुमाल क्र. १, २, ८, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २४, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३४, ३६, ३८, ४०, ४२, ४४, ४८, ४९, ५०, ५६, ५७, ५८, ५९ ही कागदपत्रे प्रस्तुत संशोधकाने मिळवून त्याचे लिप्यंतर प्रबंधामध्ये योग्य तेथे वापरले आहे.

राष्ट्रीय इतिहास (National History)

इतिहास हा प्रवाही आहे. तो कालक्रमानुसार बदलत असतो. प्रत्येक वास्तूस, देशास, इतिहास परंपरा असते. तिचा अभ्यास करणे. हे इतिहासामध्ये अभिप्रेत आहे.राष्ट्रीय इतिहास हा संपूर्ण देशाचा इतिहास असला तरी तो अनेक प्रादेशिक घटक इतिहासाच्या साह्याने तयार होत असतो. म्हणून प्रत्येक देशाचा इतिहास हा त्या देशाचे, राज्याचे प्रतिबिंब असते. देशातील विविध प्रादेशिक घटकांच्या आधारे राष्ट्रीय इतिहास साकारला जातो. म्हणून राष्ट्रीय इतिहासाबरोबरच प्रादेशिक इतिहासालाही महत्त्व आहे.

प्रादेशिक इतिहास (Regional History)

इतिहास हा अतिव्याप्त विषय आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी वेगवेगळ्या प्रकारे त्याची विभागणी केली जाते. उदा. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशी काळाच्या निकषावर केली जाणारी विभागणी. अशीच स्थलाच्या निकषावर केली जाणारी विभागणी म्हणजे जागतिक इतिहास, राष्ट्रीय इतिहास, प्रादेशिक इतिहास आणि स्थानिक इतिहास. प्रादेशिक इतिहास व विशेषतः त्याचा पोटविभाग म्हणता येईल असा स्थानिक इतिहास प्रस्तुत प्रबंधाशी संबंधीत असल्याने त्या दोहोंचा आता विचार करू.

डॉ. राजा दीक्षित यांनी 'प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संदर्भ' या लेखात 'प्रादेशिक इतिहास' या संकल्पनेची पद्धतशीर मांडणी केलेली आहे.[२१] ते म्हणतात, ''भव्य एकत्वाशी जोडलेल्या 'विभागा'च्या अतिविशिष्टत्वाचा वेध प्रादेशिक इतिहास घेतो.... इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोहोंचा वेध असतो. त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो.''[२२]

त्यांनी म्हटल्याप्रमाणे, '''प्रदेश' ही संकल्पनासुद्धा अधिक काटेकोरपणे निश्चित केली पाहिजे. 'सीमाबद्ध भूभाग' अशी प्रदेशाची व्याख्या करता येईल. 'प्रदेश' म्हटला की सीमा आल्या, दिशा आल्या, नकाशाबद्धता आली. याचा अर्थ, प्रदेश ही मूलत: भौगोलिक संज्ञा आहे; पण प्रदेशाचा निव्वळ भौगोलिक विचार अपुरा ठरतो. इतिहासाच्या अभ्यासात भौगोलिकतेच्या जोडीला मानसिकतेचा घटकही विचारात घ्यावा लागतो. 'प्रदेश' नावाच्या ऐतिहासिक प्रवर्गाला जशी भौगोलिक, तशीच मानसिक सीमाबद्धता असते. प्रत्येक प्रदेशाला त्याची अशी एक मानसिकता असते, अस्मिता असते, संस्कृती (निदान उप-संस्कृती)

असते. इतिहास ही एका अर्थाने आपली अस्तित्व-ओळख असते, आत्मशोध असतो, आत्मबोध असतो. एकदा हे लक्षात घेतले की, प्रादेशिक इतिहासाचे महत्त्व किती अनन्यसाधारण आहे हे पटू शकते. 'जननी आणि जन्मभूमी या स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ होत' अशा अर्थाचे एक संस्कृत वचन आहे. 'जन्मभूमी' म्हटले की, जागतिक संदर्भात आपण आपल्या देशाचा उल्लेख करतो आणि तो योग्यही आहे. पण 'जन्मभूमी' हा शब्द उच्चारताना आपले जन्मगावसुद्धा स्वाभाविकपणे आपल्या मनात असते. 'गाववाले' म्हणून दोन व्यक्ती एकमेकांचे नाते पुकारतात तेव्हा त्याला मातीचा सुगंध असतो. हे मातीतले रुजलेपण फार महत्त्वाचे आहे. देशाची माती आपल्याला प्यारी असते. गावची माती ही देशाच्या मातीचाच एक भाग असते; गावच्या मातीची म्हणून एक खास ऊब आपल्याला जाणवते. ऐतिहासिक संदर्भात आपल्या प्रादेशिकतेची सुरुवात गावापासून होते. (म्हणूनच स्थानिक इतिहासाला प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणता येईल.) पण ही प्रादेशिकता गावाच्या भौगोलिक सीमा ओलांडून विभागाच्या सांस्कृतिक सीमांमध्ये पसरते. म्हणून प्रादेशिक इतिहासाची मांडणी करताना मुळात त्याच्या सांस्कृतिक सीमा ठरवाव्या लागतात. असे सीमांकन हा विशिष्टतेचा शोध असतो; त्याला संकुचितपणा म्हणणे गैर आहे. छोट्या अस्मितांचे मोठ्या अस्मितेशी सदैव भांडण असते, असे मानण्याचे कारण नाही. अनेकदा मोठ्या अस्मितेच्या पोटात छोट्या अस्मिता सुखाने नांदत असतात.... या गोष्टींचे पूर्ण द्वैत नाही; पण पूर्ण अद्वैतही नाही. हा सारा एक विशिष्टाद्वैताचा खेळ आहे. तो निकोप पद्धतीने खेळण्याचे पथ्य पाळले तर प्रादेशिक इतिहासाचा समृद्ध आविष्कार पाहायला मिळू शकतो. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय इतिहासाला समृद्धी आणण्यातही त्याचा हातभार लागू शकतो.''[२३] ''प्रादेशिक इतिहासात भौगोलिकतेला महत्त्व असले तरी मानसिकता व संस्कृती अधिक महत्त्वाची असते.''[२४] डॉ. राजा दीक्षित यांनी 'प्रादेशिक इतिहास हा संकुचित प्रादेशिकतावादी (parochial) असता कामा नये हे महत्त्वाचे पथ्य' अधोरेखित केले आहे.[२५]

इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी इतिहासाचे विविध प्रकारांमध्ये विभाजन करण्याचे महत्त्वाचे कार्य अनेक विद्वानांनी केले. उदाहरणार्थ, हेन्री कॉमेजर, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे इ. वि. का. राजवाडे यांनी 'देशिक' हा इतिहासाचा प्रकार सुचविला. हा प्रकार म्हणताना त्यांना प्रादेशिक इतिहासप्रकारच अभिप्रेत होता.[२६] इतिहास अभ्यासाचे राजकीय, धार्मिक, सामाजिक, प्रादेशिक व स्थानिक इत्यादी प्रकारही अस्तित्वात आहेत. स्थानिक

इतिहास हा उदयोन्मुख इतिहासप्रकार स्थानमाहात्म्य उलगडून दाखविणारा असल्याने इतिहासलेखनात मानाचे स्थान मिळवून बसला आहे.

इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजामधील प्रत्येक घटकाचा वाटा असतो. प्रत्येक स्तरातील व्यक्ती, घटना यांच्या माध्यमातून स्थलकालसापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या माध्यमातूनच राष्ट्राचा एकीकृत इतिहास साकार होत असतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे, तर स्थानिक परिवेशामध्ये सामावलेला असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहास यांच्या साह्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहिला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे . म्हणूनच जागतिक इतिहासाला व राष्ट्रीय इतिहासाला "Macro Study,' तर प्रादेशिक इतिहासाला 'Micro Study' म्हणतात.[२७] या दोन प्रकारांना मराठीत अनुक्रमे 'समग्रलक्ष्यी अभ्यास' व 'अंशलक्ष्यी अभ्यास' म्हणता येईल.

१९५० नंतर महाराष्ट्रात अनेक इतिहासलेखक प्रादेशिक इतिहासलेखनाकडे वळले. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये उपप्रादेशिक अस्मिता वाढू लागल्या. विदर्भ, खानदेश, मराठवाडा, कोकण इ. प्रदेशांचे इतिहास अभ्यासण्याची ओढ स्वाभाविकपणे उद्‌भवली. विद्यापीठीय संशोधनातून अशा अभ्यासाला उत्तेजन मिळू लागले. विसाव्या शतकाच्या संधिकालात प्रादेशिक-स्थानिक इतिहासलेखनाला अधिक चालना मिळाली. महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात त्र्यंबक शंकर शेजवलकरांच्या 'कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमी' (१९६१) या ग्रंथापासून श. गो. कोलारकर - गो. मा. पुरंदरे यांच्या 'विदर्भाचा इतिहास' (१९९७) यासारख्या ग्रंथापर्यंत प्रादेशिक इतिहासलेखनाची एक शृंखला तयार झाली.[२८]

स्थानिक इतिहास (Local History)

डॉ. राजा दीक्षित यांनी प्रादेशिक इतिहासाबद्दल केलेली उपरोल्लेखित मांडणी स्थानिक इतिहासालासुद्धा बऱ्याच प्रमाणात लागू पडते. स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. प्रदेश ही संकल्पना सापेक्ष आहे. स्थानिक इतिहासामध्ये गावाचा इतिहास समाविष्ट केला जातो. परंतु गावाच्या एखाद्या भागाचा किंवा एखाद्या पेठेचा इतिहास हा मुद्दा स्थानिक

इतिहासामध्ये समाविष्ट करता येतो. तसेच एखाद्या विद्यापीठाचा इतिहास हासुद्धा स्थानिक इतिहास म्हणून गणला जाऊ शकतो.

स्थानिक इतिहासामध्ये इतिहास लेखनासाठी निवडलेल्या स्थानाच्या भौगोलिक घटकांप्रमाणे सांस्कृतिक व मानसिक घटकही अतिशय महत्त्वाचे आहेत. डॉ. अरुण टिकेकर यांनी संपादित केलेल्या 'शहर पुणे : सांस्कृतिक संचिताचा मागोवा...', या पुस्तकाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेमध्ये स्थानिक इतिहासाची चर्चा केली आहे.[२९] त्यांनी स्थानिक इतिहासासाठी 'स्थानीय इतिहास' असा शब्दप्रयोग केला आहे. 'स्थानीय इतिहास' अथवा 'Local History' ही पाश्चिमात्य देशांमध्ये प्रगत झालेली व आता मान्यता पावलेली संकल्पना आहे. 'Local History' ही संकल्पना नवीन असली तरी जुन्या काळातील अनेक लेखकांनी शहरांविषयी, सांस्कृतिक केंद्रांविषयी लिहिताना ती अनुसरली आहे. आपल्याकडे स्थलमाहात्म्य सांगणाऱ्या अनेक पोथ्या मिळत होत्या, त्यांचाच हा नवा व शास्त्रीय अवतार म्हणता येईल. त्या पोथ्यांच्या लेखकांनाही 'स्थानीय इतिहासकार' म्हणता येईल. 'Local History' ही पाश्चात्त्य संकल्पना आपल्याकडे रुजली, तेव्हा तिचे मराठीकरण 'स्थानिक इतिहास' असे केले गेले. पण श्री. टिकेकर याबाबत थोडी वेगळी भूमिका घेतात. त्यांच्या मते, 'Local History' या संकल्पनेच्या 'स्थानीय इतिहास' या मराठीकरणात Localised history आणि History of Localities या दोन्ही संकल्पना अंतर्भूत आहेत. म्हणून श्री. अरुण टिकेकर यांना 'स्थानिक इतिहास' या शब्दप्रयोगापेक्षा 'स्थानीय इतिहास' हा शब्दप्रयोग अधिक समर्पक वाटतो.[३०]

प्रत्येक गाव ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे. त्या गावाच्या 'स्थाना'शी संबंध असलेल्या व्यक्तीच्या मते ते गाव ज्यावेळी सुस्थापित झाले त्यावेळेपासून गावाविषयी आणि गावकऱ्यांविषयी जिव्हाळा वाटणे ही स्वाभाविक भावना असल्यामुळे तो प्रत्येकाचा स्वभावधर्म असतो. 'स्थानिक इतिहास' लिहिताना इतिहासकार त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या आधारे शब्दबद्ध करतो, कधी स्वत:च्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करून त्यांच्याकडून वदवून घेतलेल्या 'मौखिक इतिहासा'च्या (Oral History) रूपात मांडतो.

स्थानिक इतिहासाचे लेखन एका अर्थाने भूतकाळामध्ये रमून जाण्याचा छंद आहे. आपल्या गावाच्या किंवा शहराच्या गतकाळाबद्दल तसेच तेथील आपल्या ऋणानुसबंधाबद्दल

आपुलकी, प्रसंगी अभिमान वाटणे ही सहजभावना होय. आपल्या गावाबद्दलच्या काही स्मृती आनंददायक तर काही क्लेशदायक असू शकतात. पण घटना घडून बरीच वर्षे उलटल्यामुळे आनंददायक व क्लेशदायक अशा दोन्ही स्मृतींबद्दल कातरता येत असते. ही स्मृतिकातरता प्रभावी शैलीत पकडण्यावर 'स्थानीय इतिहास'काराचे यश अवलंबून असते.[३१]

गावाचे इतिहासलेखन करताना गावातील वास्तू महत्त्वाच्या ठरतात. त्या इतिहास सांगणाऱ्या असतात. वास्तूंनी त्या त्या काळाचे प्रतिनिधीत्व केलेले असते. एखादी ऐतिहासिक वास्तू पाहताच अंगावर रोमांच उभे राहत असतील तर ते ऐतिहासिक पद्धतीने शब्दबद्ध करावयास हवेत. एडवर्ड गिबन (१७३७-१७९४) हा इंग्रज इतिहासकार १५ ऑक्टोबर १७६४ रोजी रोम शहर पाहण्यासाठी गेला असता तेथील टेकडीवरच्या देवालयाचे भग्नावशेष पाहून त्याच्या मनात रोमच्या ऱ्हासाची कहाणी लिहावी ही कल्पना सुचली. तसे त्याने त्याच्या आत्मचरित्रामध्ये नमूद केले आहे. ते शब्दबद्ध करण्यासाठी त्याने पुढील अनेक वर्षे खर्च केली.[३२]

एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रित राहून त्या स्थानाचे इतिहासलेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहास लेखन करणे होय. भौगोलिकदृष्ट्या प्रादेशिक इतिहास ही इतिहासलेखनाच्या प्रांतातील त्या मानाने नव्याने उदयास आलेली ज्ञानशाखा आहे. मराठी भाषेतील लेखनविश्वात या शाखेची पावले मोठ्या प्रमाणात उमटलेली दिसत नाहीत. तरीही महाराष्ट्रातील इतिहास अभ्यासक, साहित्यिक, पत्रकार व इतर अभ्यासकांनी आपल्या लेखनामधून स्थानिक इतिहासलेखनाला योगदान दिले आहे.[३३] स्थानिक इतिहास लेखनाची दृष्टी आता वाढत आहे.

स्थानिक इतिहास लेखनाचा आढावा

इंग्लंडमध्ये १६ व्या शतकात स्थानिक इतिहासलेखनाची प्रक्रिया सुरू झाली. त्याचवेळी फ्रान्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रास्त्र, संग्रहालय, घराणी इत्यादींचा इतिहास लिहिला जाऊ लागला. १९ व्या शतकात हा लेखनप्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहोचला. अमेरिकेमध्ये १९ व्या शतकामध्ये व्यापारी, उद्योगपती, प्रसिद्ध व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी १८४० मध्ये आपापल्या क्षेत्रातील उद्योग व व्यवसायाचा इतिहास लिहिण्यास सुरूवात केली. इंग्लंडहून येऊन अमेरिकेमध्ये स्थायिक

झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयीच्या स्थानिक इतिहासाची मांडणी केली.[३४]

महाराष्ट्रामध्ये गोविंद नारायण माडगांवकरांचा १८६३ मध्ये प्रसिद्ध झालेला 'मुंबईचे वर्णन' हा ग्रंथ, ना. वि. जोशी यांचा १८६८ मध्ये प्रकाशित झालेला 'पुणे शहराचे वर्णन' हा ग्रंथ यांच्याद्वारे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच मराठीमध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला गेला होता. विसाव्या शतकात ही परंपरा बरीच फोफावली. ना. गो. चापेकर यांचे 'बदलापूर' (आमचा गाव) (१९३३), दे. गो. लांडगे यांचा 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' (१९५४), राजूरकरांचा 'चंद्रपूरचा इतिहास'(१९५६), पु. पां. गोखले यांचा 'जागृत सातारा' (१९६२) या ग्रंथांपासून अरुण टिकेकर (संपादक) व अभय टिळक (सहायक संपादक) यांच्या 'शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा' (२०००) या द्विखंडी मोठ्या प्रकल्पापर्यंत स्थानिक इतिहासाचीही मोठी परंपरा मराठीत आढळते.[३५]

वर उल्लेख केलेल्या प्रकल्पांशिवाय म. श्री. दीक्षित यांनी लिहिलेले 'खेड (राजगुरूनगर)' (२००३)[३६] हे पुस्तक स्थानिक इतिहासलेखनाचे एक उदाहरण आहे. डॉ. राजा दीक्षित यांचा 'पुणे विद्यापीठाचा इतिहास' (१९९९)[३७] आणि अरुण टिकेकर यांचा 'ऐसा ज्ञानसागरु बखर मुंबई विद्यापीठाची' (२००७)[३८] हे दोन्ही ग्रंथ शैक्षणिक स्थानिक इतिहासलेखनाची उदाहरणे आहेत. ही सर्व ग्रंथसंपदा स्थानिक इतिहासलेखन व संशोधनासाठी मार्गदर्शनपर व उपयुक्त आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी, विशेषत: पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व विशेष संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून 'दत्तक गावांचा इतिहास' लिहिण्यास प्रोत्साहन दिले आहे. त्यातून विद्यापीठ कार्यकक्षेमधील विविध गावांचा स्थानिक इतिहास लिहिला गेला आहे. त्याचे आजपर्यंत डॉ. नरेंद्र जाधव व प्रा. गणेश राऊत यांनी संपादित केलेले 'दत्तक गावांचा इतिहास' खंड १ (२००८), खंड २ (२००९) प्रसिद्ध केले आहेत.[३९]

स्थानिक इतिहासाविषयी संशोधन करताना विविध पैलूंचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो. प्रत्येक गावाची स्वत:ची ओळख असते. गावास इतिहास परंपरा असते. ही इतिहास परंपरा व स्थानिक इतिहास शब्दबद्ध करण्यासाठी पुढील मुद्यांचा आधार घेता येईल.[४०]

१. गावाचे वसतिस्थान.

२. पंचक्रोशीतील गावे.

३. गावाच्या चतुःसीमा.

४. गावाची लोकसंख्या.

५. गावाजवळील नदी, तलाव, पाणवठा.

६. गावाच्या नावाची व्युत्पत्ती व व्युत्पत्तीहास.

७. गावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

८. गावाविषयी व घरण्यांची जुनी कागदपत्रे.

९. वीरगळ, शिलालेख, ताम्रपट.

१०. स्वातंत्र्य सैनिकांच्या व वयोवृद्धांच्या मुलाखती.

११. गावातील गढी, वाडे, प्रवेशद्वार.

१२. गावाचा शैक्षणिक विकास.

१३. स्थानिक कुटूंबाची आडनावे व त्यांचा इतिहास.

१४. गावातील विविध गल्ली व पेठांची नावे कशी पडली?

१५. पारंपरिक व्यवसाय व खेळ.

१६. गावाची गृहरचना व गृहरचनेतील कालपरत्त्वे झालेले बदल.

१७. ग्रामसमाजातील बलुतेदारीचे वर्णन.

१८. गावातील स्त्री-जीवन.

१९. स्वातंत्र्योत्तर गावाचा विकास.

२०. ग्रामपंचायत.

२१. ग्रामीण अर्थव्यवस्था.

वरील मुद्यांचा विचार प्रस्तुत प्रबंध लिहिताना करण्यात येणार आहे. या मुद्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे - वर उल्लेख केलेल्या २१ मुद्यांचे वर्गीकरण आपणास पुढील सहा घटकांमध्ये करता येईल.

१. ऐतिहासिक,

२. भौगोलिक,

३. सामाजिक,

४. धार्मिक व सांस्कृतिक,

५. आर्थिक,

६. राजकीय व प्रशासकीय, इ.

१. ऐतिहासिक

या मुद्यामध्ये प्रामुख्याने गावाचे (वा लोकवस्तीचे वा संस्थेचे) ऐतिहासिक महत्त्व, गावाच्या इतिहासाची प्राचीनता व परंपरा, त्याचप्रमाणे गावाच्या नावाची व्युत्पत्ती, गावाशी (वस्तीशी, संस्थेशी) संबंधित पुराणकथा, लोक-समजुती इत्यादींचा अभ्यास करता येईल. कोपरगाव परिसरामध्ये आजही पौराणिक कथा प्रचलित आहेत. कोपरगावामधील बेट विभागामध्ये शुक्राचार्य, कच-देवयानीची कथा प्रचलित आहे. मुळातच 'बेट' हा विभाग गोदावरी नदीने पात्र बदलल्याने तयार झाला आहे. शुक्राचार्यांनी कचेश्वरास संजीवन विद्या शिकविली अशी पौराणिक कथा आजही प्रचलित असून याठिकाणी शुक्लेश्वर व कचेश्वर या देवतांची प्राचीन मंदिरे आहेत. बेटाच्या पूर्वेस संवत्सर येथे महानुभव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामींनी काही कालावधीसाठी वास्तव्य केल्याचे सांगितले जाते. या व अशा पौराणिक कथा व विविध घटनांसाठी गाव प्रसिद्ध असते. हा घटक लक्षात घेऊन स्थानिक इतिहासलेखन करणे शक्य आहे.

२. भौगोलिक घटक

भौगोलिक घटकांमध्ये प्रमुख्याने गावाचे वसतिस्थान, सीमा, गावाजवळून वाहणारी नदी किंवा बांधलेला तलाव, गावातील गढी, वाडे, वेस, प्रवेशद्वारे, गावामधील विविध पेठा, त्या पेठांना मिळालेली नावे इं. च्या साहाय्याने इतिहास लिहिता येईल. उदा. पुण्यामधील पेठांना वारांनुसार नावे आहेत. कोपरगावातील पेठांना कहार गल्ली, शिरोडे गल्ली सोनार गल्ली, खाटीक गल्ली, पांडे गल्ली, सुतार गल्ली इत्यादी नावे आहेत. कहार समाजाची माणसे वास्तव्यास आहेत त्यास कहार गल्ली असे म्हणतात. एखाद्या गावामध्ये ऐतिहासिक वास्तू असते. तिचा स्वतंत्रपणे इतिहास लिहिता येतो. उदा. ' पुणे शहरातील पर्वतीचा इतिहास',[४१] कोपरगावमधील राघोबादादाचा वाडा इत्यादी

३. सामाजिक घटक

गावातील समाजाची रचना, वर्ग/जात/लिंगनिहाय घटक, कुटुंबसंस्था, संस्था, सामाजिक प्रथा इ. घटकांचा अभ्यास महत्त्वाचा असतो. शिक्षणसंस्थेच्या इतिहासातही शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी यांची संख्या, वर्गवारी, परस्पर संबंध इ. घटक विचारात घ्यावे लागतात. गावाचा स्थानिक इतिहास लिहिताना स्त्रियांविषयीचे लेखन करता येईल. स्त्रियांच्या बाबत गावामधील जनजीवन, मुलींचे शिक्षण, हुंडा, प्रथा, विवाहपद्धती इं. ची मांडणी करणे शक्य आहे.

गावामध्ये विविध जमातींचे लोक राहतात. त्यांची आडनावे प्रामुख्याने गोत्र, गाव, व्यवसाय व हुद्दा या घटकांवरून मिळालेली असतात. एखाद्या व्यक्तीचे व्यवसायावरून मूळ आडनाव बदलते. उदा. महात्मा फुले यांचे मूळ आडनाव गोरे. वडिलांचा फुलांचा व्यवसाय होता. त्यावरून त्यांचे आडनाव फुले असे झाले. काहीवेळा व्यक्ती ज्या पदावर काम करते, त्या पदावरून आडनाव प्राप्त होते. उदा. पाटील. प्राचीन काळापासून पाटील हे प्रशासनातील पद होते. पाटील हा शब्द 'पट्टकील, पाटैलु, पाटेल = पाटील' असा बनला आहे. सम्राट अशोकाच्या काळात लिखाणासाठी कापसाचे विणलेले पट्ट वापरत असत. या पट्टांवर जमिनीच्या मालकीची नोंद करत. ते पट्ट कीलकांत म्हणजे वेळूच्या पोकळ कांडात घालून सुरक्षित ठेवत. पट्टकील म्हणजे पट्ट ज्यात ठेवले आहे, ती वेळूची पोकळ कांडे होत. हे पट्टकील ज्याच्या ताब्यात असत त्या गावच्या प्रमुखास पट्टकील म्हणत. पट्टकीलक = पट्टकील. पट्टकीलकचा अपभ्रंश पाटैलु. पाटैलु = पाटील असा अर्थपूर्ण शब्द तयार झाला आहे.[४२]

४. धार्मिक व सांस्कृतिक घटक

या घटकांमध्ये प्रामुख्याने गावातील मंदिर, मशीद इ. प्रार्थना स्थळांविषयीच्या परंपरा, वार्षिक सण, उत्सव, पारंपरिक खेळ इं. चा समावेश करता येईल. गावामध्ये ग्रामदैवतांची वार्षिक यात्रा असते. ही यात्रा गावाच्या आर्थिक घडामोडींचेही केंद्र असते. उदा. कोपरगावजवळील चांदेकसारे गावाची भैरवनाथ देवस्थानची यात्रा. शिर्डीमधील साईबाबांचा यात्रौत्सव. कोकमठाण गावच्या देवीची यात्रा, बेटामध्ये होणारा शिवरात्रीचा उत्सव. अशा प्रकारच्या अनेक यात्रा ग्रामीण भागामध्ये भरतात.

कोकमठाण-संवत्सर गावी यात्रेच्या प्रसंगी एक अनोखा खेळ पहावयास मिळतो. अक्षयतृतियेच्या दिवशी 'गोफणगुंड्याची लढाई' होते. गोदावरी नदीच्या पात्रात येऊन दोन्ही गावचे लोक एकमेकांना गोफणीच्या साह्याने दगड मारतात. अनेक वर्षांपासून ही खेळरूपी लढाई चालू आहे. यादरम्यान मोठी यात्राही भरते. या यात्रौत्सवामधील व्यापारी, आर्थिक उलाढाल, पूजापाठामागील वस्तुस्थिती इत्यादी घटनांचा सविस्तर अभ्यास करता येईल.

गावातील साहित्यिक-सांस्कृतिक संस्था, परंपरा, निर्मिती यांचाही अभ्यास महत्त्वाचा असतो. गावामध्ये विविध उत्सवांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची गाणी म्हटली जातात. उदा. लग्नातील गाणी, नवरदेवास लावण्यासाठीची हळद दळताना, हळद लावताना म्हणावयाची गाणी, वारुळाची गाणी, पहाटेची गाणी, भोंडल्याची गाणी, धनगरी गाणी, आदिवासींची गाणी इत्यादींमधून ग्रामीण जीवनमानाचे प्रतिबिंब अभ्यासता येते. गावचा स्थानिक इतिहास लिहिताना या लहान लहान गोष्टींचाही अभ्यास करणे शक्य आहे.

५. आर्थिक घटक

या घटकामध्ये गावाशी संबंधित आर्थिक वर्गवारी, हितसंबंध व घडामोडींची माहिती लिहिता येईल. विविध व्यवसायांची चर्चा करता येईल. गावाच्या आर्थिक प्रगतीचा आलेख मांडता येतो. संस्थेच्या इतिहासातही असा आलेख महत्त्वाचा ठरतो. गावातील एखादा व्यवसाय त्या गावाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा ठरतो. उदा. नाशिक जिल्ह्यातील येवला हे तालुक्याचे ठिकाण पैठणी उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी हातमागावर पैठणी तयार केली जाते. हा व्यवसाय या गावामध्येच का वाढला व तो आधुनिक युगातही कसा टिकून आहे, याचा इतिहास शोधता येईल. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात अवसरी खुर्द व अवसरी बुद्रुक या दोन गावी घोंगडी विणण्याचा पारंपरिक व्यवसाय आहे. जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे चिंचोके व मेंढीची लोकर यापासून जीन बनवीत. घोड्यावर बसण्यासाठीच्या खोगीरात जीन वापरत. कोपरगावामध्ये पूर्वीपासून जनावरांचा मोठा बाजार भरतो. वार्षिक किमान १५ कोटींची उलाढाल या बाजारामध्ये होते. जनावरांच्या बाजारामध्ये सांकेतिक भाषा वापरली जाते. हात रुमालाखाली बोटे चाळून गुप्तपद्धतीने जनावरांचा व्यवहार ठरतो. अशा बाजार असलेल्या गावी ग्रामपंचायतीला हे मोठे उत्पन्नाचे साधन आहे. या बाजारच्या दिवशी स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होतो. बाजारांमुळे गावाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. गावचा आर्थिक इतिहास लिहिण्यासाठी हा महत्त्वाचा घटक आहे.

६. राजकीय व प्रशासकीय घटक

राजकीय व प्रशासकीय घटकामध्ये प्रामुख्याने गावातील राजकारण, प्रशासन व राजकीय घडामोडी, स्वातंत्र्यचळवळीतील गावाचे योगदान इ. मुद्यांच्या आधारे स्थानिक इतिहास लिहिता येईल. स्वातंत्र्य चळवळीमध्ये गावातील व्यक्ती असल्यास त्यांच्या मुलाखती घेऊन त्याविषयीचा इतिहास लिहिणे शक्य आहे. उदा. कोपरगावमधील श्री. मामा गवारे यांनी १९४२ च्या दरम्यान चले जाव आंदोलनामध्ये सहभाग घेतला. १५ ऑगस्ट १९४२ रोजी कोपरगावमधील टेलिफोन यंत्रणा तोडून टाकली. ८ सप्टेंबर १९४२ रोजी शासकिय कचेरी व दफ्तर जाळून टाकले. त्याच दिवशी महात्मा गांधीच्या आव्हानावरुन हरताळ पाळला.[४३] अजूनही असा बराच अप्रकाशित इतिहास अभिलेखागारांमधील कागदपत्रे शोधून इतिहास मांडता येईल. अशा प्रकाराने स्थानिक इतिहासलेखन केल्यास हा इतिहास प्रकाशित होण्यास मदत होईल.

वर उल्लेख केलेल्या पैलूंच्या संदर्भात काही अभ्यास कसे केले गेले किंवा कसे केले जाऊ शकतात याची कल्पना यावी म्हणून मराठी इतिहास लेखनातील एक-दोन उदाहरणांचा विचार करता येईल. औरंगाबाद येथील ज्येष्ठ पुरातत्त्व अभ्यासक डॉ. रा. श्री. मोरवंचीकर यांनी 'मध्ययुगीन जलसंधारण-जलव्यवस्थापन, देवगिरी-दौलताबाद' असा ग्रंथ लिहिला आहा. तो स्थानिक इतिहास अभ्यासासंदर्भात अतिशय उपयुक्त आहे.[४४]

स्थानिक इतिहास-लेखनाच्या विविध पैलूंचा एकत्रित अभ्याससुद्धा शक्य आहे. उदा. डॉ. अरुण टिकेकर व अभय टिळक यांनी संपादित केलेला 'शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा...'[४५] हा ग्रंथ. कोपरगाव परिसराचा इतिहास हा इतिहास अभ्यास प्रबंधरूपाने मांडताना कोपरगावचा समग्रपणे इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. इतर इतिहासलेखनप्रकारांच्या लेखनासाठीची पथ्ये स्थानिक इतिहासालाही लागू आहेत. गावाचा इतिहास लिहिण्यासाठी साधने दुर्मिळ असतात. ती मिळवावी लागतात. ती कोणत्या अभिलेखागारामध्ये उपलब्ध आहेत याची माहिती शोधावी लागते. त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी 'निजाम-पेशवे संबंध' हा ग्रंथ लिहिताना अहमदनगर जिल्ह्यातील खर्डा येथे मराठा-निजाम यांच्यामध्ये झालेल्या खर्डा येथील लढाईची कागदपत्रे अभ्यासली. परंतु या लढाईविषयीची जी आणखी महत्त्वपूर्ण कागदपत्रे हैद्राबाद येथील शासकीय अभिलेखागारामध्ये आहेत. त्यांचा वापर करणे आपणास शक्य झाले नसल्याची नोंद त्यांनी केली आहे.[४६]

स्थानिक इतिहासाची जी चर्चा आतापर्यंत केली त्याप्रकारे कोपरगावच्या इतिहासाविषयीचे संशोधन करून प्रस्तुत प्रबंधाचे लेखन केलेले आहे. यानंतरच्या चार प्रकरणांमध्ये कोपरगावच्या इतिहासाची कालक्रमानुसार आणि साधार मांडणी केलेली आहे.

संदर्भ व तळटिपा

१. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश**, खंड २, मुंबई, १९७६, पृ.५०७.

२. शांता कोठेकर, **इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान**, नागपूर, २००५, पृ.४ वर उद्धृत.

३. मु. ब. शहा (संपा.), **इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य**, खंड १०, धुळे, १९९८, प्रस्तावना, पृ. १९. (येथून पुढे या ग्रंथाचा उल्लेख '**राजवाडे, खंड १०**' असा केला आहे. अन्य खंडांचाही उल्लेख याच पद्धतीने केला आहे.)

४. राजा दीक्षित, '१९ व्या शतकातल्या महाराष्ट्रातील स्त्री-जीवन : तळाकडून इतिहास', **पुणे विद्यापीठ वार्ता : महिला सबलीकरण विशेषांक**, पुणे, जून, २०००, पृ.६.

५. B. Sheik Ali, **History : Its Theory and Method**, Second Ed., Madras, 1993, p.03.

६. इ. एच्. कार, **इतिहास म्हणजे काय?**, (मराठी अनु. वि. गो. लेले), पुणे, २०००, पृ.२०.

७. शं. ना. जोशी, **मराठेकालीन समाजदर्शन**, पुणे, १९६०, पृ. ०९ वर उद्धृत.

८. ग. ह. खरे, गो. च्यं. कुलकर्णी, **मध्ययुगीन भारताचा इतिहास**, मुंबई, २००१, प्रस्तावना, पृ. ५३.

९. पद्माकर प्रभुणे, 'पर्यावरण आणि संस्कृती', त्रैमासिक, **मैत्रीच्या पलिकडे**, पुणे, २००५, पृ.५० वर उद्धृत.

१०. अरविंद देशपांडे, 'इतिहासलेखन आणि ललित साहित्य', समाविष्ट डॉ. ह. श्री. साने (संपा.), **सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंतःसंबंध**, पुणे, १९९५, पृ.९१ वर उद्धृत.

११. कित्ता.

१२. प्रभाकर देव, **इतिहास : एक शास्त्र**, नांदेड, २००२, पृ. ३१ वर उद्धृत.

१३. पद्माकर प्रभुणे, 'इतिहास अध्यापनातील प्रयोग', त्रैमासिक, **मैत्रीच्या पलिकडे**, पुणे, नोव्हेंबर, २००६, पृ. १८.

१४. उमेश बगाडे, 'सबाल्टर्न स्टडीज् व भारतीय इतिहास लेखनातील स्थित्यंतर : शोषित-अंकितांची 'स्वायत्त' जाणीव व तिचे पोकळ राजकीय-अर्थशास्त्र', **समाजप्रबोधन पत्रिका**, जुलै-सप्टेंबर, २००७, पृ.३०२-३१२.

१५. प्रवीण चव्हाण, 'सबाल्टर्न इतिहास लेखन मुक्तिगीत? नव्हे शोकांत्मिका!' **साधना**, दिवाळी अंक, २००६, पृ.११७.

१६. शुभांगना अत्रे व इतर, **महाराष्ट्र संस्कृती,** पुणे, २००८, पृ. १३९.

१७. Sanjiv Desai (edi.), **Calender of the Quit India**, Bombay, 1985, p.p. 99-100.

१८. प्रमोद ओक, **पेशवे घराण्याचा इतिहास**, पुणे, १९९४, परिशिष्ट, कोपरगावातील पेशव्यांचा वाडा.

१९. अर्पणा बोरावके, **मराठी सत्तेचा इतिहास: शोधनिबंध संग्रह**, वाघोली, पुणे, २०११, पृ. १४५.

२०. सी. एच. कुलकर्णी (संपा.), **गोदातरंग**, कोपरगाव, १९९५.

२१. राजा दीक्षित, 'प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संदर्भ', **इतिहास शिक्षक**, पुणे, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर, २००४, पृ.३.

२२. कित्ता, पृ.४-५.

२३. कित्ता, पृ.५.

२४. कित्ता, पृ.६.

२५. कित्ता, पृ.७.

२६. प्रभाकर देव, **इतिहास : एक शास्त्र**, नांदेड, २००२, पृ.३७.

२७. शांता कोठेकर, पूर्वोक्त, पृ.२२.

२८. राजा दीक्षित, 'इतिहास वाङ्मय', समाविष्ट रा. ग. जाधव (संपा.), **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड ७, भाग ३, पुणे, ऑक्टोबर २०१०, पृ.४७६-७७.

२९. अरुण टिकेकर (संपा.) आणि अभय टिळक (सहायक संपा.), **शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा...**, खंड १, पुणे, २०००, प्रस्तावना.

३०. कित्ता, पृ. पंधरा.

३१. कित्ता, पृ. सोळा.

३२. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, खंड ५, पुणे, पुनर्मुद्रण, १९९७, प्रस्तावना पृ.२१.

३३. Raja Dixit, 'Historical Writtings And Research' in Rajendra Banhatti and G. N. Jogalekar (ed.), **A History of Modern Marathi Literature**, **Vol. II**, Pune, 2004, pp. 238-278.

३४. Barbara J., Howe, 'A Century of Local History Writing', **JSTOR : OAH Magazine of History**, Vol 4, No. 3, (Summer, 1989), pp.10-15.

३५. पहा-

१. Raja Dixit, 'Historical Writings and Research,' op.cit., p.270.

२. राजा दीक्षित, 'इतिहास वाङ्मय', पूर्वोक्त, पृ. ४७७.

३६. म. श्री. दीक्षित, **खेड (राजगुरूनगर)**, राजगुरूनगर, २००३.

३७. राजा दीक्षित, **पुणे विद्यापीठाचा इतिहास**, पुणे, १९९९.

३८. अरुण टिकेकर, **ऐसा ज्ञानसागरु बख्खर मुंबई विद्यापीठाची**, मुंबई, २००७.

३९. नरेंद्र जाधव (संपा.), गणेश राऊत (कार्यकारी संपा.), **पुणे विद्यापीठ समर्थ भारत अभियानः दत्तक गावांचा इतिहास**, खंड १, पुणे, २००८, खंड २, २००९.

४०. विलास गोर्डे, 'चाकणचा स्थानिक इतिहास', पीएच्.डी.(इतिहास) पदवीसाठी सादर केलेला प्रबंध अप्रकाशित, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१२.

४१. श्री. रा. थोरवत, 'पर्वती : एक ऐतिहासिक अभ्यास', एम्.फिल्. (इतिहास) लघुप्रबंध, अप्रकाशित, पुणे विद्यापीठ, पुणे, २००१.

४२. राजवाडे, खंड ६, पृ.३४३.

४३. Sanjiv Desai, op.cit., p.29.

४४. रा. श्री. मोरवंचीकर, **मध्ययुगीन जलसंधारण- जलव्यवस्थापन देवगिरी-दौलताबाद**, (अनु. प्रदीप भलगे.), डोंबिवली, २००४.

४५. अरुण टिकेकर (संपा.) आणि अभय टिळक (सहायक संपा.), **शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा...**, खंड १, पुणे, २०००.

४६. राजा दीक्षित (संपा.), **निवडक शेजवलकर**, नवी दिल्ली, २००७, पृ.११३.

प्रकरण दुसरे

शिवकालीन व पेशवेकालीन कोपरगाव

इतिहासाचा कालखंड निश्चित करत असताना महत्त्वाची ऐतिहासिक घटना प्रमाणभूत मानून कालखंड ठरवला जातो. प्रत्येक देशाच्या वा राज्याच्या संदर्भात महत्त्वाची घटना, म्हणजे त्या देशाचा किंवा राज्याचा सर्वात जुना उल्लेख होय. महाराष्ट्र राज्याचा प्राचीन उल्लेख वायुपुराण, मार्कंडेय पुराण, ब्रह्मपुराण आणि मत्स्यपुराणामध्ये आला आहे.[१] ऐतिहासिक महाराष्ट्राची सुरुवात मौर्य राजवटीपासून होते असे मानतात. कोणत्याही प्रदेशाची लिखित साधने उपलब्ध झाल्यापासून त्या देशाचा लेखनकाळ सुरु होतो. महाराष्ट्राचा लिखित उल्लेख असलेला शक राजा श्रीधरवर्मा याचा शिलालेख सागर जिल्ह्यात एरण गावात उभारलेल्या स्तंभावर आहे. या शिलालेखामध्ये श्रीधरवर्मा राजाचा कालखंड इ.स. ३६५ असा आहे. श्रीधरवर्मा याचा सेनापती सत्यनाथ याने हा स्तंभ उभारला असून त्या लेखात त्याने स्वतःस 'महाराष्ट्र प्रमुख' असे म्हटले आहे. महाराष्ट्राचा हा पहिला लिखित उल्लेख आहे.[२]

इतिहासलेखनामध्ये प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक या शब्दांना एक वेगळा अर्थ आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये प्राचीन कालखंड सातवाहन राजवंशापासून सुरु होऊन यादव काळापर्यंत मानला जातो. सातवाहन राजवंश महाराष्ट्राचा आद्य राजवंश होता. सातवाहन राजवंशातील राजांनी महाराष्ट्राचे राजकीयदृष्ट्या एकीकरण केले.

महाराष्ट्राचा ८५% भूप्रदेश काळ्या पाषाणाने बनला आहे. सह्याद्रीचे प्रचंड विस्तारीत एकसंघ पठार आणि त्यावर आढळणारा एकाच प्रकारचा खडक हे दक्षिणेच्या पठाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारतीय भूपृष्ठाचा तोल दक्षिण कातळाने म्हणजेच डेक्कन ट्रॅपने सांभाळला आहे. भूगर्भशास्त्रानुसार महाराष्ट्राची भूमी थंड झालेल्या लाव्हारसाच्या थरांनी बनलेली आहे. सुमारे ७ कोटी वर्षांपूर्वी घडलेल्या नैसर्गिक उद्रेकाने ही घटना घडली असे मानतात.[३] सह्याद्री हा महाराष्ट्राचा कणा आहे. भारताच्या पश्चिम किनाऱ्यास सह्याद्री पर्वताच्या रांगा समांतर असल्याने पावसाळी वारे त्यावर आदळतात. सह्याद्रीला काटकोन करुन सातपुडा पर्वताच्या रांगा पूर्वेकडे विस्तारल्या आहेत. सह्याद्री व सातपुडा या दोन पर्वतांच्या रांगांनी दक्षिण पठाराचे संरक्षण केले आहे.

इ.स.पू. सहाव्या शतकाच्या आरंभी उत्तर भारतात प्रादेशिक राज्ये उदयास आली. त्यांना महाजनपदे अशी संज्ञा होती. या महाजनपदांचा उल्लेख बौद्ध व जैन वाङ्मयामध्ये आला आहे. बौद्ध व जैन धर्मांच्या उदयकाळात १६ महाजनपदे अस्तित्त्वात होती. या सोळा महाजनपदांपैकी एक 'अश्मक' हे महाजनपद महाराष्ट्रातील आजच्या औरंगाबाद व अहमदनगर जिल्ह्यात गोदावरी नदीच्या खोऱ्यात विस्तारले होते.[४] प्राकृत वाङ्मयामध्ये अश्मक राज्याला 'अस्सक' असे नाव होते. सुत्तनिपातमधील पारायणवग्गाच्या आरंभी ज्या वत्थुगाथा आहेत, त्यांवरून असे दिसून येते की, अस्सकाचे राज्य महाराष्ट्रात गोदावरी नदीच्या परिसरात होते.[५] अश्मक जनपदामध्ये गोदावरी नदीकाठचा मूळचा मूलक (आजचा अहमदनगर जिल्हा) या प्रदेशाचा समावेश होता. गोदावरी नदीचा उल्लेख 'बृहत्कल्प-सूत्र-भाष्य' या दहाव्या शतकातील एका ग्रंथामध्ये आला आहे. तो पुढील प्रमाणे -

''सच्चं भण गोदावरी पूव्वसामुपेण साहियासन्ती
सालाहाण-कुलसरीसं जय ते कुलेकुलम्।
उत्तरे हिमवन्तो दहिणतो सालिवाहण राय
समभार भरक्कन्ता तेन न पहल्यत पुत्रही।।''

(माते गोदावरी, 'खरे सांग, पृथ्वीचा तोल सांभाळलेला आहे याचे कारण उत्तरेला हिमालय (पर्वत) दक्षिणेला शातवाहन राजा हे आहे.')[६]

याच गोदावरी नदीकाठी कोपरगाव वसलेले आहे. सम्राट अशोकाच्या काळी हा सर्व प्रदेश मौर्य साम्राज्याचा भाग होता. तथापि, इ.स.पू. सहाव्या शतकापासून सुमारे ४०० वर्षांच्या घडामोडींची इतिहासामध्ये क्वचितच नोंद आढळते. सातवाहनानंतर महाराष्ट्राच्या काही भागावर अभिर घराण्याची सत्ता होती. अभिर घराण्यामध्ये ईश्वरसेन हा कर्तृत्त्ववान राजा होता. अभिर सत्तेनंतर शिलाहार राजघराण्याची स्थापना झाली. शिलाहार घराण्याशी वैवाहिक संबंध जोडलेल्या यादव घराण्याची सत्ताही कोपरगाव परिसरामध्ये होती. यादव राजा भिल्लम याची राणी लक्ष्मी उर्फ लच्छिअव्वा ही शिलाहार राजा नववा झंझ याची कन्या होती. यादवांनी इ.स. १२१२ मध्ये शिलाहार घराण्याचा खिद्रापूर जवळ झालेल्या लढाईत पराभव करून शिलाहार घराण्याची सत्ता संपुष्टात आणली. महाराष्ट्राच्या मध्ययुगीन कालखंडातील यादव हे एक इतिहासप्रसिद्ध घराणे होय. यादव राजा दुसरा सिंघण (इ.स.

१२००-१२४७) हा कर्तबगार राजा होता. त्याच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रावर सत्ता प्रस्थापित केली. कोपरगाव परिसरामध्ये यादव राजवटीत मंदिरस्थापत्याचा विकास झाला. कोपरगावच्या पूर्वेस ५ कि.मी. अंतरावरील कोकमठाण या गावात गोदावरी नदीकाठी 'जगदंबा' देवीचे मंदिर यादव काळातच उभारले. हे मंदिर भूमिज प्रकारचे मंदिर असून त्याचे शिखर विटांनी तर बाकीचा भाग दगडांनी बांधलेला आहे. मंदिराचा तलविन्यास तारकाकृती असून विटा आणि चुना यांच्या साह्याने बांधण्यात आलेले शिखर आजमितीस पूर्णपणे शिल्लक नाही. आमलसार, कलश आणि दोन भूमी आज शिल्लक नाहीत. हे मंदिर कदाचित सप्तभूम भूमिज प्रासाद या प्रकारचे असावे. मंदिर उत्तराभिमुख असून त्याच्या तलविन्यासाप्रमाणेच त्यातील काही वास्तूशास्त्रीय घटकांचे निर्माण तंत्रही वैशिष्ट्यपूर्ण आहे. मंदिर द्विगर्भ प्रकारचे आहे. मुख्य गर्भगृहामध्ये आज शिवलिंग असले तरी अगोदर त्यात विष्णूची मूर्ती असावी असे मानण्यास जागा आहे. मंडपाच्या पूर्वेला पण मंडपास जोडून असलेल्या दुय्यम गर्भगृहामध्ये देवीची मूर्ती असून आज ती जगदंबा देवी म्हणून ओळखली जाते. दुय्यम गर्भगृहाचा तलविन्यास साधा चौकोनी असून त्याला कोणतीही अंगे नाहीत. त्यामुळे मंदिर मुळात तीन अर्धमंपांनी युक्त असलेला मंडप आणि एकच गर्भगृह असलेले होते, परंतु नंतरच्या काळअत पूर्वेकडील अर्धमंडप गर्भगृहात रुपांतरीत करण्यात आला असावा. तथापि या बिनखांबी मंडपाचे, अर्धस्तंभाचे आणि तीन चतुर्थक स्तंभाचे नीट निरीक्षण केले आणि दोन अंतरातील साधर्म्य लक्षात घेतले तर हे दुसरे गर्भगृह मूळ मंदिराचाच भाग होते असे वाटते.

या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मंदिराच्या बाह्यांगावरील भद्रांना देण्यात आलेले लहान भूमीच मंदिराचे स्वरूप होय. गर्भगृहावरील प्रचंड शिखराचे वजन पेलण्यासाठी भिंती अधिक भक्कम करण्याकरिता ही अशी योजना करण्यात आली असावी, असे मत ज्येष्ठ अभ्यासक हेन्री कझिन्स यांनी व्यक्त केले आहे.[७] मंदिराच्या तलविन्यासाचे सूक्ष्म निरीक्षण करता एक बाब लक्षात येते की, गर्भगृहाच्या दोन बाजूंना बऱ्यापैकी पुढे आलेल्या भद्र-अंगामध्ये खोल्या नसून देवकोष्ठे आहेत. मंदिराचा मंडप बिनखांबी असून त्याचे छत उत्तरोत्तर लहान होत जाणाऱ्या वर्तुळाकार वलयांनी बनलेले आहे. छताच्या मध्यावर फुलांच्या कळीची नक्षी असलेला उक्षेप आहे. अंतरालाच्या द्वारावरील उत्तरांगावर पाच रथिका असून

त्यात देवीच्या मूर्ती आहेत. अंतरालाचे छतही घुमटाकार आहे. दोन्ही गर्भगृहांच्या दरवाज्यांवरील गरूडमूर्ती आणि गर्भगृहाच्या आणि गर्भगृहाच्या अंतरालाच्या दरवाज्याच्या उत्तरांगावरील रथिकांमधील देवीच्या मूर्ती यावरून या मंदिरामध्ये मुख्य दैवते म्हणून विष्णू आणि लक्ष्मीच्या मूर्ती होत्या असे दिसते. मंदिराचा तलविन्यास, वास्तूशास्त्रीय शैली आणि शिल्प यावरून हे मंदिर इ.स. च्या तेराव्या शतकात बांधले असावे असे स्पष्ट दिसते.[८]

इ.स. १२९४ मध्ये दिल्लीचा सुलतान जलालउद्दीन खिल्जी याचा पुतण्या अल्लाउद्दीन खिल्जी याने यादवांवर स्वारी केली. त्यावेळी यादवांचे सैन्य काकतियांच्या प्रदेशावरील मोहिमेत गुंतले असताना अल्लाउद्दीन खिल्जीने स्वारी केली. त्याने यादव राजांकडील अमाप संपत्तीविषयी ऐकले होते.[९] या लढाईत यादवांचा पराभव झाला. पराभवानंतर यादवांनी दिल्लीच्या खिल्जी घराण्याचे मांडलिकत्त्व स्विकारले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये ही घटना अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. अल्लाउद्दीन खिल्जीने यादव राजा रामचंद्र देव याच्याशी केलेल्या तहानुसार यादव राजांनी दिल्लीच्या सुलतानास दरवर्षी खंडणी देण्याचे मान्य केले होते. काही काळ ठरल्याप्रमाणे त्यांनी खंडणी पाठविली. मात्र यादव राजा सिंघणदेवाने खंडणी पाठविणे बंद केले. इ.स. १३०७ मध्ये अल्लाउद्दीन खिल्जीचा सरदार मलिक काफूरने दक्षिणेत स्वारी करुन यादवांचा पुन्हा पराभव केला. या दोन्ही पराभवांमुळे यादव सत्ता खिळखिळी झाली. इ.स. १३०९ मध्ये रामचंद्र रामचंद्र यादवाचा मृत्यू झाला. त्यानंतर पुन्हा इ.स. १३१३ मध्ये मलिक काफूरने पुन्हा देवगिरीवर स्वारी केली. इ.स. १३१८ मध्ये मुबारक खिल्जीने देवगिरीवर स्वारी करुन यादवांची सत्ता पूर्णतः संपुष्टात आणली.

खिल्जी घराण्यानंतर महाराष्ट्रावर काही काळ दिल्लीच्या तुघलक घराण्याची सत्ता होती. मुहम्मद तुघलकाच्या राजवटीमध्ये त्याने काही काळासाठी आपली राजधानी दिल्लीवरुन दौलताबादला आणली होती. त्याचा हा प्रयोग अपयशी ठरला. कारण उत्तरेहून दक्षिणेत आलेल्या सरदारांनी तुघलक राजवटीविरुद्ध राज्यामध्ये अनेक ठिकाणी बंडाळी सुरु केली. परिणामी मुहम्मद तुघलकास आपली राजधानी पुन्हा दिल्लीस परत न्यावी लागली.[१०]

मुहम्मद तुघलकाच्या कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यात निर्माण झालेल्या बंडामधून दक्षिणेत बहमनी राज्याचा उदय झाला. मुहम्मद तुघलकाच्या वर्चस्वाविरोधी दक्षिणेमध्ये सरदारांनी बंड केले. त्यांनी दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. मुहम्मद तुघलकाने हा उठाव

मोडून काढण्याचा प्रयत्न केला. हसन गंगू बहमनी या सरदाराने 'जाफरखान' असा किताब घेऊन बहमनी राज्याची सूत्रे हाती घेतली. बहमनी राज्याचा विस्तार मुख्यतः संपूर्ण महाराष्ट्रभर होता. जाफरखानाने पुढे 'अल्लाउद्दीन बहमनशहा' हा किताब धारण केला. तो बहमनी राज्याचा पहिला सुलतान झाला. बहमनी राज्यात चार प्रांत होते. ते विस्ताराने मोठे होते. मुहम्मद गावानने प्रत्येक प्रांताची विभागणी दोन प्रांतात करून बहमनी राज्यात आठ प्रांत तयार केले. मात्र बहमनी राज्याची ही भरभराट मुहम्मद गावानच्या मृत्यूनंतर ऱ्हासाकडे वाटचाल करू लागली.

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात बहमनी राज्याची विभागणी पाच शाह्यांमध्ये झाली, त्यामध्ये -

१. विजापूरची आदिलशाही

२. गोवळकोंड्याची कुतूबशाही

३. वऱ्हाडची इमादशाही

४. अहमदनगरची निजामशाही

५. बिदरची बरीदशाही

बहमनी राज्याची विभागणी झाल्यामुळे पाचही शाह्यांच्या सुलतानांसुलतानांमध्ये भांडणे लागली. इस्लामी सत्तेची एकजूट कायमची मोडली गेली. त्यामुळे शाह्यांमध्ये परकीय व स्थानिक सरदारांचा वरचष्मा वाढला. आपल्याशिवाय सुलतान टिकू शकणार नाही अशी जाणीव त्यांना होवू लागली. बहमनी राजवटीमध्ये सिसोदे-भोसले घराण्यातील सरदारांची कामगिरी मोठी होती. आपल्या शौर्याच्या जोरावर त्यांनी निर्णायक लढे देऊन, सुलतानांना अनेकदा संकटातून बाहेर काढले होते.[११]

बहमनी सुलतानाने अहमद निजामशाहाला जुन्नर व अहमदनगर भागाचा बंदोबस्त करण्यास पाठविले. तेव्हा सहाजिकच सिसोदे घराण्याचा भोसले व घोरपडे या शाखांमधील काही सरदार त्यांच्या मदतीस दिले होते. या सरदारांचीही निजामाने सरंजामदाखल परगणे वगैरे देवून त्यांच्या व्यक्तिगत तैनातीची सोय लावून दिली होती. त्याचा एक भाग म्हणून शाहजीराजांच्या जन्माचे वेळी मालोजी राजांकडे आजच्या अहमदनगर जिल्ह्यातील तत्कालीन कुंभारी व संगमनेर हे दोन परगणे होते.[१२] त्यापैकी कुंभारी परगण्यामध्ये कसबे कोपरगावचा समावेश होता.

निजामशाही राजवटीमध्ये तिचा मुख्य आधारस्तंभ शाहजी महाराज व मलिक अंबर हे दोन कर्तबगार सरदार होते. याविषयीचा उल्लेख शिवभारतकार परमानंदाच्या लिखाणात आला आहे. तो पुढीलप्रमाणे -

> *''निजामशाहा मूल यावर छत्र धरिले. पुढे शाहाजीने निजामशाहीचे शिवनेरी इत्यादि गड मोगलाकडून भराभर घेतले. तसाच अत्यंत पवित्र गोदावरी, प्रवरा, क्षीरसमुद्रासारखे पाणी असलेली निरा, भयंकर भीमा, या नदीकाठंचा सर्व प्रदेश क्रमाक्रमाने पादाक्रांत करुन त्याने सह्याद्रीसुध्दा लगेच आपल्या ताब्यात आणिला.''*[१३]

या श्लोकामध्ये उल्लेख केलेला गोदावरी नदीकाठचा परिसर म्हणजेच परगणे कुंभारी ते कोपरगावचा परिसर होय. त्यावेळी शाहजीराजांच्या ताब्यामध्ये संगमनेर, अहमदनगर व दौलताबादपर्यंतचा सर्वच भूप्रदेश होता.[१४]

इ.स. १६२७ मध्ये मोगल बादशहा जहांगीर निधन पावला. शाहजहान मोगल बादशहा झाला. त्याने मुघलांचे साम्राज्यविस्ताराचे धोरण अधिक नेटाने राबविण्यास सुरुवात केली. मुघलांच्या आक्रमणाचा वेग आणि त्यांनी आदिलशाहीशी केलेला सलोखा या दोघांच्या संयुक्त फौजेसमोर शाहजीराजांचा निभाव लागणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी मुघल-आदिलशाहीच्या संयुक्त फौजेशी माहुलीचा १६३६ मध्ये तह करुन आदिलशाहीत नोकरी पत्करली. तहात ठरल्याप्रमाणे मुघल व आदिलशाही यांनी निजामशाहीचा मुलूख वाटून घेतला.[१५] अशाप्रकारे अहमदनगरचा सर्व परिसर मुघलांच्या ताब्यात गेला.

शाहजहानने दक्षिणेतील राज्यकारभारावर आपली पकड बसावी म्हणून व राज्यकारभार जास्त कार्यक्षम व्हावा यासाठी दौलताबाद व अहमदनगर हा भाग खानदेश प्रांतामधून वेगळे करुन तेथे नवीन सुभेदार नेमण्यात आले.[१६] इ.स. १६३६ पासून १६७० पर्यंतचा कोपरगाव परिसराचा इतिहास फारसा उपलब्ध होत नाही. मात्र ऐतिहासिक फार्सी साहित्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७० च्या मे महिन्यामध्ये अहमदनगरमधील मुघलांच्या ताब्यातील ५१ महालांवर स्वारी करुन ते उध्वस्त केल्याची नोंद आली आहे.[१७]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराजांकडे स्वराज्याची सत्ता आली. त्यांच्या कालावधीतच मराठी स्वराज्य नष्ट करण्यासाठी व मराठ्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबाने दक्षिणेत मराठ्यांविरुद्ध स्वारी काढली. या स्वारीसाठी औरंगजेबाने आपल्या आयुष्याची २७ वर्षे खर्च केली. मात्र औरंगजेब मराठ्यांचा कायमचा बंदोबस्त करू शकला नाही.

संभाजी महाराजांच्या निधनानंतर मोगल-मराठा संघर्ष अधिकच तीव्र झाला. या संघर्षास 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध' असे म्हणतात. मराठी स्वातंत्र्ययुद्धाचे काळात कोपरगाव-गोदावरी नदीच्या परिसरामध्ये मराठ्यांनी मोगलांच्या सैन्यावर हल्ले केले. मराठ्यांच्या फौजेतील बुवाजी पवार हा सरदार त्यामध्ये आघाडीवर होता.

मराठी स्वातंत्र्ययुद्धाच्या विशेषतः राजारामाच्या कालावधीमध्ये औरंगजेबाने अनेक मराठी सरदारांना वेगवेगळ्या प्रकारची प्रलोभने दाखवून आपल्या बाजूस वळवून घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यात तो काही प्रमाणात यशस्वीही झाला. राजाराम जिंजीस वास्तव्यास असताना बुवाजी पवार हा मराठी सरदार अहमदनगर परिसरामध्ये विशेषतः गोदावरी नदीच्या खोऱ्यामध्ये होता. औरंगजेबाने व मोगली सरदारांनी बुवाजी पवार यास आपल्या बाजूस घेण्यासाठी गळ घातली. मात्र बुवाजी पवाराने स्वामींची सेवा सोडून हरामखोरी करून बादशहाची मनसबदारी करणे बद्दल नकार दिला. बुवाजी पवाराने गोदावरी नदीपासून तापीपर्यंतच्या प्रदेशामध्ये मोगलांना सळो की पळो करून सोडले. मात्र मोगलांच्या एका जमावाने बुवाजी पवारास पकडले. त्यास शिक्षा करून अशिरगड किल्ल्याच्या बुरुजामध्ये मारून टाकण्यात आले.[१८] गोदावरी नदीपासून ते खानदेशापर्यंतचा प्रदेश मोगलांनी आपल्या वर्चस्वाखाली आणला. शाहू महाराजांनी सातारा येथे जाऊन स्वराज्याचा कारभार सुरु केला. छत्रपती शाहूंचे आसन स्थिर करण्यासाठी बाळाजी विश्वनाथाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

बाळाजी विश्वनाथाने मोगलांकडून ज्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या, त्या सनदांची मागणी करण्यासाठी शाहू महाराजांनी जी बोलणी केली होती. त्यामध्ये प्रामुख्याने मोगलांकडून शिवकालीन स्वराज्याच्या समावेश असलेला प्रदेश मागितला होता. बाळाजी विश्वनाथाच्या सहकार्याने शाहूंनी आपला जम बसविला. मात्र कोपरगाव परिसराचा आणि शाहू महाराजांचा थेट संबंध आलेला दिसत नाही.

इ.स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहाचे अहमदनगर येथे निधन झाले. मोगल साम्राज्याच्या गादीवरुन औरंगजेबाच्या मुलांमध्ये भांडणे सुरु झाली. मोगल सरदार झुल्फीकारखानाच्या सल्ल्यावरुन आजमशहाने छत्रपती शाहूंची सुटका केली. इ.स. १७०७ च्या जून महिन्यात शाहूंचे महाराष्ट्रात आगमन झाले. त्यावेळी महाराणी ताराबाईंनी मोगलांशी लढा चालविला होता. शाहूंनी स्वराज्यावर आपला हक्क सांगताच ताराबाई व शाहू यांच्यामध्ये सत्तेसाठी यादवी संघर्ष सुरु झाला. सामोपचाराने आपणास मराठी राज्याचे अधिकार आपणास मिळणार नाहीत याची खात्री शाहू महाराजांना पटली. इ.स. १७०७ च्या ऑक्टोबर महिन्यात शाहू महाराज व ताराबाई यांच्यात खेड (राजगुरुनगर) येथे झालेल्या लढाईत ताराबाईचा पराभव झाला.

बाळाजी विश्वनाथाच्या व नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीमध्ये कोपरगावच्या इतिहासविषयक नोंदी विविध कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहेत. नानासाहेब पेशवा उत्तरेत भेलसा येथे स्वारीसाठी जात असताना २९ डिसेंबर १७४४ रोजी तो कोपरगाव परिसरामध्ये मुक्कामास होता. कोपरगाव परिसरात २० डिसेंबर १७४४ ते १२ जानेवारी १७४५ या कालावधीत कोपरगाव बेट, कचेश्वर मंदिर, गोदावरी नदीचा काठ, कुंभारी इत्यादी विविध ठिकाणी मुक्कामास होता. १२ जानेवारी १७४५ रोजी तो कुंभारीहून विंचूर, निफाडमार्गे उत्तरेकडे निघून गेला.[१९]

पेशवाईमध्ये कोपरगावला धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले होते. प्रशासकीय कामकाजावरुन न्यायनिवाडा करण्याची वेळ आली तर किंवा त्या संदर्भात दिव्य करण्याची वेळ आली तर कोपरगाव परिसराची निवड करत असत. पेशवाईमध्ये विविध प्रकारची दिव्ये करण्याची प्रथा होती. कसबे कोपरगावमध्ये एक दिव्य केल्याचे उदाहरण आहे. त्याविषयीचा मजकूर पुढीलप्रमाणे -

> *''राघो नारायण व खंडो नारायण देशपांडे परगणे साकसे प्रांत कल्याण यांचा व गणेश दत्ताजी यांचा देशपांडेपणाचा कजिया बहुत वर्षे होता. यास्तव राघो नारायण यांसी दिव्य करावयाची आज्ञा केली. यांणी मान्य करुन कसबे कोपरगाव परगणे कुंभारी येथे गंगातीरी (गोदावरी नदीकाठी) दिव्य केले. खरा*

जाहला. गणेश दत्ताजी खोटा जाहला. त्याजवरून राघो नारायण व खंडो नारायण यांचे दुमाला देशपांडेपणाचे वतन करून पत्रे सादर केली आहेत. तर तुम्ही यांचे हातून देशपांडेपणाचे कामकाज घेऊन हक रुसुम सुदामत असेल त्याप्रमाणे चालवणे. देशपांडेपणास सरकारचा गुमास्ता ठेविला आहे. तो दूर करून देशपांडेपणाचे दफ्तर यांचे हवाली करणे म्हणोन त्रिंबक विनायक यांस सनद''[२०]

कोपरगाव परिसरामध्ये अशाचप्रकारची दिव्ये कुंभारी, हिंगणी, सांगवी, कोपरगाव बेट इत्यादी ठिकाणी केल्याची उदाहरणे आहेत. या सर्वच ठिकाणी गोदावरी नदी अर्थचंद्राकृती होऊन दक्षिणवाहिनी होते. याठिकाणी राघोबाने आपल्या वास्तव्यासाठी वाडे बांधले. त्यापैकी आता कोपरगाव व हिंगणीचा वाडा सुस्थितीमध्ये आहे. नानासाहेब पेशव्याच्या काळात इ.स. १७४८ मध्ये मोगलांच्या आक्रमणाची झळ कोपरगाव परिसरास बसली. त्यावेळी कोपरगावचा समावेश कुंभारी परगण्यामध्ये होता. मोगलांनी कोपरगाव जवळचे मौजे कोकमठाण हा गाव लुटला. तेथील पाटील व देशपांडे यांनी पेशवे दरबारामध्ये त्यावर्षीचा महसूल भरला नाही. त्याविषयीचा सविस्तर वृत्तान्त नानासाहेबाच्या रोजनिशीमध्ये आला आहे तो पुढीलप्रमाणे -

''मौजे कोकमठाण परगणे कुंभारी येथील किले कावईच्या जाहगिरीचा हिस्सा आहे. त्यास सन सीत व सन सबा व सनतीसा वसूल सरकारात आला नाही. यांजकरीतां पाटलास तगादा जाला. तीसाला वसूल पाटलांनी सांगितला.

सन सीत व सन समान दुसाला वसूल किल्ले सन सबा पवारांनी गांव लुटून नेला यामुळे कावनई मोगलांकडे दिली. म्हणोन मोगलांनी पैका घेतला? त्याखाली गांव अगदी नाकस्ता जाला; कोणास पैका पावला नाही.

येणेप्रमाणे सांगितले त्यास तुम्ही तीसालाचे हिशोब मनास आणून चौकशीने मोगलांने वसूल घेतला असीला तरी

मोगलांची जाहागीर पाटोदा (जेऊर-पाटोदा) वैगेर आहे, त्यांत वजा करून घेणे. वसूल नेला नसीला तरी मौजे मजकुरापासून घेणे. सन सबामध्ये पवारांनी गाव लुटला, कोणास पैसा दिल्हा नाही. त्याची चौकशी करून दिल्हा असीला तरी सरकारचा हिस्सा घेणे, म्हणून राघो गोविंद कमावीसदार परगणे नेवासे वगैरे यांसी सनद.''[२१]

मोगलांच्या या आक्रमणाची झळ कुंभारी व नेवासे परगण्यासही बसली होती. विशेष म्हणजे मोगलांच्या आक्रमणामध्ये उदाजी पवार हा मराठी सरदार मोगलांना सामील होता. नानासाहेबाने या घटनेची सविस्तर चौकशी करून महसूलापैकी फक्त सरकारी हिस्सा पाठवावा असा आदेश दिलेला दिसतो.

कोपरगावमधील श्रीशुक्लेश्वराच्या मंदिरांचे पुजारी कचेश्वर परमहंस व त्याचा शिष्य परिवार कृष्णाजी गोपाळ व गोविंद त्रिंबक महंत यांच्यावर नानासाहेब पेशव्याची श्रद्धा होती. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी इ.स. १७५५ मध्ये नानासाहेबाने नारो बाबाजी यास देण्यास सांगितला आणि नेवासा हा महाल त्यांच्या खर्चासाठी दिला. त्याविषयीची नोंद पुढील प्रमाणे -

''श्रीपरमहंस वास्तव्य कोपरगाव यांचे शिष्य कृष्णाजी गोपाळ व गोविंद त्रिंबक महंत राहातात त्या ब्राह्मणास संतर्पणास नेमणूक असामी.

१ श्रीकचेश्वर

१ श्रीगंगेस नैवद्य

५ ब्राह्मण

७

एकूण सात सामींस दरमाहे अजमासे रुपये.

६।।✓ कणीक दर आसामीस दररोज वजन पक्के ६६।। प्रमाणे वजन ६=।। ५ दर ६।६ प्रमाणे रुपये.

९।।✓ तांदुळ दररोज दर आसामीस ६६।९ प्रमाणे वजन ६१।।। ८ ।।।. दर ६६ ८ प्रमाणे रुपये.

२।⁄ दाळ दररोज असामी ६६६ ९ प्रमाणे वजन ६।।६।।।
दर कैली ६६२।। प्रमाणे रुपये.
७।। तूप दररोज वजन ६६।। प्रमाणे वजन ६।५ दर ६६२
प्रमाणे रुपये.
१ तेल वजन पक्के ६६४।। एकूण
।। मीठ
३।।। हिंग जिरे मिरे हळद व शाकभाजी मिळोन.
२ लांकडे
⁄⁄ सुपारी
.।।. पाने विड्याची
३४ ।⁄

एकूण साडेचौतीस रुपये तीन आणे दरमहाप्रमाणे इस्तकबिल भाद्रपद शुद्ध प्रतिपदा तागायत चैत्रअखेर सन मजकूर आठमाही बेगमी करून देविली असे. तरी जिनसांची चौकशी करून देत जाणें म्हणोन नारो बाबाजी नामजाद परगणे नेवासे वगैर महाल यांस सनद १ ''[२२]

रसानगी यादी.

कोपरगावच्या पूर्वेकडील कोकमठाण गावाचा कारभार कोपरगावमधून पाहिला जात होता. कोकमठाणची पाटीलकी, देशपांडे व देशमुखीचा खर्च पेशवे दफ्तरामध्ये आला आहे. त्याविषयीची १७६१ मधील खर्चाची नोंद पुढील प्रमाणे -

दरबार खर्च श. १६८३
तुळशीबागवाले इ.स. १७६१

शके १६८३ पाटिलकी खरीदी केली वृशभनाम संवत्सरे जेष्ठ मास नांवें

७००९।⁄ खरीदी पाटिलकी मौजे कोकमठाण पाा कुंभारी येथील चौथाई पाटिलकी व कुपण घेतले त्यास खरिदीस व महजरास वगैरे खर्च ऐन खरिदी
२६० सन सबा सन ११६६ शके १६७८ रोख सरखलादा वगैरे खर्चास गावकरी यानी घेतले शके १६८३ सन ११७१ जेष्ठ शु. १३
२४०० देणे बाबुराव विष्णु पाा मोजे खिराडी पाा पाटोदे याजवळ महादाजी

आबाजी पुरंदरे दिवाण राजश्री बाळाजी बाजीराउ प्रधान यांचे नांवे पाटिलकीचे खरिदीखत पूर्वी गांवकरी यानी दिले ते मानसिंग दिाा पागा याने जातखत पसतिशा रुपयांचे देऊन खरिदीखत व गांवकरी यांचा रोखा सोडवून घेतला त्यापैकीं रोख रुपये मानसिंगाने ११०० दिल्हे बाकी देणे राहिले ते हस्ते माहादाजीपंत खिरडीकर तक्षीमदार बाबुरायांचा याजवळ मैराळ कृष्ण कमावीसदार पैकीं वजा सूट रुपये ७५ बाकी ६७४। याखेरीज गला कैली सोळीले मापे खंडी ६।।। ३।। एकूण खते २ पैकी गावकरी यानी पेसजी वसूल दिल्हा. खंडी ६। ४।। ---- बाकी ०।४.१ रुपये १०।।। पावणे आकरा व नख्त साहासे सवाचवऱ्याहत्तर एकूण सासे पंच्यासी व सनगें समजाविसी बदल रुपये १५ एकूण सातसे रोख हस्ते मजकूर पावतीचे कबज असे.

६०० सखंभट मुले जोसी मौजे मजकूर नख्ताची खतें २२ एकूण १८०६ पैकीं वजा दुबारा खते सुमार १६ एकूण रुपये १५० बाकी रुपये ८५६ पैकी गांवकरी याजकडून वसूल पावला ६२६ बाकी २३० व गल्याबद्दल खते २ न्हानी खंडी १ व नक्ताच्या खतांत गला आहे एकूण २।४८। पैकी गांवकरी यानी वसूल दिल्हा १।४८। बाकी गहू खंडी १ एकूण रुपये ५३ व नख्त-दोनसे तीस एकूण दोनसे त्र्यासी रोख देउन खते माघारी घेतली व कबज घेतले असें.

१५८३

सदरहू पैकीं पाटिलकीचे खरिदीखताच्या भरण्याहून ज्याजती ऐवज जाला रुपये ३४३ तिनसे त्रेतालीस ते तिही तक्षीमाचे भावाचे नावे कर्जदादन लिहिले असेल बाकी बााा खरिदीखत

५०००

११९७।।⅀ महजरसमई खर्च

३१५।⁄ पाा कुभारी गांव ३२ वजा मौजे मजकूर १ बाकी ३१ येथील पाटील कुलकर्णी महजरावर साक्षी घालण्यास आले त्यांस तिवटे दर गावास सुमार ३ प्रों सनगे ९३ एकूण

३२।।। काजी जैन खुदीन व महमद आकरम नायब वगैरे आा ८ एकूण तिवटे हस्ते

२७।⅀।। दिाा धीराजी पवार आा २ सनगे सुमार ४

५।।।' दिाा सोभागसिंग कारकून १

३९।' त्रिंबक मल्हार व त्रिंबकजी नाई दिाा सरदेशमुख व कारकून २ एकूण सनगे ६

४।' गोविंदपंत दिाा जगजिवनराव पवार धोंडो गोपाळ सनग १

२०।।'।। विसाजी लाडदी व धिराजी पवार व कारकून वगैरे आा एकूण सनगे ४ एकूण

५५।⁄।। येशवंतराव वाा मानसिंग जाधवराऊ देशमुख देशपांडिये

७६८⅀।। येशवंतराव वाा मानसिंग जाधवराऊ देशमुख देशपांडिये ५५८⅀।। खासा २५ भेटी समई २

३०८⅀।। महजरसमई ४

५५८⅀।।

१७ धोंडो गोपाळ व कारकून दोन एकूण सनगे ७ नगे ४

७२८⅀।।

८।⅀ सबनीस व चिटनीस पाा मजकूर सनगे २

४। नायकवडी १

२०।। सावल विहीकर व रुइकर सिवधडे पाा संगमनेर सनगे तिवटे ६

१८ बालाजीपंत टोपे पारसनीस येवलेकर सनगे २

१३ चत्रसिग मानसींग दिाा पागा याचा बाप सनगे २

६१६।।०।। मौजे मजकूर व मये मजरे कंचनपूर

६१६।।०।।

७४।⁄ तिही तक्षीमाचे भाउ सनगे १४

११३⁄।। पाटलांचे भाउ ३४

५९।⁄ कुलकर्णी सनगे १२

८ चौगला सनगे २

१८१।⁄ थळवाईक ६०

५३।/ जमले आसामी २२

५१। आडाण आसामी सनगे २४

५८ कारु २५ तिवटे

६१६।।'।।

११९७।।⁄

१५७ नख्त

४२ जेकुदीन काजी शालजोडीबद्दल ४०, बाकी २

१० नायेंब

७५ धोंडो गोपाल आा देशमूख देशपांडिये याचे बापास शालजोडी

२० कुलकर्णी

१० मौजे मजकूराच्या माहारांचे बायकांस साड्या

१५७

१५४⁄ भोजन खर्च व घोडी यांस दाणा व पानसुपारी महजर-समई गावगनाचे पाटील कुलकर्णी आले त्यास खर्च

१५०९।/

५०० सेरणी पाटीलकी समधे सरकारची पत्रे करुन घेतली त्यास सरकारांत देउन पावल्याचा जाब घेतला असे छ. ९ जमा-दिलावल सन सबा शके १६९८

७००९।/

१३२३८⁄ मौजे कोकमठाण येथील गावची बाकी सन तिसाची सरकारची

देणे ते पाटिलकीचे खरीदीखत करुन घ्यावयास बक्षीस पांच हजार सरकारातून कोकमठाणचें ऐवजी देविले होते त्यापैकी घेऊन नांवे लिाा

३४१६।।⁄ निलकंठ महादेव जमा सरकारातून कोकमठाणचे पाटिलकीचे खरिदीखत करुन घ्यावयास सरकारातून बक्षीस पांच हजार कोकमठाणीहून दरसाल हजार रुपये प्रों मानसिंगाकडून देविले पांच हजार त्यापैकीं गावचे ऐवजी पावले रुपये २६० सन सब १३२३४⁄ सन तिसांची बाकी हिसेबी राहिले ते सन इहिदे खर्च लिाा १५८३४⁄

बाकी ऐवज कोकमठाणचे ऐवजी मानसिंगाकडून पावला नाही तो पुणे सुभ्याकडून घेतला सन ईहिदे पाा १७ सदरहू पावेतो ग्गा रामचंद्र उमाजी आसे

भाद्रपद मास

५३ खाा पाटिलकी कोकमठाण येथील कागदपत्रवाले महजर लोक ते समइ सनगे दिल्ही नव्हती ते हली दिल्ही मेजवानी

१५ रामचंद्र धोंडदेव दिाा पागा मानसिंग

१७ बालाजीपंत दिाा पागा रामचंद्रपंताचा भाचा

२१ मानसिंगाचा लेक

५३

तुळशीबागवाले

श. १६८५
इ.स. १७६४

३४३ मौजे कोकमठाण पाटीलकीची महजर करुन घ्यावयास गांवास गेलों ते समयीं पहिलीं कर्जे गांवाकडे होतीं ते कर्जदार जमा झाले त्यांचीं कर्जे वारली. त्याची अलाहिदा याद आहे. ५००० रु. पाटिलकीबाा भरणा देऊन जाजती पावले ते (१६८५ पौष)

तुळशीबागवाले

श. १६८३

इ.स. १७६१

पाटोदे दिा रामचंद्र दामोदर याजकडून देऊन पसतीशा रुपयांचे खत मानसिंगाचे सोडवून घेतले आकरासे मानसिंगाचे दिल्हे होते ते त्याचे बापाजवळ दिल्हे. सदरहु पसतिशाच्या पावत्या दोघापासून दोन घेतल्या आसेत छ २६ सवाल सन ११७० (वैशाख वा १३ ता. १-६-१७६१)

११०० मानसिंग दिा पागा याने बाबुराव विष्णु जवळील खरिदीखत सोडवून रोख दिल्हे होते ते त्याचे बापाजवळ चत्रसिंगाजवळ देउन पावती घेतली आसे रुपये ३५०० चे खत व खरिदीखत गांवकरी याचे सोडवून मानसिंगाने घेतले. त्यापैकी रोख दिल्हे होते ते दिल्हे छ २६

१२४० कर्जे वारण्यास आमानत रामचंद्र धोंडदेव दिा पागा मानसिंग याजवळ ठेविले ते तेच समई त्याजपासून घेऊन कर्जे वारिली गावकरी यांची पेसजीची बाकी होती तपसील छ ११ जिलकाद सन ११७१ (श. १६८३ ज्येष्ठ शु१ा १३ ता. १५-६-१७६१)

७०० त्रिंबक मल्हार दिा मल्हार दादाजी याची खते ६ एकूण १४८४।[२३]

नानासाहेब पेशव्याच्या निधनानंतर थोरला माधवराव पेशवा झाला. तो आर्थिक व्यवहारामध्ये दक्ष असल्याने त्याने राज्यातील आर्थिक कारभारावर लक्ष देवून आपली माणसे नेमली. त्याचाच एक भाग म्हणून कुंभारी व कोपरगावचा कारभार व कमाविसी जिवाजी हरि याजकडे दिली. त्याविषयीची माधवरावाची आर्थिक नोंद पुढील प्रमाणे -

व कुपण घेतले त्यास खरिदीस व महजरास वगैरे खर्च ऐन खरिदी

जिवाजी हरि कमाविसदार परगणे कुंभारी, व परगणे राहुरी, परगणे संगमनेर येथील अंमल पेशजीचे कमावीसदाराकडून दूर करून सालमजकूरापासून तुम्हास कमावीसी सांगितली असे. रसदेचा ऐवज -

६०००० *तूर्त भाद्रपद शुद्ध पौर्णिमा भरणा करावा.*

४०००० *एका महिन्याने अश्विन शुद्ध पौर्णिमा निमे व निमे अश्विन अखेर*

१०००००

एकूण एक लक्ष रुपयांचा भरणा सदहू प्रांत (प्रमाणे) अरकटगंजीकोट प्रतीचा भरणा करून पावलियाचा जाब घेणे. याखेरीज महासंबंधे कलमे -'

'महालमजकुरी शिबंदी व कमाविसदाराची नेमणूक पेशजीचे शिरस्तेप्रमाणे मजुरा पडेल. कलम'

रसदेचे व्याज एकोत्रा बिनसूटप्रमाणे.

कलम १.

'महाली रसदेचा ऐवज वसूल जाल्यावर जाजती ऐवज होईल. तो समजवावा तदनंतर वरात होईल. कलम १.'

सदरहू महालपैकी गांव कोणांस देऊ नये. दिला तरी गावाचा आकार होईल त्याची रसद ठरेल ती सदरहू रसदेंत मजुरा द्यावी.

कलम १

तुर्त रसदेचा ऐवज सरकारांत घेतला, तर हल्ली ऐवजास आद्याच्या मित्या लागतील ते तेरीखपर्यंत व्याज मजुरा पडेल.

कलम १

सरकारातून फडनीस व मजमदार होऊन सनद सादर होईल. त्याचे हाते कामकाज घेत जाणे.

कलम १

'एकूण सहा कलम करार करून दिली असेत. तरी सदरहू प्रमाणे वर्तणूक करून इमाने इतबारे कमावीस करून कच्चा हिशोब अखेरसाली सरकारांत समजावीत जाणे. म्हणोन.'

सनद १

चिटणीसी ४

२ *दोन महालच्या कमाविसदारांस* ५

२ *दोन माहालचे जमीदारास''*[२४]

४

थोरल्या माधवरावाने प्रशासकीय घडी व्यवस्थित बसवून जवळजवळ पानिपतावरील मराठ्यांचे अपयश धुवून काढले. त्यासाठी त्याने मोगलांच्या ताब्यातील मराठ्यांचे किल्ले जिंकून घेतले. इ.स. १७६१ मध्ये पट्टा किल्ला मोगलांकडून मराठ्यांनी जिंकून घेतला. त्यावेळी

पट्टा किल्ल्यास सरंजाम म्हणून कोपरगाव जवळची पुढील गावे दिली होती ती पुढीलप्रमाणे -

परगणे कुंभारीपैकी

१ *मौजे सिंगवे वारी हिसा*

१ *मौजे कोकमठाण*

१ *मौजे धारणगाव*

३

तर्फ कोराळेपैकी -

१ *मौजे मढी बुद्रुक*

१ *मौजे मढी खुर्द*

१ *मौजे अंजनापूर*

१ *मौजे हिंगणवेढे*

१ *मौजे मरढोण*

ही गावे आज कोपरगाव तालुक्यात आहेत.[२५]

थोरल्या माधवरावाचे कार्यकर्तृत्त्व राघोबादादास सहन झाले नाही. तो माधवरावास त्रास देऊ लागला. पेशव्यांच्या इतिहासामध्ये या दोघांचे वैर सर्वत्र प्रसिद्ध आहे. राघोबादादाचा आपणास जास्त त्रास होऊ नये म्हणून माधवरावाने राघोबास कोपरगावमधील पुढील गावे सरंजाम म्हणून दिली.

३०,००० परगणे कुंभारी

२५,००० संवंत्सर, कोकमठाण, कचेश्वर बेट.

या गावांचा कारभार राघोबादादातर्फे १७६३ पासून चिंतो विठ्ठल पाहत होता.[२६] मात्र १७६८ पासून माधवरावाने राघोबाचाही सरंजाम रद्द करुन तो पुन्हा सरकारात घेतला. या गावांचा महसूल सरकारी खजिन्यामध्ये भरण्यास सांगितले.[२७] चिंतो विठ्ठल राघोबास कोपरगावची सविस्तर माहिती कळवित असे. दि. ४ ते ७ नोव्हेंबर १७६४ या काळात राघोबादादा कोपरगाव मुक्कामी थांबून आपल्या सरंजामाचा आढावा घेताना दिसतो.[२८] राघोबाच्या कोपरगावमधील वास्तव्यावर माधवरावाची नजर होती. माधवरावही प्रसंगी कोपरगावी येत असे. तो १७६७ च्या एप्रिलमध्ये वऱ्हाड प्रांतामध्ये गेला होता. तेथून परत

येताना अचानकपणे दि. २२ एप्रिल १७६६ रोजी कोपरगावमध्ये आला. पुढील दोन दिवस तो कोपरगाव व कोकमठाणमध्ये वास्तव्यास होता.[२९]

माधवराव आपल्या अखेरच्या दिवसांमध्ये आपल्या तब्येतीस उतार पडावा म्हणून दि. २५ ऑक्टोबर ते २१ नोव्हेंबर १७७१ या एक महिन्याच्या कालावधीत कोपरगावमध्ये वास्तव्यास होता. नंतर तो पुण्याजवळ थेऊर येथे गेला.[३०] कोपरगावामधील वास्तव्यात थोरल्या माधवरावाच्या तब्येतीस बरे वाटावे म्हणून विविध ठिकाणी अनुष्ठाने केली. कोपरगावचे कचेश्वर देवस्थान पेशव्यांच्या विविध देवतांपैकी एक श्रद्धेचे ठिकाण होते. २३ ऑक्टोबर १७७१ रोजी कोपरगावी बेटामध्ये कचेश्वर येथे चंद्रग्रहाणाचे मुहूर्तावर माधवरावाची सुवर्णतुला करण्यात आली. मात्र तिचा काहीच उपयोग झाला नाही. माधवराव पुण्याजवळ थेऊर येथे निधन पावला. त्यानंतर नारायणराव पेशवा आपली मोठी छाप पाडू शकला नाही. ३० ऑगस्ट १७७३ रोजी नारायणरावाचा खून झाला. त्यामागे राघोबाचा हात असल्याचे पुढे चौकशीत सिद्ध झाले. तो कोपरगाव वास्तव्यास आला.

थोरला माधवराव व राघोबादादा यांच्यामध्ये मतभेद झाले. राघोबा काही काळ पेशव्यांविरुद्ध इंग्रजांना जाऊन मिळालाही होता. पुढे ७ मे १७८२ रोजी पुणे दरबाराचा इंग्रजांशी साल्बाईचा तह झाला. राघोबादादा आता दरमहा २५,०००/- निवृत्तीवेतन घेऊन राजकारणातून निवृत्त झाला. महादजी शिंदेच्या सल्ल्यावरुन त्याने कोपरगावला कायमचे वास्तव्य करण्याचे ठरविले. १७८२ च्या ऑगस्ट महिन्यात तो कोपरगावला येऊन स्थायिक झाला. गोदावरी नदीच्या काठी कोपरगाव व हिंगणी येथे राघोबाने दोन वाडे बांधले. राघोबाने कोपरगाव हे पुण्यक्षेत्र मानले जात असल्याने आपल्या वास्तव्यासाठी निवडले. कोपरगावजवळ 'बेट' ही वसाहत आहे. याच बेटामध्ये 'श्री शुक्लेश्वर', 'श्री कचेश्वर' आणि विष्णू यांची मंदिरे आहेत. बेटामध्ये प्राचीन काळात शुक्राचार्यांनी कचेश्वरास संजिवनी विद्या दिली अशी पौराणिक कथा सांगितली जाते. ती आजही प्रचलित आहे. त्यामुळे हा परिसर पुण्यक्षेत्र मानला जातो. म्हणूनच राघोबाने आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस येथे व्यतित करण्याचे ठरविले.

राघोबादादास नवीन गावे वसविण्याप्रमाणेच इमारती व वाडे बांधण्याची हौस होती. कोपरगाव परिसरात राघोबाने दोन वाडे बांधले. पहिला वाडा कोपरगावमध्ये तर दुसरा गोदावरी नदीकाठी कोपरगावच्या पश्चिमेस हिंगणी या गावी आहे. कोपरगावच्या वाड्याची

बांधकामाची जबाबदारी राघोबाने १७६७ पासूनच बापूजी कृष्ण या सरदारावर सोपविली होती. ही बाब २४ जुलै १७६७ च्या पत्रावरुन स्पष्ट होते ते पत्र पुढीलप्रमाणे -

''श्रीगजानन

सेवेसी बापूजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ. २७ सफर मुक्काम शुक्लेश्वर येथास्तित आसे विशेष.

सरकारवाड्याचे काम च्यार दिवाली व चौसोपी व घर व बंगले इतके आज्ञेप्रमाणे काम सिध जाले. पुढे पुण्यास यावयाची आज्ञा जाली पाहिजे म्हणौन येथे आहो. किरकोल आठा चौ दिवसाचे काम आहे. ते इतक्यात होईल. पुढे काम तुर्त नाही. याजकरिता पुण्यास यावयाची आज्ञा काय ती करावी; त्याप्रमाणे करू. श्रीमंत राजश्री दादासाहेब या मार्गे आनंदवल्लीस गेले. वद्य १० मंगलवारी येथे स्वारी आली. श्रीमंतांनी वाडा संपूर्ण फिरुन पाहिला. दुसरे दिवसी प्राथकाली भोजन येथेच करावे यैसी श्रीमंताची मर्जी होती. भोजनाची तर्तूद करणे म्हणौन आज्ञा केली होती. मागती दिकत निघाली की, वास्तुशांती जाली नाही. यामुळे तो मनसुबा राहिला. त्यास मातबर इमारत. प्रथम काम जाले त्या तागाईत वास्तुशांती नाही. यास्तव सूचनार्थ लिहिले आहे.[३१]*''*

कोपरगावच्या वाड्याचा पेशवे दफ्तरामध्ये दुसऱ्यांदा उल्लेख आला आहे. तो असा -

''मौजे कोपरगाव, परगणा कुंभारी येथे गंगेच्या बेटात श्री शुक्लेश्वर देवालयासन्निध सन इसने सबैनात [इ.स. १७७१-७२] सरकारचा वाडा व बाग नवा केला.''

याचाच अर्थ इ.स. १७७१-७२ पूर्वी कोपरगावच्या सरकारवाड्याचे बांधकाम पूर्ण झालेले होते.

वाड्याची बाह्यरचना

पेशव्यांच्या कोपरगावातील हा प्रशस्त वाडा पूर्वाभिमुख,-धाबा पद्धतीचा असून पूर्व, पश्चिम व उत्तर बाजूने वाड्यात प्रवेश करण्यासाठी साधारणतः ६' .६'' X ४' .३ X १' .३'' आकाराच्या चौकटी व ३'' जाडीचे पितळी फिरक्या बसविलेले व थोडेफार नक्षीकाम केलेले लाकडी दरवाजे आहेत. मुख्य प्रवेशद्वार गंगेच्या बाजूला म्हणजे पूर्वेकडे असून, या बाजूची दगडी जोत्याची उंची सुमारे २० फूट आहे. त्यासाठी दगडी २५ पायऱ्यांचा जिना आहे. मात्र जमिनीच्या चढावामुळे उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रवेशद्वारांच्या जोत्यांची उंची कमी आहे. वाड्याच्या जोत्यावरील बांधकामासाठी पक्की वीट, माती, चुना व घडीव दगड वापरलेला असून, धाब्याच्या छपरासाठी लाकडी फळी, वीट व मातीचा वापर केला आहे. त्यावरुन वाळू व चुना यांच्या मिश्रणाचा साधारणतः दीड इंच जाडीचा कोबा आहे.

भरपूर प्रकाश, खुली हवा, यासाठी दक्षिण व पूर्व बाजूच्या भिंतीमध्ये ५' .६''X २' .६'' आकाराच्या प्रत्येक खणामध्ये एक अशा १५ खिडक्या आणि पूर्वेकडील भिंतीमध्ये त्याच आकारमानाच्या व तेवढ्याच अंतरावरील १० खिडक्या आहेत. त्या मानाने उत्तर व पश्चिम बाजूच्या भिंतीमध्ये कमी खिडक्या आहेत, तरी परंतु वाड्यामधील दोन चौकांमुळे भरपूर प्रकाश व खुली हवा ही सुविधा साधली आहे. या बांधकामामुळे मुख्यतः दिखाऊपणापेक्षा टिकाऊपणाकडे अधिक लक्ष दिले होते, असे दिसते.

अंतर्गत रचना

पेशव्यांच्या या वाड्याचे पुण्यातील विश्रामबाग वाड्याप्रमाणे वाड्यांतर्गत वाडा असे स्वरूप आहे हे पहावयास मिळते. मुख्य वाड्यामधील पहिल्या खोलीमध्ये झोपाळ्याची व्यवस्था होती. त्या खोलीच्या छताचे लाकडावर सुबक नक्षीकाम आहे. वाड्यामध्ये मुख्य प्रवेशद्वार व उत्तर प्रवेशद्वार यांच्यासमोर अंदाजे १५ फूट X १५ फूट आकारमानाचा चौक आहे. चौकाच्या चारही बाजूंनी ओसरी व बैठकीच्या सदरेची रचना आहे. ओसरीवर लाकडी खांब असून प्रत्येकी दोन भिंतीमध्ये भुयार असून त्यालगत आंतरवाड्यातील बैठकीची खोली आहे. भिंतीतून निघालेल्या या भुयारी मार्गाचे दुसरे टोक बेट कोपरगावातील श्री शुक्लेश्वर मंदिराच्या देवडीजवळ निघालेले आहे. ब्रिटिश आमदानीपासून हा भुयारी मार्ग सुरक्षिततेसाठी बंद करण्यात आलेला आहे. सदर वास्तूचा ब्रिटिशांनी तहसिल कचेरीसाठी

वापर केला होता. तेथील शासकीय तहसील कचेरी १९५३ चे आसपास स्वतंत्र इमारतीमध्ये स्थलांतरीत केली गेली.

आंतरवाडा

आंतरवाड्यामध्ये १५ फूट X १५ फूट या आकारमानाचा चौक असून, चौकाच्या चारही बाजूंनी घडीव दगडाची ओसरी आहे. ओसरीच्या वरील बाजूने देवघर, माजघर इत्यादी खोल्या आहेत. वाड्याच्या या भागातच श्रीमंत आनंदीबाईसाहेबांचे सुमारे ९ वर्षे वास्तव्य होते.

स्नानगृह व शौचकूप

या आंतरवाड्यातील दक्षिणेकडील कोपऱ्यातील १०'X १२' आकारमानाच्या खोलीमध्ये ५' X ५' आकारमानाचे स्नानगृह व त्याला जोडूनच ५' X ५' आकारमानाचे शौचकूप आहे.

पाणीपुरवठा व सांडपाणी

पेशव्यांच्या सेवेतील पाणके, गोदावरी नदीचे पाणी पखालीने वाड्यामध्ये भरीत असत. पाणी साठविण्यासाठी मुख्यतः खापरांचे रांजण होते. सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी बंद गटारांची सोय करण्यात आली होती. हे सर्व पाणी वाड्याबाहेर बंद गटारातून काढून उघड्या गटाराने दूर नेऊन सोडलेले आहे. हे आजही पाहावयास मिळते.

विटाळशीचा वाडा

राघोबादादांच्या पत्नी श्रीमंत आनंदीबाईंचे या वाड्यात दीर्घकाळ वास्तव्य होते. (इ.स. १७६७ ते १७८३ या कालावधीमध्ये अधून-मधून व इ.स. १७८३ ते १७९२ पर्यंत सलग वास्तव्य होते. तदनंतर या कुटुंबाला पुणे दरबारच्या आदेशानुसार नासिकजवळील आनंदवल्लीला स्थलांतरीत व्हावे लागले.) त्यांच्या सोबत पुत्र बाजीराव, कोपरगावातच जन्मलेले चिमाजी व दत्तकपुत्र अमृतराव ही तीन मुले आणि अमृतरावांची बायको सावित्रीबाईम बाजीरावाची बायको भागीरथीबाई असा राघोबादादांचा कौटुंबिक परिवार येथे होता. त्याशिवाय इतर सेवकांचा लवाजमाही होता. दाहासाहेबांच्या पश्चात हे कुटुंब जवळ जवळ नजरकैदेतच होते. त्यांची देखभाल करण्यासाठी नाना फडणिसांनी गोविंद कृष्ण गोडबोले हे अधिकारी नेमले होते. असे पेशवे दफ्तरातील नोंदीवरून दिसते.

श्रीमंत आनंदीबाईंच्या दिनचर्येवरुन त्यांचे येथील धार्मिक विधी, व्रतवैकल्ये, बाजीरावाचा हुडपणा इ. बाबींची तपशीलवार माहिती मिळते. तसेच श्रीमंत आनंदीबाई 'अस्पर्श' असताना अंतर्वाड्यातील मागील खोलीत बसत असत, अशी माहिती मिळते. गोदावरी नदीला स्पर्श होऊ नये म्हणून त्या वाड्यातून बाहेर पडत नसत. कदाचित त्यामुळेच या वाड्याला 'विटाळशीचा वाडा' असे म्हणण्याचा प्रघात पडलेला असावा, हा प्रघात आजही प्रचलित आहे.

तीन भिंतीचा वाडा (हिंगणीचा वाडा)

रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा राजकारणातून निवृत्त होऊन कायमचे वास्तव्य करण्यासाठी जेव्हा कोपरगावात आले तेव्हा त्यांनी कोपरगावचे पश्चिमेला तीन मैलावर असलेल्या हिंगणी गावाजवळ भव्य वाडा बांधण्याचे ठरवले. त्यांनी वाड्यासाठी गोदावरी नदीच्या पश्चिम तीरावरील निसर्गसुंदर जागेची निवड करुन तेथे वाड्याच्या बांधकामाला सुरुवात केली. दुर्दैवाने वाड्याच्या तीन भिंतींचे बांधकाम झाले. पूर्वेकडील चौथ्या, गंगेच्या तीरावरील दर्शनी भिंतीचे बांधकाम चालू असतानाच, श्रीमंत दादासाहेब ११ डिसेंबर १७८३ रोजी आकस्मिकपणे निवर्तले साहजिकपणे हा 'तीन भिंतीचा वाडा'आजही राघोबादादांच्या अतृप्त इच्छेची साक्ष देत उभा आहे.

उत्कृष्ठ बांधकाम

तीन भिंतींच्या वाड्याचे बांधकाम अतिशय मजबूत, भक्कम व उत्कृष्ठ दर्जाचे आहे. तीन भिंतींची लांबी २००० फूट, रुंदी १० फूट आणि ४५ फूट उंच असून भिंतीची माथ्यावरील जाडी ७ फूटांची आहे. भिंतीच्या अग्रभागी जाण्यासाठी विशिष्ट उंचीवरच्या दगडी बांधीव जोत्याच्या पायऱ्या ठेवल्या आहेत. या सर्व बांधकामाला आत बाहेर कातीव स्वरुपाचा काळा दगड, चुना वापरलेला आहे. गोदावरी नदीच्या तीरावरील या वाड्याच्या उत्तर व दक्षिण भिंतीला एक एक बुरुज बांधलेला आहे. तर फक्त उत्तरेकडील भिंतीमध्ये प्रशस्त प्रवेशद्वार ठेवलेले आहे. राघोबादादांच्या इच्छेनुसार बांधला जाणारा हा तीन भिंतींचा वाडा पूर्ण झाला असता तर प्रशस्त, भक्कम आणि रेखीव नक्षीकामाचा प्रेक्षणीय (वाडा) पहावयास मिळाला असता, परंतु श्रीमंतांच्या आकस्मिक निधनाने चौथी भिंत आणि अंतर्गत बांधकाम जे राहून गेले ते आजतागायत अपुरेच राहिले, त्यामुळे पेशवेकालीन वास्तू शिल्पकलेतील प्रगतीचा एक उत्तम अविष्कार साकार होत असतानाच दुर्दैवाने अपूर्ण राहिला. या तीन भिंतींच्या वाड्यामध्येच राघोबादादांची समाधी आहे.[३२]

नारायणरावाच्या हत्येच्या संदर्भात जो डाग राघोबादादावर लागला होता. त्याबद्दल धर्मसंमत सक्षौर प्रायश्चित घ्यावे आणि गोपिकाबाईचे दर्शन घ्यावे क्षमा याचना करुन त्यांचा आशिर्वाद घ्यावा असा प्रांजळ सल्ला राघोबास आनंदीबाईंने दिला होता. त्या अन्वये राघोबादादांनी नाशिक, पंचवटी, कोपरगाव, कचेश्वर टोके, त्रिंबकेश्वर, गंगापूर येथील विद्वान ब्राह्मण व काही विशिष्ट मातब्बर आसामी कोपरगावला प्रायश्चित विधीसाठी एकत्रित जमविले. त्यांनी विचारपूर्वक प्रायश्चिताचा मसूदा तयार केला. उच्चार करावयाच्या संकल्पाचा मसूदा पाहून राघोबाने हरकत घेतली की, दोषाहून उच्चार फार तेव्हा दहापाच सूज्ञ ब्राह्मणांनी असाच उच्चार करावा असे सांगितल्यावर राघोबाने मान्य केले. सर्वांचे संशय दूर करुन शुद्ध व्हावे असे मनात आणून प्रायश्चित घेतले... एकवेळ उच्चार स्वमुखे स्पष्ट केला. गोदावरी व दारणा यांच्या संगमावरील सांगवी या गावी ४ ऑगस्ट १७८३ रोजी सकाळी प्रसन्न चित्ताने संकल्प सोडला व शास्त्रसंमत सक्षौर प्रायश्चित घेतले. यानंतर काही दिवसांनी राघोबादादा आणि गोपिकाबाई यांची गोदावरी नदीकाठी गंगापूरला भेट झाली.

कोपरगावच्या बेटामध्ये कचेश्वर, श्री गणपती, श्री विष्णू व श्री शुक्लेश्वर अशी सुंदर मंदिरे असून तेथील श्री विष्णू आणि लक्ष्मीच्या मुर्ती राघोबाच्या हस्ते स्थापित झाल्या होत्या. या मंदिराची बांधकामे राघोबाच्या आर्थिक मदतीमधून झाली. शुक्लेश्वर मंदिराजवळून खालच्या बाजूने गोदावरी नदी वाहते. मंदिरांच्या चौथऱ्यावर बसून संध्या करण्याची सोय आहे. देवालयाच्या जवळच्या पारास 'कचदेवयानीचा किंवा संजीवनी पार' असे म्हणतात. वरील चार मंदिरांपैकी गणपतीचे मंदिर काळोजी पवाराचा मुलगा जिवाजी पवार याने ११ एप्रिल १७६८ रोजी बांधून पूर्ण केले. मंदिरास घाटही बांधला. त्यासंबंधीचा शिलालेख अजून सुस्थितीत आहे. तो पुढील प्रमाणे -

'स्वस्ति श्री नृपशालिवाहन शके १६८९ सर्वजित नाम संवछरे माघ शुद्य १ तागाईत शके १६९० चैत्र व ९ मासे समाप्त गोदावरी पश्चिम वाहिनी कटमध्ये घाट कर्तव्ये काळोजीसुत जिवाजी पवार कोपरगाव प्रगने कुंभारी श्री गंगाप्रितर्थ का.... स्थयु केला असे काम जाले.'

जिवाजी पवाराचा वाडाही मंदिराजवळ होता. इंग्रजांनी कोपरगाव परिसर ताब्यात घेतल्यावर हा वाडा पाडला. त्याचे कोरीव दगड व सामानाचा लिलाव करण्यात आला. येवला (जि. नाशिक) येथील प्रसिद्ध व्यापारी गंगाराम छबिलदास याने कोरीव दगड व सामान विकत घेतले. त्याच्या साह्याने येवला गावामध्ये मोठा वाडा बांधला. मात्र तो फार काळ जगला नाही.

राघोबादादांचा कोपरगावमधील ग्रंथसंग्रह

निवृत्तीनंतरचे हे जीवन राघोबादादाला चार महिन्यापेक्षा फार काळ लाभले नाही. दिवसेंदिवस प्रकृती खालावतच चालली. नोव्हेंबर सन १७८३ मध्ये आणखीनच ढासळली तेव्हा मृत्यूपूर्वी सुमारे ५-६ दिवस आधी इच्छारामपंत वैद्य यांस सांगितले की वर शिढ्या लावून याद करून अमृतराव याजपाशी द्यावी व सुमारे चार लक्ष ग्रंथ वैद्यकशास्त्र, धर्मशास्त्र वगैरे संग्रह पुस्तकाचा केला होता याचा कोही भोक्ता जाल्यास उपयोग आहे. नंतर २-३ दिवस बोलणे राहिले तसे एक दिवस होते दुसरे दिवसी मार्गशिर्ष वद्य ३ शके १७०३ सहा घटिका रात्रीस कैलासवासी जाहले. ही बातमी पुण्याला तिसऱ्या दिवशी समजल्यानंतर नाना फडणीसांनी उत्तर कार्यासाठी एक लाख रुपये रोख पाठवले दहा दिवस पर्यंतचे कृतय अमृतरावांनी केले संपिंडी दुसऱ्या बाजीरावांनी केली.

राघोबादादाच्या निधनानंतर ऑक्टोबर इ.स. १७९२ पर्यंत आनंदीबाई परिवारासह कोपरगाव येथे कैदेतच होत्या. त्या काळात त्यांना दोन लाख रुपये रोख नेमणूक होती. तैनातीसाठी गोविंदपंत कृष्णाजी गोडबोले, अप्पाजीराम सहस्त्रबुद्धे व केसो महादेव ओक हे पागा फौजेसह असत. नाना फडणीसांनी यांची नेमणूक कारभारी म्हणून केलेली असली तरी त्यांचे खरे काम पहारे ठेवणे व कोपरगावच्या रोजच्या घडामोडी सर्व तपशीलासह पुण्याला कळविणे हे होते. आनंदीबाईचा रोजचा दिनक्रम काय? त्या कोणाला भेटतात? कोठे जातात? काय बोलतात इत्यादी सर्व माहिती नाना फडणवीसाला पाठवावी लागे आनंदीबाईच्या कारस्थानी वृत्तीची त्या काहीतरी घातक मंत्रतंत्र करतील याची पुण्यातल्या कारभाऱ्यांना सतत भीती वाटत असे. यामुळे आनंदीबाईस थोडीही मोकळीक मिळत नसे.

कोपरगावच्या कैदेत असताना नाना फडणीसास कैद करण्याच्या कटात आनंदीबाई अप्रत्यक्षपणे सामील असल्याचे काही उल्लेख पेशवे दफ्तरात मिळतात. हा कट उघडकीला

आल्यावर कोपरगावची बंधने आणखी कडक झाली. आनंदीबाईवर कायम लक्ष ठेवण्यासाठी केसो महादेव व त्याचा चिरंजीव जगन्नाथ केशव यांची नियुक्ती करण्यात आली. साहजिकच आनंदीबाईचा जळफळाट झाल्याने त्यांनी कारकून व कारभाऱ्यांची कठोर शब्दात निर्भत्सना केली. कारकून मंडळी सर्व हकीकत जशीच्या तशी लिहून पुण्याला पाठवित. बाहेरुन कोपरगावी येणाऱ्या आणि तेथून बाहेर जाणाऱ्या मंडळींना लेखी परवानगी घ्यावी लागे. जागोजागी चौक्या पहारे बसलेले होते. आनंदीबाईची पत्रे बाहेर जात तसेच बाहेरची पत्रे आनंदीबाईकडे येत त्या प्रत्येक पत्राच्या नकला पुण्याला रवाना होत असत. सर्व बाजूंनी त्रासलेल्या आनंदीबाईची नेहमीच तक्रार असे की कारभारी मंडळी आपल्याला त्रास देताना गरजेपेक्षा कमी खाण्यास देऊन उपासमार करतात. कोणाला भेटेन म्हटले तर नानाची लेखी परवानगी मागतात. कोणाजवळ बोलायचे नाही की काही करायचे नाही असा मुका मार देतात आम्ही पडलो बंदी आमचे ऐकते कोण? आज त्यांची सद्दी आहे म्हणूनच अशा गोष्टी घडतात.

राघोबादादाच्या निधनासमयी आनंदीबाई गरोदर होत्या. सुमारे साडेतीन महिन्यानंतर सर्वात धाकट्या मुलास म्हणजे चिमणाजी आप्पासाहेब याचा जन्म ३० मार्च १८८४ रोजी कोपरगाव मुक्कामी झाला. त्यावेळी आनंदीबाई प्रतिकूल परिस्थितीत असल्याने पुत्रजन्माची विशेष कौतुकाने दखल घेतली जाणे शक्यच नव्हते. तेव्हा आनंदीबाई म्हणते, 'चिमाजी अप्पा जाले हे ऐकोन आनंद झाला नाही शर्कराही वाटली नाही. वैरी निर्माण झाला आहे. त्याचे दुःख झाले त्यामुळे शर्करा वाटण्याचे विस्मरण जाले.' अशी त्या खंत व्यक्त करतात.

राघोबादादाच्या पश्चात नाना फडणीसांनी अन्याबा मेहंदळे यांना आनंदीबाईचे दागिने घेऊन येण्यासाठी पाठविले जवाहिर देणे म्हणोन मशारनिल्हे बोलले बाईंनी उत्तर केले की अंगावर आहेत ते काढोण घेणे, हे उत्तर अन्याबाने नानास लिहिले त्यांनी उत्तर पाठविले की निघोण येणे म्हणोन माघारे आले. कोपरगावला आनंदीबाईचाच बराचसा वेळ देवधर्मातच जाई. व्रत वैकल्य उपासतापास नेहमीच चालू असत. कोणत्याही तीर्थक्षेत्री अथवा यात्रेला जाण्याची परवानगी मात्र पुण्याहून कधी मिळाली नाही.

आनंदीबाईजवळ धार्मिक ग्रंथसंग्रह मोठा होता. एखादी पोथी जवळ नसल्यास त्याची प्रत त्या लेखनिकाकडून उतरवून घेत. त्या स्वतः सप्तशतीचा पाठ तोंडी म्हणत नेहमी पुराण श्रवण करीत. परिसरातील देवदर्शनास जात. कोपरगावच्या वाड्यामध्ये चैत्र महिन्यात गौरीची

स्थापना केली जाई. त्यावेळी कोपरगाव, हिंगणी, कचेश्वर भागातील स्त्रिया हळदीकुंकवासाठी येत. वसंतपुजेच्या दिवशी वाड्यामध्ये ब्राह्मण जमत. श्रावणमासाची दक्षिणाही वाटण्याची प्रथा होती. मासिक शिवरात्रीला आनंदीबाई जागर करीत. चार प्रहरांना पूजा करीत. कोपरगावी आनंदीबाई नेहमी करीत असलेल्या धार्मिक कृत्यामागे काहीतरी कपट कारस्थानेच असली पाहिजेत असा बारभाई मंडळास नेहमीच संशय होता. इ.स. १७८८ च्या सूर्यग्रहणामध्ये आनंदीबाईला सुवर्णतुला आणि सर्वस्वदान करण्याची परवानगी नाकारण्यात आली. त्यावेळी त्रागा करताना दिसते.

दुसऱ्या बाजीरावाच्या बालपणी त्यास शिकविण्यासाठी राधोपंत ठोसर नावाचे शिक्षक खास पुण्याहून पाठविले होते. कोपरगावच्या वाड्यामध्ये दासी, कुणबीनी नाना फडणीसाच्या आदेशानुसारच नेमल्या जात. राधोपंत ठोसर शिकवणी आटोपून पुण्यास गेल्यावर बाजीरावावरील दबाव नाहीसा झाला. दासी, नाटकशाळा, कुणबीनी यांच्या संगतीमध्ये कोपरगावी बाजीरावाचे दिवस जाऊ लागले. तो कोणाचाही मान ठेवीत नसे. आनंदीबाईसही उलटून बोलत असे. अर्वाच्य भाषेचा वापर जास्त करु लागला होता. आनंदीबाईसारख्या मानी स्त्रिला ही बाब सहन होणे शक्य नव्हते. बाजीरावास वयाच्या तेराव्या वर्षी उष्णतेचा त्रास होऊ लागला. आनंदीबाई म्हणते, 'बाजीराव यांस गरमी जाली आहे. बाईकी थोर नाही हेच बाधा फार आहे.'यांणी विद्या सिकावी किंवा शहाणे व्हावे हे कोणास अगत्य नाही आजून त्याचाही बंदोबस्तच केला नाही... जाल्याशिवाय तो राधोपंत ठोसर तरी कशास येईल? बाजीराव आखाचगिर फार करीतात ऐकत नाहित हे काय जाले? बाजीराव थोर जाले असता अद्यापि मर्यादेची तऱ्हा नाही. कालचर्चेस काय म्हणावे? आम्ही पेचात आणि मुले अशी तशात हा मुख्य याची तऱ्हा अशी नसावी याचे दैवाने चार आणि याणी असे असणे हा दैवयोग आहे. आनंदीबाई १७९२ च्या ऑक्टोबर महिन्यामध्ये कोपरगावमधून नाशिकजवळच्या आनंदवल्ली गावी वास्तव्यास गेली.

कोपरगावमधील वास्तव्यात राघोबादादा व आनंदीबाई यांनी ग्रंथसंग्रह केला होता.

१. अपरार्क ग्रंथ	२. मदनपारिजात	३. विज्ञानेश्वर
४. अध्यात्म रामायण	५. सहस्त्रचंद्र विधान	६. सिद्धान्तबिंदू
७. गीताशंकरभाष्य	८. अग्निपुराण	९. काशी महात्म्य

१०. बृहनारदी　　११. उपदेशसहस्त्री　　१२. गीतगोविंद

१३. गया महात्म्य　　१४. केदार महात्म्य　　१५. वैशाख महात्म्य

१६. नीलकंठी सटीक　　१७. शुद्र कमलाकर　　१८. तत्वानुसंधान... इ.

उत्तम ग्रंथांचा संग्रह कोपरगावमध्ये राघोबाच्या पदरी होता. ग्रंथाच्या संग्रहाप्रमाणे राघोबाच्या बऱ्याच दासीही कोपरगावमध्ये होत्या. राघोबाच्या नाटकशाळा आणि लेकावळे यांची संख्या मोठी होती. त्यापैकी-

१. मैना　　२. उमेदा

३. यमुना　　४. लाडू

५. केसरी　　६. रत्ना

७. स्वरुपा　　८. शामा

याव्यतिरिक्त हेमंती, वसंती, चपला, चंद्रसेना या चार मुलींची नावे राघोबाच्या नाटकशाळा म्हणून येतात. राघोबाच्या निधनानंतर आनंदीबाईने हा परिवारही सांभाळलेला दिसतो.

सवाई माधवरावाच्या काळात त्याचे कोपरगाव परिसरावर लक्ष होते. सवाई माधवरावाने बारभाईंच्या सल्ल्यानुसार कोपरगावजवळील सवंत्सर व कोकमठाण या दोन्ही गावांना कसब्याचा दर्जा दिला. कोकमठाणची कमाविसी खंडो गणेश याजकडे दिली. कुंभारी परगण्याची पुनर्रचना करुन नारो गोविंद याजकडे कुंभारी गावची कमाविसी दिली.[३३] कोपरगावच्या बेटातील शुक्लेश्वराच्या मंदिरास सवाई माधवरावाने सरकारमधून इनाम दिला. त्याविषयीची नोंद पुढीलप्रमाणे -

> *''मौजे कोपरगाव, परगणे कुंभारी येथे गंगेचे बेटांत श्री शुक्लेश्वराचेसंनिध सन इसने सबैनात सरकारचा वाडा व बाग नवा केला, तेथे बेट मजकुरी पेराजीपासून जमीन इनाम चालत आहे. त्यापैकी वाडा व बागेकडे जमिन घेतली, याची चौकशी बापूजी कृष्ण कारकून निसबत खासगी यांणी केलियाप्रमाणे हल्ली सरकारांतून मोबदला दुसरी जमीन मौजे मजकूर येथील बेट पैकी जमीन बिघे'*

'६३।।६४ श्रीशुक्लेश्वराकडील इनामपैकी घेतली, तिचे मुबदला
हल्ली दुसरी जमीन बिघे साडे तीन व काठ्या ४'

६६६४६४ मसीदीकडे चिराख बत्तीबद्दल इनाम चालत आहे,
त्यापैकी जमीन घेतली, तिचे मुबदला हल्ली दुसरी
मसीदीकडे सा बिघे चार पांड चार काठ्या जमीन.

६९।।४।३

'एकूण साडे नऊ बिघे सवा चार पांड तीन काठ्या जमीन, हल्ली सरकारांतून सदरहूप्रमाणे दुसरी जमीन पेशजीप्रमाणे सालमजकुरापासून इनाम करार करून देऊन, हे सनद सादर केली असे, तरी पेशजींपासून जमीन इनाम चालत आहे, त्याप्रमाणे हल्लीची सदरहू साडेनऊ बिघे सवाचार पांड तीन काठ्या जमीन, इनाम दरसाल चालवणे, म्हणून सनदा २.'

'२ कमाविसदार वर्तमान व भावी यांस.

१ श्रीशुक्लेश्वराचे जमीनीविशी.

१ मसीदी बेट मजकुरीं आहे, तेथील चिराख बत्तीबद्दल जमीनीवीशी.

२

२ हल्लीचे कमाविसदार आत्माराम रंगनाथ, व आत्माराम राजाराम परगणा मजकूर यांस कीं सदरहूप्रमाणे जमीन इनामखर्च लिहीत जाणें म्हणून सनदा.

१ श्रीशुक्लेश्वराचे जमीनीविशी

१ मसीदीकडे जमीन चालवणें म्हणोन' '[३४]

२

४

शुक्लेश्वर मंदिरास इनाम असलेली ही जमीन आजही वंशपरंपरेने याच मंदिराच्या पुजाऱ्याकडे आहे. ही मंदिरे आजही सुस्थितीमध्ये आहेत. दरवर्षी महाशिवरात्रीस शुक्लेश्वर

देवतेचा उत्सव भक्तीभावाने आयोजित केला जातो.

कोपरगावजवळच्या कोकमठाण या कसब्याच्या एक कौटुंबिक खटला पेशवा दरबारात चालू होता. कृष्णाजी लक्ष्मण कोकमठाणकर आणि सेवगाव परगण्यातील लक्ष्मण सोनार पोतदार यांच्यादरम्यान हा खटला होता. त्याविषयीचा १५ सप्टेंबर १७८३ मध्ये निकाल झाला त्याचा निकाल पुढील प्रमाणे -

जमा-भाद्रपदमास

३५० प्यादे व जासूद सरकार नजर सोनाराबद्दल ग्ाा हाय बाा सरकारच्या पत्राच्या नकला सोनार खरे जाहले सबब, मिाा वाा ५

२५० काो मिरी प्राा सेवगांव लक्ष्मण सोनार पोतदार वाा नामें कृष्णाजी लक्ष्मण.

१०० कृष्णाजी लक्ष्मण कोकमठाणकर ग्ाा जग्ु सोनार संवत्सरकर नामें कृष्ण माार.

३५० सदर्हूचा तपशील खर्चाकडे.

खर्च - भाद्रपदमास

२५० कृष्णाजी लक्ष्मण फडणीस नेवासे जमा-प्यादे जासूद दिाा सरकार ऐवज नजरेंबाा. लक्ष्मण सोनार पोतदार प्राो मिरी पाो सेवगांव याचा व दिप्या सोनार याचा पोतदारीसंमंधे कजिया होता. तो दिप्या खोटा जाला लक्ष्मण खरा जाला. त्याजकडील हरकीबद्दल पत्रेंसरकार छ. १७ सवाल... पत्रें.

१ मल्हार जगंनाथ काोदार प्राो माार यांस जे लक्ष्मणांस दिप्यानें खोटे पत्र लेहून दिल्हे आहे त्यांजवर गांवकरी मिरीकर यांच्या साक्षी करुन देणे म्हणोन.

१ गावकरी काो माार यांस सदर्हु अन्वयें.

२ सदर्हू दोन पत्रे अस्सल सोनाराजवळ दिल्ही त्याच्या

नकला ठेऊन जमाखर्च केला असे. हवाला कुशाबाकडे मिाा वाा ५ (१५।९।१७८३ इ.)

१०० कृष्णा वाा गोविंदा सोनार मौजे कोकमठाण पाो कुंभारी याचा चुलता सटवाजी वाा मलोजी सोनार होता. त्याचें नकल जालें. त्यानें पाटाची बायको केली होती तिचा आधले घरचा लेक कुसाजी सोनार मौजे माारचे पोतदारीकरितां कृष्णाजीसीं भांडत होता. त्याची मनसुबी होऊन कुसाजी खोटा जाला. कृष्णाजी खरा जाला. त्याजला सरकारचें कागदी दिल्हे जे कृष्णाजी परागंदा होऊन नेवासें परगण्यांत गेला आहे. त्यास आणून पोतदारीचें कामकाज घेणें म्हणोन पत्रें.

न्याय

१ शिवाजी विश्वनाथ व मल्हार कृष्ण कमावीसदार पाो कुंभारी यांस

१ मोकदम मौजे कोकमठाण यांस.

२ सदर्हु अस्सल पत्रें जगु सोनार संवत्सरकर याजपासीं दिल्ही. त्याच्या नकला ठेऊन जमाखर्च केला असे. सदर्हु ऐवज सोनार माार गांवावर आल्यावर पोतदारी चालती करून ऐवज पाठऊन देतो म्हणोन जगुमाार यानें करार केला असे. जमा प्यादे जासूद दिाा सरकार. मि।। भाद्रपद वाा ५

खर्च आश्विनमास

६० जगंनाथ वाा रघुनाथ सोनार, संवत्सरे-याजकडे हवाला. सोनाराच्या मनसुबीबद्दल. दरबार खर्च. चिटणीस व मजमदार यांस कारकुनीचें ऐवजी करार रु.

३० कृष्णा सोनार कोकमठाणकर.

४० लक्ष्मण सोनार मिरीकर

७० पों हल्ली हस्ते महिपतराव बापुजी. बाकी सोनार

माार याजकडे येणे असेत. वाा ६ (१६।१०।१७८३)[३५]

सवाई माधवरावाने राघोबादादास १७८३ मध्ये कुंभारी परगण्यातील कोपरगाव व परिसरातील तेवीस गावांचा सरंजाम खर्चासाठी दिला. मात्र तो त्यास फार काळ उपभोगता आला नाही.[३६] कारण ११ डिसेंबर १७८३ रोजी राघोबादादा कोपरगावजवळ हिंगणी यागावी तीन भिंतीच्या वाड्यामध्ये निधन पावला. राघोबादादाचा सेवक काशी त्रिंबक याने पेशवेदरबारामध्ये हा सर्व वृत्तान्त कळविला.[३७] त्यावेळी आनंदीबाईचा मुक्काम कोपरगावी होता. तिच्यासमवेत तिचा परिवारही होता. दि. ३० मार्च १७८४ रोजी चिमणाजी (चिमाजी) माधव याचा जन्म कोपरगावच्या बेटामध्ये झाला. त्यांची मुंज १७८९ च्या महिन्यामध्ये कोपरगाव येथेच करण्यात आली. चिमाजी लग्न कावेरीबाई नावाच्या मुलीशी माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या मदतीने ठरले. कोपरगावच्या वाड्यात २० मे १८१२ रोजी बुधवारी रात्री ०२ वाजता हे लग्न झाले.[३८] या लग्नासाठी स्वतः एल्फिन्स्टन कोपरगावी उपस्थित होता.

इ.स. १७८८ मध्ये आनंदीबाई कोपरगावमध्ये वास्तव्यास होती. तिच्या समवेत दुसऱ्या बाजीरावाची बायको भागीरथीबाईदेखील होती. दोघींच्याही बंदोबस्तासाठी नानाने कारभारी म्हणून कृष्णाजी जनार्दन यास ठेवले होते. बाजीराव व भागीरथीबाई दोघेही कोपरगावमध्ये आजारी पडले. तो नानास लिहितो,

''भागीरथीबाई यांस शीतज्वर आला.

भागीरथीबाईस ज्वर येतच असतो. किंचीत कमी-अधिक

होतो. शरीर क्षीण झाले आहे. बाजीराव यांस ज्वर आला.

काविळीचा उपद्रव झाला आहे. सारा वेळ खेळतात. यामुळे

आनंदीबाई रागे भरतात. म्हणोन शरीर किंचित क्षीण

झाले आहे. त्यात ज्वरांश होतो.''

आनंदीबाई १७९२ पर्यंत कोपरगावमध्ये वास्तव्यास होती. भागीरथीबाईस बरे वाटावे म्हणून त्याकाळी जे जे शक्य होते ते सर्व उपाय आनंदीबाईंनी केले. शेवटी तिने कोपरगावच्या

पश्चिमेकडील 'जेऊर' या गावाचा भगत अंताजी फटांगरा जेऊरकर यास वाड्यामध्ये बोलावले. तो म्हणाला की, 'त्यांचे मागील काही नवस आहेत, ते फेडल्याने चांगले होईल.' आनंदीबाईस त्याचे सांगणे खरे वाटले. ती म्हणाली, 'आमचे मागील नवस श्री त्रिंबकेश्वर, सप्तश्रृंग व कोकणात हरिहरेश्वरास व गणपतीपुळ्याचा व ग्रामदेव ऐसे नवस पहिलेच आहे.' त्यानुसार आनंदीबाईने देवदेवतांचे नवस फेडण्यासाठीचे साहित्य पुण्याहून मागितल्याची नोंद आहे. कोपरगावच्या वास्तव्यातच राघोबाचे निधन झाले. राघोबा निधन पावल्यावर बारभाईच्या कारभाऱ्यांनी आनंदीबाईस वार्षिक दोन लाख रुपये खर्चासाठी देऊन तिच्यावर सक्त देखरेख ठेवली होती. आनंदीबाईच्या रोजच्या कार्याचा वृत्तान्त पुणे दरबारामध्ये पाठविला जात असे. २ ऑक्टोबर १७८७ रोजीचा एक वृत्तान्त पुढीलप्रमाणे -

'आनंदीबाई रोज भविष्योत्तर पुराण श्रवण करीत होती. त्यात नानाप्रकारची व्रते निघतात. त्याचा उपक्रम करावयासी करीत आहेत. सायंकाळी नित्य शुक्रेश्वरी नाटकशाळा आणून गाववीत आहेत. सवाक्षणी बायका कोपरगावच्या वगैर मिळोन नित्य एक-दोन शिवाय व्रते वगैरे उगेच नाव सांगोन दहापाच बायका दोन-चार दिवशी भोजनास आणवीत आहेत. कपिलाषष्ठीचे दिवशी अमृतराव व आनंदीबाई यांनी दान दिले. त्यात सोन्याचे (गाईचे) शिंग, रुप्याचे खूर व गाईची किंमत ८।। रुपये दिली.'

दुसऱ्या बाजीरावाचे बालपण

दुसरा बाजीराव, चिमाजी आप्पा, अमृतराव आणि आनंदीबाई यांना नाना फडणीसाने कोपरगावास ठेवले होते. नानाने कोपरगावमध्येच त्यांच्या लष्करी व इतर शिक्षणाचीही सोय केली होती. आनंदीबाईस वाचनाचा व पुस्तकांचा संग्रह करण्याची सवय होती. कोपरगावमध्ये बाजीराव व आनंदीबाईची व्यवस्था करण्याचे काम नानाने गोविंद कृष्ण गोडबोले याच्यावर सोपविले होते. तो नानास लिहितो,

''भारताचे पुस्तक सरकारचे, मागे बहुत प्रती मेळवून शोधून ठीक केले आहे. ते आनंदीबाईस श्रवणास पाहिजे. येथे पुस्तक आहे. तो त्रुटित ग्रंथ आहे. यास्तव ते पुस्तक आल्याने श्रवणाचे उपयोगी पडून दुसरी प्रत त्याजवरून नीट करावयास येईल. यास्तव ते पुस्तक पाठवावे.'' 'सुभाभट तेलंग यांनी शुक्लेश्वरास ११००० प्रदक्षिणा घातल्या व बाईंनी विष्णूसहस्त्रनाम सहस्त्र आवर्तन व शिवसहस्त्रनाम आवर्तन केले याबद्दल गोप्रदान केले.'[३९]

अशा प्रकारच्या व्रतवैकल्याच्या प्रसंगी गैरफायदाही घेतल्याचे दिसून येते. दि. १८ ऑक्टोबर१७८८ रोजी आनंदीबाईने कोपरगाव मुक्कामी बागेमध्ये ब्राह्मणभोजन दिले. त्यावेळी लासलगावच्या एका कोष्ट्याने ब्राह्मण म्हणून जेवणास हजेरी लावली. त्यास पकडण्यात आले. आपणास पोटास मिळाले नाही. म्हणून मी जेवणास बसलो अशी कबुली त्याने दिली. तरीही त्यास केवळ जेवला म्हणून बेड्या घालण्यात आल्या. केवढी ही अंधश्रद्धा. कोष्ट्याचा संसर्गदोष झाला म्हणून वाड्यातील ब्राह्मणांनी एक दिवस उपोषण करून नंतर जेवण घेतले. हा जातीभेदाचा प्रकार निश्चितच माणूसकीला धरून नाही.

कोपरगाव हे गोदावरी नदीकाठी वसलेले आहे. इ.स. १७८७ मध्ये गोदावरी नदीस महापूर आला. महापूरामध्ये कोपरगावच्या पूर्वेकडील वारी हा गाव बराचसा वाहून गेला. गावाच्या तटबंदीच्या भिंतीही पडल्या. त्यांच्या दुरुस्तीसाठी सवाई माधवरावाने दुसऱ्या बाजीरावास एक हजार रुपये दिले. त्याविषयीची नोंद पुढीलप्रमाणे -

''मौजे वारी, परगणे कुंभारी, हा गांव तालुके घोडप येथील बेगमीस आहे, त्यांस मौजे मजकूरचें गांवकुसूं सालमजकुरी श्री गंगेस [गोदावरी नदीस] महापूर येऊन कुसांस धक्का बसोन तीन बाजूंच्या भिंती वाहून गेल्या, याजकरिता कुसू घालावयास काम लाविले आहे, त्याचे खर्चाबद्दल सरकारांतून ऐवज द्यावयाची आज्ञा जाली

पाहिजे, म्हणोन मोकदम मौजे मजकूर यांणी अर्ज केला, त्याजवरून गांवकुसाचे बंदिस्तीबद्दल एक सालां रुपये १००० एक हजार रुपये देविले असेत, तरी मौजे मजकूरची जमाबंदी सालमजकूरी होईल, त्यापैकी सदरहू एक हजार रुपये देणे म्हणोन, बाजीराव आपाजी तालुके मजकूर यांचे नावे सनद.'[४०]

इंग्रजांनी पेशवाईच्या उत्तरार्धात ठिकठिकाणी आपले गुप्तहेर पाठविले होते. कोपरगावमधील गाडग्यांच्या तळावर इंग्रजांची माणसे होती. बाजीरावाचा सरदार गोविंद गोडबोले यास ती २८ सप्टेंबर १७८७ रोजी सापडली. त्यांना पकडून पुणे दरबाराकडे पाठविण्यात आले.[४१] आनंदीबाईच्या कोपरगावमधील वास्तव्यकाळात तिला पालखीचा मान होता. तिच्या पत्रव्यवहारामध्ये आपणास वारंवार पालखी पाठवावी असा उल्लेख येतो.[४२] दुसऱ्या बाजीरावाजी बायको भागीरथीबाई कोपरगावहून जाण्यास निघाली असता तिला पालखी पाठवावी असाही उल्लेख तत्कालीन कागदपत्रांमध्ये आहे. आनंदीबाई कोपरगावातून भागीरथीबाईसमवेत १७९० मध्ये पुणे दरबारातील महत्त्वाच्या स्त्रियांना भेट पाठविते. ती पुढीलप्रमाणे -

१५६	पातळ साधे	१
२०	चोळखण	१
		२

कोपरगावमधील आपल्या वास्तव्याचा आनंदीबाईचा हिशोब अचूक होता.[४३] प्रत्येक गोष्टीचे ती बारकाईने टिपण करताना दिसते. भागीरथीबाई समवेत पाठविलेली वस्त्रे आनंदीबाईने नाशिक जिल्ह्यातील येवला गावामधून खरेदी केली. येवला गाव पैठणीसाठी व हातमागाच्या कापडांसाठी प्रसिद्ध आहे. पुणे दरबारातील रमाबाईसाठी तिने ही वस्त्रे पाठविली.

सवाई माधवरावाच्या कारकिर्दीतील अखेरचा महत्त्वाचा प्रसंग म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील 'खर्डा' या गावी निजाम आणि मराठे यांच्यामध्ये झालेली लढाई होय. या लढाईस मराठ्यांच्या इतिहासामध्ये 'खर्ड्याची लढाई' असे म्हणतात. त्यावेळी बाजीरावाचा मुक्काम

कोपरगावास होता. त्यास खर्चासाठी बारभाईंनी महाल दिले होते.[४४] मात्र चिमाजी दुसरा बाजीराव, अमृतराव पेशवे यांनी त्रिवर्गाने गडबड करु नये म्हणून कोपरगावहून त्यांना आनंदवल्ली नंतर पुणे व अखेरीस गोविंदपंत गोडबोले यांच्या देखरेखीखाली जुन्नरला ठेवण्यात आले.[४५]

इ.स. १७९५ मध्ये कोपरगावचा बंदोबस्त विसाजी राम या सरदाराकडे सोपविण्यात आला. त्याच्या हाताखाली मोठा फौजफाटा देण्यात आला. काही घोडेस्वारांची पथके व गाडदीही देण्यात आले. याविषयीची मोडी अप्रकाशित कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यांचे लिप्यंतर पुढीलप्रमाणे -

''श्री लक्ष्मी नारायेण प्राा

शेवेसी वीसाजी राम मुकाम कोपरगाव चरणावर मस्तक ठेउन सास्टाग नमस्कार विज्ञापना ताा छ ६ साबान जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असावे वीशेष श्री पंढरपुरचे मुकामीहून पत्रे आली तेथे आज्ञा की कोपरगावी ईतलाखी व सरंजामी फौजे आहे. त्यापैकी हाली तेथे ठेवावयाची आज्ञा होऊन राजश्री मोरोपंत भाउ यास आज्ञापत्र सरकारातून रवाना जाहाले आहे. त्याप्रमाणे राहावयाच्या दिमती

१ पलटणे रूपराम चौधरी याजकडील

१ वीसाजीराम गोखले याजकडील

१५० स्वार

१५० गाडदी

१ शेख मीदाबाईकर याचे पथक

१ हाणदार व गाडदी

सदरहू आन्वये तीकडील बंदोबस्तास राहातील वरकड स्वार व गाडदी वगैरे हुजूर आणवीले आहेत त्याप्रमाणे''

राजश्री मोरोपंत भाउ सुध्धा लौकर येउन पोहोचावे म्हणोन आज्ञा त्यावरून मोरोपंत भाउनी येथील बंदोबस्तास नेमणूकीअन्वये पथके ठेउन बाकी फौज सरंजाम घेउन आले आहेत श्रावण सुध्ध प्रतीपदेस कोपरगावीहून कुच करून श्री कचेश्वरी मुकाम केला श्री गंगेस पाणी आले याजमुळे नावेवर फौज उतारावयासी दोन तीन रोज लागले. चतुर्थीस तुमचे करून राहाते येथे मुकाम केला पुढे मजल दरमजल कुच करुन चालले आहेत. लौकर येउन पावतील बेसतील पाउणसे लोकाची हजीरी आपणासी चालती जाहली नाही बेवतील वाड्यात डालीबीची वगेरे झाडे देवेत त्यास डाली बस... दयमाने ठेवील्या तदापी दीकत नाही रोजप याजकडील सीपाई तेथे चौकी पाहावयास आहेत. त्यास व त्याजकडील कारकूनास सांगतो परंतू फकचा बंदोबस्त होत नाही बोटातील पाउणसे लोक आमची कामगारी औकत नाही हजीरी द्यावयाचे पत्र आले आणी फीरोन नरम पडले याजमुले कोणीच काम औकत नाही हे ध्यानात असावे शंकर माली बागातील झाडा मसाला घालण्याची याद न देता मोजदाद करुन न देता नीघोन गेले याजमुले बागातील दाहा कमी पडला त्यास शंकर माली यासी नीक्षूण ताकीद होऊन बागाची माने एक ओळ फाटलेली आहे ती साल गुाा जाजती लावणी काहीच केली आहे. मागील लावणीतील मागे फार आलेत याजमुले तो घाल घासरीवर घालतो कलावे शेवेसी श्रुत होणे हे विज्ञाप्ती'[६६]

इ.स. १७९६ मध्ये कोपरगाव परिसरामध्ये गोदावरी नदीकाठीच्या गावांमध्ये करीम पेंढारी व छितू पेंढारी यांनी उपद्रव दिला होता. पुणे दरबारामधून त्यांच्या बंदोबस्तासाठी

त्रिंबकजी डेंगळे याच्या सांगण्यावरुन तळेगावहून ढमढेरे, विठोजी मोरे, लक्ष्मण पाटील इ. विविध सरदारांना कोपरगावास पाठविले. याविषयीचे लिप्यंतरीत पत्र पुढील प्रमाणे -

श्री

राजेश्री त्रींबकजी पाटील तात्या गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलकृत राजमान्य श्रो वीठोजी पाा मोरे मुा पुने रामराम विनंती उपरी येथील क्षेम जाणून साभाल करीत असो पाहीजे वीशेष स्वारी कोपरगावास माघ वा ७ मंगलवारी कुच होउन जाणार स्वारी समागमे जामदारखाना वगैरे सरंजाम घेउन येतो येथील बंदोबस्त तुम्ही गेल्या तागाईत काही पडला नाही कोकनचे मुदबद कबूल केले नाही म्हणोन मो... नात मात्र रोग भरुन फरासखाना कासला भालदारखाना काढून आसे म्हणत होत परंतू येथे आल्यावर मरजी चांगली आहे मार गैरेचर लेहून वराता लाउन ही म्हणासीवाय आमादाबादाची हीडा लाखाची सी... आज स्वारीस खर्चे लाख रुये हावाली केले त्यात ढमढेरे याचे हावाली येके पुर्वी केला तो व नागपुरास दोन पाठवीले ते वजा करुन खावा... हावाली केले उट कोटीकडे चीटा .... स्वारी ... जामदारखाना... ... सुधा आपले आगावर वाकोन की ... कुलातून जातील मग ते भांडे रोज घेउन जाउन मागे आनले पुसले स्वारीस उट आपले सभर पैकी दाहा तुम्हाकडे गेलेत आठ व दोन भरबत्ती... याजकडे बाकी उट ८० अैसी आहेत ते सामायेनावीसी कानावर घातलेत म्हणोन की खावदाचे साल सादसुध करुन चालवावे सामायेना वाचून वाईट दिसतात वरकडचे उटास समदयास नवे दिल्हे त्यास सामाईना चांगले दीसतात येथे आल्यावर आपल्यावर

करजी चांगली आहे कर्ज कलत आपेल पासी हलती जातीनीसी त्रीबखजी चांगला कारभारी भट असेत फरासखाना नवा करावयासी च्यालीस हजार रुये देसमुख व जनेबा व बबनराव कातरे व ढमढेरे जोसी चवघाचे च्यार कारकून घाटवडेकर याचे हवाली केले त्यासी आपल्याकडील याद बतीस हाजारात अैसा सरजाम करुन देतो म्हणोन आदमास करुन दिल्या परंतू तुम्हाकडे सांगायचे नाही अैस म्हणोन ... चे हावाली केला परंतू मनात आले की आहे हजारी कमी जनोबास ताकीद केली की पैका दिल्हा परंतू बतीस हाजारात चांगला मरजीजोगा करावा कैस झाले पुढे काय मजकूर होईल ते लेहून पाठउ. बहूत काय लिहीणे कृपा लोभ की जे हे विनंती

लक्षुमण पाटील गावाउन स्वारीस... आला आहे हे विनंती.[४७]

राघोबादादाने हिंगणी येथे आपल्यासाठी वाडा बांधला होता. तो अपूर्ण राहिला ही बाब याच प्रकरणामध्ये मागे आली आहे. दुसऱ्या बाजीरावाने राघोबाच्या तीन भिंतीच्या वाड्याच्या पूर्वेस गोदावरी नदीकाठी दुसरा वाडा आणि पागा बांधण्यास सुरुवात केली होती. बाजीरावाने त्या बांधकामाची जबाबदारी त्रिंबकजी डेंगळे याच्यावर सोपविली होती. त्रिंबकजी एकाचवेळी हिंगणीचा वाडा आणि त्याच्या स्वतःच्या निंबगाव जाळी यागावी बांधकाम चालू असलेल्या वाड्यावर देखरेख करत होता. बाजीराव १७९६ मध्ये कोपरगावास येणार असल्याने त्यास हिंगणीचा वाडा पहावयाचा आहे म्हणून जास्तीत

जास्त माणसे कामास ठेऊन काम पूर्णत्त्वास न्यावे असा सल्ला गंगाधर खंडेराव हा त्रिंबकजीस देताना दिसतो. याविषयीचे मूळ लिप्यंतरीत मोडी पत्र पुढीलप्रमाणे -

श्री

राजश्री त्रींबकजी पाा तात्या डेगले गोसावी यासी

''अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो गंगाधर खंडेराव रामराम विनंती विज्ञापना ताा द २४ मोहरम पो मुा बेट कोपरगाव येथक्षेम असो वीशेष आपण आज्ञापत्र पाठवीले त्यात माार की श्रीमत माहराजाची स्वारी ... कधी कसी कोठी आली कीवा नाही म्हणोन आज्ञा आली त्यास माघ वाा ७ सप्तमीचा बेत होता हली माघ वाा ९ गुरवारी नीघोन येणार म्हणोन मनोहरगीर याचे पत्र रुपराम चौधरी यास आले असे की वाा १२ रवीवारी बेबत दाखल होणार व कोठीही गुरवारी प्राथ काली नीघाली होती वर्तमान आहे व रथखान्या पौ रथ पाच नायेकनीस आज्ञा जाली ती रथ कोकरा परयत आले त्यापौ दोन ... दोन घोडे आजारी जाले सबब दोन रथ येथे सोयकाली आले बाकीचे तीन रथ नीबंगाव जाली गेले बाकीचे दोन रथ जुन्यापैकी दीवला यक व फलटणी येक येकूण दोन च्या येथे आले आहेत तेसी स्वारीची बातकी येउन सावज वीहीरी परयेत जातील स्वारीचे बातकीस वीसाजी देवराम आल्येवर सेवेसी विनंती लिहून पाठवीले मौजे हींगणीचे ... याचे कामाचा बंदोबस्त जाला पाहीजे येथील कारखानदार माणसाचा भरणा करावयास नित्प कटकट होत त्याणी दुसरी काम करीतात या कामात मलघालीत नाहीत म्हैन सेवेसी

विनंती लिहीली आहे... भरू नये आज स्वारी असीचे मुकामास येणार म्हणे आवई आहे पकी बातकी आलीयावर वीनती लिहून पाठवीन बहूत काय लिहीणे कृपा लोभाची वृधी करीत जावी हे विनंती''[४८]

दुसरा बाजीराव कोपरगावला पोहचल्यावर त्याने प्रथम कोपरगावच्या पश्चिमेकडील कुंभारी येथील वतन जप्त करण्यास सांगितले. आपल्या मर्जीतील भवानीशंकर व गोविंदराव सदाशिव या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली.[४९] *कोपरगावच्या मुक्कामाची बाजीरावाची व्यवस्था किती सूक्ष्म होती याविषयीची माहिती बाजीरावाच्या रोजनिशीमध्ये आली आहे. ती पुढील प्रमाणे -*

''खासा स्वारीची छावणी मुक्काम कोपरगाव येथे होणार त्यास दाणा वैरणीची व फडफर्मास व लाकडे जळाऊ वगैर सरंजामाची बेगमी तेथे चिमणाजी बल्लाळ आहेत व हुजरून माहादजी धोंडदेव पाठविले आहेत. यांचे गुजारतीने करणे म्हणोन माहालनिहायचे कमाविसदार यांचे नांवे -'' सनदा.

१ परगणे कुंभारी निसबत रामचंद्र त्रिंबक दिमत खंडेराव त्रिंबक,

१ परगणे नाशिक निसबत रामराव आपाजी,

१ परगणे सिन्नर निसबत माधवराव गणेश,

१ गांव तर्फ बेलापूर निसबत काशिनाथ गोविंद'

दुसऱ्या बाजीरावाच्या कोपरगावाच्या मुक्कामाच्या तयारीसाठी कुंभारी, नाशिक, सिन्नर आणि बेलापूर इ. ठिकाणच्या अधिकाऱ्यांना कामास लावण्यात आले होते.[५०]

द्वितीय चिमाजी आप्पाचे लग्न कोपरगाव येथे झाले. त्यासाठी दोन लाख रुपये खर्च आला. या लग्नासाठी स्वतः माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन हजर होता. या लग्नाचा खर्च त्रिंबकजी डेंगळेने जुळवून ठेवला आहे. त्यावरून त्याची आर्थिक शिस्त लक्षात येते. याविषयीची नोंद दुसऱ्या बाजीरावाच्या रोजनिशीमध्ये नोंद आली आहे. ती पुढीलप्रमाणे-

बदल देणें, लग्नखर्च. राजश्री चिमणाजी रघुनाथ यास ..... पानसुद्धां सालीना दोन लक्ष रुपये खर्चाची नेमणूक केली. त्यांत लग्न, कार्य, प्रयोजन, वगैरे जो खर्च होईल तो त्यांनी करावा. दोन लक्ष रुपयांखेरीज सरकारांतून कांही द्यावयाचें नाहीं. परंतु चिमणाजी रघुनाथ यांचा आपलें दुसरें लग्न करण्याविषयी अनमान दिसला, व प्रपंचास उदास जाहले. त्यांची वंशवृद्धि असावी याजकरितां सरकारातून येक वेळ लग्न करावें. या पुढें लग्न कार्ये वगैरे प्रयोजनें त्यांजकडे जाहल्यास सरकारातून कांही येक त्यांस देऊं नये. दोन लक्ष रुपये त्यांस नेमणूक सालीना केली आहे. त्यांत त्यांनी करावी. याप्रमाणे अलपिष्टिन (एल्फिन्स्तन) वकील दिमत इंग्रज कलकत्तेकर, यांचे विद्यमानें ठरोन मौजें कोपरगांव परगणे कुंभारी येथील बेटांत वैशाख शुद्ध दशमी सौम्यवारी, छ ८ जमादिलावलीं, शके १७३४ अंगिरा नाम संवत्सरी सालमजकुरी वीस घटका रात्रीस चिमणाजी रघुनाथ यांचें लग्न केले त्यास खर्च जाहला तो गुजारत त्रिंबकजी डेंगळे. रुपये

वैशाख शुद्ध तृतीया सौम्यवार, छ १,

जमादिलावली, मंडप मुहूर्तानें घालावयाचे प्रारंभी
स्तंभपूजन केलें. त्यास विद्यमान गणेशभट कर्वे उपाध्ये,
चिंतो वामन सिधये कारकून निसबत दफ्तर.
रूपये

१ घरचे देवापुढे.

१ श्रीगणपतीस.

१ स्तंभास.

-।।- पृथ्वीस.

-।।- शेषास.

-।।- सूर्यास

-।।- विश्वकर्म्याचे अयुधांस

४।। भूयसि दक्षणा, ब्राह्मण असामी ९ दर -।।- प्रमाणें.

पैकीं वजा, बोहल्याचे यादींत खाशांकडील खाजगींपैकी रूपये.
.।।.

बाकी. रूपये.
९

रूपये

वैशाख शु. षष्टी मंदवार . छ ४ जमादिलावल. रूपये

१०८६⅝।। अक्षतेचे प्रारंभ समयीं.

४।⅝।। घाणा भरला व उडीदास तेल लाविलें त्यास.

१३४०६⅝ गडुंगनेर घरचा केला त्यास रूपये.

१४५२।।।⁄

पैकीं वजा, ऐन जिनसांचे किंमतीचे यादीचे बेरजेस कमी पडला,

तो रूपया १. बाकी १४५१।।।⁄ रूपये.

वैशाख शुद्ध नवमी भोमवासरी, छ ७ जमादिलावली, विनायकशांति केली.त्यास
वरहुकूम यादी. रूपये

२।।। पुण्याहवाचन केलें त्यास रुपये

६७। शांतिकडे.

१४६॥।। ऐन जीनसांची किंमत रुपये

८४६॥।।-

वैशाख शुद्ध दशमी सौम्यवासर, छ ८, जमादिलावल, लग्नाचे दिवशी.

१९। घाणा भरला ते समयीं.

९९३।८। पुण्याहवाचन समयीं.

३३।।। सुवासिनी भोजनास घातल्या.

३६॥ सीमांतपूजनास, सोयरे वराची पूजा करावयास आले, ते समयी भूयसि ब्राह्मणांस दिल्ही त्यास. रुपये.

३२९। तेलफळ, सोयरे यांजकडे नेलें त्यास. रुपये.

२००। वाग्निश्चय, सोयऱ्याचे मंडपी केला. त्यास विद्यमान राजश्री बाबासाहेब.

२५।।। रुखवत सोयऱ्याकडून आलें तें समयीं.

६८५॥।।। वर प्रस्थान, वधुगृहीं जाते समयीं.

३०३४६। लग्नास सोयऱ्याचे मंडपी गेल्यावर तेथें खर्च जाहला तो.

३।।८।। हात दिव्यास.

२८।८।। पुण्याहवाचन, व सीमांतपूजन, व आहेर घेऊन लोक आले तेव्हां विडे दिल्हे त्यांस वगैरे.

५ तोरणें कागदी रंगीत सुमारीं. २.

३।॥।।। कित्ता नक्त खर्च. रुपये.

५३६५६।।।-

पैकी वजा कमी यादीस पडले. रुपये ५.

बाकी. ५३६०६।।।-

वैशाख शुद्ध येकादशी छ १० जमादिलावल, भृगुवासरें.

२०६६।। सुनमुखसमयीं. रुपये.

२।। विद्यमान राजश्री आपासाहेब, अङ्गीस व देवांस.

वैशाख शुद्ध १२ मंदवासरे छ ११ जमादिलावल. रुपये.

२९५॥।। नवग्रह शांति केली त्यांस.

१९९०।।॥।। साडे रात्रौ पंधरा घटकांस जाहलें, त्यास वगैरे.

३६।।॥ विडे कुलपी, व केळीच्या डांगा मिळोन. रुपये.

२३२३।

वैशाख शुद्ध १३ भानुवासर, छ १२ जमादिलावल. रुपये.

८४।॥।। देवकोथापन केलें त्यांस. रुपये.

५० वेदशास्त्री देव पालशेतकर, सोयऱ्याकडील उपाध्ये यांस पाठवणीबद्दल.

१८॥। बोडण भरलें त्यांस.

६५३।।। वरात वाड्यांत आलीयावर पडभोजनास सोयरे मंडळी बोलाविली त्यांस.

२८/ राजश्री आपासाहेब यांस अभ्यंगास सामान.

४० माधवराव अनंत रास्ते यांनीं पुण्याहून आहेर कारकुनाबरोबर पाठविला. त्यास रास्ते यांस फेर अहेराची वस्त्रें अहेराचे सनंगांपैकीं मशारनिल्हेचे कारकुनाजवळ देऊन त्याजखेरीज कारकून यास वस्त्रें दिल्हीं तीं. सनंगें.

१० वोवाळणी, उष्टी हळद सोयऱ्याकडून आली ते समयीं दिल्ही. ते पुतळ्या ताटें येकूण दर ५ प्रमाणें.

१४ लक्ष्मीपूजन समयीं सरकार वाड्यांत नवरेमुलीस वस्त्रें दिल्ही. ते समयीं सोयऱ्याकडील उपाध्यास वस्त्रें द्यावीं, तीं पावलीं नव्हती सबब छ. मजकुरीं दिल्हीं तें सनगें.

वैशाख शुद्ध १४ इंदुवासर, छ १३ जमादिलावल, बरहुकूम यादी

१।।॥ ओटीस सामान, मांडवपरतनाचे आमंत्रणास बायका आल्या सबब.

२।। कागद दस्ते जुन्नरी, लिहिण्याकडे सुमारी ५ दर -।।- प्रमाणें.

३ खाद्या, पासोड्या, विड्याचे रुमालास वगैरे सनंगें २ दर १।।

प्रमाणें. रुपये.

७।⁄

प्रत. यादी दोन येकूण रुपये.

२०४।⁄ प्रत यादी १ येकूण.

५०० अतसबाजी नळे वगैरे रुपराम चौधरी याजकडून करविले

त्यास. रुपये.

७०४।⁄

१५०० गुजरात जनार्दन नारायण नऱ्हेकर, भोजन खर्च गडंगनेरापासून

मांडवपरतनापर्यंत कुलभोजन खर्चाचे.

१२५२१।।⁄।

पैकी वजासूट. -।।⁄।- रुपये

बाकी रसानगी याद. रुपये.

१२५२१

बारा हजार पांचशें येकवीस रुपये जमा इजाफत

खाशांकडील खासगीपैकी, त्रिंबकजी डेंगळे खिजमतगार

याचे गुजारतीनें पावले. ते जमा धरुन देविले. [५१]

रुपये

१७ ऑगस्ट १८०१ रोजी दुसरा बाजीराव पुण्याहून कोपरगावास अमृतरावाशी बोलणी करण्यास निघाला. दि. २६ ऑगस्ट १८०१ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत तो कोपरगाव परिसरामध्ये मुक्कामास होता. या मुक्कामात बाजीरावाने अमृतरावास भिवंडीहून समेटासाठी कोपरगावास भेटीस आणले. मात्रा दोघांमध्ये उपयुक्त बोलणी झाली नाही. तेंव्हा बाजीराव कोपरगावहून मुक्काम हलवून २२ ऑक्टोबर १८०१ रोजी पुण्यात पोहचला.[५२]

दुसऱ्या बाजीरावाच्या काळात त्रिंबकजी डेंगळे या सरदाराचे प्रस्थ पेशवे दरबारात वाढू लागले. पेशव्यांच्या कोपरगावाकडील कारभार पाहण्याची जबाबदारी बाजीरावाने

त्रिंबकजीवर सोपविली. त्याच्यामार्फत त्रिंबकजीचा मुलगा कुसाजी डेंगळे कोपरगावचा कारभार पाहत असे. कोपरगावच्या वाड्याची साफसफाईदेखील केल्याचे तो त्रिंबकजीस कळवितो. याविषयीचे पत्र पुढीलप्रमाणे -

''श्री गजानन

तीा राजश्री त्रिंबकजी पाा दादा वडीलाचे सेवेसी

आपत्ये बालके कुसाजी पाा डेगले चरणावर मस्तक ठेउन सिरसाां दंडवत विज्ञापना येथील क्षम ताा छ ११ मोहरम पावतो वडीलाचे आसीरवाद करून सर्वे सुखरूप असो विशेष आपले आज्ञेप्रो कोपरगावा जाउन तेथील कामाचा समाचार घेतला यास देवालयाचे काम तर जमीचे वरतील असर जाले आहेत चवथे थरास काम चालले आहे. चौकाची घसाई जाली वाड्याचे रंगाचे व डागडूजीचे काम चालले आहे मौजे नींबगाव ताो कोद्रले येथील रबीची यारलणी जाली खल्यात मालन्यावयास आठ दिवस लागतील मल्यात शलख भाजी करवीली आहे. मौजे नींबगाव रबी काली आहे साो शाळीपरक होता ता यटाळून खल्यात आणी लागलयाचे पटीत हरभरे तीन सवातीन मणे पेरले होत त्याज हरभरे दिड खंडी जाले जुणे मल्यात गहू हरभरे कला आहे तो ..... गावकुसाचे कामदार येसूपासून कुंभाराचे दिपला पावतो मुढेरी जाली तेथू पुढे उतरेस दोनसे हात गावकुसास माती मिलत नाही होईल तेथवर माती मलउन करीतच आहो आपण पुण्याहून घोडी राख २६ सवीस रखमाजी बरोबर पाठवीली ते येथे पावली त्याजपाो येक नयेत.

पुरवणी २

जाले असीचे बंगल्याचे येक मजलाचे खोड

बसली दोड घालणे पटाई करावयाची मात्र वरकड वाड्याची डागडूजी जाली आहे स्वारीचे पुर्वी दोन दिवस फरासखान्यापौ सरंजाम याप्रो पुढे पाठवावा यास आज्ञा व्हावी कुरणातील गवत तीस हजारावर निघाले तर गजीत आणून ठेवीले आहे चिंकाणीचे कुरण चौदा हाजार नीघाले तेथच गजी घातली मौजे नींबगाव ताा कोरहाले येथील महाजरावर गावचे काराबळी त्याच्या गादया दरोबस्त मारून घेतल्या होलकराचे पाटीकीचे गाव निघोन व रुई व आस्तगाव व लोणकरी... हे पाप गाव मात्र गावी देणे राहीले होत त्याच म्हणत पडले जे आम्ही गुमास्ते राजश्री सडापंत बाबाचे पेलमराचे वडील याचे पत्र आले म्हणजे आम्ही गाहण घालू त्यास सडोपंत बाबाचे दस्तक येथे राजश्री भिकाजीपंत कोरहाल्याचे मामलेदार यास पत्र पाठउन दयावे म्हणजे गादया घालतील आपण आज्ञापत्र पाठवीले गावकुसास माजी असेल तेथून घेउन जावी त्यास आम्ही तर कलते सीनेउ परंतू कटकट जाल्यास आपण राग भरु नये राजश्री बापाजी नाईक याणी आपले पत्र गादया घानवीसी आणीले आहेत पत्र आम्ही मागतो ते म्हणतात जे पत्र आकूटीस राहीले आहे गादया घन्माविसी त्याचे बालणे पडले जे गादया घालाव्या त्यास आम्ही उत्तर केले जेहरजी पाा थटे आल्याखेरीज गादया कढया होती तुम्ही त्याजला आणून राजी करावे''[५३]

त्रिंबकजी डेंगळे याने कोपरगाव परिसरात आश्वी, लोणी, मुर्शतपूर, कोऱ्हाळे इत्यादी ठिकाणी पेशव्यांसाठी घोड्यांच्या पागा तयार केल्या होत्या. बाजीरावाचा चिटणीस विनायक चिंतामण देशमुख याजकडे पागा जपण्याची जबाबदारी होती. पागेचा नोकर रुपराम चौधरी होता. आपण घोड्याच्या पागा कशा पद्धतीने जपतो याविषयी तो दरबारास वारंवार कळवितो.

''रुमाल नंबर ३५ पत्र नंबर १८१४२

श्री

राजश्री मोरोपंत आपा कारकून नीा राजश्री रुपराम चौधरी स्वामीचे शेवेसी

पाो विनायक चिंतामण देशमुख सां नमस्कार विनंती विशेष आमचे नीसबतीस सरकारातून चंदी वैरणीचे खर्चाचे नेमणूकेस घोडा आहेत त्यापैकी पेशजी सरकारचा स्वारी कोपरगावास गेली होती तेव्हा सारंगा घोडा मेघ मल्हार... याचे नेमणूकेस तेथे ठेवीला आहे त्याचे खर्चाची देखरेख राजश्री आबाजी रघुनाथ बाला याजकडील कारकून तेथे आहेत त्याजकडे बाला याणी सांगीतली होती त्यास पावेतो खर्च काय जाहला असेल त्याचा कचा हिसेब तुम्ही समजून घेउन हली पुणीयाहून रा सुभराव तरवडे बारंगीकर याचे नेमणूकेस चंद्रहार सारंगासीग बसावयास दिल्हा आहे हा तेथे तुम्हाजवल दाखल होईल ते दिवसी पासून दोन्ही घोडयाचे चंदी वैरणी सवा रतीबस खर्च्र लागले तो तुम्ही देउन दरमाहाचे खर्चाचा याद आम्हाकडे पाठवीत जावी त्याप्राा औवज चौधरी यास पावता करुन त्याची पावती तुम्हाकडे येईल येवीसी चौधरी याचे पत्र तुमचे नावे आलाहीदा पाठवीले आहे त्यास चंदी वैरणीस व रतीबस वगैरे किरकोल लागवड लागला ती तुम्ही आपले समक्ष चौकसीने करीत जावी घोड्याचा बंदोबस्त न होता दास्त येथास्थीत करवीत जावी जनावरे खराब न होत औसे करवीत जावे चंदी वैरण रतीब खावायाचा त्याची याद आलाहीदा लिाा पाा आहे त्यास यादी प्राा देत जावे बेलकाकडील कारकूनापासून

सरंगे घोड्याचे कचे खर्चाची याद तपसीलवार घेउन पाठवावी खर्च गैरवाज करून ये सारंगा घोड्याचे सरंजामास बासन नवे करावे झुल नाही... जी भूरूकी करून दिल्ही आहे हाली तेथे सारंगा घोडा आहे त्याचा गाशा सलालपी येथे राहीला आहे तो हाली सुभराव याजबराबर पाठवीला आहे हा घेउन च्यार जामा तेथे आहे तो तुम्हाकडील हर कोणी येईल त्याजबरोबर माफ जतीने रवाना करावा मागाहून येथून नवा तयार करून ठेवीला आहे. तो तुम्हाकडील हर कोणी येईल त्याजबरोबर माझ जातीने रवाना करावा मागाहून येथून नवा तयार करून ठेवीला आहे तो रा छ १७ जील्काद कार्तीक बहूत काय लिा लोभ करावा हे विनंती

सुभराव यास घोड्याचे खर्चाबा दाहा रूपये दिल्हे आहेत त्याचे खर्चाची याद समजोन घेउन तुमच्या यादी येतील त्याजबराबर पाठवावी सिलक ... दयावी आणी हीशेबी जमा करावी''[५४]

कोपरगावमधील घोड्यांच्या पागेमध्ये 'सारंग्या' नावाचा घोडा बाजीरावाच्या खास मर्जीतील होता. त्यास कशाप्रकारे रतीब दिला जात असे याविषयीचा वृत्तान्त पहा-

रुमाल नंबर २८ पत्र नंबर १४५९९

श्री

शेवेसी नारो सदासीव जोसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा श्रावण वा चतुर्थी रविवार पर्यंत आपले कृपे करून मुा कोपरगाव येथे वर्तमान यथास्थीत असे विशेष सरकारचे दोन घोडे आपल्याकडे त्यापैकी गुलछबू घोड्यास भर रतीब व सारंग्या घोड्यास नीम रतीब याप्रो पुण्यापासून देत होतो त्यास सारंग्या

घोड्यावरील मुसलमान बारगीर याणे भर रतीबावीसी

सरकारात कानावर घातले त्याजवरून भर रतीब

दयावा म्हणोन आज्ञा जाली याप्रो बाला याणी सांगीतले

त्यावरून कोपरगावी आलो त्या तारेखेपासून भर रतीब

चालता लोक सरकारचे घोड्या पुण्याहून नीघते समई

विठोजी भोडवा याजवल पनास रूपये व मजल दोन उंट

व दोन घोडी मिलोन पनास रूये येकून शंभर रूपये

खर्चास दिल्हे त्यास दरमाहाचा खर्च आजमासे रूपये

११६ ग्ाा विठोजी भोडवा दोन घोडे व फडताकचे तटू याो दर दोन रूये

१८ = चंदीस हरभरे के

८/ थोर रास २ दर ८१//

८// तटू १

८//

१८ = रतीब

८=// कणीक ८८२

// तुप ८८८१ दर ८१/

/ साकट ८८// दर ४१//

८/ मीरे

१८ = -

१८ = वैरण कडबा पुले सुमार ३० दर ४ प्राो

३//

येक माही आनवीस रोजा आकार रूये

९८ अैन आकार घोड्याचा

१८ माणसाचा रोजमरा आषाढ मासचा पुण्यात पावला

श्रावण मासचा येथे दिल्हा

१० सरकारचे घोड्यावरील २ दर ५

४ तटूवरील

४ वीठू भोडवा

११६

९० खासगत उंटे २ व घोडी २ दररोज रुपये

१/ चंदीस हरभरे केली

६६२ उंट २

६६१ थोर घोडा १

६६// तटू १

६६// ४

१/ वैरण कडबा पुले सुमारे ३५ आजमासे

२//

येक माही आठावीस रोजा रूपये

७० यैन आकार

२० रोजमरा श्रावण मासचा बीन होते

४ सारवान

८ घोडावरील २ दर ४

८ कृष्णाजी व वीठू शेटया आा २

६ पुण्यात पावले त्याप्राो

२ पुरत नाही सा साा जाजती

८

२०

९०

२०६

योा दोनसे साहा रूपये दरमाहाचा खर्च यात यापुढे वो ती वैरण लागली म्हणजे कडबा लागणार नाही त्यास दिडशे बाला याजपासून घेतले पुढे लागतील तसे घेईन शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना''[५५]

श्री

''शेवेसी नारो सदासीव जोसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा श्रावण वाा चतुर्थी रविवार पर्यंत आपले कृपे करून मुाा कोपरगाव येथे वर्तमान यथास्थीत असे विशेष स्वारी टोकयातून श्रुाा चतुर्थी सी बुधवारी श्रावणीचे दिवसी नीघाली ते ते दिवसी सुर्य गावास दुसरे दिवसी गुरुवारी पुणतांबे तीसरे दिवसी भृगूवारी वाा प्रतीपदेस कोपरगावी नावे वरचा उतरोन बेटात गेली लस्कर श्री कचेश्वराजवल गंगातीरी आहे श्री गणपती उछाहा कोपरगावी बेटात करावयाचा ठरला कीर्दीचे दोन दस्ते मेणकापडाचे रूमालात बांधोन पेसजी पाठवीले त्यास रुमाल माघारा पाठवावा म्हणोन पत्री आज्ञा त्याजवरुन मेणकापडाचा रूमाल एक व मेणकापडाचे आणून खादीचा कोरा श्रुवट रूमाल लाब हात तीन हात होता तो यो दोन रूमाल माघारे पाठवीले आहेत पावतील कोपरगावी स्वारीचे मुदबाखचे काम राजश्री जनार्दनपंत भाउ देशपांडे याजकडे सांगीतले गणपती उछाहा करीता जवाहीरखान्याकडील सोने रूपयाचे दागीने पुण्याहून यावयाचे त्या समागमे रखवालीस स्वार व सिपाई पाहीजेत त्यावीसी श्रीमंत राजश्री भाउस पत्र बाला यास ल्याहावयावीसी आज्ञा जाली त्याजवरुन त्यांनी आपले नावाचे पत्र भाउस पाठवीले हाली उभयता आपटे यास पालखया करण्यावीसी आज्ञा जाली दोनसे प्राो सामानास रूये दिल्हे नाना आपटे आठ च्यार दिवस वाड्यात येत नवते फिरोन पुर्ववत येउ लागले शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना''

१५३० छ २७ भौवल

१५३० छ २७ भाखर

१५३० छ २५ साबान

१५३० छ २५ साबान

१५३० छ २७ सवाल

१५३० छ ५ जील्काद

१५३० छ १६ मोहरम

१५३० छ २९ सफर

१५३० छ ७ राखर

१५३० छ १७ राखर

३०६० छ १७ राखर

२१४२० १३ सुा

वराता सुमार ४३''[५६]

श्री

''यादी काो वेउर वगैरे गाव येथील भरणा
सरकारात दयाववयाचे ते सुमा तीसा मयातैन व अलफ
शके १७३० इा अवल साल ताा आखेर साल त्रिंबकजी
तात्या कड वराताचा

१९४⁄ साल गुा बाकी वरात कोपरगावची रूपये २५०० पौ आदा

५०० छ ७ साबान

६९५⁄ छ २९ साबान

६५० सिका जामदारखान्यात रूपये ७५० पाो जमा जाला

४५⁄ हवादारास प्राो

६९५⁄

११०० छ २५ रमजान

२२९५⁄

१०००१ साल माार सदे पाो

९७९२ माहे १२ माहा ८१६ रूपये

२०९ ज्येष्ठ अखेर हाप्त

१०००१

२०० ताा मानबाा साल गुाा व साल माार मिलोन

१०० साल गुाा श्री पंढरपुरचे स्वारीत घेतले ते चिठी येणे असे

१०० विाा भाउ जामदारखान्यात चिठी येणे

२००

१०३९५⁄

२१०० छ ३ जिल्काद सदासीव नवले पाौ ६⁄

३२४८ गंगाधर हरी पंडीत पाौ

८१६ छ १४ जील्काद ८१६ छ १ जील्काद

८०० छ २० सफर ८१६ छ ८ रावल

३२४८

२००० पुरूषोत्तमराव बलवंत छ २७ मोहरम

५०० छ २२ रावल रोख हस्ते रामाजीपंत

१०० छ १० राखर जामदारखान्यात ताा राधोजी पाा रोख

८१६ छ ७ भावल

४६४ सिका जामदारखान्यात

३२⁄ बटा दर ७ प्राो

४९६⁄

१००० हवाला शास्त्री बावा याचा

१०२६०⁄ बाकी १३५ रूपये''[५७]

''रूमाल नंबर १३ पत्र नंबर ६५००

श्री

असलेहाा नकल

राजश्री त्रिंबकजी डेंगले गोसावी यासी

सुमा सबा मयातैन व अलफ तुम्हाकडे पाा
अमोद प्रांत गुजराथ येथील साल माारचे रसदेचा अैवज
येणे त्या पाौ बाा देणे ताा राजश्री जीवनराव पंडीत सुंमत
याजकडे वाड्यातील नव्या दिवाणखान्याचे चौकाचे
दुसरे मजल्याची छते दुसरे दिवाणखान्यातून छते आहेत
त्याहून चांगली उत्तम प्रत नवी तयार करावयास रूपये

१००० कार्तीक अखेर

१००० मार्गसीर्ष अखेर

१००० पौष अखेर

१००० माघ अखेर

१००० फालगुन अखेर

१००० चैत्र अखेर

१००० वैशाख अखेर

७०००

येकूण सात हजार रुपये देवीले असेत तरी
सदरहू प्राो पावते करून पावलीयाचे कबज घेणे जाणीजे
छ १४ साबान मोर्तब लेखनसिमा''[७८]

इ.स. १८०० मध्ये बाजीरावाने कोपरगावचा आर्थिक कारभार केशव महादेव याजकडून काढून घेऊन त्याजागी रामचंद्र सखाराम सबनीस याजकडे सोपविला.[७९] त्याविषयीचे पत्र उपलब्ध आहे.

''श्री

पाौ छ ११ माहे सफर सुमा समान

सेवेसी केसो माहादेव कृतानेक साष्टांग
नमस्कार विज्ञापना ताा छ ६ माहे सफर परीयेत स्वामीचे
कृपे करुन सेवकाचे वर्तमान येथास्थीत असे विशेष रा
रामचंद्र सखाराम कोपरगावी सबनीशाष्या कामकाजावर
आहेत त्यास माारनीलहे येथून निरोप स्वामीजवल

जावयाकरीत मागत होतो कि पंधरा दिवस नीरोप दयावा की आज तीन च्यार वरसे जाहाली तैनात पैकी काहीच दाहा पाच वरसे पावले नाही रोजमुरा मात्र सासमधे येकसे वीस मात्र पावतात बाकी काही हिसेब पैकी काही पावत नाही त्याचे तेथ दुसरे कोणी रदबदली करावा यासी नाही येथून नीरोप दयावा तरी येथे कोणी दुसरे चवकी पाहारे याची व देखरेख बारीक मोठी बातमी सांगावयास माहीतगार नाही हे चवकस आणी माहीतगार जाहले आहेत आणी चवकीस बहूत खबरदार आहेत तेव्हा येथून नीरोप देता येत नाही तेव्हा याजला सांगीतले की विनंतीपत्र लिहून श्रीमंतास देतो म्हणजे याचे घरची बेगमी स्वामीनी याची केली पाहीजे साल मजकूरी माहागाई जाहाली आहे याजकरीता सेवेसी विनंती लिहीली असे तरी स्वामीनी कृपाळू होउन याजला खर्चास दयावयाची आज्ञा जाहली पाहीजे येथून याजला नीरोप देत नाही सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना''

त्रिंबकजी डेंगळे कोपरगावमध्ये कारभार पाहू लागल्यावर पेशव्यांच्या दरबारात त्याचे वजन अधिकच वाढू लागले. पेशव्यांच्या कोपरगाव परिसरामध्ये मुक्काम असेल तर त्याची सर्व व्यवस्था त्रिंबकजीच करत होता. कोपरगावच्या बेटामध्ये असलेला वाडा त्रिंबकजीने दुरुस्त करुन घेतला. त्याच्या डागडुजीचे काम भास्कर बल्लाळ खांडेकर या सरदाराने केले.[६०] पेशवे दरबारामधून दरवर्षी संक्रांतींच्या निमित्ताने राज्यातील विविध सरदार एकमेकांना तीळगुळ पाठवीत. याविषयी कोपरगावच्या सरदाराने तीळगुळ पाठविल्याचा उल्लेख सापडतो. तो पुढीलप्रमाणे

''श्री

राजश्री त्रिंबकजी तात्या पाटील डेंगळे गोसावी यांसी अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री विनायेक वासुदेव मराठे मुकाम कोपरगाव रामराम विनंती येथील विनंती कुशल ताा छ २, सफर जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. आपणा कारणे रवी संक्रमणाचे तील शर्करायुक्त थैली पाठविली आहे. स्वीकार करुन पावली याचे उत्तर पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.''[६१]

त्रिंबकजी डेंगळे तर्फे कोपरगावचा कारभार पाहण्यासाठी आबाजी दिघे, विनायक मराठे इत्यादी सरदार पाहत होते. परिसराची इतंभूत माहिती ते पेशवे दरबारास कळवीत. त्रिंबकजी कोपरगावी आल्यावर सर्व लेखाजोखा त्यास दिला जात असे. त्याविषयीची दोन पत्रे उपलब्ध आहेत. ती पुढीलप्रमाणे -

श्री

''राजश्री त्रिंबकजी पाा तात्या डेंगले गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्राो आबाजी पाा दिघेकीले हरीष रामराम विनंती विज्ञापना ताा छ ७ राखर पावेतो स्वामीचे कृपे करुन वर्तमान येथास्थीत जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष स्वामीचे आज्ञा की अैवज घेउन कोपरगावचे मुकामी यावे त्यास आम्ही अैवज वसूल केला तो स्वारी आली नाही त्याजवरुन राजश्री आत्मारामभट टकले याजला आणष्टाानाकडे रूपये ६०० साहासे देउन राजश्री गणेशभट दादा उपाधे याचे नावे पावती पाठवीली आहे. शेवेसी पावले पावलीयाचे उत्तर दयावयास आज्ञा जाली पाहीजे दुसरे फुकटीचा गला किल्यास न्यावा कींवा

नींबगावास पाठवावा ज्या प्राो आज्ञा येईल त्याप्रमाणे करू काकडाचा माार लिाा होता त्यास काकडे नींबगावास सुमार १०० रोज सांगवावी श्री कुसाजी पाा सुभेदार याजवल पावती केली कळावे राणूजी आसूद याजबरोबर आटशा रूपये ची पावती पाा ती पावलीच असेल त्याचीही पावती पाठवावी कलावे बहूत काय लिा लोभ असावा शेवजी श्रृत हे विज्ञापना''[६२]

यापत्रामध्ये उल्लेख केलेले नींबगाव म्हणजे त्रिंबकजीचे मूळ गाव आजचे नींबगाव जाळी होय. कोपरगावच्या वाड्यामध्ये स्वतंत्र कैदखाना होता. विविध गुन्ह्यातील कैद्यांना कोपरगावी कैदेत टाकत असत. वैजापूर जवळील लासूर या गावी एका मुसलमान सैनिकाने बदकर्म केले. म्हणून मराठी सरदार आप्पाजी राम सहस्त्रबुध्दे याने त्यास कोपरगावी कैदेत टाकले. तसा वृत्तान्त पेशवे दरबारास कळविला.

श्री

पौा छ १० जिल्काद

''सेवेसी आपाजीराम सहस्त्रबुध्दे कृतानेक साा नमस्कार विज्ञापना येथील कुशल ताा छ २५ सवाल पावेतो स्वामीचे कृपे करुन सेवकाचे वर्तमान यथास्थीत असे विशेष कसबे लासूर येथील गावचे कामावर मुसलमान प्यादा होता त्याने बदकर्म कुणब्याचे बायेकोसी कदनती बायको काढून होउन जात होता हे वर्तमान कारकूनास कलली यावर त्या मुसलमानास धरून कोपरगावी पाो येथे आलीयावर त्यास बेडी घालून ठेवीली आहे त्याची आज्ञा काय ते जाहली पाहीजे मोगलाईकडील जाहीगीरीचा अंमल त्यास ये गोष्टी विशाद आला जे कोपरगावी न्यावे कारण काय जाहले वर्तमान सेवेसी श्रृत होय आज्ञा येईल त्याप्रमाणे करावयास येईल सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना''[६३]

दुसऱ्या बाजीरावाच्या काळात कोपरगाव परिसरामध्ये घोड्यांच्या पागा होत्या. याविषयीचा उल्लेख मागे आलेला आहे. कोपरगावचा परिसर गोदावरी नदीमुळे सुपिक असून नदीकाठी गवताची विस्तीर्ण कुरणांचा होता. त्रिंबकजी डेंगळे यांनी कोपरगावच्या पागेमध्ये काही उंटही पाळले होते. उंटाच्या पागेचा हिशोब, विक्री, देवाणघेवाण इत्यादी बाबी विनायक मराठे पाहत होता. कोपरगावहून उंट पुणे दरबारात पाठविले मात्र ते परत आणले नाहीत; पेंढाऱ्यांचा उपद्रव परिसरात वाढत आहे. उंट पाठवून द्यावेत. पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठीच्या स्वाऱ्यांमध्ये बाणांच्या कैच्यांसाठी व दारुखान्यासाठी उंटांची गरज होती. याविषयीचे मूळ पत्र पुढीलप्रमाणे -

''श्री

पौ छ १२ माहे जिल्हेज सन खमस आशर मयातैन

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री बापुजीपंत बापू आपटे स्वामीचे शेवेसी पो विनायक वासुदेव मराठे मुा कोपरगाव सा नमस्कार विनंती येथील कुशल ता छ २७ जील्काद जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष राजश्री त्रिंबकजी तात्या डेंगले याचे दिमतीचे उंट कोपरगावचे नेमणूकेकडे बाणाचे कैच्यास व दारुचे बादरयास होते ते हुजूर नेउन त्याचे मोबदला चारणीपैकी उंट देवीले ते अदयाप आले नाहीत पेंढारी याच्या आवया येतात याजमुले तलावा व स्वारी करावी लागते त्यास बाणाचे कैच्यास व दारुखान्यास उंट नाहीत याजकरीता आपणास लिहीले आहे तर चारणीचे उंटापैकी आमचे उंटाचे मोबदला उंट नेमले आहेत त्यास ताकीद करुन सत्वर होय ते करावे बहूत काय लिहीणे लोभ करावा हे विनंती.''[६४]

पेंढाऱ्यांचा हल्ला झाल्यास त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कोपरगाव परिसरातील सरदारांनी विशेष काळजी घेतलेली दिसते.

दुसरा बाजीराव कोपरगावी बऱ्याचदा वास्तव्यास येत असल्याने त्याच्या कोपरगावी मुक्कामाची व्यवस्था करण्याचे काम शिवाजी जाधव हा सेवक करत असे. याविषयी घोसपुरी तर्फ रांजणगावचा कमावीसदार दि. ६ ऑगस्ट १८०१ रोजी लिहितो.

''श्री

राजमान्य राजश्री कमावीसदार मौजे घोसपुरी
ताा राजणगाव दिाा राजश्री दौलतराव सींदे आलीज्याहा
बाहादर गोसावी

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुाा
ईसने मयातैन व अलफ खासा स्वारी कोपरगावास जाणार
त्यास मौजे मजकूरी मुकाम करावयाचा याजकरीता
सरकारातून सीवाजी जाधव खीजमतगार पाठवीला असे
तरी तेथे ब्राह्मणाचा वाडा थोर चांगला पाहून झाडून ठेवणे
जाणीजे छ २५ रबीलोवल आज्ञाप्रमाण लेखन सीमा''[६५]

या पत्रामधील घोसपुरी हा गाव दौलतराव शिंदे याच्या अखत्यारितील होता. बाजीराव मुक्काम घोसपुरीहून कोपरगावी जाणार असल्याने कोपरगावी मुक्कामाची व्यवस्था केली होती.

इ.स. १८०२ नंतर बाजीराव व इंग्रज यांच्या दरम्यानच्या संबंधामध्ये चढउतार सुरु झाला. बाजीरावाची चहुबाजूंनी कोंडी करण्यासाठी इंग्रज डावपेच आखू लागले. स्थानिक लोक जे बाजीरावाच्या अन्यायी धोरणाचे बळी ठरले होते, जे दुखावले होते त्या सर्वांना विविध अमिषे दाखवून इंग्रजांनी बाजीरावाविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त केले. कोपरगावमध्ये कादिरभाई मिर्घे हा सरदार बंडवाल्यांचा उपद्रव थांबविण्यासाठी वारंवार पेशवे दरबाराकडे मदत मागताना दिसतो. आपणास बंडाच्या बंदोबस्ताबद्दल खर्च झालेला ऐवज मिळावा अशा आशयाचे त्याचे पत्र उपलब्ध आहे. ते पुढीलप्रमाणे -

''श्री

पाौ छ २७ रमजान सन सबान
राजश्री आणा वाघ माहे बतहू
अजीदीनयेकनास कादरभाई मीर्धे सलाम

बाजत सलाम अंकी येथील खैर सला ताा १६ रमजान जाणून आपली खैर खुशी हमेशा कलमी करुन दिल ताजा करीत जावे दीगर मजकूर आपण कृपा करून छ २० साबानचे पत्र पाठवीले ते पावले त्याची उत्तरे व इकडील माार बीाा

१ आपणास वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री मोर दीक्षीत नाना याणी येलावणे ठाणे लगत राहून व दुसरे वेलेस सांगीतले जे जेथे असतील तेथून तेथून इंग्रजास बातमी कळउन बंडवाले वगैरेची पारीपत्ये करावी म्हणोन माार दोन लिहीन्यात आले त्यास पेशजी आम्ही कोपरेलिस होतो व फौजेत राजश्री बापु वाघ व गंगाधर रावजी व लक्षुमणपंत त्रींवर्ग कोपरगावीहून परंभारे आपेल पत्राआनवये फौज पाठउन बंदाचे पारीपत्य व पींपलनेरचे ठाणे घेउन मुकामास येथे होते इंग्रज ईसकाठ साहेब मुसान्यास आल्यामुळे त्याजवल आम्हापासी संरजाम होता त्यासुधा येउन पोचलो ठाणे सर होउन त्या समागमे पींपलनेरचे मुकामास आलो नंतर काही बंडाचे स्वार तळोदयाचे सुमारे गेल्याची बातमी आली ती इंग्रजास कलवील्यावरुन त्याणी तळोदयाकडील बंदोबस्तास फौजे सुधा कुच करवील्यावरुन नंदूरबारचे सुमारे येऊन स्वार गाडदी बातमीचे पाठलागावर रवाना केले पता लागेल तीकडे जाउन...''

या पत्रातील पुढील तीन ओळी पत्र फाटल्याने वाचता येत नाहीत. [६६]

कादरीभाई हा तोफखान्याचा अधिकारी होता. कोपरगाव व मालेगाव या दोन्ही ठिकाणी तो कारभार पाहतो. इ.स. १८०२ मध्ये त्यास पुणे दरबारात बोलावून घेण्यात आले. त्याच्यासमवेत तोफा व स्वार घेऊन यावे असा पत्रामध्ये उल्लेख आहे.[६७] कादरीभाई पुण्यास आल्याने त्याजागी मोरोपंत आप्पा निसबत चौधरी यांस कोपरगावी पाठविण्यात आले.

याविषयीचा मजकूर पुढीलप्रमाणे -

''श्री

आजम कादरभाई मीर्धे दाममोहबतहू अजीदीन हेनामास वामनराव गोवींद व बापुजी सखाराम व भीकाजी बाबाजी सलाम अंकी येथील खैर खुशी जाणोन आपली खैरयत कलमी करुन दिन ताजा करीत जावे दीगर मालेगावचे कामगीरास तोफा व पायदल व स्वार घेउन तुम्हास येण्यावीसी पेशजी लीाा च आहे त्याप्राो येथे मालेगावास दाखल जाहला असाल व राजश्री मोरोपंत आपा नीाा चौधरी यास पलटण सुधा कोपरगावीहून तुम्हाकडे मालेगावास जावयावीसी येथून लिहीली गेलीच आहेत त्याप्राो येउन पोहचले असतील त्यास मालेगावची कामगारी तुर्त महकूब करुन तुम्हास पुण्यास आणीवण्यावीसी आज्ञा जाहाली आहे त्यास तुमचे बरोबर नेमणूकी पायदल आहे त्याचे च्यारशे पायदल कोपरल वगैरे येथे बंदोबस्तास ठेउन बाकीचे पायदल व स्वार व तोफा सुधा तुम्ही व राजश्री मोरोपंत आपा पलटण सुधा असे मीलोन बाकीचे पायदल जमावानी सीमार्ती बहूत हूशारीने बंदोबस्त राखून दरकूचया मोटया मजली करुन खासा स्वारीत येउन पोहोचावे.''[६८]

बाजीराव आपली ठिकठिकाणची ठाणी मजबूत करताना दिसतो. त्याच्या इंग्रजांविरुद्ध आघाडी उभारण्याचा प्रयत्नांचा हा एक भाग होता. बाजीराव इंग्रजांविरुद्ध लढ्याची तयारी करत असताना त्यास आर्थिक निकड भासत होती. राज्याच्या विविध भागांमध्ये बाकी असलेला महसूली ऐवज गोळा करण्यावर त्याने भर दिला. कोपरगाव व कुंभारी येथील आर्थिक हिशोबाचे व जमाबंदीचा सविस्तर हिशोब देऊन येणे असलेली वसूली वसुल करावीत असे तो अधिकाऱ्यांना कळवितो.[६९]

इ.स. १८१२ मध्ये कोपरगावमधील घोड्यांच्या पागांवर किती व कसा खर्च झाला

याविषयीची आर्थिक कागदपत्रेही तो तपासतो. प्रस्तुत आर्थिक हिशोबांचा ताळेबंद उपलब्ध झाला आहे. तो पुढीलप्रमाणे -

श्री

यादी पागा नीहाय चीघोडी वगैरे कोपरगावी आहेत त्याखेरीज जाजती घोडी वगैरे रासत्याचा रोजमुरा नेमुन यावयाचा सुमा सलास आशर मयातैन व अलफ रूये

१२० दीमत गणपतराव रघुनाथ

८० थोर रास ४ दर २० प्राो

४० तटे रास ४ दर २० प्राो

१२०

१०० दीाा जनार्दन नारायण थोर रास ५

४४० दीाा बलवंतराव घोटवडे कर...

३८० थोर रास १९ दर २० प्राो ३८०

६० तटे रास ६ दर १०

४४०

२४० दिाा गंगाधरपंत मराठे

१८० थोर रास ९ दर २० प्राो

६० तटे रास ६ दर १० प्राो

२४०

९० दीमत सदासीव गाईकवाड

८० थोर रास ४ दर २० प्राो

१० तटू रास १ प्राो

९०

४० दीमत चीमणाजी नारायण थोर १

२० दीा दीनकर सदासीव साठे थोर रास १

१२० दीा रामचंद्र माहादेव नगरकर थोर रास ६ दर २० प्राो

२४० दीा रावजी लेले थोरास १२ दर २०

२० दीा शेकोजी खरे थोरास १९

२० दीा बहीणाजी जाईकर थोररास १

३० दीाा हैबतसींग

२० थोर रास १ येाा

१० तटू रास १ येाा

४० दीा गोपाल सखाराम थोर रास २

१७५ दीाा वीसाजी देवराव हतनीज १ येाा आजमासे रूये

४०० दीाा बालोजी बनकर उट व .... ४० दर १० प्रो १००

६० गाडदी दीमत पानशे अमृत.... नेमणूक होउन आली आाा बाकी होणे॰॰ ११

कोपरगाव व कुंभारी परगण्याचा आर्थिक हिशोब सादर केल्यावर त्रिंबकजी डेंगळे याने पेशवे दरबारामध्ये कोपरगावच्या फौजेच्या खर्चापोटी अतिरिक्त ऐवजाची मागणी केली.[७१] दि. १० नोव्हेंबर १८१३ रोजी दौलतराव शिंदे यांच्या फौजेचा तळ कोपरगावी पडला होता. प्रस्तुत फौजेच्या मुक्कामाचा खर्च माधवराव गोविंद या सरदाराने व्यवस्थित टिपण ठेवून पेशवे दरबारास कळविलेला होता. त्याविषयीचे पत्र पुढीलप्रमाणे -

''श्री

पौ छ २ जील्हेज मार्गसीर्ष सन आर्बा

श्रीमंत माहाराज राजश्री बाबा साहेब स्वामीचे

शेवेसी

विनंती शेवक माधवराव गोवीद वैदय चरणावर मस्तक ठेउन कृतानेक सीरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तगाईत कार्तीक वदय २ पावेतो स्वाम कृपे करून शेवकाचे वर्तमान येथास्थीत असे वीशेष माहे भाद्रपद मास व आस्वीन मास दुमाही रोजमुरा स्वार व गाडदी वगैरे याचा हजीरी... हुजूरचे पठाप्रमाणे हातावर वाटणी ज्याचे त्याचे हातावर करून वाटणीचे पट व पावत्या व

रेजकरी वगैरे याची सीलक राहीली त्याचा झाडा शेवेसी पाठवीला आहे कोपरगावचे पत्र राजश्री नारोपंत नाना आपटे यास पेढारी याचे बातमीचे आले तेवलेस कुच सडे फौजेचे करून गेले तो वाटेने रा वीसाजीराम याचे पत्र वामोरीस आले की पेढार नव्हे सींदयाकडील काफला आहे येउ नये त्याजवरुन माघारे फौजे सुध्धा नगरास आले शहरात आहेत पेढारी याची आवई.... कोसावर नाही फौजे आल्याने प्रांताची ... शेमली शेवेसी श्रुत हे होय हे विज्ञाप्ती''[७२]

कोपरगावमधून शिंदे यांच्या फौजेचा तळ निघून गेल्यानंतर परिसरामध्ये लुटीस पेंढाऱ्यांच्या टोळ्या आल्याची बातमी समजली. कोपरगावचा कमावीसदार माधवराव गोविंद वैद्य याने पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी तोफा, गाडदी व चौधरी यांची नियुक्ती केली. त्यामध्ये शंभर बाणधारी सैन्य, सत्तर सैनिक यांचा भरणा केला. याविषयीचे पत्र पुढीलप्रमाणे -

''श्री

पाो छ १३ लौवल वैशाख सन आर्बा

श्रीमंत माहाराज राजश्री बाबासाहेब स्वामी माहाराजाचे शेवेसी

विनंती शेवक माधवराव गोवीद वैदय चरणावर मस्तक ठेउन कृतानेक सीरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत चैत्र वदय १४..... पावेतो माहाराजाचे कृपावलोकन करुन ..... वर्तमाने येथास्थीत हे विशेष ताबूक आकदार व ..... मजकूराची तर्दीचा याद आलाहीदा .... केली आहे ती आवलोकन होउन उतराची आज्ञा जाहली. पाहीजे यानंतर नगर तालुक्याचे बंदोबस्ता जेउरकर सुध्ध रूपराम याजकडील तोफा व गाडदी होते ते दरोबस्त तोफा सुध्धा

कोपरगावास छ २१ साखरी कुच करून गेले येथे स्वार ... व कोपरगाव पौ चौधरी याने नेमले आहेत बा १०० पौ देह करी व मेवावती मीळून सतर माणूस नउदास व नगरास फौज होती त्याने पनास .... कास पर्यंत हाली हरामी नवता हे सर्व लक्षात आहे शेवेसी श्रृत हाय हे विज्ञापना''[७३]

''श्री

पो साबान माघ कार्तीक सन आर्बा असर

शेवेसी वीनंती शेफा नारो विष्णू आपटे चरणावर मस्तक ठेउन सीरसां नमस्कार विज्ञापना ता छ १४ जील्काद प्रांत काल मुा नगर स्वामीचे कृपेकडून वर्तमान येथास्थीत असे प्रार्थना असीजे कोपरगावाहून पेढारी याचे बातकीचे पत्र छ १३ जील्कादचे आले ते छ मजकूर प्रांत काली पावले त्याचवेळेस सडे फौजेनसी नीघोन कोपरगावचे रोखे गेले बातमीचे पत्र आले त्याची नकल शेवेसी पाठवीली आहे शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना''[७४]

कोपरगाव परिसरातील पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी पुणे दरबारामधून नारो विष्णू आपटे या सरदारास फौजेसह ०९ नोव्हेंबर १८१३ रोजी पाठविण्यात ओ. २५ ऑक्टोबर पासून पेंढाऱ्यांनी कोपरगाव परिसरात दंगा करावयास सुरुवात केली. त्यांनी पुढील दहा दिवस उपद्रव दिला. त्याची माहिती विसाजी देवराम याने पुणे दरबारामध्ये कळविलेल्या २५ ऑक्टोबर १८१३ च्या पत्रामध्ये आहे -

''श्री गजानन

पो छ ४ जील्काद कार्तीक सन आर्बा असर

मुा पुणे

राजश्रीया वीराजीत राजमान्य राजश्री भीकांजीपंत आपा व बापु स्वामीचे शेवेसी

पो वीसाजी देवराव कृतानेक सा नमस्कार

वीनंती येथील कुशल तागाईत छ २९ सेवा जाणून मुकाम कोपरगाव येथील यथास्थीत असे वीशेष पेढारी याचे बातमीचे पत्र पेशजी लिाा आहे आणखी बातमी आली की दुसरे ..... गंगा उतरून मागे माहेतून पुण्याकडे आले म्हणोन वर्तमान आहे पेंढारीच धर्मात हाती व उटे आहे येथील बंदोबस्त .... ने आहे परंतू थोरल्यास उपाय नाही गडबड करू लागल्यास वीना झटपट जाहाल्यासीवाय हार मानावयाचे नाही हे .... जमा आसावी आम्हाजवल च्यार आसामी जासूद सीवाये नाही वर्तमान कसे ल्याहावे येथे च्यार पाच .... खान्यामू माणूस मीलत नाही दर आसामी साडेपाच साहा सीवाय मीलत नाही आणी सोगणीच दीवस माणूसाच फार तोटा उतर मात्र सर्मदेक गुस्तर जावे येथे सामान आहे तो आपल्यास माहीतच आहे श्रीमंत माहराज स्वामीस वीनंती करून जमीयत .... व्हावा चाकरी घडावी हे ईला आहे श्रीमंत माहाराज स्वामीचे चेरण आहे बहूत काय लिहणे कृपा लोभ करावे हे विनंती'[७७]

पेंढाऱ्यांनी कोपरगावच्या पश्चिमेकडील 'जेऊर' या गावी आपला तळ दिला होता. त्यांचा उपद्रव १८१४ च्या मध्यापर्यंत चालू होता. १३ एप्रिल १८१४ रोजी माधवराव वैद्य दुसऱ्या बाजीरावास लिहितो की, जेऊरमधील पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी रूपराम चौधरीची पलटण व दोनच तोफा आहेत. आणखी त्वरीत मदत पाठविणे याविषयीचा मजकूर खालीलप्रमाणे -

''श्री

पाो छ ११ राखर सन आर्बा आशर मयातैन

श्रीमंत माहाराज राजश्री बाबा साहेब साहेबाचे

शेवेसी

वीनंती शेवक माधवराव गोवीद वैदय चरणावर मस्तव ठेउन कृतानेक सांष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत चैत्र वदय ४ शुक्रवार नगरात स्वामे कृपे करून सेवकाचे वर्तमान येथास्थीत असे वीशेष नगर व जेउर येथील बंदोबस्तास रा रूपराम चौधरी याची पलटणे व दोन तोफा होत्या त्यास चौधरी याचे पत्र छ १४ राखर चे दौलतराम येथील कामावर आहे. त्यास आले की पत्र पावताच तोफा व पलटणे स्वार खेरीज करून जलद कोपरगावचे मुकामास येणे असे आले त्याआनवये छ १८ मीनहूस कुच करून तोफा सरंजाम सुधधा जाणार याजकरीता विनंती लेखन केली आहे ईकडील मजकूराची वर्दीची यादी आलाहीदा आहे बहूत काय लिहू शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती''[७६]

पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी कोपरगाव परिसरामध्ये पाठविल्या फौजेच्या खर्चाची व अन्नपाण्याची व्यवस्था करण्याची व्यवस्था त्रिंबकजी डेंगळेने विसाजीराम कारूळकर याच्याकडे दिली होती.[७७] दि. १९ एप्रिल १८१४ रोजी कोपरगावमध्ये पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी गारद्यांचे पथक व तोफा आणण्यात आल्या.[७८] विसाजीराम कारूळकर हा त्रिंबकजी डेंगळेच्या पथकातील सरदार असून तो कोपरगाव परिसराचे सर्व कामकाज पाहत असे. विसाजीराम कारूळकराकडे कोपरगावजवळील हिंगणीच्या वाड्याचे काही काम होते. वाड्याच्या समोर गोदावरी नदीच्या पूर्वेस आजच्या मुर्शतपूर शिवारात बाजीरावाची घोड्यांची पागा होती. त्याविषयीच्या बांधकामाचा वृत्तान्त तो वेळोवेळी बाजीरावास कळवितो.[७९] हिंगणीच्या वाड्याविषयी माहिती व कारखान्याच्या खर्चाच्या बाबींचा तपशील १८१७ च्या जून महिन्यामध्ये कुंभारीच्या मामलेदाराकडे व मुला खुशालचंद कोपरगावकर या व्यापाऱ्यास द्यावयाच्या हुंड्या हिशोब सादर करावयाचा तपशील विसाजी रामाने तयार केला होता.[८०] दि. २६ जून १८१७ रोजी कोपरगावमध्ये बापूजी बाजी वाघ या सरदाराच्या तळावर चोरी

झाली. तिचा वृत्तान्तही कळविल्याची नोंद आहे. चोरी झाल्यावर चौकशी कशाप्रकारे केली जात असे याविषयीचे कोपरगावशी एक पत्र उपलब्ध झाले आहे ते पुढीलप्रमाणे -

''श्री गजानन

पौ छ १० साबान सन समान आशर मयातैन

शेवेसी बापुजी बाजी व गंगाधर मोरेश्वर व लक्षुमण विठल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १ साबान सांयकाल घटका दिवसपर्यंत मुकाम कोपरगाव येथे संरजामासह वर्तमान यथास्थीत असे विशेष पेशजी कसबे मुखेडचे मुकामचे पत्र पाठवीले आहे त्याजवरुन माार श्रृत जालाच असेल कसबे माारी फौजेचा मुकाम जाला ते दिवसी रात्री सिलेदार याचे रावटीची कजात फाडून चोरचोरी करुन वस्तभाव घेउन गेले त्याची चौकसी गावकरी मांग भील मागाडी वगैरे आणूक केली त्यास मांग गावात गेला याप्रामो मागाडी याणी गावकरी जमीदार याचे विाा लिहून दिल्हे नंतर मुदाही माहार चोरीचे दागीन्याचे बसन सापडले त्याजवरुन गावकरी यास चोरीचा फडशा करुन देणेविसी पाटील कुलकर्णी आणीले आहेत इतक्यात विचूराहून कारकून आले त्याणी बहूत प्रकारे दबावाच्या वलगना केल्या त्या श्री गंगा उतरतीरी तपासनीसी विंचूरकर याची व गावही त्याजकडे सच आहे तेव्हा चोरीचा जाबसाल त्याणी फडशा करुन दयावा आपणास गैरवाका लिहीतील याजकरीता सुचनार्थ माार लिहीला आहे आम्ही येथे मुकामास आलो इतक्यात इंग्रजांकडील हीसपीट साो येवलेचे मुकामास संरजाम सुध आहे त्याने आजम कादरभाई याचे नावे पत्र लिहीले ते बजीनस आपणाकडे पाठवीले आहे पाहाता माार आपाजी येई; उतर दिल्हे त्याचीही नकल पाो आहे लिहीला आहे

त्याच सकती पाठावावयाची असल्यास घेउन पाठवावी
पेशजी कादरभाई याणी कोपरेलचे मुकामीहून इंग्रजांचे
लस्कर उतरानचे मुकामास आहे तेथे पत्र लिहून पाठवीले
होते त्याची नकल आपणाकडे पाठवीलीच होती त्यास
पत्राचे उतर इंग्रज याने दिल्हे नाही जबानी जासूदाचे की
तुम्हाजवल दुसालाचे बंड असता तुम्ही त्याचे मीलाफी
आहा असे बोलले त्यास तो ही माार त्याचे चिंतात वागतो
असे आताचे लिहीण्यावरुन भासले असो आज्ञा होईल
त्याप्राो वर्तणूक करुन येथे वैरणीची...''[४१]

दुसऱ्या बाजीरावाने पेशवाईच्या अखेरच्या टप्प्यामध्ये राज्याच्या विविध भागांमधून लढण्यासाठी आवश्यक तो पैसा गोळा करण्याची जबाबदारी त्रिंबकजी डेंगळे याच्यावर सोपविली त्याप्रमाणे आपल्या विश्वासातील व्यक्तींना राज्याच्या विविध भागांमध्ये पाठविले. कोपरगावमध्ये चिमणाजी आप्पा व विंचूरकर यांना पाठविले.[४२] कोपरगावमध्ये फौजेची पथके तयार करण्यात आली. विसाजी गोखले याच्या अधिपत्याखाली रूपराम चौधरीची एक पलटण, गाडग्यांची एक पलटण कोपरगावी जमा करण्यात आली. याविषयीचा उल्लेख पुढीलप्रमाणे -

''श्री लक्ष्मी नारायेण प्राा
शेवेसी वीसाजी राम मुकाम कोपरगाव
चरणावर मस्तक ठेउन सास्टांग नमस्कार विज्ञापना
ताा छ ६ साबान जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत
असावे वीशेष श्री पंढरपुरचे मुकामीहून पत्रे आली तेथे
आज्ञा की कोपरगावी ईतलाखी व सरंजामी फौजे आहे
त्यापैकी हाली तेथे ठेवावयाची आज्ञा होउन राजाश्री
मोरोपंत भाउ यास आज्ञापत्र सरकारातून रवाना जाहाले
आहे त्याप्रमाणे राहावयाच्या दिमती

१ पलटणे रूपराम चौधरी याजकडील

१ वीसाजीराम गोखले याजकडील

१५० स्वार

१५० गाडदी

१ शेख मीदाबाईकर याचे पथक

१ हाणदार व गाडदी

सदरहू आन्वये तीकडील बंदोबस्तास राहातील वरकड स्वार व गाडदी वगैरे हूजूर आणवीले आहेत त्याप्रमाणे ''[८३]

दुसऱ्या बाजीरावाने मराठी राज्याच्या उत्तरार्धात बरीच धावपळ केली प्रसंगी कोपरगाव तर कधी जुन्नर प्रांतात तो मुक्काम करत होता. या धावपळीमध्येही कोपरगावमधील इमारतींची बांधकामे, बागांमधील झाडांची निगा याविषयी तो सरदारांना विचारणा करताना दिसतो. याविषयीची दोन पत्र पुढीलप्रमाणे -

''राजश्री मोरोपंत भाउ सुध्धा लौकर येउन पोहोचावे म्हणोन आज्ञा त्याजवरुन मोरोपंत भाउनी येथील बंदोबस्तास नेमणूकीअन्वये पथके ठेउन बाकी फौज सरंजाम घेउन आले आहेत श्रावण सुध्ध प्रतीपदेस कोपरगावीहून कुच करुन श्री कचेश्वरी मुकाम केला श्री गंगेस पाणी आले याजमुळे नावेवर फौज उतारवयासी दोन तीन रोज लागले चतुर्थीस तुमचे करुन राहाते येथे मुकाम केला पुढे मजल दरमजल कुच करुन चालले आहेत लौकर येउन पावतील बेसतील पाउणसे लोकाची हजीरी आपणासी चालती जाहली नाही बेवतील वाड्यात डालीबीची वगेरे झाडे देवेत त्यात डाली बस..... दयमाने ठेवील्या तदापी दीकत नाही व रोजप याकडील सीपाई तेथे चौकी पाहावयास आहेत त्यास व त्याकडील कारकूनास सांगतो परंतू फकचा बंदोबस्त होत नाही बोटातील पाउणसे लोक आमची कामगारी औकत नाही हजीरी दयावयाचे पत्र आले आणी फीरोन नरम पडले

याजमुले कोणीच काम अैकत हे ध्यानात असावे शंकर माली बागातील झाडास मसाला घालण्याची याद न देता व मोजदाद करून न देता नीघोन गेले याजमुले बागातील दाहा कमी पडला त्यास शंकर माली यासी नीक्षूण ताकीद होउन बागाची माने एक ओळ फाटलेली आहे ती साल गुाा जाजती लावणी काहीच केली आहे मागील लावणीतील मागे फार आलेत याजमुले तो घाल घासरीवर घालतो कलावे शेवेसी श्रुत होणे हे विज्ञाप्ती''[८४]

''श्री

राजश्री त्रींबकजी पाा तात्या डेगले गोसावी यासी

अखंडीत लक्षुमी आलंकृत राजमान्य श्राो गंगाधर खंडेराव नारो कासीनाथ रामराम वीनंती वीज्ञापना ताा छ २९ जीलकाद पावेतो मुाा बेठ कोपरगाव येथे क्षेम असो वीशेष आपणकडून फार दीवस जाले पत्र येउन शेवकाचा सांभाल देत नाही तर येसेचा सांभाल देत नाही तर येसे नसोण नीरंतर पत्र पाठउन सांभाल करीत गेला पाहीजे ईकडील माार दस्तूर येणे प्राो

१ छ २८ रोजी कारागीर वगैरे

२ नाईक

२ कारकून

७ हवालदार

९० पाथरवट

१३० मजूर माणसे

३० बायका पोरे

९ घीसाडी

१६ सुतार

५ गवडी

१ कारी दगड घडोन आटा चोहो रोजी तयार होतील पुढे दगड घडावयासी कारागीर यास नाही तुलसीवृदावणाचे दगड मात्र येउन पंधरा दीवस होत आले त्याजवर कारागीर सतत आठ नीक्षूण ताकीद होउन फरशा आल्यास आज्ञेप्रमाणे काम होईल कलम

१ जोत्याचे उतरेकडील पायरी जुडयीस कारागीर लावीले आहेत दुसरी पायरी पुर्वेकडे करावी की उतरेकडे करावी त्याची आज्ञा या ..... त्याप्रमाणे करु कलम

लाकडे चांगली मीलत याजकरीता नासीक प्रांती वगैरे ठीकाणीहून आणोन काम चालवले कलम

१ दगडास फार दीवस यावयाची लागले त्याणी च्यार दीवस काम लांबले लछीरराम परभारास आवरगाबादेस गेले आहेत त्याचा देव देव होउन महीन्यातीन वारानी येथे येणार म्हणोन त्याचे पत्र काल येथे आले येथे माल मसाल्याचा बोभाट आपल्यास कोठ पर्यंत ल्याहावा आणी स्वारी तर महाराजाची येणार तर कृपा करोन फरशा जलद कारखानदार यास ताकीद रवाना होई येसे करावे कलम

१ मौज नींबगाव जाली येथीली पुढी चौकाचे जोत्याचे पाटथरा येक बाजूचा जाहला बाकीची पाटथरयाचे जुडईस कारागीर लावीले आहेत मी उदईला नीघोन येक जण तेथे जातो स्वारीची बातमी आठ दीवस अगोदर आज्ञा यावी म्हणोन लाकूड फाटे याची वगैरे बेगमी करुन ठेउ जागा आपल्यास राहावयाचा

नीट कराव यासी त्यास साल गुदस्ताचे तलावर करावी
कीवा दुसरे ठीकाणी करावी याची आज्ञा यावी येणे
प्राो साहा कलमे याची वीनंती लिहीली आहे नीवेदन
होईल बहूत काय लिहीणे कृपा लोभाची वृधी करीत
जावी हे वीनंती''[८७]

तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धानंतर मराठी राज्य जवळजवळ संपुष्ठात आले. इ.स. १८१८ च्या धुळकोटच्या लढाईत बाजीराव इंग्रजांना शरण गेला आणि मराठी राज्य पूर्णपणे नष्ट झाले. इंग्रजांनी कोपरगाव व परिसराचा ताबा घेतला. कोपरगावच्या बेटातील पेशव्यांच्या सरदाराचा वाडा, गढी पाडून टाकली.

कोपरगावच्या शिवकालीन व पेशवेकालीन इतिहासाचा आढावा या प्रकरणामध्ये घेतला आहे. कोपरगावचा या कालखंडातील इतिहास अनेक महत्त्वपूर्ण घटनांनी गजबजलेला होता. आतापर्यंतच्या अभ्यासावरुन ही बाब दिसून येते.

संदर्भ व तळटिपा

१. चि. ग. कर्वे, स. आ. जोगळेकर (संपा.), **महाराष्ट्र परिचय**, पुणे, १९५४, पृ. १६.

२. महादेवशास्त्री जोशी (संपा.), **भारतीय संस्कृती कोश**, खंड ७, पुणे, २००४, पृ. २०१.

३. सरयू दोशी (संपा.) , **महाराष्ट्र**, मुंबई, १९८५, पृ. ५६.

४. हेमचंद्र रायचौधरी, **प्राचीन भारताचा राजकीय इतिहास**, (अनु. सदाशिव आठवले), पुणे, २००६, पृ. १३५.

५. म. के. ढवळीकर, **महाराष्ट्राची कुळकथा**, पुणे, २०११, पृ. ८१.

६. कित्ता, पृ. ८६.

७. अधिक माहितीसाठी पहा-

Henry Cajinis, **Medievel Temples of the Occian, Archaeological, survery of India**, New Imprial Series, Vol.68, Calcutta, 1931.

८. अरुणचंद्र पाठक (संपा.), **महाराष्ट्र : इतिहास-प्राचीन काळ**, खंड १, भाग २, स्थापत्य व कला, मुंबई, २००२, पृ. १७६-१७७.

९. जे ब्रिग्ज, **फेरिस्ता**, खंड १, पृ. ३०९, लंडन, १८२९, पुनर्मुद्रीत आवृत्ती, कलकत्ता, १९११.

१०. ग. ह. खरे, **मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास**, मुंबई, २००१, पृ. १.

११. वा. सी. बेंद्रे, **मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची विचित्सक चरित्रे**, पुणे, १९६७, पृ. ७१.

१२. कित्ता, पृ. १४३.

१३. सदाशिव शिवदे, **मराठ्यांच्या इतिहासाची संस्कृत साधने**, पुणे, २०१०, पृ. ४८.

१४. गो. स. सरदेसाई, **मुसलमानी रियासत**, मुंबई, पुनर्मुद्रण, २०१२, पृ. २४२.

१५. ग. भा. मेहेंदळे, **श्री राजा शिवछत्रपती**, खंड १, भाग १, पुणे, १९९८, पृ. ११७.

१६. जदुनाथ सरकार, **औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास**, (अनु. श. गो. कोलारकर), नागपूर, १९९९, पृ. १०

१७. ग. ह. खरे, **ऐतिहासिक फार्सी साहित्य**, खंड ६, पुणे, १९७२, पृ. ७६.

१८. वा. सी. बेंद्रे, **छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्त्वहीन 'हिंदवी स्वराज्यांचा मोगलांशी लढा'**, मुंबई, १९७५, पृ. २५६.

१९. वि. गो. खोबरेकर, **मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम**, मुंबई, १९७७, पृ. २२०.

२०. द. ब. पारसनीस (संपा.), **बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी**, मुंबई, १९०६, पृ. ०२.

२१. कित्ता, पृ. २३०.

२२. कित्ता, पृ. १८४.

२३. ना. गो. चापेकर, **पेशवाईच्या सावलीत**, पुणे, १९३७, पृ. ५८-६३.

२४. बापू पुरुषोत्तम जोशी (संपा.), **थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे, १९११, पृ. २९-३०.

२५. का. ना. साने (संपा.), **थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, भाग २, पुणे, १९११, पृ. १२.

२६. कित्ता, पृ. ९४.

२७. कित्ता, पृ. १०५.

२८. कित्ता, पृ. ३९९.

२९. वि. गो. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. ३४२.

३०. कित्ता, पृ. ३७७.

३१. **पेशवे दफ्तर**, खंड १९, पृ. ५५-५६.

३२. प्रमोद ओक, **पेशवे घराण्याचा इतिहास**, पुणे, १९८९, पृ. ३४२.

३३. काशिनाथ मराठे (संपा.) **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे, १९११, पृ. ०२.

३४. कित्ता, पृ. १०१-१०२.

३५. ना. गो. चापेकर, **पेशवाईच्या सावलीत**, पुणे, १९३९, पृ. ११६-११७.

३६. काशिनाथ मराठे (संपा.), पूवोक्त, पृ. १४८.

३७. **संशोधनासाठी निवडलेले कागद, (सं.नि.का.)**, द. १९, पु. ५, पत्र क्र. १०९१७.(येथूनपुढे हा संदर्भ सं.नि.का. असा दिला आहे.)

३८. प्रमोद ओक, पूर्वोक्त, पृ. १२३.

३९. वा. कृ. भावे, **पेशवेकालीन महाराष्ट्र**, पुणे, १९३५, पृ. ५७.

४०. काशिनाथ मराठे (संपा.), पूर्वोक्त, पृ. २१६.

४१. सं.नि.का., द. २२, पु. २, पत्र क्र. १३३०६.

४२. सं.नि.का., द. १४, पु. २, पत्र क्र. ७६७८.

४३. काशिनाथ मराठे (संपा.), पूर्वोक्त, पृ. १४९.

४४. **चिटणीसी दफ्तर**, रुमाल १७, पु. ३, पत्र क्र. ८५६७.

४५. गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत**, खंड ७, मुंबई १९९१, पृ. ४४९.

४६. **सं.नि.का.**, द. २६, पु. ३, पत्र क्र. १४००८ व १४००९.

४७. **सं.नि.का.**, द. २९, पु. ६, पत्र क्र. १६४५८.

४८. **सं.नि.का.**, द. २६, पु. ६, पत्र क्र. १४३७३.

४९. **चिटणीसी दप्तर**, द. १, पु. १, पत्र क्र. १७९.

५०. बापू जोशी (संपा.), **दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे, १९०२, पृ. २५.

५१. कित्ता, पृ. ६६-७०.

५२. वि. गो. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. ४३१.

५३. **चिटणीसी दप्तर**, रु. २, पु. ४, पत्र क्र. १०७१, १०७२.

५४. **चिटणीसी दप्तर**, रु. ३५, पु. १, पत्र क्र. १८१४२.

५५. **चिटणीसी दप्तर**, रु. २८, पु. २, पत्र क्र. १४५९९.

५६. **चिटणीसी दप्तर**, रु. २८, पु. २, पत्र क्र. १४६००.

५७. **चिटणीसी दप्तर**, रु. २८, पु. २, पत्र क्र. ६५७९.

५८. **चिटणीसी दप्तर**, रु. २८, पु. २, पत्र क्र. ६५००.

५९. **चिटणीसी दप्तर**, रु. ९, पु. ४, पत्र क्र. ४८४१.

६०. **चिटणीसी दप्तर**, रु. २६, पु. ५, पत्र क्र. १३७४८.

६१. **चिटणीसी दप्तर**, रु. २६, पु. ९, पत्र क्र. ५०५१.

६२. **चिटणीसी दप्तर**, रु. ७, पु. ५, पत्र क्र. ३९३०.

६३. **चिटणीसी दप्तर**, रु. ७, पु. ४, पत्र क्र. ३८४९.

६४. **चिटणीसी दप्तर**, रु. ४, पु. ३, पत्र क्र. १४४९.

६५. **सं.नि.का.**, द. ५६, पु. ३, पत्र क्र. २५७६९.

६६. **सं.नि.का.**, द. २६, पु. ९, पत्र क्र. १४४९९.

६७. **सं.नि.का.**, द. ३१, पु. ४, पत्र क्र. १७६००.

६८. **सं.नि.का.**, द. ३१, पु. ४, पत्र क्र. १७०६९.

६९. **चिटणीसी दप्तर**, रु. २७, पु. ४, पत्र क्र. १४३४५.

७०. **सं.नि.का.**, द. २७, पु. ५, पत्र क्र. १४९९३.

७१. **सं.नि.का.**, द. २०, पु. १, पत्र क्र. ११६४०.

७२. **सं.नि.का.**, द. २७, पु. ४, पत्र क्र. १४८९६.

७३. **सं.नि.का.**, द. २७, पु. ५, पत्र क्र. १४८९५.

७४. **सं.नि.का.**, द. २६, पु. ६, पत्र क्र. १४३२१.

७५. **सं.नि.का.**, द. २७, पु. ४, पत्र क्र. १४९२२.

७६. **सं.नि.का.**, द. २६, पु. ३, पत्र क्र. १३९७१.

७७. **सं.नि.का.**, द. २०, पु. १, पत्र क्र. ११६०९.

७८. **सं.नि.का.,** द. २७, पु. ४, पत्र क्र. १४८९५.

७९. **चिटणीसी दप्तर**, रु. ७, पु. १, पत्र क्र. ३५६९.

८०. **चिटणीसी दप्तर**, रु. ७, पु. १, पत्र क्र. ३५८५.

८१. **चिटणीसी दप्तर**, रु. ७, पु. ३, पत्र क्र. ३७०४.

८२. **सं.नि.का.,** द. २६, पु. १, पत्र क्र. १३८९८.

८३. **सं.नि.का.,** द. २६, पु. १, पत्र क्र. १४००८.

८४. **सं.नि.का.,** द. २६, पु. १, पत्र क्र. १४००९.

८५. **सं.नि.का.,** द. २७, पु. ५, पत्र क्र. १५०७३.

प्रकरण तिसरे

आधुनिक कोपरगाव

तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धानंतर इंग्रजांनी हळुहळू मराठी राज्याची सूत्र आपल्या हाती घेण्यास प्रारंभ केला. १८१८ च्या जून महिन्यामध्ये दुसरा बाजीराव पेशवा इंग्रजांना शरण गेला. त्याबरोबरच पेशव्यांचे राज्य संपुष्ठात आले. दुसऱ्या बाजीरावाच्या शरणागतीनंतर मराठी प्रदेशाची व्यवस्था लावण्याचे काम इंग्रजी प्रशासनाने एल्फिन्स्टनवर सोपविले. तो उदारमतवादी प्रशासक होता. मराठ्यांचा पाडाव करुन ब्रिटिश अंमलाची प्रस्थापना व आधुनिकतेची पायाभरणी करण्यात माउंट एल्फिन्स्टनची अर्थपूर्ण भूमिका होती. १८१८ साली मराठी सत्ता ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडे आली तेव्हा प्रथम'डेक्कन कमिशनर' हे एक नवे पद त्याच्यासाठी निर्माण करण्यात आले. पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावण्याचे काम त्याच्याकडे सोपविण्यात आले. आपली ही कामगिरी त्याने यशस्वीपणे पार पाडली. हा नव्याने जिंकलेला मराठी प्रदेश मुंबई इलाख्यात सामील करुन १८१९ साली तो मुंबईचा गव्हर्नर झाला. मराठी प्रदेशावर जून १८१८ पासून इंग्रजी राजवट सुरु झाली. पेशव्यांकडून जिंकून घेतलेला प्रदेश सुमारे ५०,००० चौ.मैलांचा आणि ४०,००,००० लोकवस्तीचा होता. त्यावेळी अहमदनगर जिल्ह्याचा पर्यायाने कोपरगावचा समावेशही याच प्रदेशामध्ये होता.[१]

माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टनने दक्षिणेचा कारभार अतिशय जवळून पाहिला होता. कंपनीने भारतात जो प्रदेश जिंकला; त्या प्रदेशास अनेक शतकांचा इतिहास आहे. या ठिकाणचा धर्म, संस्कृती, परंपरा प्राचीन आहेत. यांची जाणीव ठेऊन त्याने या प्रदेशाचा कारभार समजून घेतला. जनतेचे अंतरंग समजून घेण्यासाठी त्याने काही अधिकाऱ्यांना ऐतिहासिक भाषा व त्या भाषांमधील ज्ञान समजून घेतले. ते इंग्रजी भाषेमध्ये अनुवादीत करण्यास सांगितले. तेथील काही महत्त्वाच्या पुस्तकांची इंग्रजी भाषांतरे केली. ब्रिटिश ईस्ट कंपनीच्या नोकरांपैकी अनेकांना हिंदुस्थान कमालीचा मागास वाटत होता. या लोकांना समाज सुधारण्याची जबाबदारी आपणावर आहे असा त्यांचा समज झाला होता. भारतीय भाषांमध्ये साहित्य मेकॉलेच्या मते सर्वसाधारण व कुचकामी होते. १८२८ ते १८५६ या काळात म्हणजेच विल्यम् बेंटिंगपासून ते लॉर्ड डलहौसीपर्यंतच्या गव्हर्नर जनरलांच्या कार्यकाळात मेकॉलेसमान विचारधारांच्या लोकांचे प्रशासनावर वर्चस्व होते.

जेरेमी बॅथम, जेम्स मिल यांच्या उपयुक्ततावादी तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेल्या कंपनीच्या सनदी नोकरांनी विविध प्रकारच्या सुधारणांसाठी प्रयत्न केले. मात्र या सुधारणांमागे प्रभुत्त्ववादी विचारांचा हेतू होता. त्याचाच एक भाग म्हणून ख्रिस्ती मिशनरींनी स्थानिक भाषा शिकून ख्रिस्ती धर्मप्रसारास सुरुवात केली. भारतातील विविध भाषांचे शब्दकोष तसेच त्यांचे व्याकरण तयार करण्यास प्रारंभ केला. गरीबांच्या मुला-मुलींसाठी शिक्षणाच्या सुविधा निर्माण केल्या. मराठी भाषिकांच्या प्रदेशात ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी ही कामगिरी केली.

ख्रिस्ती मिशनरींचे कोपरगावमध्ये आगमन -

आपल्या वसहतींमध्ये धर्मप्रसार करण्यासाठी इंग्लंडमध्ये १७९९ मध्ये 'चर्च मिशनरी सोसायटी' ची स्थापना केली. चर्च मिशनरी सोसायटीने आपला ख्रिश्चन मिशनरी डॉ. टेलर यास १८०७ मध्ये महाराष्ट्रात पाठविले. त्यानंतर रिचर्ड केनी हा मिशनरी भारतात आला. त्याने मुंबई, ठाणे, भिवंडी, नाशिक, जुन्नर, कोपरगाव, श्रीरामपूर, राहता व मालेगाव इ. ठिकाणी धर्मप्रसाराचे कार्य सुरु केले.[२]

ख्रिस्ती मिशनरींनी कोपरगावमध्ये गोदावरी नदीच्या काठी आपले केंद्र उघडले. आज तेथे मोठी चर्च आहे. काही ठिकाणी ख्रिस्ती मिशनरींना विरोधही होत असे. १८५७ च्या उठावाचे लोन महाराष्ट्रात पोहचले त्यावेळी इंग्रजांना स्थानिक मुलेही वाकुल्या दाखवू लागली.

१८५७ च्या उठावाचे लोन उत्तरेमधून अहमदनगर जिल्ह्यातही पोहचले. नाशिक जिल्ह्यातील राघोजी भांगरे यांनी नाशिक व कोपरगाव परिसरातील ब्रिटिश ठिकाणांना हानी पोहचविली. कोपरगावजवळील कोऱ्हाळे येथील ब्रिटिश तळावर हल्ला करुन तेथून रु.१८०००/- ची हानी ब्रिटिशांना पोहोचविली.[३] मिशनरींच्या धार्मिक कार्यामुळे स्थानिक व मिशनरी यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. मात्र मिशनऱ्यांनी आपले कार्य चालूच ठेवले. त्यांच्या कार्यामुळेच येथील समाजावर आपल्या धर्माचे अंतर्मुख होऊन परिक्षण करण्याची वेळ आली. कोपरगावमधील सुधारणांच्या कार्यामध्ये आणि शैक्षणिक प्रसाराच्या कार्यामुळेच सामाजिक व शैक्षणिक कार्यामध्ये मिशनरींचे अर्थपूर्ण योगदान आहे. परिणामी १८८५ च्या दरम्यान कोपरगाव तालुक्यातील राहता, पुणतांबा, कोऱ्हाळे, अस्तगाव, साकुरी, रांजणगाव, मेंढवण व पिंपळस या गावातील हिंदू-महार समाजातील लोकांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला. हा सर्व परिणाम होण्याचे कारण म्हणजे

त्याठिकाणी ख्रिश्चन मिशनरींनी जर्मन पाणलोट प्रकल्प राबविला आहे. त्याचबरोबर शुभवर्तमानवादी चळवळीचा हा परिपाक आहे.

कोपरगाव परिसराचा स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग[४]

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये महाराष्ट्राचे अर्थपूर्ण योगदान आहे. महाराष्ट्रातील विविध स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या कामगिरीमुळेच आपणास स्वातंत्र्यप्राप्ती झाली. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आंदोलन या दोन्ही आंदोलनांनी आपला स्वतःचा ठसा उमटविला आहे. कोपरगाव परिसरातील विविध स्वातंत्र्यसैनिकांनी या दोन्ही आंदोलनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १९२१ ते १९४७ या कालावधीत कोपरगावमधील पुढील व्यक्तींनी स्वातंत्र्य आंदोलनामध्ये जे योगदान दिले त्याची सविस्तर नोंद पुढीलप्रमाणे -

परशराम भिकाजी आढाव - यांनी कोपरगावी पाचवीपर्यंतचे शिक्षण घेतले. १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात सहभागी होऊन मीठाचा कायदा मोडला. त्यांना त्यासाठी चार महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा भोगावची लागली. त्याचबरोबर **माधव कचेश्वर आढाव** यांनी १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत सहभाग घेतला म्हणून त्यांना येरवडा तुरुंगात एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली. १९३० च्या सत्याग्रहामध्ये **नरसिंग धोंडू केंगले** यांनी सक्रीय सहभाग घेतला. मात्र पुराव्याअभावी त्यांना शिक्षा झाली नाही. वैद्यकिय शिक्षण घेतलेले **मोहिनीराज गणेश काथे** यांनीही १९३० च्या आंदोलनात सहभाग घेतला. त्यांना १ वर्ष सहा महिन्याची शिक्षा झाली. त्यांना धुळे येथील कारागृहामध्ये ही शिक्षा भोगावी लागली. १९३२ मध्ये पुन्हा त्यांना दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. शासनाकडून त्यांना सन्मानपत्र व दोनशे रुपये निवृत्तीवेतन देण्यात आले.

राहता गावचे **रघुनाथ गोविंदा खंदारे** यांनी १९३० मध्ये बागलाणच्या सत्याग्रहामध्ये भाग घेतला. त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. **धनाजी तानाजी खैरनार** यांनी जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला. त्यासाठी सहा महिन्यांची शिक्षा भोगावी लागली. **कुंभारी** गावचे **त्र्यंबक नारायण गडाख** यांनाही सविनय कायदेभंग आंदोलनात सहभाग घेतला म्हणून ३० रुपये दंड व २१ दिवसांची शिक्षा झाली. **भाऊलाल दगडूराम गंगवाल** यांनाही कारावासाची शिक्षा झाली.

वामन शंकर चांदवडकर यांनी १९३० च्या जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनातही सहभाग घेऊन सरकारविरोधी प्रचार केला. म्हणून त्यांना १७ महिन्यांची शिक्षा झाली. **माधव लक्ष्मण जाधव** यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात सहभाग घेतला. त्यांना ९ महिन्यांची शिक्षा झाली. शासनाने त्यांना १९४७ मध्ये रु. ५००/- निवृत्तीवेतन दिले. **शंकर आबाजी जोशी** यांनी १९३० च्या जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला. मात्र त्यांच्याविरुद्ध पुरावा न सापडल्याने त्यांना शिक्षा होऊ शकली नाही. **रावजी पुंजा गाडेकर** यांनी १९३० व १९३२ च्या आंदोलनात भाग घेतला. येरवडा जेलमध्ये सहा महिन्यांची शिक्षा भोगावी लागली. राहता गावचे **लक्ष्मण रामचंद्र टाकसाळे** यांनी १९३० च्या जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला. त्यांना सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. वारी गावचे **रंगनाथ पांडुरंग टेके** यांनी गावातील दारुच्या गुत्त्यांवर पिकेटींग केले. १९३१ मध्ये त्यांना सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. **किसनलाल चुन्नीलाल अग्रवाल** यांनी १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनामध्ये कोपरगावी भाग घेतला. दारुच्या गुत्त्यांवर पिकेटींग केले. त्याबद्दल त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. **उत्तमचंद अमोल** यांनी १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनामध्ये सहभाग घेतला. विविध ठिकाणी त्यांनी पिकेटींग केले. त्याबद्दल त्यांना तीन महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

धारणगावच्या **भिकूबाई गंगाधर रानडे**, राहता गावच्या **चुन्नीलाल रामलाल** व कोपरगावच्या **पाथादीन रामलाल** यांनी १९३० च्या जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला. रामचंद्र विष्णू रांगोळे व प्रेमचंद हरबक्ष लव्हाळे यांनीही जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला. मात्र पुराव्या अभावी त्यांना शिक्षा झाली नाही. धारणगावचे भोगाजी मोघाजी वाघ व पढेगावचे ज्ञानदेव हरी वाघ यांनी जंगल सत्याग्रहात भाग घेतला. कोपरगावचे नारायण गोविंद विद्वांस यांनी झेंडा सत्याग्रहामध्ये नागपूर येथे जाऊन भाग घेतला. मोरेश्वर वैद्य यांनी भाषणबंदीचा कायदा मोडला. दोघांनाही कारावासाची शिक्षा झाली. महादू लक्ष्मण कोल्हारी यांनी १९३१ साली भाषणबंदीचा कायदा मोडला त्यावेळी ते इयत्ता सातवीमध्ये होते. त्यावेळी त्यांना नऊ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. काशिनाथ दादा खंडागळे यांनीही १९३१ मध्ये दारुच्या गुत्त्यांवर पिकेटिंग केले. त्यासाठी त्यांना तीन महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. शंकर बाबाजी डोंगरे यांनी सविनय आंदोलनामध्ये सहभाग घेतला. दारुच्या गुत्त्यांवर

पिकेटिंग केले. परिणामी त्यांना तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.**रामराव भिमाजी आढाव** यांनी १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनामध्ये सहभाग घेतला. १९३१ मध्ये त्यांना दारुच्या गुत्त्यावर पिकेटिंग करताना पोलीसांनी पकडले. त्यांना तीन महिन्यांची शिक्षा झाली.

राहता गावच्या **भागूजी विठ्ठल अभंग** यांना फार कमी आयुष्य मिळाले. त्यांनी वयाच्या २५ व्या वर्षी जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला. त्याबद्दल त्यांना १९३२ मध्ये सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. **चिमणलाल हिराचंद दोशी** यांनी १९३०-३२ या काळात समाजात दारुबंदीचा प्रसार केला. ब्रिटिश विरोधी जनजागृती केली. त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. **सर्वोत्तम नारायण पांडे** यांना सविनय व जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतला म्हणून अटक झाली. मात्र पुरावा न मिळाल्याने ते सुटले. कोपरगाव जवळील कोऱ्हाळे गावचे **शांताबाई दत्तात्रय कुळकर्णी** यांनी काँग्रेस पक्षातर्फे स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभाग घेतला म्हणून त्यांना तीन महिन्यांची साधी कैद झाली. शासनाकडून त्यांना दरमहा रु. ५०/- निवृत्तीवेतन दिले जाते. राहता गावचे **धोंडू गोपाळ कुंभकर्ण** यांनी १९३० मध्ये गावोगावी ब्रिटिशविरोधी प्रचार केला. मिठाच्या सत्याग्रहामध्ये कायदेभंग केला म्हणून चार महिन्यांची शिक्षा झाली. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात सहभाग घेतला. त्यासाठी सहा महिन्यांची शिक्षा झाली. शासनाकडून त्यांना रु. २५०/- निवृत्तीवेतन व सन्मानपत्र दिले.

कोपरगाव परिसरामध्ये १९३२ मध्ये झालेल्या जंगल सत्याग्रहामध्ये भाग घेतल्याबद्दल **सिताराम उदावंत** यांना आठ महिन्यांचा कारावास भोगावा लागला. शासनाकडून त्यांना रु. २५०/- निवृत्तीवेतन देण्यात आले. श्रीमती **यमुनाबाई गजानन कडूसकर** यांनीही १९३०-३२ या दोन्ही वर्षी रस्ताबंदीचा नियम मोडला, दारुच्या गुत्त्यांवर पिकेटिंग केले. त्यांनाही नऊ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा झाली.

चासनळी गावचे **किसन सदू तेली** व **रमाकांत केश तेली** यांनी १९३०-१९३२ या कालावधीमध्ये राष्ट्रीय काँग्रेसचा प्रचार व सविनय कायदेभंग आंदोलनाचा हिरीरीने प्रचास केला. किसन तेली यांना दोन महिने सक्त मजुरी व रु. ५०/- दंड आणि रमाकांत तेली यांना तीन महिन्यांची शिक्षा झाली.

तुकाराम भाऊराव आमले यांनी मीठाच्या सत्याग्रहामध्ये भाग घेतला. १९३२ साली त्यांनी समाजामध्ये दारूविरोधी चळवळीत सहभाग घेतला. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनामध्ये भाग घेतला म्हणून त्यांना सहा महिने नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहामध्ये त्यानंतर सहा महिन्यांसाठी येरवडा कारागृहात शिक्षा भोगावी लागली. भारत सरकारकडून त्यांना सन्मानपत्र व ताम्रपट देण्यात आला. **नारायण बाबुराव आमले** यांनाही 'चले जाव' चळवळीत भाग घेतला म्हणून एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली.

कोपरगाव तालुक्यातील कान्हेगाव या गावच्या **सौ. पार्वतीबाई रामभाऊ इंगळे** यांनी १९३८ पासून राष्ट्र सेविका कार्यालयाच्या कामास प्रारंभ केला. १९४२ च्या आंदोलनामध्ये सक्रीय सहभागाबद्दल त्यांना सहा महिन्यांची साधी कैदेची शिक्षा झाली. मुरलीधर कान्होजी उंडे यांनी 'चले जाव' चळवळीत भाग घेऊन सरकारी कागदपत्रे जाळली. त्याबद्दल त्यांना रु. ५०/- दंडाची व चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

कोपरगावच्या बेट वसाहतीमधील **आप्पाराव बाजीराव आढाव** यांनी १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात झेंडा सत्याग्रह केला. त्याबद्दल त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. दहेगाव बोलका गावचे **भास्कर मोहिनीराज डांगे** यांनीही झेंडा सत्याग्रहामध्ये सहभाग घेतला. त्यांना तीन महिन्यांची शिक्षा झाली. **रामचंद्र कचेश्वर दीक्षित** यांनी कोपरगाव परिसरामध्ये 'चले जाव' आंदोलनात सहभागी होऊन प्रभात फेरी काढली. १९४३ मध्ये त्यांना अटक झाली. १९४४ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. टाकळी गावचे **दादू गोबाजी देवकर** यांनाही आंदोलनात सहभागी झाले म्हणून तीन महिन्यांची शिक्षा झाली.

कोपरगावच्या पश्चिमेकडील मढी खुर्द या गावच्या **विठ्ठल सखाराम आभाळे** यांनी 'चले जाव' आंदोलनात भाग घेऊन कोपरगाव परिसरातील तारायंत्रे, पोस्ट ऑफीस बंद पाडली. तलाठी ऑफीस जाळण्यात आले. त्यासाठी त्यांना एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली. शासनाकडून त्यांना आर्थिक सहाय्य, सन्मानपत्र व ताम्रपट देऊन गौरविण्यात आले. **चंद्रभान नामदेव देव्हारे** यांनी असहकार चळवळीत भाग घेतला म्हणून येरवडा कारागृहात चार महिन्यांची शिक्षा भोगली. 'चले जाव' आंदोलनात फौजदारी खटल्यात अटक झाली. मात्र सहा महिन्यांनी ते सहीसलामत सुटले.

कोपरगावच्या बेटामधील **दत्तात्रय विठ्ठल आव्हाड** यांनी १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनामध्ये सभाबंदीचा कायदा मोडला. कोपरगावी सभा घेतली, त्याबद्दल त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

१९४२ च्या आंदोलनामध्ये सहभाग घेतला म्हणून सहादू यशवंत आढाव यांना एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली. शासनातर्फे १९४७ मध्ये त्यांचा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. रघुनाथ माधव आमकर यांनीही झेंडा सत्याग्रहात भाग घेतल्याने त्यांना तीन महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. लक्ष्मण गंगाराम आढाव यांनी १९ व्या वर्षी स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेतला. १९३९ मध्ये त्यांनी दुसऱ्या महायुद्धास ब्रिटिशांतर्फे भारताना सहभाग घेतला म्हणून कोपरगाव परिसरात जनजागृती केली. त्यासाठी तिन दिवसांची शिक्षा झाली. १९४२ मध्ये 'चले जाव' आंदोलनामध्ये सहभाग, तलाठी व पाटील यांचे दफ्तर जाळून टाकणे, भूमिगत नेत्यांना आश्रय देणे, सभाबंदीचा हुकूम मोडून सभांचे आयोजन केले. म्हणून नऊ महिन्यांचा कारावास भोगावा लागला.

'चले जाव' च्या आंदोलनात ब्रिटिशविरोधी घोषणा दिल्या म्हणून भाऊराव बापूराव कहार यांना चार महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. बाळू धन्नू कहार यांनी कोपरगाव परिसरातील टेलिफोनच्या तारा तोडल्या, दळणवळण यंत्रणा उध्वस्त केली. त्यासाठी त्यांना एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली. कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुखच्या विठू गमाजी काळे यांनी १९४२ च्या आंदोलनामध्ये भाग घेतला. त्यांनी खेड्यात जाऊन जनजागृती केली. त्यांना एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्यांना येरवडा तुरुंगात ठेवण्यात आले. रखमा आबाजी काळेकर यांनीही 'चले जाव' आंदोलनात सहभाग घेतला म्हणुन येरवडा तुरुंगात एक महिन्यांची शिक्षा भोगावी लागली. पुणतांबा येथील प्राथमिक शिक्षक दत्तात्रय नारायण कुलथे यांनी १९४२ मध्ये ब्रिटिशविरोधी प्रचारपत्रके वाटली. प्रभात फेऱ्या आयोजित केल्या. त्यासाठी त्यांना अहमदनगरच्या कारागृहामध्ये सहा महिन्यांची शिक्षा भोगावी लागली.

गंगाधर नारायण गगे यांनी 'चले जाव' आंदोलनामध्ये कोपरगाव परिसरात सभा आयोजित केल्या. मिरवणूका काढून निदर्शने केल्याने त्यांना सहा महिन्यांची कारावासाची शिक्षा झाली. गंगाधर मुक्ताजी गवारे यांनी वैयक्तिक सत्याग्रहामध्ये भाग घेतला. भूमिगत

क्रांतीकारकांना मदत केली. १९४२ च्या आंदोलनात सहभाग घेतला. १९४३ मध्ये त्यांना नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात पंधरा महिन्यांचा कारावास झाला. **उमाजी राणूजी गाडेकरांनाही** ब्रिटिशांविरोधी निदर्शने केली म्हणून १८ महिन्यांचा कारावास भोगावा लागला. **हरिभाऊ सखाराम गाडेकर** यांनाही सक्षम कारावासाची शिक्षा झाली.

कोपरगावजवळील पोहेगावचे **बाळकृष्ण मुरलीधर जोशी** यांनी 'चले जाव' आंदोलनामध्ये सहभाग घेतला. भारतीय संरक्षण कायद्याखाली त्यांना अटक होऊन सहा महिन्यांची शिक्षा व रु. ५०/- रुपये दंडाची शिक्षा झाली. शासनाकडून त्यांना रु. २५०/- आर्थिक मदत व मानपत्र देण्यात आले. याच गावचे **रामकिसन मोतीलाल डागा** यांनी 'चले जाव' आंदोलनामध्ये भूमिगत आलेल्या क्रांतीकारकांना मदत केली. **बाळकृष्ण बाबुराव डबीर** यांनी राहता गावी फौजदारास मारहाण केली. अहमदनगरच्या तुरुंगात त्यांना सहा महिन्यांची शिक्षा भोगावी लागली.

रतनलाल चुन्नीलाल खंडाळे यांनी 'चले जाव' आंदोलनामध्ये बेकायदा मिरवणूक काढली, म्हणून एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा व रु. १००/- दंडाची शिक्षा झाली. **बाबा बगाजी गाडेकर** यांनी झेंडा सत्याग्रहात भाग घेतला. म्हणून दोन महिन्यांची कारावासाची शिक्षा झाली. **मुकूंद रंगनाथ गुजराथी** यांनी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतल्याने व त्यांनी सभाबंदीचा कायदा मोडल्याने दोन वर्षांची शिक्षा झाली.

उत्तमचंद छगणीदास अजमेरे यांनी १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये भाग घेतला. सार्वजनिक व राजकीय जीवनामध्ये केलेल्या कार्याबद्दल त्यांना सहा महिने शिक्षा झाली. १९४२ च्या आंदोलनात कोपरगाव परिसरामध्ये जनतेत जागृती केली. काही काळ त्यांना स्थानबद्ध केले. केंद्र सरकारने त्यांना स्वातंत्र्योत्तर काळात रु. ५०/- निवृत्तीवेतन दिले.

कोपरगाव तालुक्यातील राहता गावी १८९० मध्ये जन्मास आलेले **रामनाथ चुन्नीलाल अग्रवाल** यांनी १९३२ च्या आंदोलनामध्ये मीठाचा सत्याग्रह केला. त्याबद्दल त्यांना आठ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनामध्ये सक्रीय सहभाग घेतल्याने त्यांना पुन्हा आठ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. **गणपत पाटीलबा**

धनवटे यांनी प्रभात फेऱ्या काढून जनजागृती केली. 'चले जाव' आंदोलनामध्ये बेलापूर गावामध्ये सभा घेतली. त्यासाठी त्यांना रु. २५/- दंड व १ महिन्यांची शिक्षा झाली. दंड सक्तीने वसूल करण्यात आला. चंद्रभान ग्यानबा धुमाळ यांनी कोपरगाव परिसरातील दळवळण यंत्रणा तोडून टाकली. कोकमठाण गावचे **बापू राधाकिसन धोंड** यांनीही सक्रीय सहभाग घेतला म्हणून त्यांना १ वर्षाची कारावासाची शिक्षा झाली. येसगावचे **बाबुराव वेणुनाथ नागरे** यांनी पोस्टाच्या तारायंत्रास हानी पोहचवली त्यांच्यावर खटला चालविला. त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली.

रामचंद्र शुक्लेश्वर पगारे यांनी 'चले जाव' च्या आंदोलनात विदेशी कापडांची होळी केली. तिरंगा झेंडा घेऊन मिरवणूका काढल्या, प्रभातफेरी व जनजागृती केली म्हणून त्यांना अहमदनगरच्या कारागृहामध्ये सहा महिन्यांची शिक्षा भोगावी लागली. महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना सन्मानपत्र व दोनशे रुपये निवृत्तीवेतन दिले. **जगन्नाथ सर्वोत्तम पांडे** हे कोपरगाव परिसरातील राष्ट्रसेवादलाचे प्रमुख होते. भूमिगतांना मदत करण्यासाठीची यंत्रणा त्यांनीच उभी केली. 'चले जाव'चा संदेश त्यांनी गावोगावी पोहचवला. त्यांच्यावर वॉरंट निघून त्यांना ७ महिने नाशिकच्या कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले होते. राहता गावच्या गोविंद नारायण अनप यांनी इयत्ता चौथ्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतले. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनामध्ये त्यांनी झेंडा सत्याग्रहामध्ये सहभाग घेतला. त्याबद्दल त्यांना १ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली **भिकचंद हिराचंद दोशी** यांनी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती घडवून आणली. स्वदेशीचा प्रचार केला. महादु पुनमचंद फूलडहाळे यांनाही 'चले जाव' चळवळीत सहभाग घेतला म्हणून तीन महिन्यांचा कारावास झाला. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनामध्ये कोपरगाव परिसरातून चळवळीस मोठी आर्थिक मदत मिळवून देण्यामध्ये **सुरजमल बद्रीनारायण अग्रवाल** यांनी मोठी भूमिका बजावली. त्याबद्दल त्यांना तीन महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. राहता गावचे त्र्यंबक नाना बनकर यांनाही सत्याग्रहात भाग घेतला म्हणून तीन महिन्यांची शिक्षा झाली.

यशवंत शंकरराव भोंगले यांनी पुरंदर तालुक्यामध्ये जाऊन 'चले जाव' आंदोलनामध्ये सहभाग घेतला. मिरवणुकीमध्ये दोनदा त्यांच्यावर लाठीमार झाला. शासनाने त्यांना मानपत्र दिले व गौरविले. आसाराम रतनचंद मारवाडी, सुवालाल लक्ष्मण मालपाणी, मांगीलाल

लक्ष्मीनारायण मालपाणी यांनीही 'चले जाव' चळवळीत जनजागृती केली म्हणून कारावासाची शिक्षा झाली होती. लक्ष्मण भाऊ मेहतरे यांना तीन महिन्यांचा कारावास व छबुराव शंकरराव मोरे यांना इंग्रजांविरोधी प्रचाराबद्दल अठरा महिन्यांची कैद झाली. मुरलीधर रायाची लोणारी, शंकर देवराम लोणारी व त्र्यंबक नामदेव लोहकणे यांनी झेंडा सत्याग्रहात भाग घेतला. परिणामी त्यांना कारावास भोगावा लागला.

गोविंद तुकाराम बोठे यांना मीठाच्या सत्याग्रहामध्ये भाग घेतला म्हणून आठ महिन्यांची शिक्षा झाली, तर 'चले जाव' आंदोलनामध्ये सहभागाबद्दल सहा महिन्यांची कैद आणि रु. १००/- दंडाची शिक्षा झाली. **किसन शिवराम भातकुटे** आणि **दत्तात्रय माधवराव भातोडे**, **उद्धव माधवराव भातोडे** या तिघांनाही 'चले जाव' आंदोलनामध्ये सहभागाबद्दल आर्थिक दंड व कारावासाची शिक्षा झाली. **आंबादास यमाजी भावसार** व **त्र्यंबक माधवराव भावसार** या दोघांनी झेंडा सत्याग्रहामध्ये भाग घेतला. दोघांनाही सहा व तीन महिन्यांचा कारावास झाला.

मुरलीधर रायाजी लोणारी यांचा जन्म १९१० मध्ये कोपरगावमधील शिंगणापूर याठिकाणी झाला. गावातच त्यांनी सहावी पर्यंतचे शिक्षण घेतले. १९४० मध्ये ब्रिटिशांविरोधी प्रचार केला म्हणून १ वर्षे, ६ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली, त्यावेळी त्यांना रु. ५००/- आर्थिक दंड झाला. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनामध्ये सहभाग घेतला व ते लोकशिक्षण व जनजागृतीसाठी भूमिगत झाले. ब्रिटिशांनी त्यांना अटक करून कोपरगावमध्ये स्थानबद्ध केले. कोपरगावमधील जमावाच्या मदतीने त्यांनी सरकारी कचेरीवर मोर्चा नेला. सरकारी कामकाजामध्ये व्यत्यय आणला. ब्रिटिशांची दळणवळण व्यवस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी परिसरातील टेलिफोनच्या तारा तोडल्या, रेल्वेचे पूल नादुरुस्त केले. प्रसंगी त्यांना कारावासाची शिक्षा भोगावी लागली. महाराष्ट्र शासनाने त्यांना मानपत्र देऊन यथोचित गौरव केला.

स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांनी परिसर विकासावर भर दिला. ते शांतता व सबुरीने कोणतेही काम करत असत. कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमध्ये **शंकरराव कोल्हे** यांच्याप्रमाणे लोणारी यांचे बहुमोल योगदान आहे. ते काही काळ कारखान्याचे

अध्यक्ष व व्यवस्थापकही होते. कोपरगावमध्ये शेतीच्या मशागतीसाठी पहिला ट्रॅक्टर यांनी खरेदी केला. त्यावेळी ट्रॅक्टर चालविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी 'लार्सन ॲण्ड टूब्रो' कंपनीचे मालक मि. टूब्रो लोणारी यांच्या शेतावर आठ दिवस येऊन राहिले होते. टूब्रो यांनी लोणारी यांना ट्रॅक्टर चालविण्यास शिकविला. मुरलीधरभाऊ लोणारी यांनी त्यांना कुस्ती खेळण्यास शिकविले.

स्वामी सहजानंद भारती

स्वामी सहजानंद भारती मूळ आंध्रप्रदेशातील होते. आध्यात्मिक कार्य सोडून स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभागी झाले. मराठी, तेलगू, संस्कृत व हिंदी भाषांवर त्यांचे प्रभूत्त्व होते. स्वातंत्र्ययुद्धामध्ये त्यांनी अनेकदा कारावास भोगला होता. कोपरगाव परिसरातील १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनाची धूरा स्वामी सहजानंद भारती यांनीच सांभाळली. आखिल भारतीय काँग्रेस कमिटीमध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या बरोबर ते काम करत. सरदार पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समवेत त्यांचे घनिष्ठ संबंध होते. महात्मा गांधी यांच्या विचारांने प्रेरित झालेले सहजानंद भारती सदैव खादी वापरत. स्वतःजवळ त्यांनी पैसा हा प्रकारच ठेवला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात कोपरगाव परिसरातील शेतकऱ्यांचे संघटन करुन 'शेतकरी परिषद' स्थापन केली. ६ मे, १९६० रोजी शेतकरी परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते. त्याचवेळी ते अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांनी आयुष्यभर केव्हांही जवळ पैसा बाळगला नाही. प्रवासातही त्यांचे प्रवासभाडे कोणीही माणूस आनंदाने भरत असे. कोपरगाव येथील संजिवनी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमध्ये व शासनदरबारी कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यात त्यांचा वाटा मोठा होता. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणूनच कोपरगावमध्ये रयत शिक्षण संस्थेने सुरु केलेल्या वरिष्ठ महाविद्यालयास 'एस.एस.जी.एम.' महाविद्यालय असे नाव दिले आहे.[५] कोपरगाव मधील साखर कारखान्यास 'संजीवनी सहकारी साखर कारखाना, स्वामी सहजानंदनगर' असे नाव देऊन कोपरगावकरांनी त्यांच्या ऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न केला आहे.

बापूराव भाऊराव शिंदे (कोपरगाव), बाबुराव पंथाजी शिंदे (कोपरगाव), रामचंद्र पंथाजी शिंदे (कोपरगाव), गोपीनाथ बापू शिंपी (कोपरगाव), चंद्रहार नामदेव शिंपी (राहता), रामचंद्र पंथाजी शिंपी (कोपरगाव), बाबुराव पथाजी शिंपी (कोपरगाव), मारुती लक्ष्मण शेटे,

दामू गंगाराम सदाफळ, लक्ष्मण बाबुराव सदाफळ, पुंजाजी रखमाजी सरगडे (दहेगाव), एकनाथ उद्धव सातपुते, महादेव एकनाथ सातपुते (राहता), आप्पाजी गंगाराम साळुंखे, नाना आप्पाराव साळुंखे, दाशराज प्रेमचंद सांड (राहता), वामन सयदू सिरसाठ, किसनलाल छगनीराम सुंडाळे, वामन शंकर सोनवणे, त्र्यंबक धोंडू सोनार, सिताराम बाळा सोनार, भागवत पांडुरंग सोमवंशी, मिश्रालाल बालचंद सोळंकी (राहता) इत्यादींनी 'चले जाव चळवळीत' सहभाग घेतला.

कोपरगावची शैक्षणिक वाटचाल

कोणत्याही समाजात शिक्षण ही भविष्यकालीन ठेव आहे. उद्याचा समाज कसा असावा यादृष्टीने केलेली ती एक योजना असते. अर्थातच सर्व शिक्षणव्यवस्था मूल्याधिष्ठीत असते. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकात नमूद करण्यात आलेली स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी सामाजिक मूल्ये झालेली आहेत. भारतातील आधुनिक शिक्षणाच्या पायाभरणीचा प्राथमिक टप्पा अठराव्या शतकाच्या आरंभी सुरु झाला आणि १८१३ च्या चार्टर ॲक्टने समाप्त झाला.

१८१३ च्या चार्टर ॲक्टने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने शिक्षणासाठी काही रक्कम द्यावी. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्यास परवानगी द्यावी अशी बंधने कंपनीवर घातली. अशा प्रकारे भारतातील ब्रिटिश अंमलाखाली शिक्षण ही प्रथमच शासकीय व्यवस्था बनली. १८३९ मध्ये कोपरगावमध्ये प्राथमिक शाळा सुरु झाली. [६] आज परिसरामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या सुविधेमुळे शिक्षणाचा प्रसार झाला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा

(१ ली ते ४ थी व ५ वी ते ७ वी)

कोपरगाव तालुक्यातील अहमदनगर जिल्हा परिषदेच्या एकूण १६२ प्राथमिक शाळा आहेत. तालुक्यात एकूण ४६ माध्यमिक शाळा आहे. एक रात्र (माध्यमिक) शाळा आहे. एक सैनिकी शाळा आहे. दोन आश्रमशाळा आहे. इंग्रजी माध्यमातील सहा शाळा आहे. एक लायन्स मुकबधीर शाळा आहे. एक उर्दू शाळा आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १ ते ७ वी पर्यंत

प्रा. शाळा	माध्य. शाळा	विद्यार्थी				एकूण विद्यार्थी		एकूण शिक्षक		मुख्याध्यापक
		१ ते ४		५ ते ७		१ ते ४	५ ते ७	१ ते ४	५ ते ७	
		मुले	मुली	मुले	मुली					
१६२	४६	८५८६	७२००	१३८९	९३८	१५७८६	२३२७	५९२	२४	३७

संदर्भ : शिक्षण मंडळ, कोपरगाव तालुका कार्यालय.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा (८ वी ते १०वी व ११ वी, १२ वी)

कोपरगाव तालुक्यात माध्यमिक शाळांची संख्या ३२ आहे व उच्च माध्यमिक विद्यालय ८ आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेज संख्या [७]

अ.क्र.	शाळा	संख्या	विद्यार्थी संख्या		एकूण विद्यार्थी	शिक्षक संख्या
			मुले	मुली		
१	माध्यमिक शाळा	३२	८१३५	५४८८	१३६२३	८७९
२	उच्च माध्य. ज्युनि. कॉलेज	०८	३४८१	२७८८	६२६९	१४८

महाविद्यालये : -

कोपरगाव तालुक्यात पाच वरिष्ठ महाविद्यालये आहेत. कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे के. जे. सोमय्या वरिष्ठ महाविद्यालय, कोपरगाव, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचे श्री सद्‌गुरु गंगागीर महाराज महाविद्यालय, कोपरगाव, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर (कोळपेवाडी), संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ अंतर्गत महिला महाविद्यालय, स्टेशन रोड, नामदेवराव परजणे विधी महाविद्यालय, कोपरगाव अशी एकूण पाच वरिष्ठ महाविद्यालये आहेत.[८]

वरिष्ठ महाविद्यालय सन २०११-२०१२

अ.नं.	महाविद्यालयाचे नाव	स्थापना	विद्यार्थी संख्या		एकूण	प्राध्यपकांची संख्या
			मुले	मुली		
१.	के.जे.सोमैय्या वरिष्ठ	१९६४	युजी ७०५	२३५	९४०	३१
२.	महाविद्यालय कोपरगाव श्री सद्गुरु गंगागीर महाराज	१९६५	पी.जी. २०१ यु.जी. १११४	७० ६२०	२७१ १७३४	४०
३.	महाविद्यालय, कोपरगाव कला, वाणिज्य व विज्ञान	२००२	पी.जी. ३१८ यु.जी. २९८	१९३ १७५	५११ ४७३	१७
	महाविद्यालय, कोपरगाव, गौतमनगर					

संदर्भ : (प्रत्यक्ष क्षेत्रभेटीच्या आधारे मिळविलेली माहिती)

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. सी.एम. मेहता कन्या विद्यालय -

महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून कर्मवीर आण्णांचे अनुयायी डॉ. सी. एम्. मेहता, शंकरराव काळे यांनी फक्त मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून 'कन्या विद्यालयाची' स्थापना केली. १९६३ मध्ये पाचवीचा पहिला वर्ग सुरु झाला. त्यावेळी फक्त ४८ विद्यार्थीनी होत्या. शाळेचे पहिले मुख्याध्यापक म्हणून श्री. रा. भा. पाटील यांचे शाळेचा विकास होण्यात मोठी भूमिका आहे. आज विद्यर्थिनींची संख्या २०४१ एवढी आणि ७३ कर्मचारी आहेत.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय[९]

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' असा विचार अंगीकारुन कर्मवीर आण्णांनी महाराष्ट्रात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या प्रेरणेमधून १९८९ मध्ये कोपरगावमध्ये रयत शिक्षण संस्थेचे प्राथमिक विद्यालय सुरु झाले. पहिले मुख्याध्यापक म्हणून श्रीमती मंगला बगरे यांनी काम पाहिले, त्यावेळी विद्यार्थी संख्या ५०० एवढी होती. यावर्षी श्री. डी. एन्. खैरनार मुख्याध्यापकपदी आहेत. मागील काही वर्षामध्ये या शाळेची विद्यार्थी संख्या पूर्वीप्रमाणे राहिली नाही. ही चिंतेची बाब आहे. मात्र मराठी माध्यमाच्या सर्वच शाळांच्या ही परिस्थिती सर्वत्र साररख्याच प्रमाणात दिसून येते.

मौलाना मुनिर अहमद उर्दू माध्यमिक शाळा[१०]

उर्दू भाषा माध्यमातून शिक्षण घेणारांसाठी कोपरगाव परिसरामध्ये शिक्षणाची सुविधा नव्हती. ही अडचण ओळखून मुस्लिम बांधवांनी मुनिर अब्दुल अब्दुलाहखान, सय्यद अब्दुल रहेमान बुऱ्हाण यांनी १९८३ मध्ये उर्दू माध्यमिक शाळेची स्थापना प्रारंभी शाळेमध्ये केवळ १० मुली व २० मुले होती. शाळेचे मुख्याध्यापक म्हणून शेख रियाज अब्दुल रहेमान कामकाज पाहत आहेत. 'प्रगतीची गुरुकिल्ली' असे ब्रीद घेऊन शाळेने आपला विकास साधला. आज शाळेची विद्यार्थी संख्या १२० मुली व २४३ विद्यार्थी एवढी आहे. मुस्लिम समाजातील सामान्य परिवारातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गरज आता या शाळेमुळे पूर्ण झाली आहे.

कोपरगाव एज्युकेशन सोसायटी[११]

कोपरगाव परिसरामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून १९३४ साली कोपरगाव एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. पुढे सोसायटीचा विस्तार व्हावा यासाठी १९६९-७० या वर्षी सोसायटीच्या सभासदांची संख्या २७ पर्यंत वाढविण्यात आली. १९७० मध्ये सोसायटीने स्वतःची इमारत बांधली. त्यावेळी तिचे अंदाजपत्रक २५,०००/- रुपयांचे होते. कोपरगाव नगरपालिका सोसायटीस ६,०००/- रुपयांचे अनुदान देत असे. त्यावेळी सोसायटीमध्ये प्राथमिक वर्गात ६०० विद्यार्थी, तर माध्यमिक विभागामध्ये १४५० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

कोपरगाव एज्युकेशन सोसायटीने १९३४ मध्ये माध्यमिक शाळा सुरु केली. कोपरगावमधील व्यापारी भागचंद धनराज डोळे, वसंतराव कोऱ्हाळकर, शांतीलालजी शहा, श्री. आढाव, नरोडे इत्यादींनी कोपरगावमध्ये 'श्रीमान गोकुळचंदजी विद्यालय' सुरु केले. माध्यमिक विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक म्हणून १९३४-१९३६ या काळात कामकाज पाहिले. विद्यमान मुख्याध्यापक म्हणून जी. आर. कुलकर्णी काम पाहतात. यावर्षी शाळेची विद्यार्थीसंख्या १३४३ मुले व ५४५ मुली एवढी आहे. एकूण ४६ शिक्षक व १५ शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत. या विद्यालयाने परिसरामध्ये स्वतःचा ठसा उमटविला आहे.

कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी[१२]

या सोसायटीची स्थापना १९६३ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये झाली. कोपरगाव तालुक्यात उच्च शिक्षणाचा प्रसार व्हा हा त्यामागे उद्देश होता. १९७० मध्ये सोसायटीच्या सभासदांची संख्या २०१ एवढी होती. याचवर्षी सोसायटीकडे रु ६,००,०००/-ची मालमत्ता होती.

के. जे. सोमैय्या महाविद्यालय, कोपरगाव

१९६४ मध्ये कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीने या महाविद्यालयाची स्थापना केली. कनिष्ठ व वरिष्ठ पदवी महाविद्यालय आणि पदव्युत्तर शिक्षणाचीही सोय याठिकाणी उपलब्ध आहे. १९६४ ते २००० या कालावधीत महाविद्यालयाने विविध स्थित्यंतरे पाहिली. तरीही आज आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान टिकवून ठेवले आहे. १९६४ मध्ये महाविद्यालयामध्ये ५४५ विद्यार्थी संख्या होती. आज ती वाढून पदवी व पदव्युत्तर विभाग मिळून ३,५०० च्या दरम्यान आहे. नॅक समितीने महाविद्यालयास 'अ' दर्जा दिला आहे.[१३] विद्यमान प्राचार्य म्हणून डॉ. बी. एस्. यादव हे महाविद्यालयाचा कारभार सक्षमपणे सांभाळत आहे.

श्री सद्‌गुरु गंगागीर महाराज विज्ञान,

गौतम कला व संजीवनी वाणिज्य महाविद्यालय

रयत शिक्षण संस्थेने चालविलेल्या या महाविद्यालयाची स्थापना १९६५ मध्ये झाली. महाविद्यालयाचा २२ एकरांचा परिसर असून त्यामध्ये मुख्य इमारत, सुसज्ज ग्रंथालय, प्राध्यापक निवास, शिक्षकेत्तर सेवक निवास, मुलांचे वसतिगृह, मुलींचे वसतिगृह, वर्कशॉप, प्राचार्य निवास इत्यादी वास्तू आहेत. महाविद्यालयाची स्थापना झाली त्यावेळी प्राचार्य पदी एस्. डी. पाटील यांची नियुक्ती झाली होती. विद्यमान अवस्थेत महाविद्यालयाने आपला शैक्षणिक दर्जा उंचावला असून उच्च शिक्षणाचे मुल्यमापन करणाऱ्या 'नॅक' समितीने या महाविद्यालयास 'ब' दर्जा दिला आहे.[१४]

कोपरगावमधील वसतिगृहे -

कोपरगावमधील व परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध झाली तरी त्यांच्या निवास व जेवणाची सोय नव्हती. प्रत्येकास घरुन ये-जा करणे शक्य नव्हते. पुणे जिल्ह्यातील सासवड येथील माळी समाजातील जी मंडळी कोपरगावमध्ये शेती व व्यवसायानिमित्त स्थायिक झाली होती. त्यांनी १९६६ साली 'माळी बोर्डींग' सुरु केले. आज याठिकाणी समाजाच्या सर्व स्तरातील २०० विद्यार्थ्यांच्या वास्तव्याची सोय झाली आहे.

१९७५ यावर्षी मराठी मंडळींनी 'शेतकरी विद्यार्थी वसतिगृहाची' स्थापना केली. याठिकाणी ३०० विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय आहे. १९९२ मध्ये केवळ मुलींसाठी महाराष्ट्र शासनातर्फे मागासवर्गीय मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरु झाले. इयत्ता ५ वी पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना प्रवेश दिला जातो. याठिकाणी ७५ मुलींना दरवर्षी प्रवेश दिला जातो. मागासवर्गीय मुलांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह आहे. याशिवाय

के. जे. सोमैय्या, एस्.एस्.जी.एम्. महाविद्यालय, संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय यांची स्वतंत्र मुले व मुलींची वसतिगृहे आहेत.

दि. ०१ ऑगस्ट १९९९ रोजी ५० विद्यार्थी क्षमता असलेले सैनिकांच्या मुलांसाठीचे वसतिगृह सुरु झाले. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर यांच्यामार्फत हे वसतिगृह चालविले जाते. या वसतिगृहांमुळे विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था झाल्याने त्यांच्या शैक्षणिक विकासामध्ये भर पडली आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था[१५]

कोपरगावमध्ये महाराष्ट्र शासनातर्फे १९९९ पासून आय.टी.आय. ची स्थापना केली. प्रतीवर्षी २५० विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षणाची सोय झाली. टर्नर, फिटर, वेल्डर, प्लंबर, इलेक्ट्रीशियन, वायरमन, रेडिओ दुरुस्ती इ. विविध प्रकारचे शिक्षण दिले जाते. विद्यमान प्राचार्य ए. सी. राठोड हे या प्रशिक्षण संस्थेचे प्रमुख आहेत.

तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण

अ. नं.	शिक्षण संस्थेचे नाव	स्थापना	विद्यार्थी संख्या		एकूण	शिक्षक संख्या
			मुले	मुली		
१.	इंजिनिअरींग व पॉलीटेक्निक कॉलेज कोपरगाव	१९८१	१४४१	२५१	१६९२	७५
२.	श्री साईबाबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय कोपरगाव	२००५	३१	६९	१००	०७
३.	श्री साईबाबा अध्यापक महाविद्यालय कोपरगाव	२००५	८०	१२०	२००	०७
४.	महिला महाविद्यालय (होम सायन्स व बी.सी.ए,)	जून २००१	–	२३४	२३४	०९
५.	ॐ गुरुदेव शै. संकुल अध्यापक महा.	२००५	४७	२९	७६	०७
६.	ॐ गुरुदेव शै. संकुल अध्यापक महा.	२००५	८१	५२	१३३	०७
७.	लॉ कॉलेज, कोपरगाव	२००५	२६	१९	४५	१०
८.	चित्रकला महाविद्यालय	१९९८	०८	०९	१७	०२
९.	डी.टी.एल.	१९९०	६	२	०८	०४
१०.	डी.बी.एम्.	१९९०	२०	०४	२६	०४
११.	बी.बी.ए.	२००५	२०	२९	१११	०३
१२.	आय.टी.आय.	१९९०	८०	–	८०	०६

तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण

कोपरगाव तालुक्यात संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे श्री साईबाबा शिक्षणशास्त्र व श्री साईबाबा शिक्षणशास्त्र व श्री साईबाबा अध्यापक महाविद्यालय आहेत. तसेच इंजिनिअरींग व पॉलीटेक्निक कॉलेज आहेत.

प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळ लोणी संचलित महिला महाविद्यालय आहेत. ॐ गुरुदेव जंगलीदास महाराज शैक्षणिक संकुलांतर्गत शिक्षणशास्त्र महाविद्यालय व अध्यापक महाविद्यालय व अध्यापक महाविद्यालय आहेत. तसेच राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज केंद्रीय विद्यालय आहेत.

कोपरगाव शहरात एक लॉ कॉलेज नव्यानेच स्थापन झालेले आहेत. संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आहेत. रयत शिक्षण संस्थेचे श्री सद्‌गुरु गंगागीर महाराज कॉलेजमध्ये डी.टी.एल., डी.बी.एम्., बी.बी.ए. इत्यादी कोर्स आहेत. के. जे. सोमैय्या महाविद्यालयामध्ये बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी.सी.ए. हे डिग्री कोर्स आणि माती परिक्षण, गांडूळखत निर्मिती, मशरुम निर्मिती, रोपवाटिका प्रशिक्षण, ट्रॅव्हल्स् ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट हे सर्टिफिकेट कोर्स शिकविले जातात. कोपरगाव शहरात एक चित्रकला महाविद्यालय आहे.

कोपरगाव परिसर : साहित्य व संस्कृती

संस्कृती हे समाजजीवनापासून तुटलेले स्वयंभू व स्वायत्त बेट नसते, तर ती मूलतः सामाजिक निर्मिती आणि सामाजिक शक्ती असते. कोणत्याही समाजातील आधिशास्ता वर्ग आपली मूल्ये व आपले विचार संस्कृतीद्वारे समाजात पसरवितो आणि आपले धुरिणत्त्व समाजासंमत बनवतो. या धुरीणत्वाला आव्हान देण्याची प्रक्रियासुद्धा संस्कृतीच्या रणभूमीवर साकार होते. अभ्यासाच्या व आकलनाच्या सोयीसाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक असे मानवी जीवनाचे विभाजन आपण करत असलो तरी मूलतः मानवी जीवन हे समग्र आणि व्यामिश्र असते. त्यामुळे समाजाच्या स्थितीगतीचा कप्पेबंद पद्धतीने केलेला विचार अत्यंत अपुरा पडतो. समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांचे परस्परांवर घडणारे परिणाम समजावून घेणे ही समाजशास्त्रीय अभ्यासातील आवश्यक बाब आहे. कोपरगाव परिसराचा अभ्यास करताना याठिकाणची साहित्य-संस्कृती समजावून घेणे आवश्यक आहे.

कोपरगाव परिसरातील अनेक नवोदित व मान्यवर लेखकांनी मराठी वाचकांसाठी मौलिक लेखन केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने नीळकंठ चौधरींची महाभारताची हस्तलिखीत प्रत, डॉ. कन्हैय्या कुंदप यांचे 'महानुभव संप्रदाय' हे पुस्तक, शिवानंदगिरींचे 'शाहिर परशुराम'

हे पुस्तक, अनिल सोनार लिखित 'बिनपराचा कावळा' हे नाटक, डॉ. वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळ्या ही कादंबरी, प्रा. सिताराम गोसावी यांच्या 'कविता', शशिकांत शिंदे यांचा 'आठवर्णींच्या कविता' हा काव्यसंग्रह, दादासाहेब कोते यांचा 'चंद्रगाणी', गणेश देशमुख यांच्या 'गावकडच्या कविता', रायभान दंवगेकृत 'काळोख्र कळा', तांडा(ऊसतोडणी कामगारांची व्यथा सांगणारी कादंबरी), प्रतिभा औटींचे 'अरुण्यरुदन', मनराम पाटील यांची 'भूमिपुजन, काळ्या आईची पुण्याई' ही कादंबरी, ॲड. अशोक बनसोडे यांचा 'मी व माझा बाप' काव्यसंग्रह, धनराज भनसाळीकृत 'आपला जीवन प्रवास, धनतारा', गणेश देशमुख (संपा.) 'ग्रामवेध', मा. शंकरराव काळे यांचे 'अंतरलेले पाणी', मा. शंकरराव कोल्हे यांचे 'सत्याग्रही शेतकरी' हे आत्मकथन, प्रा. डॉ. तान्हाजी पाटील यांची 'आभाळ, रुप सावली' ह्या कादंबऱ्या, समाजजीवनातील तुकाराम, लोकोत्तर तुकाराम, ज्ञानेश्वरकालीन समाजजीवन इ. साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. जयतं मारके यांचा 'सांज' हा काव्यसंग्रह, डॉ. वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळ्या, डॉ. गणेश देशमुख संपादित ग्रामवेध या ग्रंथाना महाराष्ट्र शासनाचा साहित्य पुरस्कार मिळालेला आहे. डॉ. तान्हाजी पाटील यांच्या रुपसावली या कादंबरीस भि.ग. रोहमारे व विखे फाऊंडेशन यांचे पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग.ल. ठोकळ साहित्य पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला आहे. इत्यादी साहित्यकृर्तींनी मराठी साहित्यामध्ये मोलाची भर घातली आहे.[१६] त्याचप्रमाणे वात्रटिकाकार संजीव कोद्रे, विजय वहाडणे, राजेंद्र कोयटे, संतोष तांदळे, ऐश्वर्या सातभाई हे सर्वजण कवीवर्य व वात्रटिकाकार म्हणून प्रसिद्ध आहे. पंडीत भारुड यांनी लिहिलेली गंडेतोडे ही कादंबरी अंधश्रद्धा निर्मुलनावर प्रकाश टाकते.

कोपरगाव नगरपालिका[१७]

कोपरगाव नगरपालिकेची स्थापना १९४७ मध्ये झाली. त्यावेळी नगरपालिकेस १९ सभासद होते. त्यापैकी एक सदस्य स्वीकृत तर दोन जागा महिलांसाठी राखीव होत्या. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या व नगराध्यक्षांच्या अधिपत्याखाली पालिकेचा कारभार चालत असे. १९६१ ते ६२ मध्ये नगरपालिकेचे उत्पन्न ४ लाख ७२ हजार ५०० रुपये एवढे होते. नगरपालिकेने आपली स्वतंत्र वास्तू, सुसज्ज व अद्ययावत वाचनालय, फळांच्या बाजारासाठीची इमारत, आठवडा बाजाराची जागा, दवाखाना, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्यकेंद्र उत्तरेकडील येसगाव या गावातील तलावामधून कोपरगावी पाईपलाईनने पाणी पुरवठा इत्यादींची सुविधा निर्माण केली आहे.

नगरपालिकेच्या वतीने शहरामध्ये २६ कि. मी. लांबीच्या रस्त्यांच्या कायमस्वरुपी सिमेंट काँक्रीटीकरण पूर्ण केले आहे. अग्निशामक दलाचा स्वतंत्र विभाग कार्यरत असून आपत्तीच्या प्रसंगी या विभागाने आपली तत्परता दाखविली आहे. कोपरगावमधील नागरिकांना दैनंदिन कामामधून विरंगुळा वाटावा यासाठी बगीचे विकसीत केले आहे. ते पुढील प्रमाणे -

१) महात्मा गांधी उद्यान

२) शिवाजी बालोद्यान

३) जिजामाता उद्यान

४) लाल बहादुरशास्त्री उद्यान

संपूर्ण कोपरगाव परिसरात ३५ मंदिरे, ३ मशिदी व ख्रिश्चन बांधवांसाठी २ चर्च आहे. प्रस्तुत प्रबंधासाठी निवडलेल्या कालावधी पर्यंतच्या नगराध्यक्षांची नावे व कार्यकाल पुढीलप्रमाणे -

अ.नं.	नगराध्यक्षांचे नाव	कालावधी
१.	मा. सौ. शकुंतला शांतीनाथ बोर्डे	दि. १५/०८/१९४७ ते १७/०५/१९४८
२.	मा. श्री. उत्तमचंद छगनीराम अजमेरे	दि. १८/०५/१९४८ ते १५/०९/१९५१
३.	मा. श्री. रघुनाथ हनुमंत गिरमे	दि. १३/०९/१९५१ ते १८/११/१९५५
४.	मा. श्री. उत्तमचंद छगनीराम अजमेरे	दि. १९/११/१९५५ ते ०१/०१/१९६०
५.	मा. श्री. माधवराव कचेश्वर आढाव	दि. ०२/०१/१९६० ते ०९/०२/१९६४
६.	मा. श्री. माधवराव कचेश्वर आढाव	दि. १०/०१/१९६४ ते ०१/०७/१९६७
७.	मा. श्री. प्रेमराज पुनमचंद काले	दि. ०२/०७/१९६७ ते ०४/०७/१९६९
८.	मा. डॉ. कन्हैय्यालाल एकनाथ राठी	दि. १०/०७/१९६९ ते १७/१२/१९७०
९.	मा. श्री. वामनराव श्रीपतराव शिलेदार	दि. ३०/१२/१९७० ते २५/०६/१९७२
१०.	मा. श्री. बाबुराव नामदेवराव गवारे	दि. १३/०७/१९७२ ते ०८/०२/१९७३
११.	मा. श्री. वसंतराव वासुदेवराव सातभाई	दि. १५/०२/१९७३ ते १०/०५/१९७४
१२.	मा. श्री. सी. एम्. शेख (प्रशासक)	दि. १३/०५/१९७४ ते १६/१२/१९७४
१३.	मा. श्री. माधवराव कचेश्वर आढाव	दि. १७/१२/१९७४ ते ०५/०२/१९८१
१४.	मा. श्री. आर. सी. कांबळे (प्रशासक)	दि. ०६/०२/१९७९ ते ३१/०५/१९८१

१५.	मा. श्री. एन्. डी. आरणे (प्रशासक)	दि. ०१/०६/१९८१ ते १२/११/१९८१
१६.	मा. श्री. वाय. जी. जोशी (प्रशासक)	दि. १३/११/१९८१ ते ०४/०९/१९८२
१७.	मा. श्री. द. श. रसाळ (प्रशासक)	दि. ०५/०९/१९८२ ते ०५/०१/१९८३
१८.	मा. श्री. एच्. एम्. शेख (प्रशासक)	दि. ०६/०१/१९८३ ते १५/०६/१९८४
१९.	मा. श्री. वाय. एस्. ठाकूर (प्रशासक)	दि. १६/०६/१९८४ ते २२/०७/१९८४
२०.	मा. श्री. व्ही. के. शिरसाठ (प्रशासक)	दि. २७/०७/१९८४ ते ३०/०४/१९८५
२१.	मा. श्री. वसंतराव वासुदेवराव सातभाई	दि. १५/०५/१९८५ ते १६/०८/१९८६
२२.	मा. श्री. एस्. व्ही. आमले (तहसिलदार)	दि. १७/०८/१९८६ ते ०९/०९/१९८६
२३.	मा. श्री. पद्माकांत शंकरराव कुदळे	दि. १०/०९/१९८६ ते ०९/०५/१९८८
२४.	मा. श्री. द. श. रसाळ (तहसिलदार)	दि. १०/०५/१९८८ ते ०९/०६/१९८८
२५.	मा. श्री. माधवराव कचेश्वर आढाव	दि. १०/०६/१९८८ ते १८/०७/१९८९
२६.	मा. श्री. एस्. एन. रक्ताटे (तहसिलदार)	दि. १९/०७/१९८९ ते २६/०७/१९८९
२७.	मा. श्री. बाबुराव नामदेवराव गवारे	दि. २७/०७/१९८९ ते २९/०७/१९९०
२८.	मा. श्री. गोविंदराव फळे (तहसिलदार)	दि. ३०/०७/१९९० ते ३०/०८/१९९०
२९.	मा. श्री. अशोकराव शोभाचंद कोठारी	दि. ०१/०९/१९९० ते ३०/०६/१९९१
३०.	मा. श्री. आर. सी. देशपांडे (तहसिलदार)	दि. ०१/०७/१९९१ ते ०९/०७/१९९१
३१.	मा. श्री. साहेबराव वामनराव शिलेदार	दि. १०/०७/१९९१ ते १०/१२/१९९१
३२.	मा. श्री. के. एस्. लवांडे (तहसिलदार)	दि. ११/१२/१९९१ ते १७/१२/१९९१
३३.	मा. श्री. राजेंद्र बाबुराव शिंदे	दि. १८/१२/१९९१ ते ०३/०४/१९९३
३४.	मा. श्री. रविंद्र नामदेव पाठक	दि. ०१/११/१९९२ ते ३०/११/१९९२
३५.	मा. श्री. राजेंद्र बाबुराव शिंदे	दि. १८/१२/१९९१ ते ०३/०४/१९९३
३६.	मा. श्री. डी. बी. डोंगरे (तहसिलदार)	दि. ०४/०४/१९९३ ते १९/०५/१९९३
३७.	मा. श्री. संजय वसंतराव सातभाई	दि. २०/०५/१९९३ ते १६/१२/१९९६
३८.	मा. सौ. सुहासिनी ओमप्रकाश कोयटे	दि. १७/१२/१९९६ ते १६/१२/१९९७
३९.	मा. श्री. प्रकाश रामभाऊ शिंदे	दि. १७/१२/१९९७ ते ०१/०६/१९९८
४०.	मा. सौ. सिंधूताई साहेबराव कोपरे	दि. १६/०६/१९९८ ते १६/१२/१९९८
४१.	मा. श्री. जगन्नाथ माधवराव आढाव	दि. १७/१२/१९९८ ते १७/०१/२०००
४२.	मा. श्री. दिलीप आसाराम दारूणकर	दि. २५/०१/२००० ते ०४/११/२०००

आज कोपरगाव नगरपालिका अहमदनगर जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण संस्था आहे. कोपरगावचे बरेचसे प्रश्न तिने सोडविले आहेत. आपल्या कार्याने नगरपालिकेने नावलौकीक मिळविला आहे.

कोपरगाव तालुक्यातील दुग्ध व्यवसाय[१८]

कोपरगाव तालुक्यात सहकाराच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आर्थिक विकास करण्यासाठी, स्वयंरोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी व शेतीला पूरक व्यवसाय म्हणून तालुक्यातील ज्येष्ठ नेते माजी आमदार शंकररावजी कोल्हे, माजी खासदार शंकररावजी काळे व स्व. नामदेवरावजी परजणे यांच्या मार्गदर्शनाखाली २० जानेवारी १९७६ रोजी गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोपरगाव या दूध संघाची स्थापना झाली. स्थापनेच्या वेळी फक्त ८० लिटर दूध संकलन होते.

कोपरगाव तालुक्यात सहकारी संघाच्या व्यतिरिक्त संजीवनी मिल्क प्रा. लि. सहजानंदनगर व गौतम मिल्क प्रा. लि. ही दोन खाजगी दूध संघ आहेत. त्यापैकी एक गौतम मिल्क प्रा. लि. गौतमनगर हा संघ बंद पडलेला आहेत व संजीवनी मिल्क प्रा. लि. चे २० हजार लिटर दैनंदिन दूध संकलन केले जाते.

कोपरगाव परिसरातील दुध संकलनासाठी असलेल्या स्थानिक दूध केंद्रावर जाऊन क्षेत्रभेटीचा व मुलाखत पद्धतीचा अवलंब करुन ही माहिती गोळा केली आहे. यासाठी पुढील तक्ता देत आहोत.

वर्ष	दुध संकलन
१९९४-१९९५	२,६९,४५,५७३
१९९५-१९९६	२,१५,४०,४७७
१९९६-१९९७	१,८२,७४,४९५
१९९७-१९९८	२,७२,३६,०६२
१९९८-१९९९	४,२१,६९,४६६
१९९९-२०००	५,३०,३१,५७०

या तक्त्यामध्ये नमूद केलेल्या माहितीनुसार १९९६-१९९७ यावर्षी चाराटंचाई व दुष्काळ परिस्थितीचा परिणाम दूध व्यवसायावर दिसून येतो.

गोदावरी संघाची उपपदार्थ निर्मिती

अ.नं.	उपपदार्थ	१९९५-९६	१९९६-९७	१९९७-९८	१९९८-९९	१९९९-२०००
१.	पेढा किलो	१७३१२	३०३७३	२६७६३	५६८४०	६६९२६
२.	तुप किलो	७२११४	३३७३१	२०५२८	६८२२०	७०८२५
३.	श्रीखंड किलो	६१३८	८५५५	९७८७	१०१०६	१०८०९
४.	लस्सी लिटर्स	१९२८२	३९७०८	४३५०५	६५७८५	७८३८५
५.	ताक लिटर्स	३४९८४	५९१७१	४१०२२	३०४०८४	३४४०६२
६.	मसाला दुध लि.	४२०९१	४८२०८	३७७४५	४१९८७	४५०८३
७.	पनीर किलो	–		४४७	३८९९	५९१८
८.	दही किलो	–		–	–	८०४१
९.	स्टरलाईज दूध लि.	–		–	–	३६५६

संकरीत गो पैदास[१९]

भारतीय कृषी उद्योग प्रतिष्ठान उरळी कांचनच्या ''बायफ मिश्रा'' संकरीत गोपैदास कार्यक्रम, केंद्रातील गाईंच्या प्रमाणे कोपरगाव तालुक्यातही अशाचप्रकारचा प्रकल्प राबविण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला परिणामी परिसरातील दूध उत्पादकांना अल्पदरात सेवा उपलब्ध झाली आहे. तसेच त्यांनी कार्यक्षेत्रात शिक्षण, जातीवंत गाय, म्हशी, शेळी पैदास, पशु आरोग्य सेवा, वैरण विकास कार्यक्रम, स्वयं सहाय्यता महिला बचत गट, शिबीरे इ. कार्यक्रम राबविले आहेत.

वर्ष	केंद्रसंख्या	प्रथम कृत्रिम रेतन	एकंदर गर्भधारणा	तपासलेली जनावरे	नविन पैदास कालवडी/पारड्या
१९९५-९६	१७	२५१८४	३५५१३	२४७२६	७०१९
१९९६-९७	१७	२४६०२	३४४३३	२२७५१	६८३६
१९९७-९८	१७	२१६५८	३०४९८	१९५९२	५९८५
१९९८-९९	१७	२६२७९	३२५१३	१४६८३	५३८४
१९९९-२०००	१७	२६९९२	३३२१९	१४४४२	४९४०

कोपरगाव न्यायपालिका

कोपरगाव तालुक्यात १८८० मध्ये सिव्हिल कोर्ट म्हणून मान्यता मिळाली. १९४७ साली कायमस्वरूपी कोर्ट मंजूर झाले. याचे श्रेय न्यायाधिश श्री. जे. स्टोन यांना जाते. पूर्वी कोपरगाव कोर्टाचा कारभार राहूरी कोर्टाशी जोडलेला होता. परंतु १९४७ नंतर तो स्वतंत्र करण्यात आला. न्यायालयाजवळच पोलीस स्टेशन व पोलीस कर्मचारी वसाहत आहे.

बाजार

कोपरगावमध्ये पूर्वीपासून दर सोमवारी आठवडे बाजार भरतो. बाजारासाठी स्वतंत्र जागा आरक्षित केलेली आहे. नगरपालिकेने काही ठिकाणी व्यापाऱ्यांसाठी व्यापारी गाळ्यांची निर्मिती केली आहे. आठवडे बाजाराव्यतिरिक्त दरदिवशीचा भाजीबाजार तहसिल कचेरीच्या पूर्वेकडील मैदानावर भरतो. कोपरगाव परिसरातील लहान खेड्यांसाठी कोपरगावचा आठवडे बाजार हा आपल्या गरजा भागविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती[२०]

भारत शेतीप्रधान देश आहे. आजही भारतातील बहुतांश लोक शेती व्यवसाय करतात. स्वातंत्र्यपूर्व काळात शेतीमालास योग्य बाजारभाव दिला जात नसे. वारंवार पडणारे दुष्काळ, शेती करण्यासाठी वापरात असलेली जुनी पद्धती, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा इत्यादी संकटांना तोंड देणारा शेतकरी त्याने उत्पादीत केलेल्या शेतमालाची त्याच्या इच्छेप्रमाणे विक्री करु शकत नव्हता. बाजारामध्ये मध्यस्थ म्हणजेच दलाल, लहान व्यापारी, सावकार यांच्या सापळ्यामध्ये शेतकरी अडकला होता. त्याच्या स्वतःच्या शेतमालाची हप्ता पद्धतीने विक्री केली जात असे. दलाल एकमेकांच्या हातावर रुमाल टाकून गुप्त सांकेतिक पद्धतीने शेतकऱ्यांच्या मालाची किंमत ठरवित. ही पद्धती आजही अल्पप्रमाणात जनावरांची किंमत ठरविण्यासाठी वापरतात. शेतमालाचे वजन व्यापाऱ्यांचे मापाडे करीत

प्रत्येक बाजारपेठेमध्ये या बाबी सर्रास चालू होत्या. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होत असे. या सर्व बाबींची जाणीव ब्रिटिश सरकारला मुळीच नव्हती. ब्रिटिश सरकारच्या शेतसारा वसुलीसंबंधीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असत. याचीच परिणती पुढील काळात शेतकरी सावकारशाहीच्या पाशात अडकण्यामध्ये झाली. भारतीय शेतीव्यवसायाचे मागासलेपण, त्यातून निर्माण झालेले शेतकऱ्यांचे दारिद्र्य, त्यामध्ये जमिन महसुलाच्या अतिरिक्त प्रमाणाची पडलेली भर आणि त्याच्या वसुलीसाठी सरकारी अधिकाऱ्यांनी धारण केलेले निर्दयी वृत्ती यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांना सावकारांचा आश्रय घेणे भाग पडले.

त्यातूनच ग्रामीण भागात सावकारांच एक प्रभावी वर्ग उदयास आला. ग्रामीण भागातील ही सावकारशाही इतकी अमानुष होती की, बहुसंख्य सामान्य शेतकरी देशोधडीला लागले. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सावकारांकडे गहाण टाकणे अथवा सावकारास विकणे हे दोनच पर्याय शेतकऱ्यांसमोर राहिले.

१९२८ मध्ये ब्रिटिश सरकारने रॉयल कमिशन ऑन ॲग्रीकल्चर या अभ्यास गटाची स्थापना केली. शेतकऱ्यांच्या शेतमालाची आधारभूत किंमत कशी ठरवावी हा या कमिशनच्या अभ्यासाचा विषय होता. रॉयल कमिशनने आपला अहवाल ब्रिटिश सरकारला सादर केला त्यांच्या शिफारशी पुढीलप्रमाणे -

१. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक थांबविणे.

२. शेतमालाच्या विपणन व्यवस्थेमध्ये असणाऱ्या अनिष्ठ प्रथा नष्ट कराव्यात.

३. शेतमाल विकण्यासाठी शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

ब्रिटिश सरकारने रॉयल कमिशनच्या अहवालातील शिफारशींवर सखोल विचार केला नाही. त्याऐवजी सरकारने शेतकऱ्यांच्या शेतमालाची आधारभूत किंमत कशी ठरवावी यासाठी बी. एस. कामत कमिशनची नियुक्ती केली.

१९२९ मध्ये जगभर मंदीची लाट आली होती. इंग्रज सरकारने १४ ऑक्टोबर १९३१ रोजी बी. एस. कामत यांच्या नेतृत्त्वाखाली कमिटी नेमली. ही कमिटी शेतकऱ्यांचे पाणी, कर्ज, खंड इत्यादी जीवनावश्यक प्रश्न सोडविण्यासाठी नेमली होती. या कमिटीने दिलेल्या अहवालात साखर कारखान्यांसाठी लागणारा ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल शब्दही नाही, उलट शेतकऱ्यांच्या जमिनी कारखानदारांनी खंडाने घ्याव्यात व या खंडाची मुदत तीस वर्षे ठेवावी अशी शिफारस केली. यावरून ब्रिटिशांचा भारतीय शेतीविषयक उदास दृष्टीकोण दिसून येतो. या दोन्ही कमिशनच्या अहवालानुसार ब्रिटिश सरकारने दि बॉम्बे ॲग्रीकल्चर प्रोड्युस मार्केट ॲक्ट १९३९ हा कायदा पास केला. या कायद्यानुसार शेतीमालास योग्य हमीभाव मिळून शेतकऱ्यांची पिळवणूक थांबणार होती. दर्जेदार शेतीमालास प्रतवारीने उत्तम भाव देण्याची सुविधा मिळणार होती. या कायद्यान्वये पुढे महाराष्ट्रात कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र सरकारने राज्यामध्ये शेतकऱ्यांसाठी एकच मार्केट ॲक्ट म्हणजेच कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३ हा कायदा केला. त्यानुसार महाराष्ट्रतील सर्वत्र

कृषी उत्पन्न बाजार समित्या अस्तित्त्वात आल्या.

कोपरगावमध्येही १९६३ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाली. पूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीचे राहता व इतर उपकेंद्रे होती. आता मात्र राहता स्वतंत्र तालुका झाल्याने तेथे स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती निर्माण झाली. कोपरगावचा धान्य व बैलबाजार प्रसिद्ध आहे. व्यापाऱ्यांमध्ये प्रामुख्याने धरमचंद्र चुनीलाल ठोळे, भन्साळी, रामबिलास मुंदडा, राठी परिवार इत्यादी व्यापारी धान्यव्यापारात अग्रेसर आहेत.

प्रवासी वाहतुक सेवा[२१]

कोपरगावचा एस.टी. डेपो हा अहमदनगर जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचा आहे. कोपरगाव डेपो अंतर्गत शिर्डी हे गाव येत असल्याने त्याठिकाणी सार्वजनिक वाहतुक कोपरगावमार्फतच केली जाते. या डेपोमध्ये ६७ आरामबस असून त्यामार्फत आंतरराज्य बस वाहतूक केली जाते. डेपोमध्ये १६० चालक, वाहक व त्यांचा तांत्रिक सेवक वर्ग मिळून ४७० सेवक वर्ग आहे. कोपरगावच्या पूर्वेस तीन कि.मी. अंतरावर रेल्वे स्टेशन आहे. अहमदनगर-पुणे, अहमदनगर-मनमाड व तेथून संपूर्ण भारतात जाण्याची सोय याठिकाणाहून उपलब्ध आहे.

दुरध्वनी सेवा व पोस्ट सेवा

कोपरगावमध्ये दुरध्वनीची सुविधा १९२४ च्या सुमारास सुरु झाली. त्यावेळी ती प्रारंभीची सोय होती. आता मात्र दुरध्वनी सेवा अद्ययावत असून हजारो फोनलाईन्सची सेवा या ठिकाणाहून उपलब्ध आहेत. मुख्य पोस्ट कार्यालय आजच्या स्टेट बँकेजवळ आहे. कोपरगाव परिसरात १६ पोस्ट ऑफीस आहेत. त्यांच्या मुख्य कामकाज कोपरगाव मुख्य कार्यालयातून चालते.

वीज वितरण व्यवस्था

कोपरगावमध्ये आज १३२ के.व्ही. चे मुख्य वीज सबस्टेशन असून वारी, चांदेकसारे, पोहेगाव याठिकाणी उपविभाग आहेत. कोपरगावसाठी ४००० घरगुती जोडणी, ९०० व्यावसायिक जोडणी, ५०० औद्योगिक विजजोड व तालुक्याचे १००% विद्युतीकरण पूर्ण झाले आहे.

बँक सुविधा

कोपरगाव तालुक्यात स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ

महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हसीज् बँक, पीपल्स को-ऑप. बँक, दि कोपरगाव तालुका मर्चंटस् को-ऑप. बँक, गौतम सहकारी बँक या १२ बँकांच्या मिळून एकूण ४१ शाखा आहेत. या सर्व बँकांच्या सर्व शाखांत मिळून एकूण २३ कोटी ७१ लाख रु. च्या ठेवी असून त्या बँकांचे सन १९८१-८२ चे एकूण कर्जवाटप २४ कोटी रुपये आहे; त्यापैकी शेतीसाठी १७ कोटी रुपये कर्जवाटप झाले आहे.

तालुक्यातील तीन नागरी सहकारी बँका अशा -

१) दि कोपरगाव पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. कोपरगावची स्थापना १९४८ साली झाली असून सध्या १९०० सदस्यांचे १० लाख रुपये भागभांडवल आहे. बँकेची एकच शाखा (कोपरगाव) आहे. व तीमध्ये १ कोटी ५६ लाख रुपयेच्या ठेवी असून वार्षिक कर्जवाटप १ कोटी २० लाख रु. आहे.

२) दि कोपरगाव तालुका मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि. कोपरगाव या बँकेची स्थापना, १९७० मध्ये झाली असून सध्या २०८९ सदस्यांचे भागभांडवल ९ लक्ष ७७ हजार रु. आहे. कोपरगाव, कोळपेवाडी, शिर्डी व राहता येथे बँकेच्या ४ शाखा असून त्यामध्ये १ कोटी ६३ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. तर वार्षिक कर्जवाटप १ कोटी २५ लाख रु. आहे.

३) गौतम सहकारी बँक लि. गौतमनगर या बँकेची स्थापना १९७६ साली झाली असून सध्या २१६२ सदस्यांचे ६ लक्ष २२ हजार रु. भाग भांडवल आहे. गौतमनगर व कोपरगाव येथील दोन शाखांमध्ये ४९ लाख रु. च्या ठेवी असून वार्षिक कर्जवाटप ३९.५ लाख रुपये आहे.

पत्रकारिता

पत्रकारिता विशेषतः वर्तमानपत्र आणि प्रसारमाध्यमे लोकशाहीचा मुख्य आधारस्तंभ आहेत. कोपरगावमध्ये शं. पा. कपिले (संपा.), नव संजीवनी (१९६१), टी. बी. मंडलिक (संपा.), जगदिश (१९६४), एस्. एम्. कुलकर्णी (संपा.) गोदाजल (१९६६), अशोक खांबेकर (संपा.) गणराज्य (१९७८) एवढी साप्ताहिके नियमीत प्रकाशित होतात. या व्यतिरिक्त सी. बी. गंगवाल, सुरेश रासकर, स. म. कुलकर्णी इत्यादी पत्रकार आजच्या विविध नामांकीत वर्तमानपत्रांसाठी काम करतात. के. जे. सोमव्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल बी. के. जोशी यांनी आपल्या अभ्यासपूर्ण शैलीने परिसरातील पत्रकारितेवर ठसा उमटविला होता. ते नुकतेच निधन पावले आहेत.

पतसंस्था

राष्ट्रीय व सहकारी बँकांच्या बरोबरीने सहकारी पतसंस्थांचे कार्यही आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने समता नागरी सहकारी पतसंस्था, ज्योती नागरी पतसंस्था, प्राथमिक शिक्षकांची पतपेढी, माध्यमिक शिक्षकांची पतसंस्था इत्यादी कार्यरत आहेत. मा. काकासाहेब कोयटे यांच्या अथक परिश्रमातून ११ मे १९८६ रोजी समता नागरी सहकारी पतसंस्था उभी राहिली. संचालक मंडळाने संस्थेमध्ये कर्ज घेणे तर दुरच, साधा चहाही संस्था खर्चाने घ्यावयाचा नाही अशाच नियमावर आधारीत कोपरगावमध्ये पतसंस्था उभ्या राहिल्या. तालुक्याच्या अर्थकारणामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका आहे.[२२]

कोपरगावमधील नामवंत व्यक्ती

कोपरगावमधील विविध व्यक्तींनी महाराष्ट्र तसेच संपूर्ण भारतभर आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटविला आहे. कोपरगावच्या विकासाचा ध्यास घेणारे मा. के. बी. रोहमारे, दादा शहाजी रोहमारे, सूर्यभान पाटील वहाडणे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, रावसाहेब सोनवणे, बाळासाहेब सातभाई, माधवराव आढाव, काका कोयटे, नामदेवराव परजणे, लहानुभाऊ नांगरे व विद्यमान आमदार अशोकरावजी काळे तसेच बिपीन कोल्हे, बारामती नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. भारती मुथ्था या कोपरगावच्या सुकन्या, पिंपरी-चिंचवडच्या माजी महापौर अनिता फरांदे, अहमदनगरच्या जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे या कोपरगावच्या मा. परजणे आण्णांच्या सुकन्या, कोपरगावमध्ये वास्तव्य करुन महाराष्ट्रभर साखर विक्रीचे जाळे विणणारे राजकुमार बंब, शेती औजारांचे व्यापारी अरविंद भन्साळी, नेत्रविकार तज्ञ डॉ. राठी, सामान्यांचे डॉ. सी. एम्. मेहता, व्यापारी क्षेत्रात नावलौकीक कमविणारे अजितशेठ लोहाडे, धान्य व्यापारात काम व गरीबांना मदत करणारे रामविलास मुंदडा, विधानपरिषदेचे सभापती पद भुषविणारे प्रा. ना. स. फरांदे, पुण्याच्या राजकारणात ठसा उमटविणाऱ्या दिप्ती चौधरी ही सर्व मंडळी कोपरगावचे भूमिपुत्र आहेत. कोपरगावमधील खेळाडूमध्ये प्रामुख्याने भाऊसाहेब कहार, मधुकर भांगरे (कबड्डी), डी. के. आण्णा (कबड्डी), सुभाष पाटणकर, कादर शेख (पासिंग बॉल), ज्ञानदेव सांगडे (फुटबॉल), रामदास खैरे, बाबुराव काकडे (काठी फिरवणे), कालिदास बागुल, नरेंद्र बागुल (खो-खो), नारायण (नाना) दारुणकर (बॅडमिंटन), कृष्णराव परजणे, बाळासाहेब वक्ते (हॉकी), चंद्रकांत शिंदे (व्हॉलीबॉल), दिलीप घोडके (क्रीडा शिक्षक) इत्यादींनी त्या त्या क्रीडा क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम केले आहे.

कोपरगावच्या परजणे घराण्याची कन्या शालिनीताई आज विखे घराण्यात आहेत. त्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा आहेत. कोपरगाव जवळच्या टाकळी गावचे सुपुत्र यमाजी मालकर हे सकाळ वृत्तपत्र समुहामध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. संजय लोहाडे यांनी व्यापारी क्षेत्रामध्ये नावलौकीक उमटविला आहे. कैलास बाबुलाल वाणी यांनी पुणे येथे बांधकाम व्यावसायिक पोरवाल बिल्डर्स यांच्याकडे ५०० रु. मासिक पगारावर नोकरी करुन आज पुण्यामध्ये बांधकाम व्यावसायिक म्हणून नावलौकीक कमविलेला आहे. श्रीरंग खैरनार न्यायाधिश म्हणून १९९० पासून काम करतात. निळकंठ भागवत खोंड यांनी भारतीय नौदलाची सेवा उत्तमप्रकारे केली. रामदास शिंदे, महाराष्ट्र शासनामध्ये विक्रीकर विभागात डेप्युटी कमिशनर पदावर कार्यरत आहेत. कांतीलाल धाडीवाल आर्थोपेडिक सर्जन आहेत. राजेंद्र जाधव लाचलुचपत विभागामध्ये निरीक्षक पदावर काम करतात. हनुमंतराव भोंगळे भुसावळ नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी आहेत. भारत गाडे यांनी मुंबईच्या कस्टम विभागात मुख्याधिकारी म्हणून आपला ठसा उमटविला. रामदास दमोदर मुंदडा यांचे पुत्र शेखर मुंदडा यांनी पुण्यामध्ये पहिला बस रॅपिड ट्रान्झीस्ट मशिन (बी.आर.टी.) बस थांबे तयार केले. कापड उद्योग व्यवसायामध्ये रविंद्र माणिकचंद शिंगी यांनी नाव कमावले आहे. शिर्डी संस्थानमध्ये चांगदेव डुबे यांच्या कार्याची महती वेगळीच आहे. वकीली व्यवसाय सांभाळून त्यांनी शिर्डी संस्थानची सेवा केली. दिनेश पारख यांनी नवी मुंबई परिसरात राजकीय ठसा निर्माण केला. कोकणातील उद्योग क्षेत्रामध्ये दिलीप पारखी यांनी आपल्या कार्यशैलीने कोपरगावचा नावलौकीक उभा केला. विजय झवर यांनी सिमेंट उद्योगात नाव कमावले.

कोपरगावमध्ये बांधकाम व्यावसायिक काका कोयटे परिवाराचे अलौकीक काम आहे. सूर्य कन्स्ट्रक्शन ही त्यांची संस्था ते कोपरगाव परिसरामध्ये ओम प्रकाश दादाप्पा तथा (काका कोयटे) या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा मुलगा संदिप आता बांधकाम व्यवसायामध्ये प्रसिद्धीस आला आहे. अरुण शिरोडे यांनी कोपरगावमध्ये शिरोडे व्यापारी परिवार उभा केला. त्यांच्या भागाचे नाव 'शिरोडे गल्ली' म्हणून कोपरगावमध्ये प्रसिद्ध आहे. अरुण विनायक होन औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठात नामांकित वकील आहेत. मिलींद कोल्हे एम.एस्. सर्जन, रणजित जगताप हेदेखील पुना हॉस्पिटलमध्ये सर्जन आहेत. सुभाष डुंबरे महाराष्ट्र शासनामध्ये अतिरिक्त आयुक्त पदावर आहेत. कोपरगावच्या पश्चिमेकडील चांद गव्हाण गावचे अर्जुन गुंडे हे नाशिक येथे जलस्वराज प्रकल्पामध्ये उपायुक्त आहेत. माणिक गुरसळ कोकण विभागात रोजगार हमी विभागात उपजिल्हा अधिकारी आहेत. गोविंद परजणे यांनी

कृषी विभागात अधिकारी म्हणून काम केले. त्यांची नियुक्ती जुन्नर तालुक्यामध्ये (जि. पुणे) याठिकाणी असताना पाणलोट क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले.[२३]

कारभारी भिमाजी रोहमारे[२४]

कारभारी भिमाजी रोहमारे अर्थात के. बी. रोहमारे कोपरगाव परिसरातील शिक्षण, शेती, सहकार व राजकारण, समाजकारण या सर्वच क्षेत्रामधील अभ्यासू व अग्रगण्य व्यक्तीमत्त्व होय. त्यांचा जन्म ५ नोव्हेंबर, १९२२ रोजी कोपरगाव तालुक्यातील मढी खुर्द येथे झाला. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत नाशिक येथे भाग घेतला. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या प्रेरणेने त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात भगूर येथील सावरकर वाड्यावर तिरंगा ध्वज फडकविला. हे करताना शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. त्यावेळची मॅट्रीक, अकरावी पर्यंतचे शिक्षण अर्धमागधी मराठी, मानसशास्त्र व आरोग्यशास्त्र या विषयांचे शिक्षण पूर्ण केले. कोणतीही नोकरी न करता आधुनिक शेती पद्धतीचा प्रयोग त्यांनी पोहेगाव येथे राबविला.

१९४६ मध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांना पोहेगाव येथे आणून त्यांची सभा आयोजित केली. त्यामुळे कोपरगाव तालुक्यातील वातावरण ब्रिटिश विरोधी बनले. स्वातंत्र्योत्तर काळात १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेसतर्फे आमदारकीसाठी उभे राहिले असता. पराभव स्विकारावा लागला. मात्र १९६३ च्या निवडणूकांत ते विजयी झाले. १९७१ मध्ये लोकसभेचे मिळणारे खासदारकीचे तिकीट त्यांनी नाकारुन आपले क्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित ठेवले. याचदरम्यान १९६२ ते १९६४ या काळात सहकाराच्या क्षेत्रात भरीव काम करुन अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे ते अध्यक्ष झाले. संजिवनी सहकारी साखर कारखान्याचा विकास, कृषी उत्पन्न बाजार समितीची वाटचाल, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

ग्रामीण भागातील सामान्य माणूसही शिकला पाहिजे या विचारातून कोपरगावमधील शिक्षणप्रेमी बाळासाहेब सातभाई, ॲड. वसंतराव कोऱ्हाळकर, ॲड. डी. डी. कुलकर्णी, ॲड. शां. ना. भोकरे, ॲड. पी. बी. खुर्जेकर, विठ्ठल ठमाजी माळी, रामदास पाटील होन, माधवराव शिंदे यांना सोबत घेऊन, 'ज्येष्ठ उद्योगपती शेठ करमसीभाई सोमैय्या' यांच्या मदतीने के. जे. सोमैय्या महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. आज या महाविद्यालयाने नॅक साठीचा 'अ' दर्जा प्राप्त केला आहे. कोपरगाव परिसरातील पोहेगाव याठिकाणी प्रथम विज त्यांनीच आणली.

शेतकऱ्यांना विजपंप बसविण्यासाठी प्रोत्साहन दिले. कोपरगाव परिसरामध्ये स्वकर्तृत्त्वावर नराचा नारायण झालेला माणूस म्हणून के. बी. रोहमारे यांचे नाव आदराने घेतले जाते.

नामदेव रखमाजी परजणे[२५]

कोपरगाव परिसरातील दूध उत्पादनाच्या क्षेत्रातील कृतिशील व्यक्तींपैकी एक नाव. १९३३ मध्ये त्यांचा जन्म झाला. मुळ गाव संवत्सर, ता. कोपरगाव. ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असलेले नामदेवराव परजणे यांनी १९६० पासून कोपरगावच्या सहकारी क्षेत्रामध्ये प्रवेश केला. संजिवनी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत श्री. शंकरराव कोल्हे यांच्या बरोबरीने काम केले. कोपरगाव परिसरातील खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळवून देण्यासाठीच्या लढ्यामध्ये भाग घेतला. त्यांची खरी ओळख ही गोदावरी सहकारी दूध संघाचे संस्थापक म्हणून व आज संघाने जी प्रगती साधली आहे. त्यामुळे झाली आहे.

गोदावरी दूध संघाची स्थापना झाली त्यावेळी दूध संकलन फक्त ८० लिटर होते. आज मात्र ते ६ लाख लिटर एवढे झाले आहे. आज गोदावरी दूध संघाचा नावलौकीक झाला आहे. संघाच्या माध्यमातून कोपरगाव, राहता तालुक्यातील सुमारे ३० हजार परिवारांना रोजगार मिळाला आहे. संघाच्या आवाराजवळ व्यापारी संकुलाची उभारणी, कर्मचारी वर्गासाठी सर्व प्रकारच्या सुविधा, दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी गोदावरी सहकारी पतसंस्था इत्यादींची निर्मिती केली आहे. कोपरगावचे परिवाराचे अर्थकारण बदलण्यासाठी दूध संघाने मोठी भूमिका बजावली आहे. दूध संघाची दिवसेंदिवस प्रगती झाली. नवनवीन तंत्रज्ञानाचा, मशिनरींचा वापर संघाने केला आहे. केंद्रीय पातळीवर या कार्याची दखल घेऊन येथील वर्ल्ड इकॉनॉमिक प्रोग्रेस सोसायटी या जागतिक पातळीवर काम करणाऱ्या संस्थेने संघास 'राष्ट्रीय उद्योग सन्मान पुरस्कार' दि. २३ जून २००० रोजी देऊन गौरविले. कोपरगाव परिसराचा दुध उत्पादनाची वाढ सातत्याने होण्याबरोबरच दर्जाही टिकवून ठेवण्यात संघास यश आले आहे.

डॉ. सतिश मेहता

डॉ. सतिश चिमणलाल मेहता, कोपरगावमधील प्रसिद्ध डॉक्टर. मुळचे गुजरातहून कोपरगावला येऊन स्थायिक झाले. वैद्यकिय व्यवसायाप्रमाणे त्यांना शेतीमध्ये चांगली आवड होती. दरवर्षी महाशिवरात्रीस कोपरगावी तालुक्यातील बरेच लोक एकत्र येत असत. गोदावरी नदीकाठी स्नान करून बेटातील महादेवाच्या मंदिरामध्ये दर्शनास जात, साईबाबा कॉर्नरजवळ डॉ. मेहता कृषी प्रदर्शन आयोजित करत असत. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातही मोठी मदत केली आहे. कोपरगावमधील मुलींसाठी स्वतंत्र माध्यमिक विद्यालयाची उभारणी करण्यात त्यांची

मोठी भूमिका आहे. कोपरगाव तालुका बोर्डाचा कारभार पाहताना शंकरराव कोल्हे यांना मेहता यांनी मदत केली. तालुका बोर्डाने कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सहकार तत्त्वावर शेतीसाठी मोठी मदत केली.

सहकारी सोसायटी

कोपरगाव तालुक्यामध्ये १८/११/१९१० रोजी पुणतांबा येथे पहिली सहकारी सोसायटी स्थापन झाली. १९१०-१९२५ या काळात कोपरगाव परिसरामध्ये विविध गावांमध्ये सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या होत्या. या सोसायट्यांना बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑप. बँक कर्ज पुरवठा करीत होती.

शंकरराव गेणुजी कोल्हे[२६]

कोपरगाव परिसरातील सामान्य कुटूंबातील शंकरराव कोल्हे यांचे मूळ गाव येसगाव. अहमदनगर-मनमाड महामार्गावरील येसगाव हे लहानसे खेडेवजा गाव आहे. त्यांचा जन्म २४ मार्च १९२९ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण मराठी चौथीपर्यंतचे गावातच झाले. माध्यमिक शिक्षण कोपरगावमधील श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयामध्ये झाले. पुढील शिक्षण पुण्यामध्ये झाले. पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलच्या वसतिगृहातील वास्तव्यात त्यांनी पुण्यातील १९४२ चे आंदोलन जवळून पाहिले. पुणे विद्यापीठामधून १९५० साली. शेतकी विषयातील बी.एस्सी. पदवी प्राप्त केली. शासकीय नोकरी न करता कोपरगावमध्ये शेती करण्यास प्रारंभ केला. शेतीस आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली. कोपरगावमधील कोळपेवाडी व संजीवनी सहकारी साखर कारखाना, गोदावरी खोरे दूध संघांची उभारणी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पुढे मा. श्री. शरद पवार यांच्या आग्रहावरुन राजकारणात सक्रीय प्रवेश केला. कोपरगाव विधानसभा मतदार संघामधून आमदार म्हणून निवडून आले. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळामध्ये कॅबिनेट मंत्री झाले. अभ्यासाठी व शेतीच्या अद्ययावत ज्ञान प्राप्त करण्यासाठी अनेकदा परदेशवारी केली. सहकारक्षेत्रामध्ये आज त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

संजीवनी सहकारी साखर कारखाना[२७]

कोपरगावचे माजी आमदार व प्रगत शेतकरी मा. शंकरराव कोल्हे, त्यांचा जीवलग परिवार, स्वामी सहजानंद भारती, मुरलीधर रायाजी लोणारी, शंकरराव काळे, आबासाहेब निंबाळकर, मारुतराव घुले, बाबुराव तनपुरे, भास्कर गलांडे इत्यादींचे मौलिक योगदान आहे. संजिवनी सहकारी साखर कारखान्याची उभारणी सामान्य शेतकऱ्यांच्या आर्थिक योगदानातून

झाली. १५ ऑक्टोबर १९५९ रोजी मा. इंदिरा गांधी यांच्या हस्ते अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या टाकळी शाखेमध्ये १ लाख ३७ हजार रुपये भरून साखर कारखान्याचे नावे खाते उघडले. २१ नोव्हेंबर १९५९ रोजी मा. दादासाहेब औताडे यांनी शेतकऱ्यांकडून भागभांडवल गोळा करण्यास सुरुवात केली. त्याकामी मा. के. बी. रोहमारे यांनीही मदत केली. १ डिसेंबर १९५९ रोजी एकाच दिवसामध्ये २० लाख ५३ हजार ९१३ रुपये एवढा निधी उभा राहिला. दुसऱ्यांदा १४ लाख ९० हजार ७९० रुपये एवढे अशाप्रकारे एकाच दिवसामध्ये सहकाराच्या क्षेत्रामध्ये पैसा गोळा होण्याची ही पहिलीच वेळ असावी. कारखान्यासाठीचा नियोजीत खर्च १ कोटी ६० लाख रुपये एवढा होता. महाराष्ट्र सरकार, इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनने आर्थिक कर्ज दिल्यानंतर कारखान्याची उभारणी सुरु झाली. महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या साईट सिलेक्शन कमिटीने कोपरगाव रेल्वेस्टेशनजवळची जागा कारखान्यासाठी निवडली. कारखान्यास संवंत्सरमधील ३५० एकर, शिंगणापूरची काही जमिन व वनविभागाची ४३ एकर जमिन देण्यात आली. पुणे शहरामधील गोडबोले व काणे या इंजिनिअर जोडीने कारखाना उभारणी करुन दिली.

दि. ३० डिसेंबर १९६१ रोजी तत्कालीन कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे हस्ते कारखान्याची कोनशिला बसविण्यात आली. १९६३-६४ या वर्षीच्या पहिल्याच गळीत हंगामामध्ये साखर कारखान्याने ७२४०० टन साखरेचे उत्पादन मिळविले. शेतकऱ्यांना टनामागे ९४ रुपये भाव देण्यात आला. तोपर्यंत कारखान्याचे ऊसलागवडीचे क्षेत्र कमी असून परिसरातील एकूण ऊस उत्पादनापैकी फक्त ३०% ऊस कारखान्यास मिळत असे. प्रसंगी कारखाना तोट्यात असूनही १९६८-१९७० मध्ये १५० रुपये भाव ऊसाला प्रती टनासाठी जाहिर केला; प्रत्यक्षात मात्र तो भाव १६९ रुपये दिला. कारखान्याच्या विश्वासार्हतेमध्ये आता मोठी भर पडली कार्यकारी संचालक, राम रगबीर, व्ही. पी. नायडू यांनी कारखान्याचा विस्तार नविन तंत्रज्ञानाचा अवलंब, सहकारातील कारखाना उपपदार्थ, संलग्न उद्योग, विविध व्यवसाय तसेच संजीवनी उद्योग समुह उभारण्यामध्ये मौलीक योगदान दिले.

१९८२ पासून संजिवनी सहकारी साखर कारखान्याने ॲसिटिक ॲसीड बनविण्याचा प्रकल्प उभारला. सांडपाण्यापासून बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारला, बायोगॅस सहवीज (Co-Generation Electricity) प्रकल्पही सुरु केला. २०११ या वर्षापासून विजनिर्मितीस प्रारंभ झाला. संजिवनी सहकारी साखर कारखान्याच्या वाटचालीचा वेध घेणारे पुस्तक 'महाराष्ट्र विकासाचे नवे प्रवाह : संजिवनी रौप्य-स्मृती ग्रंथ' प्रकाशित करण्यात आले.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, साखर कारखाने, शेतीजीवन, शेतकरी, जमिनीचा कस, पर्यावरणाचा ऱ्हास कसा होतो याविषयी विस्ताराने मांडणी या ग्रंथामध्ये आली आहे.

गोदावरी नदी कोपरगाव परिसराची जीवनवाहिनी आहे. नाशिक ते नांदेड या दरम्यान गोदावरी नदीवर पहिला कोल्हापुर पद्धतीचे बंधारा हिंगणी येथे बांधला. त्यामागे मा. शंकरराव कोल्हे यांची दूरदृष्टी होती. दोन्ही कारखान्यांना विपुल प्रमाणात ऊस उपलब्ध व्हावा, ओलीताचे क्षेत्र वाढावे म्हणून त्यांनी कारखान्यातर्फे कोल्हापुर पद्धतीचे बंधारे बांधण्यास प्राधान्य दिले. बंधाऱ्याची माहिती पुढीलप्रमाणे -

हिंगणी बंधारा

संजीवनी सहकारी साखर कारखान्याने गोदावरी नदीवर इ.स. १९८८ मध्ये हिंगणी या गावी कोल्हापुर पद्धतीचा बंधारा बांधण्याचे काम सुरु केले. साडे सहा मीटर उंचीचा हा बंधारा ६६ लाख, ६५ हजार रुपये खर्च करून पूर्ण झाला. त्यामुळे सुमारे ३५०० एकर क्षेत्र ओलीताखाली आहे. ऊस उत्पादनाचे क्षेत्र वाढले. या बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता ११२.२१ दशलक्ष घनफूट पाणी एवढी आहे. ७७ मोऱ्या असलेला २७० मीटर लांबीचा हा बंधारा असून त्यामुळे ३४०० एकर खरीप, १७०० एकर रब्बी, ३४० एकर बारमाही क्षेत्र पाण्याच्या दुहेरी वापरामध्ये आले. हिंगणी बंधाऱ्याची कोनशिला तत्कालीन पाटबंधारे राज्यमंत्री ना. आण्णासाहेब म्हस्के व ज्येष्ठ पत्रकार (लोकसत्ता तत्कालीन संपादक) मा. माधव गडकरी यांच्या उमस्थितीत ११ एप्रिल १९८७ रोजी बसविण्यात आली. त्यानंतर केवळ १८ महिन्यांमध्ये काम पूर्ण होऊन महाराष्ट्राचे तत्कालीन उद्योगमत्री मा. रामराव आदिक व मा. मधुकरराव पिचड यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. बंधाऱ्याचा झालेला खर्च महाराष्ट्र शासनाने १९९३ मध्ये संजीवनी साखर कारखान्यास परत केला. हिंगणी बंधाऱ्याचा लाभ हिंगणी, मुर्शतपूर, धारणगाव, कुंभारी, सोनारी या गावांना विशेषत्वाने झाला आहे.

मंजुर गावचा बंधारा

संजीवनी साखर कारखान्यास ऊसाची उपलब्धता व्हावी यासाठी हिंगणी बंधाऱ्याप्रमाणे कोपरगावच्या पश्चिमेस मंजूर या गावी १९९५ मध्ये गोदावरी नदीवर २५० मीटर लांबीचा, १२७.८५ दशलक्ष घनफूट पाणी साठवण क्षमतेचा बंधारा बांधण्यात आला. त्यासाठी १ कोटी ५९ लाख रुपये खर्च आला. या बंधाऱ्याचा लाभ मंजूर, चासनळी, धामोरी, मोरवीस व मायगाव देवी या गावांमधील ८२६ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आले. या बंधाऱ्यासाठी अत्याधुनिक तंत्र असलेली स्वयंचलित 'गोडबोले गेटस्' बसविण्यात आले आहे.

सडे गावचा बंधारा

हिंगणी व मंजूर बंधाऱ्यांप्रमाणे इ.स. १९९६ मध्ये कोपरगावच्या पूर्वेस 'सडे' या गावी गोदावरी नदीवर २९६ मीटर लांबीचा, २७८.९५ दशलक्ष घनफूट पाणी साठवण क्षमतेचा कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्यात आला. त्याच्या पाण्याचा लाभ सडे, कोकमठाण, सावळीविहिर, संवत्सर, कोपरगाव बेट या गावातील १८६५ हेक्टर जमिनीस झाला आहे. या बंधाऱ्यास तीन कोटी २० लाख रुपये खर्च झाला.

शंकरराव काळे यांचे योगदान[२८]

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ भारतात अग्रेसर आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या संकल्पनेतील सहकारी चळवळ संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विकसित झालेली दिसून येते. सहकारी चळवळीचे बिगर सरकारीकरण, सहकारी संस्थांची निर्मिती, कृषी औद्योगिक समाजरचना, सहकारक्षेत्राद्वारे ग्रामीण नेतृत्त्वाची बांधणी, सहकारी संस्थांतून लोकशाही, काटकसर या सहकारी तत्त्वांचे काटेकोरपणे पालन होणे, सहकारी संस्थांची स्वायत्तता, समाजाच्या तळागाळातील लोकांचा आधार ठरले, खेड्याच्या पातळीवर आर्थिक विकासाचे केंद्र म्हणून सहकारी संस्था विकसीत करणे इत्यादी बाबी पंडीत नेहरूंना अभिप्रेत होत्या. सहकार चळवळीच्या शिल्पकारांमध्ये सहकार महर्षी मा. वैकुंठभाई मेहता, सहकारास आर्थिक दृष्टी देणारे मा. धनंजयराव गाडगीळ, मा. यशवंतरावजी चव्हाण, मा. वसंतदादा पाटील, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील इत्यादी प्रभुर्तींनी स्वतःच्या शेतीचे हिशोबही नीट न समजू शकणाऱ्या सामान्य शेतकऱ्यांस कारखानदार बनविले. मा. यशवंतराव मोहिते, कर्मवीर तात्यासाहेब मोहिते, मा. गुलाबराव पाटील इत्यादींनी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीस नवी आधुनिक दिशा दिली.

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा एक परिणाम म्हणून मा. शंकरराव काळे व मा. शंकरराव कोल्हे यांचे ग्रामीण नेतृत्त्वही सहकारी चळवळीमधून उदयास आले. मा. शंकरराव काळे आज हयात नाहीत, मात्र काळे यांनी सहकाराच्या माध्यमातून उभारलेल्या संस्था आज सुस्थितीमध्ये आहेत. कोपरगाव परिसराचा आर्थिक चेहरामोहराही त्यामुळेच बदलला आहे. त्यामधूनच कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची निर्मिती झाली.

कोपरगाव सहकारी साखर कारखाना[२९]

३० जून १९५२ रोजी साखर कारखान्याचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव देण्यात आला. त्यानुसार शासनाने 'दि कोपरगाव सहकारी साखर कारखाना लिमिटेड'

या नावाने संस्था रजिस्टर केली. संस्थेस रजिस्टर नंबर जी-२६०-२ असा दिला. २१ सप्टेंबर १९५३ पासून कोसाकाचे अधिकृतरित्या काम सुरु झाले. शासनातर्फे तीन वर्षाकरिता संचालक मंडळाची नेमणूक करण्यात आली. त्यामध्ये वामनराव वर्दे (बँक प्रतिनिधी), डॉ. धनंजयराव गाडगीळ (रजिस्ट्रार नॉमीनी), गणपताव रभाजी औताडे, नारायण शिवराम बोरावके, शंकरराव देवराम काळे, पुरुषोत्तम त्रिंबक मिरजकर, लक्ष्मणराव देवराम आहेर, बाबुराव दादा तनपुरे, शंकरराव बोरावके, सूर्यभान महाले, रावसाहेब नारायण पाटील या संचालकांचा समावेश होता. शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना शेअर्स घेण्यास प्रवृत्त करण्याच जबाबदारी सर्वानुमते शंकरराव काळे यांच्यावर टाकण्यात आली. याठिकाणी शंकररावांसारख्या कुशल संघटकाची परीक्षा होती.

पन्नास वर्षापूर्वी ग्रामीण भाग संघटीत नव्हता. त्यामुळे अशा विस्कळीत-पिडीत समाजाचे संघटन फारच अवघड होते. याबाबत श्री. काळे सांगतात, 'त्या काळी दातावर मारायला पैसा नसायचा, पैसाच दिसायचा नाही. रुपयाचं नाणं बैलगाडीच्या चाकासारखं भासायचं. अशा परिस्थितीत अडीचशे रुपयांचे शेअर्स विकत घ्यायला लावणं, त्यासाठी शेतकऱ्यांना राजी करणं हे एक प्रकारचं अग्निदिव्यच होतं. पण हा सारा खटाटोप शेतकऱ्यांच्या भल्यासाठीच होता. आम्ही ऊस शेतकरी बांधवांना त्यांच्या घरी-दारी, शेतात-लग्नात असं कुठेही गाठायचो. साखर कारखान्यामुळे त्यांचा कसा फायदा होणार हे दातांच्या कण्या करून पटवून द्यायचो. तरी तो राजी व्हायचा नाही. असं दोन-तीनदा झाल्यावर तो शेअर्ससाठी जुळवाजुळवीच्या तयारीला लागायचा.'[३०]

याकाळात श्री. काळे यांनी कृतीशिल कार्यक्रम राबवून विस्कळीत समाजाचे संघटन केले. माणसे जोडली. त्यांचे प्रश्न समजून घेतले. तेव्हाच पीडीत माणसांनी त्यांच्यावर विश्वास टाकला. स्वार्थाकडे पाठ फिरवून त्यांनी हे काम केले. मात्र उपेक्षा, टवाळी, उपहास, छळ, विरोध, मान-अपमान या सर्व गोष्टींचा त्यांना सामना करावा लागला. हे सगळं करताना ऊस लागवडीही मोठ्या प्रमाणावर करण्याची गरज होती. गोदावरी आणि प्रवरा यांच्या धरणावरील पाटाचे पाणी वापरण्यास शेतकऱ्यांमध्ये सुरुवातीला गैरसमज होता. जमिनीचा कस जातो. तसेच काही अंधश्रद्धा होती. पण सुदैवाने काही काळानंतर हा समज दूर झाला. एकरी विक्रमी उत्पन्न वाढले. जे शेतकरी कारखान्यांचे शेअर्स घेतील त्यांनाच पाटाच्या पाण्याचे ब्लॉक दिले जातील असे शासनाने जाहीर केल्याने कारखान्याला विरोध करणाऱ्यांनी शेअर्स घेण्यासाठी रांगा लावल्या.

एकीकडे भांडवल उभारणीचे काम सुरु असताना 'कोसाका' कुठे उभा करावा? याचाही विचारविनीमय सुरु होता. ऊसाचे क्षेत्र, पाण्याची सोय, जमिनी, मशिनरी व इमारती उभारणीस अनुकूलता, तसेच लासलगाव-कोपरगाव रेल्वेस्टेशन यापासूनचे अंतर विचारात घेऊन सुरेगाव येथील जागा निश्चित करण्यात आली. श्री. काळे यांनी जमीन मालकांचा विश्वास संपादन करुन कारखान्यासाठी जमीन खरेदी केली. कारखान्याची जागा निश्चित झाल्यावर मोठ-मोठी यंत्रे, लोखंड, बांधकामाचे साहित्य येऊन पडू लागले. कारखाना उभारणीच्या काळात आपला संपूर्ण वेळ ते तिथल्या कामात घालीत असत. कामगारांसोबतच जेवण करीत असत. घरदार विसरुन शंकरराव काळे यांनी साखर कारखाना उभारणीचा ध्यास घेतला होता. वायफळ खर्च होऊ नये याबाबत ते अतिशय दक्ष असत. सरकार आणि शेतकरी यांच्याकडून पैसे मिळाले होते. उर्वरीत मुंबई शिखर बँकेकडून पैसे कर्जाने घेण्यात आले.

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा विस्तार आणि कार्यक्षेत्र[३१]

कारखाना पूर्ण उभारण्यात आला. तज्ञांच्या सल्ल्यानुसार मे. बी.एम.ए.(वेस्ट जर्मनी) यांच्याकडून शुगर प्लँट खरेदी करणयात आला. त्याचीही उभारणी जर्मन तज्ञांकडून करुन घेण्यात आली. दंडकारण्यात गौतम ऋषींचा आश्रम म्हणजे तपस्येचे मोठे केंद्र होते. त्यांच्याच नावावरुन कारखाना परिसराला गौतमनगर हे नाव देण्यात आले. १२ फेब्रुवारी १९५६ रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या शुभहस्ते पूजा करुन ऊसाची मोळी गव्हाणीत टाकण्यात आली. कारखान्याची चाके गरगरा फिरु लागली. दाणेदार, शुभ्र साखरेची पोती भरु लागली होती. तालुक्याच्या विविध भागातून बैलगाडी अथवा मिळेल त्या वाहनाने हजारो लोक कारखान्यावर जमा झाले होते. सभासद शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. शंकरराव काळे यांच्या मेहनतीचे चीज झाले होते.

आशिया खंडातील दुसऱ्या सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीसाठी डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई, अर्थमंत्री जीवराज मेहता, महसूल व शेतकी मंत्री भाऊसाहेब हिरे, सहकार मंत्री एन. पी. पाटील, सिंचन खात्याचे मंत्री नाईक निंबाळकर, बॉम्बे स्टेट को-ऑप. बँकेचे चेअरमन सरैय्या आणि वामनराव वर्दे यांची मोलाची मदत झाली. या सगळ्यांच्या शंकरराव काळे यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करुन भविष्यात हा साखर कारखाना शेतकऱ्यांच्या हिताला सर्वाधिक

प्राधान्य देईल याची ग्वाही दिली. कोसाकाच्या पहिल्या गळीत हंगामात ५२,२३४ मे. टनाचे गळीत झाले आणि त्यापासून ५२,३२५ साखरपोत्यांचे उत्पादन झाले. शेतकऱ्यांच्या ऊसास प्रती टनी ३७.२५ भाव देण्यात आला. ८५ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या कोसाकाची गाळप क्षमता प्रतीदिन ८०० मे. टन एवढी होती. दुसऱ्या गळीत हंगामात आदल्या गळीत वर्षापेक्षा तिप्पट ऊसाचे गाळप करण्यात झाले. साखरेचा उताराही १०.०१ वरून ११.२९ पर्यंत चढला आणि शेतकऱ्यांना टनामागे ४० रुपये असा अंतिम भाव देण्यात आला. मग मात्र कारखान्याने उत्तरोत्तर प्रगतीच केली.

सुरुवातीस कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील एकूण ५९ गावे होती. आज अखेर कार्यक्षेत्रात वाढ होऊन एकूण २१५ गावे आहेत. सन १९५५-५६ साली सभासदांचे ऊस क्षेत्र १४३० एकरांचे होते. त्यात वाढ होत गेली. त्याप्रमाणे आज सभासदांचे ऊस क्षेत्र १४४९ हेक्टर व बिगर सभासदांचे ऊस क्षेत्र ३९८२ हेक्टर असे एकूण ८४३१ हेक्टर आहे. तसेच आज कारखान्याचे ८५४६ सभासद आहेत. तर कारखान्यामध्ये १३५० कामगार आहेत.

गेल्या ५० वर्षातील कारखान्याची प्रगती

अ.नं.	गळीत हंगाम	ऊस गळीत (मे.टन)	साखर पोते	साखर उतारा %	दर टनी भाव रुपये
१.	१९५५-५६	५२,२३४	५१,३९२	१०.०१	३७.२५
२.	१९६५-६६	२,२४,२२८	२,५७,००१	११.४६	६१.२५
३.	१९७५-७६	४,१३,२४४	४,५४,१८५	१०.९९	१२९.५०
४.	१९८५-८६	३,९३,३५०	४,७६,३५०	१२.११	३६२.००
५.	१९९५-९६	६,०३,२०४	६,४१,७६१	१०.६५	६६०.००

वरील आकडेवारी कारखान्याच्या वार्षिक अहवालावरून दर १० वर्षांची घेतली आहे.

कारखान्याचा निधी व डिपॉझीट -

अ.क्र.	तपशील	आकडे (लाखात)
१.	अधिकृत भागभांडवल	५०२.००
	वसूल भागभांडवल	२११.८६
२.	निधी	
	अ) राखीव व इतर निधी	१६१.६४
	ब) घसारा निधी	२७९०.४८
		२९५२.१२
३.	डिपॉझीट	
	अ) बिन परतीच्या ठेवी	६०३.८७
	ब) परतीच्या ठेवी	६९४.९६
	क) अनामत केन डिपॉझीट	२९.२२
		१३२८.०५

आज 'कोसाका' ची गाळपक्षमता रोज ३००० मे. टन एवढी आहे. सहकारी संस्था टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत, स्वंयपूर्णतेच्या दृष्टीने त्यांनी वाटचाल केली पाहिजे यासाठी श्री. काळे सतत डोळ्यात तेल घालून लक्ष देत असतात. काळानुरूप योग्य असणारे बदलही स्विकारले पाहिजेत. सभासदांचा फायदा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्यांनी वेळोवेळी कारखाना अद्यायावत केला. 'कोसाका' उद्योग समूहाला सुरुवातीपासून व्यापक दृष्टीकोण असलेले चेअरमन लाभले. त्यामुळे 'कोसाका' ची भरभराट झपाट्याने झाली. आज शंकरराव काळे यांचे सुपूत्र आमदार अशोकराव काळे हे चेअरमन म्हणून समर्थपणे 'कोसाका' उद्योगाची धुरा सांभाळत आहेत.

शंकरराव काळेंचा भर व्यापक विकासावर होता. कारखाना परिसर विकासासाठी ते नवनवीन कल्पना राबवत होते. त्यातून अपेक्षीत परिणाम दिसू लागला. कारखान्यामुळे शेकडो सुशिक्षीतांना आणि तंत्रज्ञांना कायमचे काम मिळाले. स्थानिक बेरोजगारी बऱ्याच अंशी कमी झाली. परिसरातील उद्योग वाढले. संबंधीत कारागिरांचा उदीम-उद्योग चालू लागला. लोकांच्या हातात पैसा खेळू लागला. रस्ते झाले, गौतमनगर परिसरात समृद्धी आली.

एक साखर कारखाना काय काय बदल घडवून आणू शकतो याचा परिपाठच जणू शंकरराव काळेंनी घालून दिला. अल्पावधीत कोसाकाची लोकप्रियता सर्वदूर पसरली. ज्येष्ठ

नेते, तज्ञ कोपरगाव सहकारी साखर कारखान्याकडे येऊ लागले. यशवंत चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शरद पवार, बाळासाहेब देसाई, शंकरराव चव्हाण, आण्णासाहेब शिंदे, बाळासाहेब भारदे, ना. ग. गोरे, रत्नाप्पा कुंभार अशा अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तींनी शंकरराव काळे यांनी उभ्या केलेल्या कार्याचे कौतुक केले. त्यांना कामाची पावती दिली आहे.

उपपदार्थ निर्मिती प्रकल्प

आसवनी विभाग

कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा व्याप जसजसा वाढत गेला. तसतसे साखरेचे उत्पन्न वाढू लागले. आणि साखर उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या मळीसारख्या टाकाऊ पदार्थाचे काय करायचे हा प्रश्न उपस्थित झाला. उद्योग विषयक सरकारी नियम, टाकाऊ पदार्थांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदुषणाचा प्रश्न यातून मार्ग काढण्याशिवाय पर्याय नव्हता. अशा पर्यायांचा विचार करताना एक व्यवहार्य मार्ग म्हणून स्पिरीट निर्मितीचे उद्दिष्ट प्रमुख मानून नवा प्रकल्प उभारता येईल का? असा पर्याय पुढे आला. याच दरम्यान कोसाका उद्योग समूहाला भेडसावत असलेला मळीचा प्रश्न कोसाकाजवळच्या संजीवनी व गणेश या साखरकारखान्यांनाही भेडसावू लागला होता. या पार्श्वभूमीवर कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या मळीपासून रेक्टीफाईड स्पिरीट, स्पेशल डिमेचर्ड स्पिरीट, फ्यजेन्ड ऑईल, ऑर्डीनरी डिनेचर्ड स्पिरीट अशी काही उप उत्पादने काढून कारखाना आर्थिकदृष्ट्या अधिक भक्कम करता येतो का म्हणून कोसाका, संजीवनी व गणेश या तिनही कारखान्यांनी एकत्र येण्याचे ठरविले. १९७६ साली 'कोसंग (कोपरगाव, संजीवनी व गणेश) को-ऑप. डिस्टीलरी लि.' हा प्रकल्प उभा केला. तिनही कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या मळीचा एकत्रीत उपयोग केला तर मोठ्या प्रमाणात स्पिरीट उत्पादन करण्यात येईल आणि त्याचा फायदा तिनही कारखान्यांना होईल असा विचार यामागे होता. परंतु हा प्रयोग फार काळ टिकला नाही. गणेश कारखान्याने यातून अंग काढून घेतले. राहिलेल्या दोघांनी मिळून स्पिरीटच्या उत्पादनास सुरुवात केली. तेव्हा या प्रकल्पाची उत्पादनक्षमता वर्षाला ७२ लाख लिटर इतकी होती. परंतु प्रत्यक्षात उत्पादन ४५ ते ५० लाख लिटर इतके होत होते. त्यापैकी ३० ते ३५ लाख लिटर स्पिरीटची विक्री होऊन दोन्ही कारखान्यांना ९५ लाख ते सव्वा कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न मिळत असे. पण जे १० ते १५ लाख लिटर स्पिरीट शिल्लक राहायचे त्याचे काय करायचे असा प्रश्न होता.

यासाठी आणखी काही नवीन उत्पादने सुरु करावी म्हणून श्री. काळे यांनी शासनाकडे देशी दारुच्या निर्मितीसाठी परवानगी मागितली. १९७८-७९ साली शासनाने ही परवानगी दिली आणि लगेचच देशी मद्यनिर्मितीचा प्रकल्प सुरु झाला. त्यावेळी या प्रकल्पाची ५४ लाख लिटर इतकी उत्पादन क्षमता होती. परंतु प्रत्यक्षात १५ ते ३० लाख लिटर इतकीच मद्यनिर्मिती होत होती. पुढे स्पिरीटचे उत्पादन वाढले होते. त्यामुळे मद्यनिर्मिती प्रकल्पाची क्षमता वाढविणे गरजेचे होते मात्र नेमक्या याच काळात म्हणजे १९८६ साली कोसंग को-ऑप. डिस्टीलरी लि. मधून संजीवनी कारखानाही बाहेर पडला. तेव्हा शंकररावांनी हिंमतीने हा प्रकल्प कोपरगाव सहकारी साखर कारखान्यातच विलीन करुन घेत कारखान्याचाच एक भाग म्हणून पुढे तो कार्यरत ठेवला.

बॅचटाईप फरमेन्टेशन प्रोसेसरवर आधारीत असलेला हा डिस्टीलेशन प्लँट बडोद्याच्या मे. सवाले केमिकल्स् प्रा. लि. या कंपनीमार्फत उभारला आहे. प्रतिदिनी २४ हजार लिटर इतकी क्षमता असलेल्या या प्लँटमध्ये स्पिरीट तयार करण्यापासून देशी दारुचे उत्पादन होऊन ते वेगवेगळ्या आकारांच्या बाटल्यांमध्ये पॅक होईपर्यंतच्या सर्व प्रक्रिया एकसाथ होतात.

आसवानी प्रकल्पातून मिळणारा नफा वाढावा म्हणून या संपूर्ण प्रकल्पाचा गाभा ठरलेल्या स्पिरीट निर्मिती प्लँटची क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आणि स्पिरीट उत्पादनक्षमता ७२ लाख लिटरवरुन ९० लाख लिटरपर्यंत वाढविण्यात आली. तर देश मद्यनिर्मितीचीही क्षमता ५४ वरुन १०८ लाख लिटर एवढी केली. त्यामुळे आज हा विभाग प्रतिदिनी ३० हजार लिटर इतक्या क्षमतेने काम करत आहे. त्यासाठी तो प्रतिवर्षी सुमारे ३० ते ३५ हजार मे. टन मळीचा वापर करुन ८० ते ८५ लाख लिटर्स एवढ्या स्पिरीटची निर्मिती करतो. या स्पिरीटपैकी ५५ ते ६० लाख लिटर्स स्पिरीट देशी मद्यनिर्मितीसाठी वापरले जाते. तर उर्वरीत स्पिरीट वेगवेगळ्या रासायनिक उद्योगांना विकले जाते. या दोन्ही उत्पादनातून आसवनी विभागाला दरवर्षी ८ ते ९ कोटी रुपयांचा नफा होतो. शिवाय हा विभाग राज्यशासनाला उत्पादनशुल्क, एक्साईज ड्युटी, विक्रीकर अशा विविध स्वरुपात दरवर्षी ५० ते ५५ कोटी रुपयांचा महसूल देतो. 'भिंगरी' या उत्पादनाचे एकूण दर लक्षात घेतले तर असे लक्षात येईल की, हा विभाग कारखाना, शेतकरी आणि शासन यांसाठी फायदेशीर ठरलेला आहे. तसेच एकूण ४५० कामगारांना रोजगार मिळालेला आहे.

कारखान्याची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी हा विभाग उपयुक्त ठरला आहे. स्पिरीट प्लँटचा अधिक क्षमतेने वापर केला तर नफ्यात आणखी वाढ होऊ शकते. परंतु शासन आकारत असलेल्या वाढीव करांमुळे स्पिरीट विक्रीस मोठे अडथळे येत आहेत. यातून मार्ग काढून श्री. काळे यांनी एक कोटी रुपयांची गुंतवणूक करुन देशी मद्यनिर्मिती प्रकल्पाचा विस्तार केला आहे. 'भिंगरी' ला असलेली वाढती मागणी विचारात घेता सध्या क्षमतेपेक्षा अधिक उत्पादन घ्यावे लागत आहे. तरीही आज घडीला मागणी एवढा पुरवठा करता येत नाही, म्हणूनच एक कोटी गुंतवणूक केली असून त्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना आणखी लाभ देणे कारखान्याला शक्य होणार आहे.

बॉयोगॅस प्लँट

आसवनी विभागाने स्पिरीट आणि मद्य याबरोबरच बॉयोगॅस प्लँटची उभारणी करुन साखर कारखान्याचा इंधनखर्च जवळपास ७० ते ८०% नी वाचवला आहे. प्रदुषण नियंत्रणाच्या गरजेतून उभा करण्यात आलेला हा प्रकल्प आज कारखान्यासाठी लागणाऱ्या इंधनाची काही प्रमाणात गरज पूर्ण करतो.

स्पिरीट तयार करताना सर्वच्या सर्व मळी उपयोगात येत नाही. सांडपाण्याच्या रुपाने काही मळी बाहेर पडते. त्याला स्पेंट वॉश म्हणतात. आज स्पिरीटच्या निर्मितीसाठी दरवर्षी ३० ते ३५ हजार मे. टन मळीचा वापर केला जातो. त्यापैकी २० ते २५ हजार मे. टन मळी कोपरगाव कारखाना पुरवितो. बाकीची इतर कारखान्यांकडून घेतली जाते. त्यामुळे स्पिरीट प्रकल्पामधून दररोज सुमारे ४ ते ५ लाख लिटर्स स्पेंटवॉश (सांडपाणी) बाहेर पडते. या स्पेंटवॉशमध्ये काही रसायने असल्याने ते वातावरण तसेच जमिन दुषीत करतात. ज्या जमिनीत हे स्पेंटवॉश सोडले जाते. ती जमिन नापिक बनू शकते. त्यामुळे पाणी प्रदूषण मंडळाने या स्पेंटवॉश बाबत कारखान्याने काही उपाय योजावेत असा नियम केला आहे, या नियमाचे पालन करायचे तर कारखान्याला प्रचंड खर्च करावा लागतो. केवळ प्रदुषण टाळायचे म्हणून खर्च करायचा ठरवले तर कारखान्याला फटका बसू शकतो. तेव्हा कारखान्याचा फायदा होईल आणि प्रदूषणही टळेल असा विचार करुन श्री,. काळे यांनी आसवनी विभागाचाच एक प्रकल्प म्हणून बॉयोगॅस उभारला. १९९२-९३ मध्ये तो कार्यन्वीत झाला आहे.

५ कोटी ५७ लाख रुपये भांडवली खर्च करुन उभारण्यात आलेल्या हा प्रकल्प आज दरवर्षी ५० ते ७० लाख घनमीटर गॅसची निर्मिती करत आहे. म्हणजे स्पिरीट प्लँटमधून दररोज बाहेर पडणाऱ्या ४.५० लाख लिटर्स स्पेंटवॉशवर प्रक्रिया करुन दररोज १७५०० घनमिटर गॅसची निर्मिती या प्रकल्पाद्वारे होते. हा सर्व गॅस कारखान्याच्या बॉयलरला इंधन म्हणून वापरला जातो. त्यामुळे ८०% बगॅसची बचत होऊन कारखान्याला त्याचा इतरत्र वापर करुन आणखी उत्पन्न मिळविता येते. त्यामुळे कारखान्याला आणि शेतकऱ्यांना मोठी आर्थिक मदत होते. या प्रक्रियेतून आणखी काही प्रमाणात स्पेंटवॉश बाहेर पडते. मात्र त्याची तीव्रता कमी असते. त्यामुळे त्यात काही प्रमाणात साधे पाणी मिसळले तर ते शेतीसाठी उपयुक्त ठरते. म्हणून मग या प्रकल्पाद्वारे असे पाणी मिश्रीत स्पेंटवॉश कारखाना परिसरातील जमीनीला टँकरद्वारे पुरविले जाते.

कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प

बगॅस आणि मळी यांचा पुरेपूर वापर करून आसवनी विभाग आपल्या उप-उत्पादनाद्वारे कारखान्याला एक प्रकारे आर्थिक स्थैर्य देत आहे. आता बायोगॅस प्लँटद्वारे स्पेंटवॉशवर प्राथमिक नियंत्रणाचे काम चोखपणे केले जाते. तरीही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्पेंटवॉशवर आणखी एक प्रक्रिया करुन त्यातील बीओडी, सीओडी आणखी कमी करावा असे बंधन घातले आहे. यावरही आसवनी विभागाने एक नवा तोडगा काढला आहे. तो म्हणजे कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पाचा. बॉयोगॅसमधून बाहेर पडणारा स्पेंटवॉश आणि कारखान्यातून मिळणाऱ्या प्रेसमड या दोन्हींचा वापर करुन १९९९-२००० मध्ये आसवनी विभागाने कंपोस्ट खत निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला. सुमारे २५ ते ३० लाख रुपये भांडवली गुंतवणूकीच्या या प्रकल्पाद्वारे फेब्रुवारी २००० मध्ये प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात झाली. आज हा प्रकल्प वर्षाला १५ ते २० हजार टन कंपोस्ट खत तयार करतो. कारखान्याच्या सभासदांना हे खत केवळ वाहतूक खर्च घेऊन उपलब्ध करुन दिले जाते.

थोडक्यात आसवनी विभाग हा कारखाना व परिसरासाठी आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरला आहे. आज या विभागात १७५ कामगार कायमस्वरुपी काम करतात तर सुमारे ३५० कामगार ठेका पद्धतीने काम करत आहे. या विभागाने काही छोट-छोट्या उद्योगांनाही चालना दिलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने देशी मद्याच्या पॅकींगसाठी बाटल्या आणि खोकी

यांचा पुरवठा करणाऱ्यांना रोजगार मिळवून दिला आहे. बाटल्या, खोकी आणि लेबल तसेच बाटल्यांचे बुचे पुरविण्याचा व्यवसाय करणारी दहा ते पंधरा छोटी छोटी युनिटस् आज या विभागावर अवलंबून आहेत. यातील बहुतेक युनिटस् आसपासच्या परिसरातीलच असल्याने एकूण परिसराच्या दृष्टीने कोपरगाव कारखान्याचा आसवनी विभाग मोठा फायदेशीर ठरला आहे.

कागद प्रकल्प

केंद्र सरकारने बगॅसपासून कागदनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाच्या उभारणीसाठी साखर कारखान्यांना प्रोत्साहन देणारे धोरण जाहिर केले होते. पॅकींग पेपरची वाढती गरज आणि त्यासाठी होणारी जंगलतोड याचा विचार करता साखर कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या बगॅसचा वापर अशा कागदनिर्मितीसाठी केला तर जंगलतोड थांबू शकेल. आणि कागदाची गरजही पूर्ण करता येईल. म्हणून केंद्र सरकारने अशा प्रकल्पांसाठी काही सवलती देऊ करून कारखान्यांना प्रकल्प उभारणीस प्रोत्साहन दिले होते. त्याचा फायदा मिळविण्यासाठी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने १९८६ साली बगॅसपासून क्राफ्ट पेपर निर्मितीचा प्रकल्प सुरु केला.

भरमसाठ विजबील, वाढती पाणीपट्टी, सेल्स टॅक्स, टर्नओव्हर टॅक्स, सरचार्ज अशा अनेक कारणांनी वाढलेला आर्थिक बोजा, त्यातच प्रदूषण टाळण्यासाठी बसवावी लागणारी मोठी यंत्रसामुग्री, मालाच्या वाढलेल्या किंमती आणि खाजगी उद्योगांशी करावी लागणारी स्पर्धा यामुळे ही पेपर मिल तोट्यात आली. असे असले तरी या मिलमार्फत १,४८,४०० मे. टन इतक्या कागदाची निर्मिती केली गेली. त्यापासून आणखी फायदा मिळावा म्हणून २५ मे. टन क्षमतेचा हा प्रकल्प ४० मे. टन क्षमतेचा करण्यासाठी सुमारे १८ कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात आली. पेपर मिलच्या पाण्यासाठी सुरेगाव शिवारात २४ एकर जमिन खरेदी करुन एक साठवण बंधारा बांधला गेला. त्यासाठी ७३ लाख रुपयांचा खर्च केला गेला. मात्र दिवसेंदिवस या प्रकल्पाचा तोटा वाढत गेला. आर्थिक अडचणी वाढल्यामुळे उत्पादन बंद करावे लागले. एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला अपयश आले. राज्यातील अन्य कारखान्यांच्या कागदप्रकल्पासमोरही हाच यक्ष प्रश्न उभा ठाकला होता. प्रचंड तोटा सहन करुन संपूर्ण कोसाका उद्योग समूहाला अंधारात ढकलण्याऐवजी हा प्रकल्प बंद करण्याचा श्री. काळे यांनी विचार केला आणि अत्यंत जड अंतःकरणाने हा प्रकल्प बंद केला.

गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि.[१२]

ऊस तोडल्यानंतर तो लवकरात लवकर कारखान्याच्या गव्हाणीत पडला पाहिजे. कारण, त्यामुळे साखर उतारा अधिक मिळतो. यासाठी वाहतूकीची वेगवान साधने उपलब्ध असणे आवश्यक असते. परंतु 'कोसाका' कडे अशी साधने सुरुवातीपासून उपलब्ध नव्हती. ऊस वाहतूकीसाठी सारी मदार बैलगाड्यांवर होती. बैलगाड्यांच्या माध्यमातून जवळचा ऊस आणता येत होता. पण लांब अंतरावरील ऊस बैलगाड्यांद्वारे आणायला खुप वेळ जायचा. परिणामी साखर उतारा कमी व्हायचा. शिवाय बैलगाड्यांचा केव्हाही संप सुरु व्हायचा. यातून मार्ग काढण्यासाठी शंकरराव काळे यांनी १९७१ साली गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट ही खासगी कंपनी स्थापन केली.

कंपनी खासगी असली तरी तिचे कामकाज सहकारी तत्त्वावरच चालते. ही कंपनी स्थापन करताना सभासद शेतकऱ्यांना यातून जोडधंदा मिळाला पाहिजे, त्यांच्या एकूण आर्थिक उत्पन्नात भर पडली पाहिजे असा विचार करुन श्री. काळे यांनी या कंपनीची रचना केली आहे. दहा ऊस उत्पादक शेतकरी आणि कोसाकाचे पाच जण असा पंधरा जणांचे संचालक मंडळ बनवून या कंपनीचा कारभार त्यांच्याकडे सोपविण्यात आला. या संचालक मंडळाने काही शेतकऱ्यांना कंपनीचे सभासद करून घेतले आणि या सभासदांना ऊस, बगॅस, साखर अशा मालाच्या वाहतूकीचा खात्रीचा धंदा उपलब्ध करुन दिला. ट्रक घेण्यासाठी हमीपत्र देऊन बँकेचे कर्ज उपलब्ध करुन दिले. त्यामुळे स्थापनेच्यावेळी एकूण ५१ ऊस उत्पादक शेतकरी कंपनीचे सभासद होते. आज ही संख्या १०० च्या वर गेली असून या सर्व सभासदांच्या १६० ट्रक्स कंपनीच्या या योजनेत समाविष्ट झालेल्या आहेत.

गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीशी संलग्न राहील अशी दुसरी गौतम केन ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि. ही खासगी कंपनी १९९९ मध्ये शंकरराव काळे यांनी सुरु केली. आज या दोन्ही कंपन्या सभासद शेतकऱ्यांच्या ट्रक्सना खात्रीचा वाहतूक व्यवसाय देतात. तसेच गळीत हंगामाच्या काळात ट्रक्सची निगा व दुरुस्ती, टायर, स्पेअर पार्टस्, डिझेल, ऑईल, ट्रक अपघात विमा व रोड टॅक्स भरणे, तसेच उत्पन्न व व्यवसाय कर भरणे अशा अनेक सेवा अगदी अल्प दराने पुरवतात. या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून शंकरराव काळे यांनी एक नवा प्रयोग सहकारी क्षेत्रासमोर मांडला आहे.

विशेष उपक्रम

साखर कारखान्याच्या माध्यमातून श्री. काळे यांनी अनेक प्रकल्प उभारले. पण त्याच्या जोडीलाच परिसरातील लोकांचे उद्योजकीय कौशल्य वाढावे यासाठी वेगवेगळ्या जोडधंद्यांना विशेष प्रोत्साहन देण्याचे कामही ते सातत्याने करत आहेत. यात प्रामुख्याने कृत्रिम गो-पैदास, पशुधन, कुक्कुटपालन, गौतम मिल्क, पशुखाद्य निर्मिती प्रकल्प यांचा समावेश होतो.

दुग्धविकास योजना

एकूण दुध धंद्याचा जो विकास झाला त्यात शासनाच्या कृत्रिम गोपैदास आणि पशुधन विकास या विभागाचा मोठा वाटा आहे. हीच बाब लक्षात घेऊन शंकरराव काळे यांनी कारखान्याच्या माध्यमातून कृत्रिम गोपैदाशीची काही केंद्रे कारखाना कार्यक्षेत्रात सुरु करुन संकरित गायी घेण्यासाठी सभासद शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले. पशुसंवर्धनासाठी अनेक सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. १९७५ साली सुरु करण्यात आलेल्या या विभागाने आतापर्यंत कृत्रिम रेतनाच्या माध्यमातून ७७,१०० गायी निर्माण केल्या आहेत. परिणामी आज परिसरातील दूध उत्पादनात तर वाढ झालेलीच आहे. पण त्याचबरोबर पशुसंवर्धनही उत्तम प्रकारे झाले आहे.

गौतम सहकारी कुक्कुटपालन व्यावसायिक संस्था मर्यादित

१९८६-८७ साली ही सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. एक घरगुती उद्योग म्हणून खेड्यात बहुतेक लोक गावरान कोंबड्या पाळतात. परंतु त्याकडे व्यवसाय म्हणून फारचे पाहिले जात नाही. या लोकांना प्रशिक्षणासह काही गोष्टी उपलब्ध करुन दिल्या तर ते कुक्कुटपालनाचा व्यवसाय उत्कृष्टपणे करु शकतात आणि त्यातून त्यांना बऱ्यापैकी उत्पन्न मिळू शकते. हाच विचार करुन श्री. काळे यांनी गौतम सहकारी कुक्कुटपालन व्यावसायिक संस्था सुरु केली आहे. परंतु लोकांचा तसेष सभासदांचा फारसा प्रतिसाद न मिळाल्याने संस्थेने स्वतःच कुक्कुटपालनाचा व्यवसाय सुरु केला आहे. मात्र ही संस्था आजवर फारशी नफ्यात आली नाही. याचे कारण अंडी उत्पादनाच्या एकूण खर्चात वाढ झाली त्या प्रमाणात अंड्यांचा दर वाढला नाही. तरी आर्थिक मेळ साधून संस्था नफ्यात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गौतम मिल्क प्रायव्हेट लिमिटेड

कोसाका उद्योगसमूहाने सहकारी तत्त्वावरच परंतु खाजगी स्वरुपाच्या काही संस्था उभ्या केल्या आहेत. त्यातील एक संस्था म्हणजे गौतम मिल्क ही आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात दूध उत्पादन होऊ लागले होते. परंतु दूध संकलनाची योग्य सोय नव्हती. तालुका संघाकडून वेगवेगळ्या कारणाने शेतकऱ्यांचे दूध नाकारले जात असल्यामुळे हा जोडधंदा अडचणीत आला होता. त्याला हात देण्यासाठी श्री. काळे यांनी २६ मे १९९३ रोजी कंपनी कायद्याप्रमाणे 'गौतम मिल्क प्रायव्हेट लिमिटेड' ही संस्था स्थापन केली आहे.

१ कोटी ६० लाखांची भांडवली गुंतवणूक असणारी ही कंपनी १०० दूध संकलन केंद्रामार्फत रोज ३६ ते ४० हजार लिटर दूध खरेदी करीत होती. त्यावर प्रक्रिया करुन ते विकत होती. प्रक्रियेसाठी कंपनीकडे २५,००० लिटर क्षमतेचा पाश्चरायझेशन आणि पॅकींग प्लँट आहे. संकलीत होणाऱ्या दूधावर प्रक्रिया करुन ते दूध पिशव्यांमध्ये पॅक करुन शहरी ग्राहकांना उपलब्ध करुन दिले जात होते. निर्भेळ, स्वच्छ आणि प्रमाणित असे गौतम मिल्क प्रायव्हेट लिमिटेडने उपलब्ध करुन दिल्याने या दूधाला कोपरगाव, औरंगाबाद, नाशिक तसेच गुजराथमधील सुरत या शहरातून मोठी मागणी होती. मात्र काही दिवसांनी हा प्रकल्प आर्थिक अडचणीत आला. दूधाची बाजारपेठ, स्पर्धा, दूधाची प्रत, बाजारभाव यांचा अवमेळ झाल्याने हा प्लँट बंद करावा लागला. मात्र एवढी मोठी भांडवल गुंतवणूक व यंत्रसामुग्री वाया जाऊ नये म्हणून श्री. काळे यांनी 'डायनामिक्स' या खाजगी संस्थेला हा प्लँट भाडे तत्त्वावर चालविण्यास दिला आहे. यातून चांगल्याप्रकारे उत्पन्न मिळू लागले आहे.

गौतम पशुखाद्य प्रायव्हेट लिमिटेड

कोसाका उद्योग समुह आणि गौतम मिल्क प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून दूध उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना विविध पातळ्यांवर प्रोत्साहन दिले जात होते. जनावरांना सकस आहार उपलब्ध व्हावा म्हणून मार्च १९९९ मध्ये 'गौतम पशु खाद्य प्रायव्हेट लिमिटेड, गौतमनगर'या नावाने एक स्वतंत्र कंपनी स्थापन केली. त्यातून रोज १५ टन हायप्रोटीन कांडीचे उत्पादन आणि ५ टन कोंबडीखाद्य उत्पादन असे २० टन खाद्याचे उत्पादन होत होते. मात्र गौतम मिल्क प्रमाणेच हा उद्योगही कालांतराने अडचणीत आल्यामुळे बंद करावा लागला.

सहकारी वित्तसंस्था स्थापना

अहमदनगर जिल्ह्यात प्रवरा काठी पहिला सहकारी साखर कारखाना सुरु झाला आणि संपूर्ण देशाच्या विकासाला एक नवी दिशा सापडली. सहकाराच्या माध्यमातून परिसराच्या विकासाबरोबरच ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत होते हे ओळखून शंकरराव काळे या उच्चशिक्षित, उद्यमशील आणि प्रयोगशील शेतकऱ्याने आपल्या गावचा व तालुक्याचा विकास करायचा म्हणून विविध पातळ्यांवर काम केले आहे. त्यातीलच एक महत्त्वाचे काम म्हणजे परिसरातील शेतकरी, शेतमजूर तसेच कष्टकरी जनतेसमोरील आर्थिक अडचणी दूर करण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या विविध सहकारी पतसंस्था, सोसायट्या अणि बँका हे आहे.

या काळात महाष्ट्राच्या ग्रामीण भागात सावकारी धंद्याने चांगलाच जोर धरलेला होता. छोटे शेतकरी, कामगार व कष्टकरी असे बहुतेक लोक आपल्या छोट्या छोट्या गरजा पूर्ण करण्यासाठी सावकारांकडून कर्ज घेत असत. सावकार लोक जनतेची लुबाडणूक करत असत. काही शेतकऱ्यांच्या तर जमिनी ताब्यात घेऊन त्याच जमिनी खंडाने त्याच शेतकऱ्यांना देऊन सावकारांनी मोठी पिळवणूक चालविली होती. बँका या काळात अस्तित्त्वात होत्या पण त्या खेड्यापर्यंत पोहचलेल्या नव्हत्या. ग्रामीण भागातल्या शेतकऱ्याला या बँका कर्ज देत नव्हत्या. शिवाय बँकांच्या अनेक अटी असायच्या, याला पर्याय म्हणून सावकाराकडून कर्ज उचलायचे, कर्जात अडकलेला शेतकरी समोर आला की, सावकार मंडळी वाटेल तसे नियम लावून त्याला लुटायचे. त्यांच्या व्याजाबाबत कुठलाही नियम नव्हता. पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने दैनंदिन गरजांसह शेतीचे भांडवल तसेच लग्नकार्य पार पाडण्यासाठी खेड्यातील लोकांना पैशाची गरज भासायची. अशावेळी जमीन किंवा तत्सम् बाबी तारण ठेवून पैसे द्यायला सावकार तयार असत. पण सावकारकी पाशामुळे लोकांच्या गरजा पूर्ण होण्यापेक्षा लोक अधिकच आर्थिक अडचणीत सापडू लागले. कर्जाचा डोंगर वाढत गेल्याने अनेकांचे संसार उध्वस्त होत होते. यातून मार्ग काढण्यासाठी शंकरराव काळे यांनी कोपरगाव तालुक्यात विविध प्रकारच्या सहकारी वित्तसंस्थांची निर्मिती केली.

माहेगाव सहकारी सेवा संस्था[३३]

दुष्काळ हा कोपरगाव तालुक्याच्या पाचवीलाच पुजलेला असल्याने शेती किंवा त्यावर आधारलेले इतर उद्योग तेथे भरभराटीला आलेले नव्हते. त्यामुळे परिसराची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय होती. नांदूर-मधमेश्वर ह्या धरणाचे पाणी तालुक्याच्या काही गावात

शेतामध्ये खेळू लागले तेव्हा मात्र कोपरगावचा ग्रामीण परिसर बराच बदलला. दरम्यान महाराष्ट्राच्या इतर भागात विविध पातळ्यांवर सहकाराने चांगलाच जोर धरलेला होता. विशेषतः ग्रामीण भागात सहकारी सोसायट्या, पतसंस्था, दूधसंस्था, ग्राहक भांडार, आदिवासी गृहनिर्माण संस्था, पाणी पुरवठा सहकारी संस्था, खरेदी विक्री संघ अशा स्वरूपाच्या सहकारी संस्था स्थापन होत होत्या. या संस्थांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाला एक नवे रूप दिले. या संस्था शेतकऱ्यांच्या, शेत मुजरांच्या जीवनाचा आधारस्तंभ बनल्या होत्या. त्यामुळे ही बाब कोपरगाव तालुक्यातील सामाजिक भान लक्षात ठेवून लोकांसाठी काम करणाऱ्या तरुणांच्या लक्षात आले.

दक्षिण गंगा समजल्या जाणाऱ्या गोदावरीच्या तिरावर वसलेले माहेगाव देशमुख हे तसे दुष्काळाने होरपळून निघालेले गाव त्यामुळे नांदूर-मधमेश्वरच्या पाण्याने गावचा शिवार हिरवागार केल्यानंतरही या गावाला विकासाचा नेमका मार्ग सापडेना. गावची शेती पाण्याखाली आल्यानंतर परिसराचे आर्थिक चित्र पालटले. तरी लोकांची आर्थिक विवंचना मिटत नव्हती. त्यामुळे माहेगावचे शेतकरी सावकाराच्या कचाट्यात सापडले होते. कोपरगाव तालुक्यातील पहिला पदवीधर म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जायचे ते शंकरराव काळे याच माहेगाव देशमुखचे आहेत. उच्च शिक्षण घेतलेल्या या तरुणाचे लक्ष गावातील शेतकरी बांधवांच्या आर्थिक प्रश्नाकडे गेले. दरम्यान लोकल बोर्डातील चांगली नोकरी सोडून त्यांनी सामाजिक कार्यात उडी घेतलेलीच होती. त्यातच १९५२ सालच्या विधानसभा निवडणुकीने त्यांना अनेक गोष्टी शिकविल्या. त्यातून त्यांना गावचा विकास करण्याची प्रेरणा मिळाली. गावपातळीवर एखादी सहकारी सेवा सोसायटी काढली तर माहेगावच्या लोकांना मदत होऊ शकेल. असा विचार शंकरराव काळे यांच्या मनात आला. हा विचार त्यांनी गावातल्या काही कार्यकर्त्यां पुढे मांडला. त्यातूनच ३० एप्रिल १९५३ रोजी 'माहेगाव देशमुख विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.' या सोसायटीची स्थापना करण्यात आली. या संस्थेमुळे गावातील एकूण विकासाला चालना तर मिळालीच परंतु संपूर्ण गावाला सहकाराच्या तत्त्वाने एकत्र गुंफून प्रत्येकाला स्वावलंबी करण्याचा सोसायटीने केलेला प्रयत्न वाखाणण्याजोगा आहे. शेतकरी व शेतमजुरांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन सोसायटीने प्रथम लोकांना अत्यावश्यक वस्तूंची सेवा पुरविली. यामध्ये प्रामुख्याने बी-बियाणे, खते, किटकनाशके, पशुखाद्य, पेट्रोल, डिझेल व रॉकेल अशा काही वस्तूंचा समावेश होता. सोसायटीने या वस्तू 'ना नफा-ना तोटा' या तत्त्वावर उपलब्ध करुन दिल्या आहेत.

शंकरराव काळे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने विविध कल्पना लढवून गावात विकासाची मुहूर्तमेढ रोवली. लहानातल्या लहान शेतकऱ्याला शेतीसाठी पाणी मिळाले पाहिजे म्हणून सोसायटीने गोदावरी नदीवरील दत्तसागर पाण्याचा योग्य वापर करता यावा म्हणून श्री दत्त दिगंबर, कुंभारी-माहेगाव आणि पांडुरंग रोकडे अशा तीन सहकारी पाणी उपसा जलसिंचन संस्था स्थापण्यास हातभार लावला. सोसायटीच्या माध्यमातून दुभती जनावरे घेण्यासाठी शेतकरी व शेतमजुरांना अर्थसहाय्य केले. दूध उत्पादन वाढीसाठी म्हणून रास्त किंमतीत पशु-खाद्य उपलब्ध करुन दिले. त्याचबरोबर या व्यवसायाच्या वाढीसाठी म्हणून गावात श्रीकृष्ण सहकारी दुग्ध व्यवसाय संस्था, राधाबाई काळे दूध उत्पादक सहकारी संस्था यांची स्थापना केली. यामुळे लोकांना जोडधंदा मिळाला. सोसायटीने 'ना नफा-ना तोटा' या तत्त्वावर गरीबांसाठी स्वस्त धान्य दुकानही सुरु केले आहे. त्याचप्रमाणे सोसायटीच्या सभासद शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसारख्या वाहनांसाठी लागणारे इंधन जवळ आणि वेळेत उपलब्ध व्हावे म्हणून सोसायटीने स्वतःच्या जागेत इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचा एक पेट्रोल पंप सुरु केला आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाची सुरक्षित साठवणूक व्हावी म्हणून सोसायटीने गावातच सहा गोदामे बांधून लोकांना उपलब्ध करुन दिली आहे. २५०० मे. टन क्षमतेची ही गोदामे धान्यबरोबरच खते साठविण्यासाठी वापरली जातात. आदिवासी व इतर गोर-गरीब मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून सोसायटीमार्फत श्री. काळे यांनी अनेक पातळीवर प्रयत्न केले आहेत. थोडक्यात सांगायचे तर आज उभ्या असलेल्या कोसाका उद्योग समूहाची मुहूर्तमेढ श्री. काळे यांनी या संस्थेद्वारे रोवली आहे.

कोसाका पगारदार नोकरांची सहकारी पतपेढी [३४]

१९५६ साली कोपरगाव सहकारी साखर कारखाना सुरु झाल्यानंतर परिसरातील अनेकांना रोजगार मिळाला या कामगारांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी एखादे दुकान कारखाना परिसरात असावे असा विचार काळे यांच्या मनात आला. त्याला कारखान्यातील सर्व अधिकारी व कामगार यांनी उचलून धरले. त्यातूनच १५ जुलै १९५७ रोजी 'कोसाका पगारदार नोकरांची सहकारी पतपेढी मर्या., गौतमनगर' ही पतसंस्था स्थापन करण्यात आली. पतसंस्थेने कामगारांबरोबरच परिसरातील लोकांच्या दैनंदिन गरजा विचारात घेऊन एक विविध वस्तू भांडार सुरु केले आहे. कारखाना परिसरातील लोकांना लग्नासारखी छोटी-

मोठी कार्ये नीट पार पाडता यावीत म्हणून एक मंगल कार्यालय उभारले आहे. शिवाय कापडदुकान, पिठाची गिरणी, स्वस्तधान्य दुकान, एस.टी.डी. बुथ, मेडिकल दुकान, कँटीन व साखर विक्री अशा अनेक प्रकारच्या सेवा या पतपेढीमार्फत उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

या पतसंस्थेकडे असलेले खेळते भांडवल २७ हजारांवरून १ कोटी ५७ लाखांवर पोहचले आहेतर शेअर्स भांडवल ७ हजारावरून २१ लाख ३६ हजार इतके वाढले आहे. कारखाना कार्यस्थळावर आज संस्थेची भव्य इमारत असून त्याच इमारतीत कोसाका बझार, मंगल कार्यालय आणि पतसंस्थेचे ऑफिस अशा सर्व गोष्टी एकत्रित केल्या आहेत.

गौतम सहकारी बँक लिमिटेड गौतमनगर[३५]

कोपरगाव सहकारी साखर कारखाना आणि त्याच्या माध्यमातून सुरु झालेल्या इतर संस्थांमुळे परिसरात चैतन्य निर्माण झाले होते. परंतु विकासाच्या पातळीवर अद्यापही आपण मागे आहोत याची जाणीव श्री. काळे यांना सतत होत होती. कारखान्याच्या एकूण प्रगतीमुळे ऊस उत्पादकांच्या हाती चार पैसे खेळू लागले होते. तसेच कारखान्याच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाल्याने कामगार कष्टकऱ्यांच्या हातीही बऱ्यापैकी पैसा आला. शिवाय अडीनडीला सोसायट्या, पतसंस्था यांचा आधार होता. अनेक मुले शिकून उच्च पदावर नोकऱ्या करु लागले तर काही जण शिकून शेती करु लागले. मात्र काही काळाने शेतीवरचा बोजा वाढत जाऊन शेतीही परवडेनाशी होईल, तेव्हा नवे प्रश्न उपस्थित होतील. हे शंकरराव काळेंनी ओळखले आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी शेतीला पर्याय म्हणून लहान-मोठे उद्योग इथल्याच लोकांकडून उभे राहिले पाहिजेत असा एक विचार त्यांच्या मनात आला. त्यासाठी कर्जपुरवठा करणारी आपल्या परिसरातीलच एक सहकारी बँक असली पाहिजे असा त्यांनी विचार केला. त्यातूनच १४ मार्च १९७७ रोजी 'गौतम सहकारी बँक लिमिटेड' या बँकेची स्थापना त्यांनी केली.

स्थापनेपासून आजतागायत बँकेने आपल्या शाखांचा विस्तार वाढवत अहमदनगर जिल्ह्यासह नाशिक, औरंगाबाद, पुणे आणि ठाणे हे जिल्हे कार्यक्षेत्रात आणले आहेत. एवढेच नव्हे तर बँक आज आपल्या एकूण १५ शाखांद्वारे ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लावते आहे. आज ३० वर्षांच्या काळात बँकेने केलेल्या कर्जपुरवठ्यामुळे अहमदनगर आणि

नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण परिसराचा मोठा विकास झालेला दिसतो. कारण या काळात बँकेने व्यापार, नित्योपयोगी वस्तू खरेदी, पगारापोटी कर्ज, सोनेतारण कर्ज, कुटीर उद्योग, स्वयंरोजगार, शेती व शेतीपुरक उद्योग तसेच ट्रान्सपोर्ट, छोटी-मोठी दुकाने, गॅरेजस, हॉटेल्स अशा अनेक कारणांसाठी खेड्यातील जनतेला अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिलेले आहेत.

ग्रामीण भागातील महिलांना क्षमता असूनही इतर व्यवसायाची संधी न मिळाल्याने शेतीतल्या कामाशिवाय पर्याय नसतो. कष्ट करण्याची प्रचंड ताकद असणाऱ्या ग्रामीण महिलांना जर योग्य दिशा मिळून किमान अर्थसहाय्य उपलब्ध झाले तर त्या आपल्या संसारास हातभार लावू शकतात, ही बाब लक्षात घेऊन बँकेने गृहउद्योग सुरु करु इच्छिणाऱ्या महिलांना आवश्यक तेवढे अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिलेले आहे.

गेल्या ३० वर्षांच्या कारकिर्दीत बँकेने आपली प्रगती करुन दाखविली आहे. तसेच आपल्या विविध शाखांच्या माध्यमातून नगर आणि नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण जनतेच्या घरापर्यंत विकासाची गंगाही नेली आहे. सुशिक्षित बेकारांना वेगवेगळ्या धंद्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देऊन त्यांचे संसार उभे केले आहे. किराणा मालाच्या दुकानापासून अगदी एखाद्या मोठ्या वर्कशॉप पर्यंत अशा विविध कारणांसाठी अर्थसहाय्य केले आहे. शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, ट्रक्स, वैयक्तिक वापरासाठीची वाहने घेण्यासाठी तसेच शेतात पाण्याचा पंप बसवायचा असेल, तसेच पाईपलाईन टाकायची असेल तर गौतम बँक सदैव अशा शेतकऱ्यांच्या मागे उभी असते असे दिसून आले आहे. एक सामाजिक बांधिलकी म्हणूनही बँकेने आजपर्यंत अनेकांना सढळ हाताने मदत केलेली आहे. बँकेचे सभासद आणि कर्जदार यांची जनता अपघात विमा पॉलीसी उतरवून त्यांना संरक्षण दिले आहे. त्याचप्रमाणे खातेदारांच्या ठेवींनाही विमा संरक्षण उपलब्ध करुन दिलेले आहे. एवढेच नव्हे तर देशाच्या सीमांचे संरक्षण करताना शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबियांना बँकेने वेळोवेळी मदत केली आहे.

अनेक उपक्रम राबवत असतानाच बँकेने कोसाका कारखाना परिसरात आपल्या मुख्य कार्यालयासाठी ३६ लाख रुपय खर्चून सुसज्ज इमारत बांधली आहे. याठिकाणी आज सर्व व्यवहार संगणकाद्वारे करण्यात येतात. कोपरगाव येथील शाखेचीही इमारत २९ लाख रुपये खर्चून बांधली आहे. आज बँकेने मोठा शाखा विस्तार केला आहे. अहमदनगर, नाशिक, पुणे, औरंगाबाद व ठाणे एवढ्या कार्यक्षेत्रात बँकेच्या जवळजवळ १५ शाखा कार्यरत

आहेत. आज रोजी बँकेचे अधिकृत भागभांडवल २०० लाखांचे असून सभासद संख्या १५९०३ इतकी आहे. तसेच सर्व शाखा मिळून बँकेत १५९ कर्मचारी आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात नवे उद्योग सुरु व्हावेत आणि त्यातून ग्रामीण युवकांना पर्यायी रोजगार उपलब्ध होऊन शेतीवरचा भार कमी व्हावा हा शंकरराव काळे यांनी मांडलेला विचार बँकेचे सूत्रधार आमदार अशोकराव काळे यांच्यासह सर्व संचालक अंमलात आणत आहेत. म्हणूनच बँकेकडे ११८ कोटींच्या ठेवी जमा असून ८५ कोटी रुपयांपर्यंत कर्जाचे वाटप झालेले आहे. आकर्षक व्याज दरामुळे बँकेने आपल्या ठेवीत वाढ करुन ग्रामीण परिसराच्या विकासात मोठी भर टाकली आहे.

शरद पवार नागरी सहकारी पतसंस्था[३६]

आर्थिक विकासाला जास्तीत जास्त हातभार लागावा म्हणून शंकरराव काळे यांनी श्री. शरद पवार यांच्या नावाने आणखी एक छोटी पतसंस्था १९८८ साली स्थापन केली आहे. आज या पतसंस्थेकडे २५ लाख रुपयांच्या ठेवी जमा आहेत.[३७] ही संस्था केवळ कोसाका उद्योग समूहातील कर्मचाऱ्यांसाठीच केलेली आहे असे नाही. एका मर्यादित क्षेत्रात ही संस्था आपले काम करीत असून सतरा-अठरा वर्षांच्या काळात पतसंस्थेने बरीच प्रगती केली आहे. थोडक्यात शंकरराव काळे यांनी तालुक्यात विविध प्रकारच्या वित्तसंस्था निर्माण केल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना सहकारी संस्थांचे महत्त्व पटू लागले.

कोपरगावचे सामाजिक स्थित्यंतर

कोपरगाव हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले गाव आहे. कोपरगावची वसाहत प्राचीन आहे. सहाव्या शतकाच्या प्रारंभी दासगणू महाराजांनी गोदावरी प्रदक्षिणा केली असावी. त्यांनी गोदावरी महात्म्यांची रचना केली आहे. यामध्ये शुक्राचार्य यांना शिवाने याठिकाणी अमृतसंजिवनी विद्या दिली म्हणून हे स्थान 'शुक्रतिर्थ' या नावाने प्रसिद्ध झाले. परंतु नंतरच्या काळात नैसर्गिक कारणामुळे गोदावरी नदीने आपल्या प्रवाहाची दिशा बदलली. या संदर्भात दासगणू महाराज लिहितात, 'गंगा कोपरी धरिली' म्हणून कोपरगाव याचाच अर्थ असा की, गोदावरी नदीचा प्रवाह बदलण्याची घटना कोपरगाव या स्थाननामाच्या संदर्भात महत्त्वाची आहे. या स्थानावर राहणारी माणसे कोपरे या नावाने ओळखली जाऊ लागली. आजही कोपरगावमध्ये मराठा व महार समाजामध्ये या आडनावाचे लोक आहेत. हे लोक गावचे वतनदार म्हणून ओळखले जातात.

कोपरगाव शहराच्या तीनही बाजूंने गोदावरी नदीचा प्रवाह आहे. चौथ्या बाजूस जुना खंदकनाला आहे. गोदावरी नदीला पूर आल्यानंतर हे शहर चारही बाजूने पाण्याने वेढले जाते. कोपरगावची रचना मध्ययुगीन ग्रामरचनेप्रमाणे आहे. पूर्व दिशेला नदी किनारी गावची जूनी वेस आहे. प्रवेश द्वारातच दत्त मंदिर, महादेव मंदिर, मुरलीधर मंदिर, हनुमान मंदिर, अमृतेश्वर मंदिर ही मध्ययुगीन काळातील मंदिरे आहेत. हे ठिकाण सराफ बाजार/सराफ फाटा या नावाने ओळखला जातो. सुवर्ण कारागिरांची व व्यापाऱ्यांची लोकवस्ती याठिकाणी आजतागायत कायम आहे. ही घरे वाडापद्धतीची आहेत. गावाच्या मध्यभागी पवार सरकार यांचा वाडा आहे व जवळच काळभैरवनाथ मंदिर आहे. त्याच्या पुढे गेल्यानंतर ब्राह्मणगल्ली नंतर पांडे गल्ली आहे. त्याच परिसरामध्ये पेशव्यांचा वाडा आहे. कोपरगावचे पाटिलकीचे वतन कोपरे, नरोडे, आढाव व रुईकर या घराण्यांकडे होते. यांचे वाडे गावच्या मध्यवर्ती वसाहतीमध्ये आहेत. गावठाणामध्ये कुंभारवाडा, चांभारवाडा, महारवाडा, धनगरवाडा, गवंडीवाडा, सुतारवाडा, कहार गल्ली, खाटीक गल्ली, परीट गल्ली, गुरव गल्ली, तेली आळी, रंगारी गल्ली, गोसावी मठ, लक्ष्मीमाता मंदिर, महार चावडी, जैन मंदिर, बाजार तळ, गोकर्ण गणेश मंदिर, बिरोबा मंदिर, जामा मश्जिद या वास्तू सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाच्या द्योतक आहेत. कोपरगाव जवळ गोदावरी नदीने अर्धचंद्राकृती वळण घेतले आहे. म्हणून तिला पुण्यक्षेत्र असे स्वरूप प्राप्त झाले आहे.

ब्रिटिश राजवटीमध्ये कोपरगावच्या शेतीक्षेत्रात झालेले बदल भौगोलिकदृष्ट्या वाढलेला विस्तार, स्थलातंरीतांच्या समस्या, उभी राहिलेली चाळ संस्कृती त्याचबरोबर आधुनिक गृहनिर्माण प्रकल्प अशी संमिश्र समाजसंस्कृती उभी राहिली. त्याचबरोबर अनधिकृत झोपडपट्टी, चोहोबाजूंनी उभी राहिली. ब्रिटिश सरकारने बांधलेल्या धरणांमुळे जलसिंचनाच्या क्षेत्रात मोठे बदल झाले. शेतीउत्पन्न व कारखानदारी वाढली. १९४५ नंतर सहकाराची संस्कृती रूजू लागली. कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन झाली. साखर कारखाने उभे राहिले आणि कोपरगाव परिसराचा आर्थिकदृष्ट्या कायापालट झाला.

कोपरगावचे सांस्कृतिक स्थित्यंतर

विविध धर्मीय लोक कोपरगावमध्ये एकत्र राहतात. सर्वधर्म समभाव व स्विकार या तत्त्वांचा अवलंब करुन सर्वजण एकमेकांच्या धार्मिक उत्सवात सहभाग घेतात. जैन धर्मीय मोठ्या उत्साहाने महावीर जयंती, हरिजन बांधव आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराजांचा

जन्मोत्सव, शिर्डी येथे साजरा होणारा रामनवमी उत्सव, कोपरगावला महाशिवरात्रीच्या दिवशी भरणारी यात्रा, तिचे संमिश्र स्वरूप, कृषी प्रदर्शने, ग्रामदैवत विरोबाची यात्रा अशा विविध सन उत्सवांनी परिसराचे सांस्कृतिक जनजीवन संपन्न झाले आहे.

यात्रा उत्सवांप्रमाणेच वासुदेव समाजाचे दैनंदिन काम चालू आहे. श्रावण महिन्यामध्ये दररोज पहाटे तो प्रत्येक पेठेत जाऊन समाजजागृतीचे काम करतो. भारूड ही लोककला जपण्याचे काम व तिचा समाजप्रबोधनासाठी वापर करण्यामध्ये भानुदास बैरागी, प्रभाकर जाधव, बाबासाहेब कोपरे, रामभाऊ महाजन यांनी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी भानुदास बैरागी यांना कला, सांस्कृतिक क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे.

कोपरगाव परिसरात अजूनही बहुरुपी हा कलाकार मोहिनीराज नगरमध्ये वास्तव्यास आहे. तो पोलीस असल्याचे भासवून (मात्र कोणासही न फसवता) लोकांकडून काहीतरी आर्थिक मदतीची अपेक्षा करतो. तमाशा क्षेत्रामध्ये कौसल्याबाई कोपरगावकर यांनी अर्थपूर्ण कामगिरी केल्यामुळे त्यांना १९६६ मध्ये राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. संगीतक्षेत्रामध्ये नाव कमाविणारे सी. रामचंद्रन उर्फ रामचंद्र चितळीकर हे कोपरगाव तालुक्याचे सुपूत्र. १९५२ मध्ये अण्णा आढाव यांनी आनंद संगीत विद्यालयाची स्थापना करुन परिसरामध्ये संगीताची गोडी रुजविली.

नाट्यसंस्कृतीमध्ये गंगाधर अण्णा बागुल यांनी फुलपाखरे, जाल का खेड्यात?, वंदे मातरम्, देव माणूस, आग्र्याहून सुटका या नाटकांमध्ये केलेल्या भूमिका अतिशय गाजल्या. त्यांनीच साकारलेले करील ते पूर्व हे नाटक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर असून ते राष्ट्रवादाने प्रेरित होते. परिणामी ब्रिटिश सरकारने त्यावर बंदी घातली.

स्वातंत्र्योत्तर काळात समाजवादी विचारसरणीचा प्रभाव वाढविण्याचे काम राष्ट्रसेवादलाच्या माध्यमातून मामासाहेब गवारे यांनी हाती घेतले. स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले आहे. १९६८ मध्ये कोपरगावला शेतमजूरांचे पहिले अधिवेशन भरविले. 'जमिनीचे फेरवाटप करा!' ही घोषणा दिली. मात्र तिचा प्रभाव फार काळ टिकू शकला नाही.

जलसिंचनाचे क्षेत्रफळ वाढल्याने शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊ लागले. कोरडवाहू जमीन आता बागायतीमध्ये रुपांतरीत झाली. पूर्वी सामान्य माणूस अन्यठिकाणी शेतमजूर म्हणून दररोज कामाच्या शोधात होता. आता तोच स्वतःच्या शेताचा मालक झाला व शेतमाल

पिकवू लागला. त्याची क्रयशक्ती वाढली. त्याच्याच शेतावर तो अन्य शेतमजूरांना काम देऊ लागला. परिणामी पूर्वीच्या पाटलाच्या शेतीवर कामाला जाणे हा प्रकार कमी झाला. आता सरदार, पाटील घराण्यातील लोक शेतीच्या कामासाठी मजूरांचा शोध घेत सामान्यांच्या वस्तीत येत आहेत असे चित्र दिसते.

पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेती व औद्योगिक क्षेत्रामध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या. मराठवाडा, खानदेश, विदर्भ, अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, कर्जत तालुक्यातून विविध जातीधर्माचे लोक कोपरगावमध्ये रोजगाराच्या निमित्ताने स्थायिक झाले. ते विविध धर्माचे असले तरी एका हेतूने एकत्र आल्याने त्यांच्यात जात-पात हा प्रकार उरला नाही. असा संमिश्र समाज कोपरगावमध्ये उभा राहिला. सामाजिक स्थित्यंतरामध्ये यासर्व बाबी महत्त्वपूर्ण आहेत. पुणे परिसरामधून बोरावके, रासकर, गिरमे, जाधव, कुदळे, बडदे, अबनावे, पांढरे, कोद्रे या उपनामांची घराणी कोपरगाव परिसरात येऊन स्थायिक झाली.यापैकी बडदे घराण्यातील भीमराव बडदे हे खासदार म्हणून निवडून आले होते. आज हे सर्वजण कोपरगावच्या विकासाचे शिल्पकार ठरत आहे.

अशाप्रकारे मध्ययुगीन कोपरगावचे रुपांतर स्वातंत्र्योत्तर कालावधीत आधुनिक व्यापारी केंद्रात त्याचप्रमाणे औद्योगिक नगरीमध्ये झाले आहे. कोपरगाव शहरामध्ये आधुनिकता जाणवू लागली. मोठमोठ्या इमारती, शैक्षणिक संस्था, वित्त संस्था स्थापन झाल्या. शैक्षणिक स्तर उंचावला. या सर्व जडणघडणींमध्ये रोहमारे, औताडे, आढाव, कोल्हे, काळे, कोयटे, ठोळे, शिरोडे, अजमेरे, मुंदडा, भोकरे, वहाडणे, सातभाई, कोऱ्हाळकर, भन्साळी, आढाव, रुईकर, गायकवाड, गिरमे, बोरावके, सोनार, मुंदडा, मेहता, फरांदे, फडके, परजणे या सर्व व्यक्ती व घराण्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. यापुढील प्रकरणामध्ये प्रबंधातील मांडणीचे निष्कर्ष दिले आहेत.

प्रबंधाच्या या चारही प्रकरणांमध्ये कोपरगाव परिसराच्या इतिहासाची मांडणी केली आहे. पुढील प्रकरणामध्ये मांडणीचे निष्कर्ष दिलेले आहेत.

संदर्भ व तळटिपा

१. अ. रा. कुलकर्णी, **कंपनी सरकार**, पुणे, १९९९, पृ. ७६.

२. M. D. David, **Mission: Cross Culture Encounter & Changes in Western India,** New Delhi, 2001, p. 207.

३. **Bombay Gazetter**, Poona, 1883, p. 61.

४. कोपरगाव परिसराचा स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग यासाठी सविस्तर पहा -

1. **Ahamadnagar Gazetter**, Bombay, 1976, p. 261
2. Sanjiv Desai (Ed.), **Calender of the Quit India Movement in the Bombay Presidency**, Bombay, 1985, p.10-30
3. K. K. Chaudhari (Ed.), **Source Material for a History of Freedom Movement, Civil Disobedience Movement**, Bombay, 1990.

५. शंकरराव कोल्हे, **महाराष्ट्र विकासाचे नवे पर्व**, कोपरगाव, १९९१, पृ. ४०.

६. शिक्षण मंडळ, कोपरगाव तालुका कार्यालय, धारिकेच्या आधारे नोंदी.

७. कोपरगाव पंचायत समिती कार्यालय, धारिकेच्या आधारे नोंदी.

८. प्रत्यक्ष क्षेत्रभेट सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेली माहिती.

९. कित्ता.

१०. कित्ता.

११. कित्ता.

१२. कित्ता.

१३. के. जे. सोमैय्या महाविद्यालयास नॅक समितीने दिलेले मूल्यमापन प्रमाणपत्र.

१४. एस्.एस्.जी.एम्. महाविद्यालयास नॅक समितीने दिलेले मूल्यमापन प्रमाणपत्र.

१५. प्रत्यक्ष क्षेत्रभेट सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेली माहिती.

१६. गणेश देशमुख (संपा.), **गोदातरंग**, महाविद्यालय वार्षिक विशेषांक, २००२.

१७. प्रत्यक्ष क्षेत्रभेट सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेली माहिती.

१८. श्री. राजेश परजणे यांच्या मुलाखतीच्या आधारे मिळालेली माहिती.

१९. प्रत्यक्ष भेट पशुवैद्यकिय कार्यालय, कोपरगाव यांच्या कार्यालयीन धारिकेच्या आधारे.

२०. प्रत्यक्ष भेट कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालय, कोपरगाव यांच्या कार्यालयीन धारिकेच्या आधारे.

२१. प्रत्यक्ष भेट, मध्यवर्ती एस्.टी. मध्यवर्ती कार्यालय, कोपरगाव यांच्या कार्यालयीन धारिकेच्या आधारे.

२२. सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालय, कोपरगाव यांच्या कार्यालयीन धारिकेच्या नोंदीनुसार.

२३. श्री. काका कोयटे यांच्या मुलाखतीच्या आधारे व त्यांनी सुचविलेल्या व्यक्तीनामांप्रमाणे या मुद्याचे लेखन केले आहे.

२४. श्री. रामदास पाटील होन, श्री. जोंधळे गुरूजी व श्री. अशोकरावजी रोहमारे यांच्या मुलाखतीच्या आधारे.

२५. स. म. कुलकर्णी (संपा), साप्ताहिक गोदाजल, कोपरगाव, २००९, व श्री. राजेश परजणे यांच्या मुलाखतीच्या आधारे.

२६. अरूण खोरे (संपा), **महाराष्ट्र : विकासाचे नवे प्रवाह**, (संजीवनी रौप्यस्मृती-ग्रंथ), कोपरगाव, १९९१.

२७. संजीवनी सहकारी साखर कारखाना यांच्या कार्यालयाचे मागील वार्षिक अहवालातील नोंदींच्या आधारे या उपघटकाचे लेखन केले आहे.

२८. मा. शंकरराव काळे यांची मुलाखत, दि. २० फेब्रुवारी, २०१०.

२९. कोपरगाव सहकारी साखर कारखाना यांच्या कार्यालयाचे मागील वार्षिक अहवालातील नोंदींच्या आधारे या उपघटकाचे लेखन केले आहे.

३०. मा. शंकरराव काळे यांच्या मुलाखतीच्या आधारे.

३१. कोपरगाव सहकारी साखर कारखाना यांच्या कार्यालयाचे मागील वार्षिक अहवालातील नोंदींच्या आधारे या उपघटकाचे लेखन केले आहे.

३२. प्रत्यक्ष क्षेत्रभेट सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेली माहिती.

३३. माहेगाव सहकारी सोसायटीच्या वार्षिक अहवाल, कोपरगाव, २००३, पृ. २१-३०

३४. भाऊसाहेब ढगे (संपा.), वार्षिक अहवाल, कोपरगाव नोकरांची पतपेढी, कोपरगाव, २००७, पृ. ३६.

३५. प्रत्यक्ष बँकेस क्षेत्रभेट देऊन मिळालेल्या माहितीच्या आधारे.

३६. प्रस्तुत संस्थेच्या मागील दहा वर्षांच्या वार्षिक अहवालाच्या आधारे या उपघटकाचे लेखन केले आहे.

३७. कित्ता.

प्रकरण चौथे

कोपरगावमधील सहकार चळवळ

अहमदनगर जिल्हा हा उत्तर अक्षांश १८.२° ते १९.९° पूर्व रेखांश ७३.९° ते ७५.५° या दरम्यान विस्तारलेला आहे.[१] अहमदनगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडतो. त्यामुळे जिल्ह्यात सरासरी पावसाचे प्रमाण कमी आहे. जिल्ह्यातील पावसाची सरासरी नोंद ५५ से.मी. इतकी आहे. हवामान विषम आहे. हिवाळा व उन्हाळा कडक असतो. उन्हाळ्यात तापमान कमाल ४१° असते तर हिवाळ्यात किमान १२° इतके असते. पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे सतत दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागते आहे. भौगोलिकदृष्ट्या अहमदनगर जिल्ह्याचे चार भाग पडले आहे.

१) अतिशय पावसाचा प्रदेश-अकोले तालुक्याचा आंतर्भाव या विभागात होतो.

२) खुप कमी पावसाचा प्रदेश - अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा, संगमनेर, कर्जत या तालुक्यांचा या विभागात अंतर्भाव होतो. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४८% क्षेत्रफळ या भागाचे आहे.

३) मध्यम पावसाचा प्रदेश - कोपरगाव, राहता, श्रीरामपूर, राहूरी या तालुक्यांचा अंतर्भाव या विभागात होतो. या भागात पर्जन्य कमी आहे. परंतु गोदावरी, मुळा, प्रवरा या नद्यांच्या पाटपाण्यामुळे येथे बागायती पिके घेतली जातात.

४) सर्वसाधारण पावसाचा प्रदेश - या विभागामध्ये नेवासा, जामखेड, शेवगाव, पाथर्डी या तालुक्यांचा समावेश होतो.

अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ

अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७,०७१ चौ.कि.मी. इतके आहे. किंवा ६,४७२ चौरस मैल आहे. या जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत. हा जिल्हा दक्षिण भारतातील दुष्काळाचे प्रतिक आहे. या जिल्ह्यातील लोकांचा व्यवसाय प्रामुख्याने शेती हा आहे. नैसर्गिक परिस्थिती प्रतिकूल असताना सहकार चळवळीच्या माध्यमातून आणि सहकारी संस्थांच्या साह्याने दुष्काळाचे सुकाळात रुपांतर करुन जिल्ह्याने आपल्या समस्यांवर आपणच मार्ग

शोधला आहे. या जिल्ह्यात आज दोन साधनामुळे नवजीवन प्राप्त झाले आहे. एक म्हणजे शेतीमध्ये पाणी खेळवणारा कालवा आणि दुसरा म्हणजे माणसामध्ये पाण्याप्रमाणे खेळणारा सहकार यामुळे आज अहमदनगर जिल्ह्याने दुष्काळावर मात करुन आपले भाग्य उजळले आहे.[२]

कोपरगाव तालुका : भौगोलिक पर्यावरण

सह्याद्रीच्या गिरीशिखरातून अनेक नद्यांचा उगम झाला आहे. त्यापैकी त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरी डोंगरावर गोदावरी नदीचा उगम झाला आहे. ही नदी नाशिक जिल्ह्यातून वहात वहात कोपरगाव तालुक्याच्या हद्दीत अहमदनगर जिल्ह्यामध्ये प्रवेश करते. या नदीच्या तीरावर कोपरगाव हे तालुक्याचे गाव वसलेले आहे. या नदीच्या प्रवाहामुळे कोपरगाव तालुक्याचे दोन भाग पडले आहे. याच नदीवर ब्रिटिश कालखंडात गंगापूर, नांदूर मधमेश्वर ही धरणे बांधून कोपरगावच्या दुष्काळी भागाचा प्रश्न सोडविला गेला आहे. या धरणांमुळे व गोदावरी नदीतील पाण्याच्या उपलब्धतेमुळे कोपरगाव परिसर हा शेतीच्या क्षेत्रात अग्रेसर ठरत आहे. अहमदनगर जिल्ह्यात पारनेर, कर्जत, जामखेड हे पर्जन्यछायेचे तालुके आहेत. कोपरगाव परिसर पर्जन्यछायेमध्ये येत असला तरी जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे तो आता ऊस उत्पादकांचा व विपुल जलसंपदेचा परिसर बनला आहे.

तालुक्याचे भौगोलिक स्थान

कोपरगाव हे ठिकाण अहमदनगरच्या दक्षिणेस १०० कि.मी. अंतरावर असून १९° ते ५२° उत्तर अक्षांश व ७४° ते ३३° पूर्व रेखांशावर आहे. समुद्रसपाटीपासून उंची १,८५३ फूट (४९४ मीटर) आहे. तालुक्याचे क्षेत्रफळ १,०४,४८० हेक्टर आहे. कोपरगाव हा अहमदनगर जिल्ह्यातील उत्तरेकडील शेवटचा तालुका आहे. कोपरगावच्या उत्तरेस नाशिक जिल्हा व पूर्वेस औरंगाबाद जिल्हा आहे.[३]

हवामान व पर्जन्यमान[४]

कोपरगाव तालुक्यात सरासरी ४३ से.मी. (१८ इंच) पाऊस पडतो. वर्षातील कमाल तापमान ३५° सेंटीग्रेड तर किमान तापमान १२° सेंटीग्रेड असते. कोपरगाव हा विषम हवामान असलेला तालुका आहे. पुढे पर्जन्यमानाचा तक्ता दिला आहे.

महिना	महिन्यातील एकूण पर्जन्यमान एम.एम.	पावसाचे एकूण दिवस	२४ तासातील सर्वाधिक पाऊस	तारीख आणि वर्ष
जानेवारी	३.८	०.४	४५.३	८ (१९५४)
फेब्रुवारी	०.६५	०.१	५०.५	८ (१९४१)
मार्च	५.१०	०.६	७८.५	१९ (१९३१)
एप्रिल	११.८०	०.८	१२१.२	१६ (१९१५)
मे	२६.५०	०.९	१२२.४	२३ (१९४८)
जून	१३२.४०	७	१५८	२८ (१९३१)
जुलै	१०२.२०	५	१४६	२६ (१९९०)
ऑगस्ट	९८.५०	५	१७२	०३ (१९५७)
सप्टेंबर	१७५.६०	८	१५०	१८ (१९७०)
ऑक्टोबर	८३.४०	४	१४५.२	३ (१९५७)
नोव्हेंबर	३३.५०	०.९	१२८.२	२३ (१९४८)
डिसेंबर	८.२०	०.५	६८.३	०३ (१९६२)
एकूण	६८१.६४	३३.२	१९०.६	१८ (१९७०)

कोपरगाव तालुक्याची प्राकृतिक वैशिष्ट्ये

कोपरगाव तालुक्यातील गोदावरी नदीकाठावरील उत्तर व दक्षिण दोन्ही तीरावरील जमीन काळी कसदार आहे. आजूबाजूला डोंगर नाहीत. या तालुक्यात खनिजपदार्थ उपलब्ध नाहीत. बागायती शेतीसाठी हा तालुका अग्रेसर आहे. एकूण (९३,३३६ हेक्टर) क्षेत्रफळापैकी लागवडीखालील क्षेत्र ६४,३८४ हेक्टर २० आर. आहे. त्यामध्ये ५,९५६.७९ हेक्टर कॅनॉल बागायत व २७,६४३.०१ हेक्टर विहिर बागायत व ४७३.१४ हेक्टर इतर साधनांने बागायत असे एकूण ३४,०७२.९४ हेक्टर बागायत क्षेत्र आहे.[५]

कोपरगाव तालुक्याला कालव्यामार्फत पाणीपुरवठा करणारा गोदावरी डावा तटकालवा १९१५ मध्ये तयार करण्यात आला. गोदावरी नदीवरील गंगापूर धरणातील पाणी नांदूरमधमेश्वर बंधाऱ्यात आणण्यात येते. त्या ठिकाणाहून डावा व उजवा तटकालवे

कोपरगावच्या शेतीला पाणीपुरवठा करतात. डाव्या तटकालव्याची कोपरगाव तालुक्यातील लांबी ५९ कि.मी. आहे.

कोपरगाव तालुक्यातील सहकार चळवळ

कोपरगाव तालुक्याने जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात फार मोठी ऐतिहासिक परंपरा निर्माण केली आहे. त्यास कोपरगावची भौगोलिक परिस्थितीही कारणीभूत झाली आहे. या तालुक्यात शेतकरी हा अतिशय शिस्तप्रिय आणि कष्टाळू व त्यातच त्यास काळ्या आईची साथ लाभल्याने तो मातीतून सोने निर्माण करु लागला. या तालुक्यासारखी संपन्न व समृद्ध शेती इतरत्र आढळणे अशक्य आहे. या तालुक्यातील शेतकऱ्यांनी काळी कसदार जमिन आणि समृद्ध पाणीपुरवठ्याच्या सुविधांचा पुरेपुर वापर करुन घेतला. परंतु याच काळात शेतीसाठी फार मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज होती. त्यासाठी हा शेतकरी सावकारशाहीच्या पाशात अडकला होता. यातून स्वतःची सुटका करुन घेण्यासाठी त्याने सहकाराचा नवा मार्ग पत्करला. या भागातील शेतकरी जीवनात सहकाराच्या संजीवनी मंत्राने नवे पर्व सुरु झाले. शेतकऱ्यांच्या जीवनात प्रगतीचे नवे दालन खुले करण्याची महान कामगिरी या तालुक्यातील सहकारी संस्थांनी केली.

'विना सहकार नही उद्धार' या घोषणेची सत्यता कोपरगाव तालुक्याने प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केली आहे. कोपरगाव तालुक्यात मुख्यतः दोन साधनांमुळे नवजीवन लाभले. शेतामध्ये पाणी खेळवणारा कालवा आणि शेतकऱ्यांच्यामध्ये चैतन्य निर्माण करणारा सहकार.[६] त्यामुळे तालुक्यातील शेतकरी जीवनाचे भाग्य उजळले आहे. कोपरगाव तालुक्याला सहकार चळवळीने सुरुवातीपासूनच आकर्षित केले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनामध्ये या चळवळीने चांगली पकड घेतली आहे. राज्यकर्त्यांपासून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत या तालुक्यातील जनतेची अशी मनोधारणा तयार झाली आहे की, सहकारावाचून व्यक्तीचा, कुटूंबाचा, समाजाचा आणि राष्ट्राचा उत्कर्ष होणे अशक्य आहे. या चळवळीच्या वाढीला सभोवतालचे वातावरण अधिक पोषक होत गेल्याने जनता सहकार चळवळीकडे आकर्षित झाली आहे.

सहकार चळवळीची वाटचाल

२० व्या शतकाच्या उदयाबरोबरच भारतातही सहकारी चळवळीचे बीजारोपण झाले. परंतु अनेक अडचणींमुळे या चळवळीला हवी तेवढी गती प्राप्त झाली नाही. १९३० मधील

आर्थिक मंदीची लाट दुसरे जागतिक महायुद्ध या सर्व कारणांमुळे सामान्य शेतकऱ्यांची परिस्थिती आधिक खालावत गेली. त्यामुळे सहकारी चळवळीची निकोप वाढ आणि गती खुंटली. त्यामुळे सहकारी चळवळीचे महत्त्व आणि होणारा आर्थिक विकास याचे प्रतिबिंब सामान्य जनतेच्या मनावर फारच थोड्या प्रमाणात उमटले.

महापूर, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे आणि अस्थिर आर्थिक धोरणामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती कमालीची खालावली याचा परिणाम म्हणजे १८७९ मध्ये सावकारशाही विरुद्ध झालेले बंड होय. या बंडाचा परिणाम म्हणून सन (१८८३-८४) मध्ये जमिन सुधारणा कर्ज कायदा व शेतीविषयक कर्जकायदा हे दोन कायदे पास होऊन शेतकऱ्यांना कर्जपुरवठ्याची सोय झाली. परंतु या कायद्याची व्याप्ती मर्यादित होती. कर्ज देण्याच्या अटी फारच जाचक होत्या. त्यामुळे कर्ज मिळण्यास विलंब लागत असे. परिणामी १९०४ मध्ये को-ऑप. क्रेडिट सोसायटी ॲक्ट हा कायदा पास करण्यात आला. आणि अशारितीने भारतात सहकारी चळवळीचा जन्म झाला.

सन १९०४ च्या कायद्यानुसार फक्त कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था नोंदण्याइतपतच चळवळीचा विकास झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या एकांगी उन्नतीचाच मार्ग मोकळा झाला. व्यवहारिकदृष्ट्या हा कायदा अपूर्ण होता. शेतकऱ्यांना फक्त कर्ज पुरवठा होत असे. पण त्यांचा उत्पादित माल येणाऱ्याामार्फत विकावा लागत असे. त्याची मोठी फसवणूक होत असे. त्यामुळे सन १९१२ मध्ये को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट नावाचा नवा कायदा पास झाला आणि सहकार चळवळीने तिसऱ्या अवस्थेत पदार्पण केले. या कायद्यात क्रेडिट हा शब्द वगळल्यामुळे खरेदी-विक्री संघ, सेंट्रल व प्रोव्हेंशल बँका, हौसिंग सोसायट्या यासारख्या सर्वप्रकारच्या संस्था नोंदता येऊ लागल्या.

१९१९ मध्ये नवीन सुधारणा कायदा पास करण्यात आला. या कायद्यानुसार सहकार हे खाते प्रांतिक सरकारकडे सुपूर्द करण्यात आले व त्यासाठी प्रत्येक प्रांतास स्वतंत्र मंत्री नेमण्यात आले व स्वतंत्र कायदे पास करण्याचा खास अधिकार घटनेने प्रांतांना देण्यात आला. त्यानुसार मुंबई प्रांताने १९२५ मध्ये मुंबई सहकारी सोसायटी ॲक्ट पास केला. सन १९०४ च्या कायद्याने सोसायट्यांचे ग्रामीण व नागरी असे वर्गीकरण करण्यात आले. १९१२ च्या कायद्यान्वये नियमीत जबाबदारी व अनियमीत जबाबदारी असे वर्गीकरण करण्यात

आले आणि सन १९२५ च्या कायद्यान्वये उत्पादक सोसायट्या, ग्राहक सोसायट्या, फेडरल सोसायट्या आणि जनरल सोसायट्या अशा सात प्रकारात वर्गीकरण करण्यात आले.

कोपरगाव तालुक्यातील सहकारी चळवळीचे बीजारोपण

सहकार चळवळ खऱ्याअर्थाने महाराष्ट्रात १९२५-२६ सालापासून सुरु झाली असे असले तरी कोपरगाव तालुक्यात त्याअगोदरच सहकार चळवळीचे बीजारोपण झाल्याचे दिसून येते. तालुक्यातील पुणतांबा या गावातील प्रमुख शेतकऱ्यांनी एकत्रित येवून भारत सरकारच्या सन १९०४ मधील को-ऑप. क्रेडिट सोसायटी कायद्यानुसार 'पुणतांबा को-ऑप. मल्टीपरपज सोसायटी लि.' ही संस्था दि. १८/११/१९१० रोजी रजिस्टर्ड केली. या संस्थेचा नोंदणी क्रमांक २४६ असा आहे.[७] यावरुन असे दिसते की, देशपातळीवरील सहकार कायदा पास झाल्यानंतर अवघ्या ६ वर्षातच कोपरगाव तालुक्यातील पुणतांबा या खेडेगावात सहकार चळवळीचे बीजारोपण झाल्याचे दिसून येते. या सोसायटीच्या कार्यामुळे तालुक्यातील इतर शेतकऱ्यांमध्ये सहकाराचे आकर्षण वाढीस लागले. आपणही आपल्या विकासासाठी एकत्रित आले पाहिजे. अशी भावना निर्माण होऊ लागली. त्यातून हळूहळू तालुक्यात सहकार चळवळीचा प्रसार सुरु झाला.

कोपरगाव तालुक्यातील सहकारी चळवळीची वाटचाल

१९१० मध्ये सर्वप्रथम स्थापन झालेल्या पुणतांबा को-ऑप. मल्टिपरपज सोसायटी लि. या संस्थेचा आदर्श घेऊन तालुक्यात ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन १९४७ पर्यंत अनेक सहकारी सोसायट्या व संस्थांची निर्मिती केली. त्यामध्ये खालील महत्त्वाच्या सहकारी संस्था आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील तालुक्यातील सहकारी संस्था[८]

अ.क्र.	सहकारी संस्थेचे नाव	रजि.नं.	रजिस्टर वर्ष
१.	पुणतांबा को-ऑप.एम.पी. सोसायटी लि.	२४६	१९१०
२.	एकरुखे को-ऑप. एम.पी. सोसायटी लि.	१२४५	१९१६
३.	साकुरी को-ऑप. एम.पी. सोसायटी लि.	१२४७	१९१६
४.	दहिगाव को-ऑप. एम.पी. सोसायटी	१२४८	१९१६
	पुढील पानावर...		

अ.क्र.	सहकारी संस्थेचे नाव	रजि.नं.	रजिस्टर वर्ष
	... मागील पानावरून		
५.	पोहेगाव को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१२३२	१९१६
६.	अस्तगावॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१२३३	१९१६
७.	पिंपळस ग्रुप ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१२४६	१९१६
८.	निमगाव ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१२६८	१९१६
९.	पिंपळवाडी ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१३१६	१९१७
१०.	लोकी ग्रुप ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१३७५	१९१७
११.	नाथू पाटलाचीवाडी ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसा.	१८३५	१९१७
१२.	केळवड ग्रुप ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१७०९	१९१८
१३.	धोत्रे ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१९९२	१९१८
१४.	तळेगाव माळे ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	२२३७	१९१९
१५.	मढी खु. ग्रुप अग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	३४४९	१९२१
१६.	मुर्शतपूर ॲग्रि. को-ऑप. क्रेडिट सोसायटी	४२१४	१९२३
१७.	गोदावरी कॅनॉल ॲण्ड कोपरगाव तालुका को-ऑप. सुपरवायझींग युनियन लि.	५००५	१९२५
१८.	टाकळी ब्राह्मणगाव को-ऑप. एम.पी.सोसा.लि.	५०२९	१९२९
१९.	राहता को-ऑप. एम.पी. सोसायटी लि.	६८४८	१९३०
२०.	गोदावरी ॲण्ड प्रवरा कॅनॉल को-ऑप. खरेदी-विक्री संघ लि. कोपरगाव	७१७२	१९३२
२१.	कोपरगाव ॲण्ड राहूरी तालुका सर्व्हटंस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.	७८८६	१९३३
२२.	संवत्सर को-ऑप. ॲग्रि. मशिनरी ॲण्ड इम्प्लेमेंट सोसायटी	७६३४	१९३६
२३.	कोपरगाव तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन लि.	७५४८	१९३६
२४.	करंजी ग्रुप एम.पी. सोसायटी लि.	७५५४	१९३७
	पुढील पानावर...		

अ.क्र.	सहकारी संस्थेचे नाव	रजि.नं.	रजिस्टर वर्ष
	... मागील पानावरुन		
२५.	नासिक इरिगेशन ॲण्ड कोपरगाव रिसर्च सब.		
	डिव्ही. एम्प्लाइज को-ऑप. क्रेडिट सोसा. लि.	७८३२	१९३८
२६.	चास को-ऑप. ग्रेन बँक लि.	७८४०	१९३८
२७.	दहिगाव बोलाका ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसा.	८०८०	१९३९
२८.	पुणतांबा नं. २ ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	८८१४	१९४२
२९.	रामूपूरवाडी ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	८६०३	१९४३
३०.	कोऱ्हाळे ब्रुप ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	९०३९	१९४४
३१.	रांजणगाव ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	८६५९	१९४४
३२.	रुई ब्रुप ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	८६६३	१९४४
३३.	शिंगवे ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	९०४९	१९४५
३४.	रस्नापूरवाडी ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	९३८७	१९४५
३५.	सावळेविहिर ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	९४०३	१९४६
३६.	वारी ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०२००	१९४६
३७.	कुंभारी ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०८१८	१९४७
३८.	बहादराबाद ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०८२५	१९४७
३९.	वेस ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०८३३	१९४७
४०.	सडे ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०८४०	१९४७
४१.	आपेगाव ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०८४१	१९४७
४२.	बोलकी ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०८४८	१९४७
४३.	भोजडे ॲग्रि को-ऑप. क्रेडिट सोसायटी	१०८५२	१९४७

वरील तक्त्याचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, १९०४ ते १९१० या पहिल्या टप्प्यात तालुक्यात केवळ एकच सहकारी संस्था सुरु झाली होती. १९०४ च्या सहकार कायद्यानंतर सहकार चळवळ भारतात रुजत असतानाच महाराष्ट्र राज्यातील कोपरगाव तालुक्यातील पुणतांबा या खेडेगावात सहकार चळवळीची पायाभरणी झाली ही

वैशिष्ट्यपूर्ण घटना आहे. त्यानंतर १९११ ते १९२० या दशकात १३ सहकारी संस्थांची सुरुवात झाल्याचे दिसून येते. १९१० नंतर १९१५ पर्यंत एकही सहकारी संस्था उदयास आली नाही. परंतु इ.स. १९१६ ते १९२० या चार वर्षात तालुक्यात एकूण १३ सहकारी संस्था स्थापन झाल्या. २० व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात जागतिक बड्या सत्ता पहिल्या महायुद्धाच्या तयारीस लागल्यामुळे ब्रिटिश सरकारचे सहकार चळवळीकडे दुर्लक्ष झाल्याचे जाणवते. त्यातही १९१४-१९१५ हे वर्ष महायुद्धातील महत्त्वाचे वर्ष होते. ब्रिटिशांचा महायुद्धातील विजय दिसू लागताच त्याचे सकारात्मक परिणाम भारतातील सहकार चळवळीत दिसू लागले. १० सप्टेंबर १९१७ रोजी भरलेल्या मुंबई प्रांतिक सहकारी परिषदेत सहकाराची नैतिक मुलतत्वे या विषयावर आपले विचार प्रकट करताना महात्मा गांधी म्हणाले, ''सहकारी चळवळीचे यश सोसायट्यांची संख्या किती वाढली यावरुन ठरवायचे नसते तर ते सभासदांच्या नैतिक अधिष्ठानावरुन ठरवायचे असते. ही चळवळ समाजउन्नतीद्वारे राष्ट्रोन्नतीसाठी नवचैतन्य निर्माण करणारी आहे. जेणेकरुन आदर्श मानव, आदर्श समाज, आदर्श राष्ट्र निर्माण होईल. मानवामानवात एकमेकांच्या सहाय्याने न्याय व नीती, बंधुभाव व स्नेह निर्माण करुन आपआपसातील वर्गविग्रह, तेढ आणि संघर्ष टाकून सुखी जीवन निर्माण करील.'' त्याचाच सकारात्मक परिणाम कोपरगाव तालुक्यातील सहकार चळवळीवर दिसून येतो.

इ.स. १९१२ च्या सुमारास गोदावरी नदीच्या डाव्या व उजव्या बाजूने कालवे काढण्यात आल्याने या तालुक्यात पाटस्थळ क्षेत्र तयार झाले. तेव्हापासून तालुक्याच्या शेतीच्या प्रगतीस प्रारंभ झाला. अनिश्चित पावसामुळे नशिबावर भरवसा ठेवून राहण्याचे दिवस संपले. उद्योगी व प्रगतशिल शेतकरी पाटाच्या पाण्याचा शेतीच्या विकासासाठी उपयोग करु लागले. केवळ ज्वारी व बाजरी यासारखी पिके काढून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होणे शक्य नाही. हे काही जाणत्या शेतकऱ्यांनी ओळखले. त्यांनी ऊस व इतर व्यापारी पिकांची लागवड करण्यास सुरुवात केली. ती प्रायोगिक अवस्था होती. त्यामध्ये काही शेतकरी बांधवांना यश अपयशही आले. परंतु या अपयशाने खचुन न जाता त्यांनी पुढे यशाचा मार्ग सापडेल या आशेवर धाडसी प्रयोग केले. ते एवढे यशस्वी झाले की, अल्पावधीतच कोपरगाव तालुका ऊसाचे माहेरघर म्हणून सर्वत्र ओळखला जात आहे. ऊसाबरोबरच मोसंबी, द्राक्षे, कपाशी यासारखी भरपूर अर्थोत्पादन देणारी नगदी पिके घेण्यात तालुक्याने जिल्ह्यातच

नव्हे तर महाराष्ट्रात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. भरपूर अर्थोत्पादन देणारी नगदी पिके उत्पादन करण्यास आवश्यक असलेल्या भांडवल पुरवठ्याचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला. परंतु याचवेळी त्यांच्या नशिबाने १९१२ चा ''को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट'' पास होऊन त्याचा प्रसार तालुक्यात सुरु झाला. या भागातील शेतकऱ्यांनी डोळसपणे सहकारी सोसायट्यांची निर्मिती करुन भांडवलाचा प्रश्न सोडवण्याचा निश्चय केला.[९] १९११ ते १९२० या काळात स्थापन झालेल्या सहकारी संस्थांचा व्याप मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

शेती व्यवसायाला भांडवल पुरवणाऱ्या सहकारी सोसायट्या स्थापन झाल्यानंतर त्यांना भांडवल पुरवठा करण्यासाठी मुंबई प्रांतिक सहकारी बँकेने शेतकऱ्यांना खास सोयीसाठी कोपरगाव येथे सन १९१६ साली आपली पहिली शाखा उघडली व सहकारी बँकेच्या इतिहासातील एक नव्या पर्वास सुरुवात झाली.[१०]

सन १९२१ ते १९३० या दशकात कोपरगाव तालुक्यातील सहकार चळवळीची गती मंदावल्याचे जाणवते. याकाळात केवळ ५ सहकारी संस्था स्थापन झाल्याचे दिसते. पहिल्या महायुद्धाचा परिणाम म्हणून जगभर आर्थिक मंदीची लाट निर्माण झाली. ब्रिटिश सरकारला आपली अर्थव्यवस्था सावरणे कठीण होऊन बसले. त्याचा परिणाम त्यांच्या भारतातील प्रशासन व ध्येयधोरणावर झाला. परिणामी सहकार चळवळीच्या विकासासाठी आवश्यक असणारा सरकारचा पाठींबा मिळू शकला नाही.

१९३१-१९४० या दशकातही कोपरगाव तालुक्यात ८ सहकारी संस्था नव्याने स्थापन झाल्याचे दिसून येते. आर्थिक मंदीच्या लाटेतून बाहेर पडून इंग्लंडची अर्थव्यवस्था पूर्वपदावर येऊ लागली. तसेच शेतकऱ्यांना आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी सहकाराचे महत्त्व पटू लागले. परिणामी दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडातही कोपरगावमधील सहकारी संस्थांचा विकास होत गेला असे दिसते. याच काळात गोदा-प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघ, कोपरगाव तालुका सहकारी देखरेख संघ, सहसचिव सेवक पतसंस्था मर्यादित यासारख्या नाविन्यपूर्ण सहकारी संस्था स्थापन झाल्या. या संस्थांनी कोपरगाव तालुक्याचाच नव्हे तर महाराष्ट्रातील सहकार चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

१९४१ ते १९५० हे दशक सहकार चळवळीच्या सर्वांगीण विकासाचे दशक मानले जाते. १९४७ पर्यंत तालुक्यात १७ नविन सहकारी संस्था स्थापन झाल्या. या काळात भारतामध्ये सहकाराचे महत्त्व पटून सर्वसामान्य जनता सहकार चळवळीकडे आकर्षित झाली होती. त्यास कोपरगाव तालुकाही अपवाद नव्हता. या कालावधीत पाटपाण्याची सुविधा, सहकारी संस्थांकडून शेतीसाठी आवश्यक असलेला भांडवलाचा पुरवठा यामुळे तालुक्यातील ऊसाचे उत्पादन मोठ्याप्रमाणावर वाढले होते. ही संधी साधून इ.स. १९३९ मध्ये तालुक्यातील साकरवाडी येथे गोदावरी शुगर मिल, १९४० मध्ये तालुक्यातील लक्ष्मीवाडी येथे दुसरा साखर कारखाना आणि १९४१ मध्ये पुणतांबा येथे चांगदेव शुगर मिल हा तालुक्यातील तिसरा खाजगी साखर कारखाना सुरु झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात अहमदनगर जिल्ह्यामध्ये ६ खाजगी साखर कारखाने स्थापन झाले. त्यातील तीन कारखाने एकट्या कोपरगाव तालुक्यात स्थापन झाले होते.[११]

ब्रिटिश सरकारने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन या कारखानदारांना दिल्या होत्या. सरकारने शेतसाऱ्याच्या सातपट किंमत देऊन लाखो एकर जमीन ताब्यात घेतली व खाजगी कारखानदारांना विकली.[१२]

सहकार चळवळ महाराष्ट्रात खऱ्याअर्थाने १९२५-१९२६ सालापासून रुजल्याचे दिसून येते. त्यावेळचे नेते वैकुंठभाई मेहता, जी. डी. लाड, पारीख यांनी सहकारी सोसायट्यांचे खरेदी-विक्री संघ स्थापन करुन सहकार चळवळ वाढविली. त्यातीलच महाराष्ट्रातील अग्रगण्य असा गोदावरी-प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघ हा कोपरगाव तालुक्यातील आहे. कोपरगाव तालुक्यातील सहकार चळवळ वाढली ती मुंबईच्या प्रोव्हेंशल सहकारी बँकेने गुळाची खरेदी व विक्री सहकारी तत्त्वावर सुरु केल्यानंतर इ.स. १९३१ मध्ये या बँकेने कोपरगाव येथे एक दुकान सुरु केले.[१३]

१९०४ ते १९४७ या कालखंडातील कोपरगाव तालुक्यातील सहकारी संस्थांची प्रगती

पहिला टप्पा १९०४-१९१९[१४]

सह.संस्था नोंदणी वर्ष	को-ऑप. ॲग्रि. क्रे. सोसा.	को-ऑप. कंझ्युमर स्टोअर्स	को-ऑप.मल्टी परपज सोसा.	को-ऑप. क्रे. सोसा.संस्था	इतर सह. संस्था	एकूण
१९०४	-	-	-	-	-	-
१९०५	-	-	-	-	-	-
१९०६	-	-	-	-	-	-
१९०७	-	-	-	-	-	-
१९०८	-	-	-	-	-	-
१९०९	-	-	-	-	-	-
१९१०	-	-	०१	-	-	०१
१९११	-	-	-	-	-	-
१९१२	-	-	-	-	-	-
१९१३	-	-	-	-	-	-
१९१४	-	-	-	-	-	-
१९१५	-	-	-	-	-	-
१९१६	०३	-	०३	०१	-	०७
१९१७	०३	-	-	-	-	०३
१९१८	०२	-	-	-	-	०२
१९१९	०१	-	-	-	-	०१
एकूण	०९	-	०४	०१	-	१४

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, मुंबई प्रांतातील को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ॲक्ट १९०४ मध्ये पास झाला असला तरी कोपरगाव तालुक्यातील पहिली सहकारी संस्था सुरु होण्यासाठी १९१० पर्यंत वाट पहावी लागली आहे. १९०४ ते १९१९ या कालखंडातील सहकार चळवळीचे क्षेत्र मर्यादित असल्याचे आपणास दिसून येते. शेतकऱ्यांची कर्जाची गरज भागविण्यासाठी ९ ॲग्रिकल्चरल क्रेडिट सोसायटीज् या संस्थांची स्थापना झाली, ४ मल्टीपरपज को-ऑप. सोसायट्या स्थापन झाल्या तर एक को-ऑप. क्रेडिट सोसायटी स्थापन झाली हा

कालखंड सहकार चळवळीचा प्रारंभिक कालखंड होता असे असतानाही तालुक्यामध्ये १४ सहकारी संस्था स्थापन झाल्या ही महत्त्वाची बाब आहे.

दुसरा टप्पा १९२०-१९२५[१५]

सह.संस्था नोंदणी वर्ष	को-ऑप. ॲग्रि. क्रे. सोसा.	को-ऑप. कंझ्युमर स्टोअर्स	को-ऑप.मल्टी परपज सोसा.	को-ऑप. क्रे. सोसा.संस्था	इतर सह. संस्था	एकूण
१९२०	-	-	-	-	-	-
१९२१	०१	-	-	-	-	०१
१९२२	-	-	-	-	-	-
१९२३	०१	-	-	-	-	०१
१९२४	-	-	-	-	-	-
१९२५	-	-	-	-	०१	०१
एकूण	०२	-	-	-	०१	०३

सन १९२० ते १९२५ या कालखंडात तालुक्यामध्ये नव्याने तीन सहकारी संस्था स्थापन झाल्याचे दिसून येते या कालखंडात तालुक्यातील सहकार चळवळीची गती मंदावल्याचे दिसून येते.

तिसरा टप्पा १९२६ ते १९३५ या काळातील नोंदणी झालेल्या सह. संस्था[१६]

सह.संस्था नोंदणी वर्ष	को-ऑप. ॲग्रि. क्रे. सोसा.	को-ऑप. कंझ्युमर स्टोअर्स	को-ऑप.मल्टी परपज सोसा.	को-ऑप. क्रे. सोसा.संस्था	इतर सह. संस्था	एकूण
१९२६	-	-	-	-	-	-
१९२७	-	-	-	-	-	-
१९२८	-	-	-	-	-	-
१९२९	-	-	०१	-	-	०१
१९३०	-	-	०१	-	-	०१
पुढील पानावर ...						

सह.संस्था नोंदणी वर्ष	को-ऑप. ॲग्रि. क्रे. सोसा.	को-ऑप. कंझ्युमर स्टोअर्स	को-ऑप.मल्टी परपज सोसा.	को-ऑप. क्रे. सोसा.संस्था	इतर सह. संस्था	एकूण
मागील पानावरुन...						
१९३१	-	-	-	-	-	-
१९३२	-	-	-	-	०१	०१
१९३३	-	-	-	०१	-	०१
१९३४	-	-	-	-	-	-
१९३५	-	-	-	-	-	-
एकूण	००	००	०२	०१	०१	०४

सन १९२६ ते १९३५ या कालखंडात जागतिक मंदीचा प्रभाव कमी झालेला दिसून येतो. जागतिक मंदीचा प्रभाव ओसरल्यावर या संस्थांनी जोर धरला. नव्या जोमाने या कालखंडात कोपरगाव तालुक्यामध्ये नव्याने चार सहकारी संस्था सुरु झाल्या. १९१० ते १९३५ या कालखंडात तालुक्यातील सहकारी चळवळीमध्ये सातत्य असल्याचे दिसून येते.

चौथा टप्पा १९३६ ते १९४७ या काळातील नोंदणी झालेल्या सहकारी संस्था[१७]

सह.संस्था नोंदणी वर्ष	को-ऑप. ॲग्रि. क्रे. सोसा.	को-ऑप. कंझ्युमर स्टोअर्स	को-ऑप.मल्टी परपज सोसा.	को-ऑप. क्रे. सोसा.संस्था	इतर सह. संस्था	एकूण
१९३६	-	०१	-	-	०१	०२
१९३७	-	-	०१	-	-	०१
१९३८	-	-	-	०१	०१	०२
१९३९	०१	-	-	-	-	०१
१९४०	-	-	-	-	-	-
१९४१	०१	-	-	-	-	०१
१९४२	-	-	-	-	-	-
पुढील पानावर ...						

सह.संस्था नोंदणी वर्ष	को-ऑप. ॲग्रि. क्रे. सोसा.	को-ऑप. कंझ्युमर स्टोअर्स	को-ऑप.मल्टी परपज सोसा.	को-ऑप. क्रे. सोसा.संस्था	इतर सह. संस्था	एकूण
मागील पानावरुन...						
१९४३	०१	-	-	-	-	०१
१९४४	०३	-	-	-	-	०३
१९४५	०२	-	-	-	-	०२
१९४६	०२	-	-	-	-	०२
१९४७	०७	-	-	-	-	०७
एकूण	१७	१	१	१	२	२२

१९३६ ते १९४७ हा कालखंड देशभरातील सहकार चळवळीच्या वेगवान विकासाचा कालखंड होता. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक स्वातंत्र्याची भावना सामान्य जनतेमध्ये निर्माण झाली होती. याला कोपरगाव तालुका अपवाद नव्हता. कोपरगाव तालुक्यातही सहकार चळवळीने गती घेतली होती. तालुक्यातील सहकारी चळवळीने विविध क्षेत्रात प्रवेश केला होता. या कालखंडात तालुक्यामध्ये सुमारे २२ सहकारी संस्था रजिस्टर झाल्या होत्या.

इ.स. १९०४ ते १९४७ या कालखंडात कोपरगाव तालुक्यामध्ये ४३ सहकारी संस्थांची नोंदणी झाली होती. या संस्थांमध्ये २१ ॲग्रिकल्चरल क्रेडिट सोसायट्या, ७ को-ऑप. मल्टीपरपज सोसायटी, २ नॉन ॲग्रि. क्रेडिट सोसायटीज्, ०२ दोन अर्बन क्रेडिट सोसायटीज् ०१ को-ऑप. स्टोअर्स व ०१ को-ऑप. ब्रेन बँक आणि ०१ सुपरवाझिंग युनियन या संस्थांचा समावेश आहे. वरील सहकारी संस्थांचे स्वरुप पाहता कोपरगाव तालुक्यामध्ये सर्वच क्षेत्रात सहकार चळवळीचा प्रवेश झाल्याचे दिसून येते. पाटपाणी आणि ऊस शेती यामुळे शेतकऱ्याला भांडवलाची मोठी गरज निर्माण झाली होती. ती पूर्ण करण्याचे महत्त्वाचे कार्य ॲग्रिकल्चरल को-ऑप. सोसायटीज्ने केलेले दिसून येते.

१९४० ते १९४७ या सात वर्षाच्या काळात सर्वाधिक १६ सहकारी संस्थांची नोंदणी झाली होती. स्वातंत्र्याबरोबरच सहकाराचे तत्त्व तालुक्यातील जनतेमध्ये रुजण्याचे दिसून येते. तालुक्यातील सहकारी साखर कारखानदारीची पायाभरणी याच काळात झालेली दिसून येते.

कोपरगाव तालुक्यातील स्वातंत्र्यपूर्वकाळातील निवडक सहकारी संस्था[१८]

हजारो शेतकऱ्यांचे संसार सुजलाम् सुफलाम् करणाऱ्या एका आदर्श आणि सेवाभावी सहकारी संस्थेचा इतिहास पाहण्यापूर्वी त्या संस्थेच्या स्थापनेच्या वेळची राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती कशाप्रकारची होती हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. गोदावरी प्रवरा कॅनॉल खरेदी-विक्री संघ ही संस्था सहकार चळवळीसी अगदीच निगडीत असल्यामुळे त्यावेळचा व त्या अगोदरचा सहकार चळवळीचा इतिहास पहावयाचा झाला तर ही चळवळ प्रामुख्याने शेती व्यवसायाशी निगडीत चळवळ आहे असे म्हणणे थोडे धाडसाचे झाले असते. कारण, त्यावेळी ही चळवळ एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच पोहचली होती. भारत हा शेतीप्रधान देश असल्याने सहकार चळवळीस अनुकूल असे वातावरण शेतीक्षेत्रात निर्माण करण्याची खास गरज होती. सहकारी चळवळीचा हेतू शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती व्हावी असा जरी होता. तरी परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली ही चळवळ योग्यरितीने बाळसे धरु शकत नव्हती. परकीय राजवटीमध्ये सहकारी कायदे पास होण्याच्या पलिकडे काही घडले असते असे म्हणता येणार नाही. सहकाराचे तत्त्व नैतिक अधिष्ठानावर निर्भर असल्याने सर्वसामान्य जनतेचा पाठींबा मिळाल्यावाचून हे तत्त्व ही चळवळ यशस्वी होणार नाही आणि शेती अर्थव्यवस्था संपन्न व सुदृढ बनणार नाही. याची जाणीव झाल्यामुळे गोदावरी प्रवरा कॅनॉल खरेदी विक्री संघाच्या चालकांनी सहकार चळवळीला पोषक पार्श्वभूमी तयार केली.

याचवेळी आपले राष्ट्रीय नेते स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिशेने विचाराधिन होते. २० व्या शतकातील दूसऱ्या दशकात भारतातील सहकार चळवळ सरकारी मार्गदर्शनाखाली व सरकारी कुबडीच्या आधारे उभी राहण्याचा प्रयत्न करीत होती.[१९]

या कालावधीत राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीकरीता राष्ट्राची फार मोठी शक्ती त्यागासाठी सिद्ध होती. याचवेळी शेती व औद्योगिक क्षेत्रातील राष्ट्रीय प्रवृत्तीच्या मंडळीकडून ग्रामीण जनतेच्या आर्थिक स्वातंत्र्याची चळवळ सुरु करण्यात आली. सहकार हे त्या चळवळीचे प्रमुख साधन बनले. हे सर्व घडत असताना कोपरगाव तालुक्यातील सुजाण शेतकऱ्यांनी आपले पिढ्यान् पिढ्याचे दारिद्र्य नष्ट करण्याचा विचार सुरु केला. त्यासाठी पैशाच्या मदतीबरोबरच अत्याधुनिक औजारे, सुधारित बी-बियाणे, नवीन औषधे, रासायनिक खते, शेती मालाची योग्य भावाने खरेदी व विक्री इत्यादीची आवश्यकता त्यांना वाटू लागली. परंतु याच काळात मंदीची लाट देशभर उसळली. त्यामुळे शेतीव्यवसाय नष्ट होतो की काय अशी

स्थिती निर्माण झाली. कोपरगावातील शेतकरी हतबल झाला. या संकटातून मार्ग काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

दि गोदावरी-प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना

सन १९२९-३० साली झालेली मंदीची लाट कोणताच शेतकरी विसरणे शक्य नाही. या लाटेने सर्व शेतकऱ्यांना जबरदस्त तडाखा दिला. अशा परिस्थितीत त्यांना सहकाराचा दीपस्तंभ दिसला. त्यास कोपरगाव तालुक्यातील शेतकरीही अपवाद नव्हते. या भागातील प्रमुख सहकारी कार्यकर्ते बागायतदार शेतकरी यांनी एकत्रित येऊन दि कोपरगाव तालुका शेतकरी व सासवड माळी को-ऑप. परचेस आणि सेल सोसायटी लि. या नावाने दि. १३/४/१९३२ रोजी खरेदी-विक्री संघाची स्थापना केली. याच संघाचे पुढे दि गोदावरी-प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघ लि. असे नामकरण करण्यात आले.[२०]

संस्थेचे पहिले चीफ प्रमोटर म्हणून श्री. रावसाहेब बापूसाहेब बोरावके या सहकार चळवळीच्या कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली. श्री. बापूसाहेब जगताप यांनी सन १९३५ ते १९४३ या कालखंडात संघाची धुरा समर्थपणे सांभाळून संघाला अनेक अडचणीतून आणि विविध समस्यातून बाहेर काढले. बापूसाहेबांच्या अंगी असलेली धडाडी, दुर्दम्य उत्साह व सहकारावरील निष्ठा पाहून तालुक्यातील तरुणांना मोठे स्फुरण चढले व ते सहकाराकडे आकर्षित झाले. सन १९४३ ते १९५३ पर्यंत संघाचे व्हाईस चेअरमन म्हणून त्यांनी भरीव कार्य केले. प्रदीर्घ काळ संघाच्या अधिकारपदावर राहून दुरदर्शीपणे संघाला प्रगतीपथावर आणण्याचे कार्य त्यांनी केले.

सन १९४३ मध्ये गणपतराव उर्फ दादासाहेब औताडे हे संघाचे चेअरमन बनले. गणपतराव औताडे हे राज्यातील बोटावर मोजण्याइतक्या सहकारी कार्यकर्त्यांपैकी एक होते. जिल्ह्यातील सहकार चळवळीमध्ये त्यांचे मोठे कार्य आहे. संघाची सूत्रे हाती घेतल्यानंतर संघाची आर्थिक स्थिती सुधारणे, सभासदांच्यामध्ये संघाबाबत आदरभाव निर्माण करणे, संघाचे कार्य अधिकाधिक लोकाभिमुख करण्यात त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. संघाच्या स्थापनेपासून ते संचालक मंडळावर होते. त्यामुळे संघाच्या कार्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. व्यवहारनिपुणता, दुरदृष्टी, संघटन, कौशल्य, हे गुण त्यांच्यामध्ये असल्यामुळे संघाच्या कार्यावरील आपली पकड त्यांनी घट्ट केली. सभासदांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. याच

काळात सरकारने सहकारी संस्थांना कंट्रोल वाटपाचे काम देण्याचे धोरण निश्चित केले. गणपतराव औताडे यांनी या धोरणाचा भरपूर फायदा संघास मिळवून दिला. त्यामुळे हा संघ सहकार क्षेत्रातील अग्रेसर संघ बनला. राज्यभर संघाचा लौकीक वाढीस लागला. संघाची आर्थिक स्थितीही सुधारली. याचकाळात संघाची सर्व सोयींने युक्त अशी इमारत बांधण्यात आली. ते १९५३ पर्यंत संघाचे चेअरमन होते. त्याचकाळात त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी उभारण्यात मोलाचे श्रम घेतले.

सन १९५४ ते १९५७ या दरम्यान संघाच्या चेअरमनपदाची सूत्रे श्री. बाबुराव किसनराव कडू यांनी उत्तमरितीने सांभाळली व संघाला उर्जितावस्था प्राप्त करुन दिली. त्यांना श्री. बगाजी कोंडाजी उर्फ आप्पासाहेब देवकर यांची मोलाची साथ मिळाली. सन १९५४ ते ५७ पर्यंत ते संघाचे व्हाईस चेअरमन होते. त्यांनी अत्यंत काटकसरीने संघाचा कारभार केला. त्याप्रमाणेच पुणतांबा येथे सहकार क्षेत्रातील तडफदार कार्यकर्ते काशिनाथ पा. धनवटे यांनी संघाच्या कार्यामध्ये रस घेऊन संचालक मंडळास मार्गदर्शन केले. तसेच पोहेगाव येथील बळवंतराव उमाजी औताडे, नारायण कोंडीबा धारमाळकर, केशवराव नारायणराव पाटील, धनाजी तान्हाजी खैरनार या कार्यकर्त्यांनी संघाच्या प्रगतीसाठी आपले सर्वस्व पणाला लावून त्याचे संवर्धन केले. परिणामी अवघ्या २५ वर्षातच राज्यभर संघाचा नावलौकीक झाला. यानंतर संघाचे चेअरमनपद तालुक्यातील तरूणतडफदार निस्पृह नेते श्री. के. बी. रोहमारे यांच्याकडे आले. त्यांच्या प्रदीर्घ कालावधीत संघाने सर्वच क्षेत्रात भरीव असे कार्य केले होते.

संघाचे कार्यक्षेत्र

गोदावरी-प्रवरा नद्यांवरील बंधाऱ्याच्या पाटपाण्याने समृध्द झालेला कोपरगाव व श्रीरामपूर तालुक्यात श्रीरामपूर व कोल्हार येथे संघाची दुकाने होती. कोपरगाव तालुक्यात कोपरगाव येथील मुख्य कचेरीशिवाय राहाता व कोळपेवाडी येथे संघाचे दोन डेपो होते. त्यामार्फत शेतीउपयुक्त मालाचा योग्य भावाने पुरवठा केला जात होता. १९४० मध्ये वांबोरी हे अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्यपूर्व काळातील भुसार मालाच्या खरेदी-विक्रीची मोठी बाजारपेठ होती. नंतरच्या काळात संघाचे कार्यक्षेत्र संगमनेर तालुक्यापर्यंत वाढवून देण्यात आले. याकामी माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांनी विशेष परिश्रम घेऊन संघास सहकार्य केले.

संघाचे सहकार क्षेत्रातील योगदान

तालुक्यातील सहकारी सोसायट्यांची संख्या वाढत चालली होती. या सर्व सोसायट्यांना सहकारी ध्वजाखाली एकत्रित आणण्यासाठी संघाने पुढाकार घेऊन या सर्व सहकारी सोसायट्यांवर देखरेख ठेवण्यासाठी १९४५ मध्ये दि गोदावरी-प्रवरा कॅनॉल्स को-ऑप. सुपरवायझिंग युनियन ही सहकारी सोसायट्यांची प्रातिनिधीक संस्था रजिस्टर्ड केली. या संस्थेच्या प्रभुत्त्वामुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे सहकारी संस्थांचे जमाखर्च, त्यांचा वाढता व्याप एका ठराविक साच्यात ठेवणे, सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे, नवीन सहकारी सोसायट्या स्थापन करून सहकार चळवळीचा प्रसार करणे. काही नियम करून त्यांना शिस्त लावणे. पुढे या संस्थेचे नामकरण कोपरगाव तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन असे ठेवण्यात आले. सद्यस्थितीला या संस्थेचा व्याप बराच वाढला आहे. या संस्थेच्या कार्याचा व्याप, पसारा आणि वाढ यांचा तौलनिकदृष्ट्या अभ्यास केल्यास ती महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या सुपरवायझिंग युनियनमध्ये सर्वश्रेष्ठ दिसून येते.

कॅनॉल कॉन्फरन्स

सन १९४२ मध्ये संघाने या भागातील कॅनॉल सहकारी सोसायट्यांची कॉन्फरन्स भरविली होती. व्ही. जी. काळे हे या कॉन्फरन्सचे अध्यक्ष होते.[२१] या परिषदेमध्ये प्रामुख्याने पाटबंधारे खात्याच्या नियमामुळे येणाऱ्या अडचणी व युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या वाहतुकीच्या अडचणींवर विचारविनीमय करण्यात आला.

त्यानंतर दि. २३/११/१९४७ रोजी दुसरी कॅनॉल कॉन्फरन्स डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या परिषदेचे उद्घाटन त्यावेळचे मुंबई राज्याचे अर्थ व सहकार मंत्री नामदार वैकुंठभाई मेहता यांच्या हस्ते झाले.

सहकारी सोसायट्यांचा मेळावा

सहकारी संस्थांच्या दैनंदिन व्यवहारात ज्या विविध अडीअडचणी येतात. त्याबाबत सांघिक प्रयत्नांनी सर्वांगीण विचार करून उपाययोजना करण्याचे उद्दिष्ट संघाचे होते. त्यासाठी जिल्ह्यातील सहकारी सोसायट्यांचा एक भव्य मेळावा श्रीरामपूर येथे घेण्यात आला. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान ठाणे येथील प्रमुख सहकारी कार्यकर्ते श्री. दौलतराव जयरामराव झुंजारराव यांनी भुषविले होते. तर मेळाव्याचे उद्घाटन हेल्थ आणि पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटचे

पार्लमेंटरी सेक्रेटरी बॅ. ए. टी. मोरे यांचे हस्ते झाले.

विविध विभाग

आडतविभाग - भरपूर पिके काढणारा शेतकरी हाती पैसे नसल्याने सावकाराला शरण जात होता. पिकासाठी बँकेकडून कर्ज घ्यावे लागत होते. परंतु उत्पादित माल त्याला कवडीमोल किंमतीने विकावा लागे. माल शेतकऱ्याचा, कर्ज बँकेचे परंतु भाव व्यापारी ठरवत होता. अशी विचित्र स्थिती निर्माण झाली. आडत्यांच्या मनमानी कारभाराला लगाम घालण्यासाठी त्यावेळच्या बॉम्बे स्टेट को-ऑप. बँकेला पुढाकार घेऊन मार्ग काढावा लागला होता. नंतर बँकेने कोपरगाव येथे आडत दुकान सुरु केले. संघाच्या कार्यक्षम व्यवहारानंतर बँकेने हे दुकान संघाकडे सुपुर्द केले. तेव्हापासून आडत विभाग हा संघाचा पहिला आणि एक महत्त्वाचा विभाग म्हणून काम करीत होता.

सभासद आणि बिगरसभासद शेतकरी बंधूंच्या गुळाची आडतीवर विक्री करणे हे संघाचे त्यावेळचे प्रमुख कार्य होते. कोपरगाव परिसरात ऊसापासून फार मोठ्या प्रमाणात गुळ तयार केला जात होता. शेतकऱ्यांच्या गुळाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी गुळ इतर ठिकाणी पाठविण्यासाठी संघाने प्रयत्न सुरु केले. त्यासाठी संघाने रेल्वेकडून खास वॅगन मिळविला. संघाची कार्यक्षमता पाहून सरकारने या भागातील गुळ रवानगीचे काम संघाकडे सुपूर्द केले. इ.स. १९४७-४८ मध्ये संघाच्या या विभागामार्फत ७५ लाख रु. किंमतीचा गुळाचा व्यवहार केला.[२२] केवळ गुळाच्या आडतीचाच संघाने व्यवहार केला नाही तर भुसार मालाच्या विक्रीतही संघाने आपला वाटा उचलून सभासदांना आर्थिक फायदा करुन दिला. इ.स. १९४३ च्या सुमारास अन्नधान्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. सरकारने धान्यावर नियंत्रण बसविले व स्वतः धान्य खरेदी सुरु केली. यावेळी सरकारने या भागातील धान्य खरेदी सुरु केली. यावेळी सरकारने या भागातील धान्य खरेदी व वाटप दोन्ही अत्यंत महत्त्वाची कामे संघाकडे सुपूर्द केली. सरकारने या संघावरती दाखवलेला विश्वास संघाच्या कार्यपद्धतीची साक्ष देतो. या काळात संघाने १०,३५४ पोती धान्य खरेदी करुन सरकारला भरीव सहकार्य केले. या विभागामार्फत सभासदांची गरज म्हणून पेंडीचा पुरवठा करण्याचे काम संघाने हाती घेतले. प्रतीवर्षी ६० ते ७० हजार पोती पेंडविक्री संघामार्फत केली जात होती. या विभागाचे प्रमुख म्हणून श्री. पी. आर. नरोडे काम पाहत होते. इतर

सहकाऱ्यांचे त्यांना सहकार्य लाभले होते. त्यामुळेच एक कार्यक्षम विभाग म्हणून आडत विभाग ओळखला जात होता.

स्वस्तधान्य व नियंत्रित दराने मालविक्री विभाग

सर्वसामान्य नागरिकांना किफायतशीर भावात जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे हे संघाचे सुरुवातीपासूनचे उद्दीष्ट आहे. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी संघाने आपल्या श्रीरामपूर व बेलापूर शाखांमार्फत वेळोवेळी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. नियमांच्या काळात संघाने रेशनिंगची दुकाने चालविली. कोपरगाव येथे नियंत्रित कापड दुकान चालवून सामान्य नागरिकांची सेवा केली.

स्वस्त धान्य दुकानाच्या व्यवहारामध्ये तोटा होत असूनही जनतेच्या हितासाठी हा विभाग चालविला जात होता. संघाच्या मुंबई विभागामार्फत वस्तूची ठोक खरेदी केली जात होती आणि वाहतूक खर्च आकारुन जीवनावश्यक वस्तूची विक्री केली जात होती. संघाने सन १९४८ ते १९५३ या दरम्यान नियंत्रित दराने रु. ६,४७,५०९/- ची कापड विक्री केली.[२३] संघाने नियंत्रित दराने लोखंड, सिमेंट व पत्रे यांची फार मोठ्या प्रमाणात विक्री केली. संघाचे हे भरीव कार्य लक्षात घेऊन सरकारने लोखंड, सिमेंट व पत्रे नियंत्रित दराने वाटपाचे काम कोपरगाव, श्रीरामपूर व राहूरी तालुक्याकरिता संघाकडे सुपूर्द केले. या विभागाचे प्रमुख म्हणून श्री. व्ही. के. ढमाले यांनी काम पाहिले.

इंजिन व तेलविभाग

पाटपाण्याचा नियमीत पुरवठा होत नव्हता. त्यामुळे शेतकऱ्यांनी विहिरी खोदल्या इंजिने बसविली. उपसा सिंचन योजना सुरु केल्या. तालुक्यात इंजिनाच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ग्रामीण भागात इंजिनाच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली. शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन संघाने शेतकऱ्यांना इंजिन पुरविण्याचा उपक्रम सुरु केला. शेतकऱ्यांना खात्रीशिर इंजिन ऑईलचा पुरवठा करण्यासाठी संघाने बर्मा शेल ऑईल कंपनीची एजन्सी घेतली आणि शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचे इंजिन ऑईल पुरविले.

या विभागामार्फत शेतकऱ्यांना डिझेल, क्रुड ऑईल, लुब्रेकेटींग तेल, रॉकेल आणि पेट्रोल पुरविले जात होते. रॉकेल आणि क्रुड ऑईल यांची सर्वाधिक विक्री होत असे.

मशिनरी विभाग

या विभागामार्फत शेतकऱ्यांना इंजिन व इलेक्ट्रीक मोटारीचे सुटे भाग पुरविले जात होते. तसेच संघाकडून खरेदी करण्यात आलेल्या इंजिनची देखभाल केली जावी. काही बिघाड झाल्यास तज्ञ कारागिरामार्फत त्यांची दुरुस्ती करुन देण्याचे काम या विभागामार्फत केले जात होते. त्यासाठी स्वतंत्र कारागिराची नेमणूक करण्यात आली होती. या विभागामार्फत संघाने रु. ५,६३,३९१/- ची उलाढाल केली आहे.

फर्टिलायझर होलसेल विभाग

शेतकऱ्यांना व सभासदांना वाजवी दरात सर्व प्रकारची खते जरुर पडेल तेव्हा उपलब्ध करुन देण्याचे काम या विभागामार्फत केले जात होते. पेंड व मिश्रखते नियंत्रित दराने वाटप करण्याची अहमदनगर जिल्ह्याची एजन्सी सरकारकडून या संघास देण्यात आली होती. या कामासाठी संघाने जिल्ह्यात २२ सब एजंटस् नेमले होते.[२४]

संघामार्फत शेतकऱ्यांना शेणखतही पुरविले जात होते. मुंबई येथील गवळीवाड्यातील शेणखत रेल्वे वॅगनमार्फत कोपरगावमधील शेतकऱ्यापर्यंत पोहचविले जात होते. प्रतिवर्षी शेकडो वॅगन शेणखत पुरवून शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीला चालना दिली आहे.

छापखाना विभाग

संघाचा व्याप वाढल्यामुळे छपाईची कामे बाहेरुन वेळेत करुन मिळत नव्हती. त्यामुळे संघाने स्वतःच्या मालकीचा छापखाना सुरु केला होता. छापखान्यात बाहेरची इतरही कामे केली जात होती.

लक्ष्मी छाप मिश्रखत

खत हे जमिनीचे टॉनिक आहे. याची जाणीव संघाच्या संचालक मंडळात पुर्वीपासून होती. शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य भावात व योग्य प्रमाणात उत्तम दर्जाचे खत मिळावे म्हणून संघाने स्वतःचा मिश्रखत कारखाना सुरु केला. संघाने निर्मिती केलेले लक्ष्मी छाप मिश्रखते उत्तम दर्जाची व स्वस्त असल्याने कमी वेळेत या खतांना प्रचंड मागणी झाली आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही खतापेक्षाही मिश्रखत उत्तम व स्वस्त होती. या खताचे उत्पादन व वापरामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी दाणेदार खताचा कारखाना सुरु करण्याचे संघाने ठरविले आहे. त्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले व नंतर दाणेदार मिश्रखत कारखान्याची उभारणी करण्यात आली.

खत व माहिती विभाग

रासायनिक खताच्या उत्पादनाबरोबरच खताचा वापर कसा व किती प्रमाणात करावा याची शास्त्रशुद्ध माहिती सर्व शेतकऱ्यांना नव्हती. ही अडचण लक्षात घेऊन संघाने हा विभाग सुरु केला होता. पिकांना सेंद्रीय, रासायनिक, संयुक्त समिश्रखते कशी, केव्हा व किती द्यावी याचे ज्ञान सर्वच शेतकऱ्यांना असणे अत्यंत आवश्यक होते. अन्नधान्य व नगदी पिकांचे उत्पादन वाढविणे ही महत्त्वाची गरज पूर्ण करण्यासाठी हे ज्ञान आवश्यक होते. त्यासाठी हा विभाग सुरु करण्यात आला होता. या विभागाद्वारे शेतीविषयक सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले जात होते. या उपक्रमाचा पुरेपूर फायदा तालुक्यातील शेतकऱ्यांनी घेतला.

माती परीक्षण विभाग

खत उत्पादन व वितरण याबरोबरच जमिनीची व शेती पाण्याची चाचणी करणे अत्यंत महत्त्वाचे असते. परंतु अशी सुविधा जवळपास नसल्यामुळे शेतकरी माती परीक्षण करण्याची टाळाटाळ करीत होते. म्हणून तालुक्याच्या ठिकाणी ही सुविधा उपलब्ध करुन देण्याचे संघाच्या संचालक मंडळाने ठरविले आणि हा विभाग सुरु करण्यात आला. माती परीक्षण अहवालाबरोबरच शेतकऱ्यांना योग्य सल्ला व मार्गदर्शन या विभागामार्फत केले जाते.

संघाची मुंबई शाखा

सरकारी मालकीच्या नत्रयुक्त खताची मुंबईवरुन महाराष्ट्रात इतरत्र वाहतूक करण्यासाठी सरकारे अधिकृत एजंट म्हणून संघाची अहमदनगर, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, बीड, नागपूर, पुणे, सातारा या आठ जिल्ह्यासाठी नेमणूक करण्यात आली. खत वाहतुकीबरोबरच इतर मालाच्या वाहतुकीचे कामही संघास मिळाले. त्यासाठी मुंबई येथे संघाची एक शाखा सुरु करण्यात आली. संघाची ही शाखा प्रतिवर्षी नफ्यातच व्यवहार करीत होती असे दिसून येते.

संघाच्या मालकीची जागा व इमारती

संघाच्या मालकीची कोपरगाव येथे एक भव्य व अलिशान इमारत आहे. संघाचे सर्व विभाग व त्यांची कार्यालये याच इमारतीमध्ये आहेत. कोपरगाव मार्केटयार्डमध्ये संघाची दोन गोदामे आहेत. कोपरगाव रेल्वेस्टेशनवर संघाच्या मालकीची तीन मोठी गोदामे आहेत. श्रीरामपूर रेल्वेस्टेशनलगत संघाचा एक मोठा प्लॉट आहे. मुंबई मध्ये संघाच्या मालकीचे दोन

प्लॉट आहेत. तेथे कर्मचाऱ्यांच्या निवासाची सोय करण्यात आली आहे. कोपरगावमध्ये कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी एक चाळ विकत घेण्यात आली आहे. वरील प्रमाणे संघाची स्थावर मालमत्ता आहे.

श्री. रावसाहेब बापूसाहेब बोरावके, श्री. काशिनाथ पाटील धनवटे, सहकार महर्षि दादासाहेब औताडे पाटील, श्री. बापूसाहेब जगताप आदी सेवाभावी कार्यकर्ते गोदावरी-प्रवरा खरेदी विक्री संघाची स्थापना करुन कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना एक नवा मार्ग दाखविण्याचा एक धाडसी उपक्रम केला.[२५] हा उपक्रम सर्वश्री बाबुराव किसनराव कडू, श्री. कारभारी भिमाजी रोहमारे यांनी यशस्वीपणे राबवून संस्थेला गौरवपूर्ण स्थान प्राप्त करुन दिले. याकामी त्यांना श्री. हरीभाऊ शेळके, श्री. पंडीतराव कुलकर्णी (धामोरीकर) जगन्नाथ पाटील बारहाते, विठ्ठलराव भोईटे, ब. को. देवकर, भी. रा. नवले, दा. पू. पाचोरे, रा. भि. होन, शं. ब. पाठारे, त्रि. सो. गिरमे, ग. वि. नागरे या सहकाऱ्यांची खंबीर साथ मिळाली.

योजनाबद्ध कार्यपद्धती, कार्यक्षम व्यवहार, संघ व सभासद यांचे परस्पर संबंध, कर्तबगार संचालक मंडळ, प्रामाणिक, कष्टाळू व काटकसरी सेवक वर्ग ही या संघाची खास वैशिष्ट्ये सांगता येतील.[२६] अशाप्रकारे प्रस्तुत प्रबंधाच्या आतापर्यंतच्या मांडणीमध्ये कोपरगाव परिसराच्या स्थानिक इतिहासाची साधार व कालानुक्रमे मांडणी केली आहे. यापुढील प्रकरणात प्रबंधातील मांडणीचे निष्कर्ष दिले आहे.

संदर्भ व तळटिपा

१. अहमदनगर **जिल्हा दार्शनिका**, पृ. १९४.

२. कसबे रावसाहेब, लामखडे भा. रा. (संपा.), **शेती आणि सहकार,** १९८४, पृ. ७०.

३. अहमदनगर **जिल्हा दार्शनिका**, पृ. १९४.

४. वार्षिक पिके अहवाल, तहसिल कार्यालय कोपरगाव, २०१०-२०११.

५. कित्ता.

६. सहाय्यक निबंधक सह. संस्था (प्रपत्र वा. २४) अपेंडिक्स (अे)

७. दि गोदावरी-प्रवरा कॅनॉल खरेदी विक्री संघ लि. कोपरगाव, **स्मरणिका**, १९७१, पृ.९.

८. सहाय्यक निबंधक सह. संस्था (प्रपत्र वा. २४) अपेंडिक्स (अे)

९. Tupe S. D., **Sugar Co-Oprative and rural change**, Pune, 1992, pp. 6.

१०. दि गोदावरी-प्रवरा कॅनॉल खरेदी विक्री संघ लि. कोपरगाव, **स्मरणिका**, १९७१, पृ.२०.

११. Tupe S. D., op.cit, pp. 6.

१२. अरुण खोरे (संपा.), **महाराष्ट्र विकासाचे नवे प्रवाह**, संजिवनी सह. साखर कारखाना, **रौप्य स्मृतीग्रंथ**, १९९१, पृ. २६८.

१३. कित्ता.

१४. सहाय्यक निबंधक सह. संस्था (प्रपत्र वा. २४) अपेंडिक्स (अे)

१५. कित्ता.

१६. कित्ता.

१७. कित्ता.

१८. दि गोदावरी-प्रवरा कॅनॉल खरेदी विक्री संघ लि. कोपरगाव, **स्मरणिका**, १९७१, पृ.२०.

१९. कित्ता, पृ. २४.

२०. दि गोदावरी-प्रवरा कॅनॉल खरेदी विक्री संघ लि. कोपरगाव, **स्मरणिका**, १९५३, पृ.५.

२१. कित्ता, पृ. ७.

२२. कित्ता, पृ. २५.

२३. कित्ता, पृ. २९.

२४. कित्ता, पृ. ३.

२५. गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी विक्री संघ लि., **वार्षिक अहवाल,** १९५३, पृ. ५

२६. कित्ता.

प्रकरण पाचवे

उपसंहार

'कोपरगाव परिसराचा स्थानिक इतिहास' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी इ.स. १६०० पासून ते आधुनिक काळापर्यंतचा कोपरगाव परिसराच्या इतिहासाचा आतापर्यंत जो मागोवा घेतला, त्याच्या फलश्रुतीचा विचार करणे प्रस्तुत प्रकरणामध्ये अभिप्रेत आहे.

प्रबंधाचे पहिले प्रकरण हे प्रास्ताविक स्वरूपाचे आहे. या प्रकरणामध्ये अभ्यास-विषयाची ओळख करुन देऊन प्रबंधाची रुपरेषा मांडलेली आहे. तसेच संशोधन-साधनांची संक्षिप्त ओळख करुन दिलेली आहे. इतिहासाची संकल्पना स्पष्ट करताना व्यक्ती, समाज, स्थळ आणि काल हे अनुबंधचतुष्ट्य, इतिहासाची अन्वयार्थात्मकता, भूतकाळ व वर्तमानकाळ यांचा सततचा संवाद, इतिहासाची शास्त्रीयता व सत्यशोधन या मुद्यांवर भर दिलेला आहे.

'कोपरगाव परिसराचा स्थानिक इतिहास' हा प्रस्तुत प्रबंधाचा विषय 'स्थानिक इतिहासांशी संबंधित असल्याने त्याच्या प्रास्ताविक भागामध्ये 'प्रादेशिक' व 'स्थानिक इतिहास' या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. जागतिक व राष्ट्रीय इतिहासाला 'समग्रलक्ष्यी' अभ्यास (Macro Study) तर 'प्रादेशिक व स्थानिक' इतिहासाला सूक्ष्मलक्ष्यी अभ्यास (Micro Study) असे संबोधले जाते.

इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोहोंचा वेध असतो. त्यामधील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासात भौगोलिकतेला महत्त्व असले, तरी मानसिकता व संस्कृती अधिक महत्त्वाची असते.

'स्थान' या घटकाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. स्थानिक इतिहासामध्ये गावाचा इतिहास समाविष्ट केला जातो. परंतु एखाद्या गावाच्या वाडी, पेठेचा किंवा एखाद्या संस्थेचा इतिहास हा मुद्दाही स्थानिक इतिहासामध्ये समाविष्ट करता येईल. स्थानिक इतिहासामध्ये इतिहासलेखनासाठी निवडलेल्या स्थानाच्या भौगोलिक घटकांप्रमाणेच सांस्कृतिक व मानसिक घटकही अतिशय महत्त्वाचे आहेत. स्थानिक इतिहास ही पाश्चिमात्य देशांमध्ये प्रगत झालेली व मान्यता पावलेली संकल्पना आता आपल्याकडेही विकसीत होत आहे. मराठीमध्ये अशा प्रकारच्या इतिहास-लेखनाची एक दीर्घ परंपरा दिसून येते. त्यामध्ये काही वेळा जीवनाचा

एखाद्या पैलू घेऊन स्थानाच्या विशेष संदर्भात मांडणी केली जाते. किंवा विविध पैलूंचा समग्र विचारही केला जातो. डॉ. अरुण टिकेकर यांनी स्थानिक इतिहासासाठी 'स्थानीय इतिहास' हा शब्दप्रयोग केलेला आहे.

प्रबंधाचे दुसरे प्रकरण 'शिवकालीन व पेशवेकालीन कोपरगाव' या शीर्षकाचे आहे. या प्रकरणामध्ये इ.स. १६०० पासूनचा इतिहास मांडला असला तरी कोपरगावच्या इतिहासाची परंपरा प्राचीन काळापर्यंत जाऊन भिडते. मात्र या इतिहासाचा महत्त्वपूर्ण टप्पा यादव काळापासून सुरु होतो. प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये यादव कालखंडापासून कोपरगाव परिसराचा इतिहास आणि विकासक्रम सांगितला आहे. कोपरगाव परिसरामध्ये यादव राजवटीमध्ये मंदिरस्थापत्याचा विकास झाला. कोकमठाण या गावात गोदावरी नदीकाठी जगदंबा देवीचे मंदिर यादवकाळातच बांधले. हे मंदिर भूमिज प्रकारचे असून त्याचे शिखर विटांनी तर बाकीचा भाग दगडांनी बांधलेला आहे. शिखर आजमितीस पूर्णपणे मूळ स्वरूपामध्ये अस्तित्त्वात नाही. मंदिराच्या बाह्यांगावरील भद्रांना देण्यात आलेले लहान भूमिज मंदिराचे वैशिष्ट्ये आहे. मंदिराचा तलाविन्यास, वास्तूशास्त्रीय शैली यावरुन ते तेराव्या शतकात बांधले असावे असे स्पष्ट दिसते.

इ.स. १३४७ मध्ये स्थापन झालेल्या बहमनी राज्याचे पुढे विभाजन होऊन ज्या पाच शाह्या निर्माण झाल्या, त्यापैकी निजामशाहीमध्ये कोपरगावचा परिसर समाविष्ट होता. त्यावेळी कुंभारी परगण्यामध्ये कोपरगाव समाविष्ट होते. शिवाजी महाराजांच्या कालावधीमध्ये कोपरगावाचा परिसर समृद्ध होता. १६७० च्या मे महिन्यामध्ये मराठ्यांनी या परिसरावर स्वारी केली होती.

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालावधीमध्ये बुधाजी पवारांचे कोपरगावमधील कार्य उल्लेखनीय आहे. कोपरगाव गोदावरी नदीच्या काठी असल्याने धार्मिकदृष्ट्या या गावास पेशवे राजवटीत चांगलेच महत्त्व होते. प्रशासकीय कामकाजासंदर्भातील न्यायनिवाडे झाल्यानंतर दिव्या करावयाचे असेल तर ते कसबे कोपरगावमध्ये केले जात असे. आर्थिकदृष्ट्या हा परिसर समृद्ध असल्याने मोगली व निजामाच्या आक्रमणाची झळ वेळोवेळी कोपरगावास बसल्याचे उल्लेख आहेत.

नानासाहेब पेशव्याने कोपरगावमधील शुक्लेश्वर मंदिरास व पुजारी कृष्णाजी गोपाळ व गोविंद त्रिंबक यांना मंदिराच्या खर्चासाठी नेवासे परगण्यामध्ये जमीन इनाम दिली. थोरला माधवराव पेशव्याच्या कालावधीमध्ये त्याने विविध भागांची पुनर्रचना केली. नाशिक जिल्ह्यातील पट्टा किल्ल्याच्या सरंजमासाठी कोपरगावच्या परिसरातील गावे दिली. माधवराव व राघोबा मतभेद मिटल्यानंतर २५०००/- रुपये वार्षिक पेन्शन घेऊन राघोबाने कायमस्वरुपी कोपरगावमध्ये वास्तव्याचे मान्य केले. याठिकाणी त्याने स्वतःसाठी स्वतंत्र वाडा व हिंगणी या गावी स्वतंत्र वाडा बांधला आहे. या दोन्ही वास्तू आजही सुस्थितीत आहेत. इ.स. १७७२ च्या पूर्वी या वाड्यांची बांधकामे पूर्ण झाल्याची नोंद पेशवे दफ्तरामध्ये आहे. कोपरगावच्या वास्तव्यामध्ये राघोबा व आनंदीबाई यांच्याकडे मोठा ग्रंथसंग्रह होता. पुढे आनंदीबाईने तो नाशिक जवळ आनंदवल्ली येथे नेला.

सवाई माधवरावाच्या काळात त्याने कोपरगाव परिसरातील संवत्सर व कोकमठाण या दोन्ही गावांना कसब्याचा दर्जा दिला. कुंभारी परगण्याची पुनर्रचना केली. कोपरगावामधील बेटातील शुक्लेश्वर मंदिरास सरकारमधून जमीन इनाम दिली. ही जमीन आजही वंशपरंपरेने याच मंदिराच्या पुजाऱ्याकडे आहे.

राघोबादादाने आपणास त्रास देऊ नये म्हणून १७८३ मध्ये सवाई माधवरावाने कोपरगाव परिसरातील २३ गावे सरंजाम म्हणून दिली. राघोबास ती फार काळ उपभोगता आली नाहीत. कारण १७८३ च्या डिसेंबर महिन्यात राघोबाचे निधन झाले.

राघोबादादाने व आनंदीबाईने कोपरगावमधील वास्तव्याचा आपला अधिक वेळ धार्मिक अनुष्ठाने व मंदिरे बांधण्यासाठी खर्च केला. कोपरगावच्या बेट परिसरात व गोदावरी नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर मंदिरे बांधली, ती आजही सुस्थितीत आहेत. दुसऱ्या बाजीरावाचे बालपण कोपरगावामध्येच व्यतित झाले. याठिकाणी त्याच्या लष्करी व इतर शिक्षणाची सोय केली होती. चिमाजी आप्पा द्वितीय याचा विवाह देखील कोपरगावमध्येच झाला. याप्रसंगी एल्फिन्स्टन हजर होता.

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत त्रिंबकजी डेंगळे या सरदाराचे प्रस्थ पेशवे दरबारात वाढले होते. याकाळात कोपरगावचा सर्व कारभार त्रिंबकजी पाहत असे. त्रिंबकजीच्या

अनुपस्थितीत त्याचा मुलगा कुसाजी डेंगळे कारभार पहात असे. त्रिंबकजीने कोपरगाव परिसरात आश्वी, लोणी, मुर्तजापूर, देर्डे कोऱ्हाळे इत्यादी गावामध्ये घोड्यांच्या पागा तयार केल्या होत्या. त्रिंबकजीने कोपरगावच्या वाड्यामध्ये स्वतंत्ररित्या कैदखाना बांधला होता. राज्याच्या विविध भागामधून कैदी याठिकाणी आणत. बाजीरावाने आपल्या लष्कराचा तळ कोपरगावामध्ये ठेवला होता. कारण परिसरातील ठग व पेंढाऱ्यांनी पेशव्यांच्या सैनिकांस दिलेला उपद्रव १८१० ते १८१३ या काळात कोपरगावमध्ये पेंढाऱ्यांनी दंगा केला. तो मिटविण्यासाठी पेशव्याने विसाजी देवराम हा स्वतंत्र अधिकारी नेमला. अखेरीस त्रिंबकजीस कोपरगावमध्ये यावे लागले. तेव्हा पेंढाऱ्यांचा बंदोबस्त झाला. या सर्व धावपळीच्या काळातही बाजीरावाने कोपरगावमध्ये आंब्याच्या बागा विकसीत केल्या होत्या. त्याची निगा डेंगळेचा परिवार पाहत असे. तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धानंतर मराठी राज्य जवळजवळ संपुष्टात आले. इंग्रजांनी पेशव्यांच्या ताब्यातील किल्ले व वाडे पाडून टाकण्याची मोहिमच राबविली. कोपरगावच्या बेटातील गढी व वाडा पाडून टाकला. एकंदरीत १८ व्या शतकात कोपरगाववर प्रामुख्याने मराठ्यांचे प्रभुत्त्व होते.

तिसरे प्रकरण 'आधुनिक कोपरगाव' या शीर्षकाचे आहे. यामध्ये १८१८ पासूनचा कोपरगावचा इतिहास मांडला आहे. इंग्रजांनी कोपरगाव परिसराचा ताबा घेतल्यानंतर याठिकाणी केलेला धर्मप्रसार, त्याविरुद्ध उमटलेल्या प्रतिक्रिया, ब्रिटिश सत्तेविरुद्ध स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याचे योगदान, कोपरगावचा शैक्षणिक विकास, औद्योगिक केंद्र म्हणून झालेला विकास, रोहमारे, औताडे, खांबेकर, काळे, कोल्हे, ठोळे, गंगवाल, मुंदडा, कोयटे, मेहता इ. परिवारांचे अर्थपूर्ण योगदान आहे. अशी मांडणी या प्रकरणामध्ये केली आहे. १९५० च्या नंतर कोपरगाव परिसरामधील नागरी जीवन विविध अंगांनी विकसीत होऊ लागले.

कोपरगावमध्ये सहकारी तत्त्वावर साखर कारखानदारी उभी राहिली. गोदावरीच्या पाण्याच्या उपलब्धतेने ऊस क्षेत्रात लक्षणीय भर पडली. गणपतराव औताडे, के. बी. रोहमारे, माधवराव शिंदे, रामदास पाटील होन, शंकरराव कोल्हे, कोपरगावमधील शिलेदार व त्यांच्या मित्र परिवाराच्या मदतीमुळेच त्याचप्रमाणे शंकरराव काळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या

योगदानामुळेच कोपरगावमध्ये साखर उद्योग उभे राहिले. ते आज सुस्थितीमध्ये आहेत. त्याचे श्रेय संबंधीताच्या कार्यशैलीस जाते.

प्राथमिक शिक्षणाच्या मराठी व उर्दू माध्यमांच्या शाळा सुरु झाल्या. शेतीचे क्षेत्र विकसित होऊन फळबाग, व्यापारी पिके, उत्पादन केली जाऊ लागली. कोपरगाव नगरपरिषदेने येसगाव येथे पाण्याची तळी तयार करुन कोपरगावास पाणी पुरवठ्याची सोय केली. माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या संदर्भात आधुनिक काळात कोपरगावने मोठी प्रगती केली आहे. सहकार चळवळीमधून उदयास आलेल्या ग्रामीण नेतृत्त्वाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

प्रबंधाचे चौथे प्रकरण 'कोपरगावमधील सहकारी चळवळ' या शीर्षकाचे आहे. या प्रकरणामध्ये प्रारंभी तालुक्यामधील ऐतिहासिक, भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे. कोपरगाव परिसरातील जलसिंचनाचा विकास कसा झाला याची माहिती देताना गोदावरी डावा कालवा व गंगापूर धरणांचा परिसरास झालेला लाभ यांची माहिती दिलेली आहे.

कोपरगाव परिसरामध्ये सहकार चळवळीचा प्रारंभ खऱ्या अर्थाने १९१० पासून झाला. १९१० मध्ये पुणतांबा येथे पुणतांबा को-ऑप. मल्टीपरपज सोसायटी ही तालुक्यातील पहिली सहकारी संस्था स्थापन झाली होती. १९१० ते १९४७ या काळात कोपरगाव परिसरामध्ये ४३ सहकारी संस्था स्थापन झाल्या होत्या. शेतीस पतपुरवठा करण्यासाठी कोपरगावमध्ये केवळ शेतकऱ्यांसाठी 'मुंबई प्रांतिक सहकारी बँकेने आपली शाखा उघडली.' १९३९ मध्ये साकरवाडी येथे 'गोदावरी शुगर मिल', १९४० मध्ये लक्ष्मीवाडी साखर कारखाना, १९४१ चांगदेव शुगर मिल हे खासगी साखर कारखाने सुरु झाले. याच दरम्यान १९३२ च्या एप्रिल महिन्यात सहकारी तत्त्वावर 'गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघाची' स्थापना झाली होती. पुढे कोपरगावमध्ये शिंगणापूर व कोळपेवाडी याठिकाणी सहकार तत्त्वावर साखर कारखान्यांची उभारणी झाली. कोपरगावचा परिसर आता 'सहकारी साखर उद्योगाचे' आगर म्हणून ओळखले जाऊ लागले. सहकारी पतसंस्था, दुध उद्योगाचे नाव आता महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरही घेतले जाते. सहकारी पतसंस्था व सहकारी बँकेंचे जाळे निर्माण झाल्याने कोपरगावच्या अर्थकारणामध्ये अमुलाग्र बदल होऊ लागला आहे.

निष्कर्ष :

कोपरगाव परिसराचा इतिहास हा विषय अभ्यासताना पुढील काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात त्या पुढीलप्रमाणे.

१. कोपरगावच्या इतिहासाचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे यादव राजवटीपासून आधुनिक काळापर्यंतची इतिहास परंपरा सलग आहे. यादव राजवटीत कोपरगाव परिसरामध्ये मंदिरस्थापत्याचा विकास झाला. त्यावेळेपासून आधुनिक काळापर्यंत म्हणजेच कोकमठाणचे जगदंबा मंदिर ते जनार्दन स्वामींचे समाधी मंदिर ही मंदिरे मंदिरस्थापत्याचा उत्तम नमुना आहेत. इतिहासाची ही सलग परंपरा कोठेही खंडीत झाली नाही.

२. कोपरगाव परिसराचा इतिहास मांडण्यासाठी विविध प्रकारची साधने उपलब्ध आहेत. त्यामध्ये विविधता दिसून येते. प्राचीन मंदिर स्थापत्य, नाणी, शिलालेख, पुणे, मुंबई, अहमदनगर येथील अभिलेखागारांमध्ये उपलब्ध आहेत. कोपरगाव परिसराच्या इतिहासासंबंधीची कागदपत्रे व साधनांची विपुल उपलब्धता अन्य क्वचितच एखाद्या गावाच्या इतिहासास उपलब्ध होऊ शकतील.

३. कोपरगाव परिसरास सांस्कृतिक व धार्मिक महत्त्व देखील आहे. उदा. कोकमठाणचे जगदंबा व जुनी गंगा येथील जनार्दन स्वामींचे समाधी मंदिर, बेटातील शुक्लेश्वर व कचेश्वर मंदिर ही त्यांची उदाहरणे आहेत. मशिदी व चर्च देखील आहेत.

४. कोपरगावास भौगोलिक व राजकिय महत्त्व आहे. कोपरगाव मधूनच अहमदनगरहून दिल्लीकडे जाणारा राजमार्ग गेलेला असल्याने ते आता व्यापारी मार्गावरील महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे.

५. कोपरगाव परिसराचे पेशवे काळातील इतिहासाविषयी एक विशेष महत्त्वाचे स्थान आहे. राघोबादादाच्या वास्तव्याचा अधिक काळ याठिकाणीच व्यतित झाला. पेशवेकाळात त्यास हा परिसरच सरंजाम म्हणून होता. कोपरगाव, बेट, हिंगणी याठिकाणी राघोबाने आपल्या वास्तव्यासाठी वाडे बांधले. गढी व वाडे स्थापत्याचा हा अविष्कार आहे. दुसऱ्या बाजीराव, त्रिंबकजी डेंगळे यांनी या

परिसरामध्ये घोड्यांच्या पागा विकसित केल्या. आंब्याच्या बागाही लावल्या हे आगळेवेगळे वैशिष्ट्य कोपरगावाच्या इतिहासाचे आहे.

६. कोपरगाव परिसराचा इतिहास हा अभ्यास विषय स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी योग्य असला तरी तो काहीसा दुर्लक्षित राहिलेला होता. या परिसरास समृद्ध इतिहास परंपरा आहे. त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न प्रस्तुत इतिहास संशोधनाच्या माध्यमातून केला आहे.

७. प्रस्तुत संशोधनाचे काम जरी स्थानिक इतिहासाचा एक भाग असले तरी कोपरगाव परिसराचा इतिहास हा प्रादेशिक, राष्ट्रीय व जागतिक इतिहासाशी अर्थपूर्णरित्या जोडलेला आहे. उदा. या परिसराचा पेशवेकाळाशी असणाऱ्या संबंधामुळे तो प्रादेशिक इतिहासाशी जोडला गेला आहे. यादव काळापासून ते आधुनिक काळातील स्वातंत्र्य चळवळीपर्यंत ते राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहचतात. शिर्डी आता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धार्मिक पर्यटन केंद्र झाले आहे. त्याच्या माध्यमातून आपणास कोपरगाव परिसराचा इतिहास पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक स्तराशी जोडता येतो.

८. कोपरगाव परिसरातील पेशवेकालीन मंदिरांची व वाड्यांची अवस्था आता बऱ्याच प्रमाणात दयनीय होत आहे. ती जतन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व खात्याकडे पाठपुरावा करण्याची गरज आहे. आपला स्थानिक इतिहास आपणच जपला पाहिजे ही भावना स्थानिकांमध्ये रूजविण्यावर या संशोधनाचा भर आहे.

९. पेशवेकाळात बारभाईविरुद्धच्या संघर्षामध्ये राघोबा व आनंदीबाईंनी कोपरगावचा परिसर आपल्या ताब्यात ठेवून बारभाईंना याठिकाणी फारसा हस्तक्षेप करु दिला नाही. ज्यावेळी बारभाईंचा हस्तक्षेप वाढला. त्यावेळी तिने कोपरगाव ऐवजी नाशिक येथे वास्तव्य केले.

१०. कुंभारी हा परगणा तत्कालीन कोपरगावपेक्षा भौगोलिकदृष्ट्या मोठा होता. आज मात्र कुंभारी हे खेडे असून कोपरगाव हे तालुक्याचे ठिकाण झाले आहे.

११. हिंगणी येथील राघोबादादाने बांधलेला वाडा हा तीन भिंतीचा असून गोदावरी नदीच्या बाजूने त्यास भिंत बांधलेली नाही. त्यामुळे गोदावरीच्या पुराचे पाणी वाड्यात जाऊन वाड्यातील गणेश मंदिरास हानी पोहोचली आहे. यावर उपाय म्हणून गोदावरी नदीच्या कडेने भिंत बांधल्यास वाड्याचे संरक्षण होईल.

१२. हिंगणीच्या वाड्यामध्ये राघोबादादाची पूर्वी समाधी होती. आज मात्र ती नदीच्या पुराच्या पाण्याने वाहून गेली आहे.

१३. कोपरगावच्या पश्चिमेकडील मुर्शतपूर यागावी राघोबादादाने घोड्यांची मोठी पागा तयार केली होती. या पागेच्या इमारतीचे अवशेष असूनही त्याठिकाणी कुणीही पर्यटक व संशोधक जात नसल्याने ती दुर्लक्षीत आहे. प्रस्तुत संशोधकाने ही इमारत व तिची अप्रकाशित मोडी कागदपत्रे प्रथमच उजेडात आणलेली आहेत.

१४. दुसऱ्या बाजीरावाच्या कालखंडात कोपरगावचा कारभार त्रिंबकजी डेंगळे या सरदाराकडे होता. त्याने त्यावेळी कोपरगावजवळ कोऱ्हाळे, केलवड, राहता, साकोरी या गावी कलमी आंब्याच्या बागा लावल्याचे मोडी कागदपत्रांमध्ये उल्लेख आहेत.

१५. कोपरगावच्या आधुनिकीकरणामध्ये शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. कोपरगावमध्ये तालुक्याचा विस्तार पाहता अभियांत्रिकीच्या पदव्युत्तर शिक्षणाची व पारंपरिक कला, वाणिज्य व विज्ञान क्षेत्रातील संशोधन केंद्रांची आवश्यकता आहे. वैद्यकिय शिक्षणाची मोठी सोय होणे आवश्यक आहे.

१६. कोपरगाव हे सुनियोजीत शहर नाही. त्याच्या अगदी जवळून गोदावरी नदी वाहते. पावसाळ्यात तिचे प्रचंड पाणी पुढे आंध्रप्रदेशापर्यंत जाते. ते पाणी अडविण्याची व्यवस्था सडे, हिंगणी, मंजूर या बंधाऱ्यांमुळे झाली असली तरी ते पाणी कोपरगाव शहरास पिण्यासाठी वापरता येत नाही. जर कोपरगावच्या पश्चिमेस जेऊर या गावी स्वतंत्र बंधारा बांधून पाणी अडविले तर कोपरगावच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल आणि थेट येसगाव येथून आणलेले पाणी शहरामध्ये वितरीत केल्या जाण्यापर्यंतचा खर्च वाचणार आहे.

१७. कोपरगावमधील रस्ते कित्येक ठिकाणी अरुंद आहेत. भावी काळासाठी या रस्त्यांवर अतिक्रमणे होणार नाहीत याची काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच सांडपाण्याच्या पाण्याची योग्यरितीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

१८. पाण्याची उपलब्धता असल्याने शेतकऱ्यांनी ऊसाचे उत्पादन मोठ्याप्रमाणात घेतले आहे. मात्र ज्या दर्जेदार पद्धतीने पुणे जिल्ह्यामध्ये ऊस पिकविला जातो. तशाप्रकारची शेती कोपरगावमध्ये अजून होत नाही. ऊस या पिकाला पाटपद्धतीने पाणी न देता ठिबक सिंचनावर ऊसशेती केली तर पाण्याची बचत होईल.

१९. कोपरगावमधील प्राथमिक आरोग्य केंद्राचा विस्तार होणे गरजेचे आहे. कारण पश्चिमेकडील ३० कि.मी.च्या परिघातील सर्वच लहानमोठी गावे या आरोग्यकेंद्रावर अवलंबून आहेत. लोकसंख्येचा वाढीव भार लक्षात घेता त्याचे अत्याधुनिकीकरण होणे गरजेचे आहे.

२०. कोपरगावच्या आधुनिकीकरणामध्ये व औद्योगिकीकरणामध्ये शंकरराव कोल्हे, शंकरराव काळे, नामदेव परजणे, सतिश मेहता, रामबिलास मुंदडा, प्रकाश मुंदडा, विकास मुंदडा, बोरावके परिवार, काका कोयटे, शिरोडे, रोहमारे, गवारे, जोशी, खंडागळे, अजमेरे, नांगरे, लोणारी, आढाव, कुलकर्णी, खुर्जेकर, चांदवडकर, अग्रवाल, उदावंत, आव्हाड इ. परिवारांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मात्र आतापर्यंत यापैकी शंकरराव कोल्हे, के. बी. रोहमारे वगळता अन्य कोणत्याही योगदान दिलेल्या व्यक्तींविषयी ऐतिहासिकदृष्ट्या लेखन झालेले नाही. या प्रत्येक कुटुंबाच्या इतिहासलेखनाची आवश्यकता स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून प्रतिपादन केली आहे.

२१. कोपरगाव परिसरामध्ये शिर्डी, राहता, कोपरगावची जुनी गंगा, पुणतांबा, प्रति शिर्डी (कोपरगाव येथील साई बाबांची तपोभूमी) ही गावे आता पर्यटनदृष्ट्या बहरु लागली आहे. मात्र याठिकाणी जाण्यासाठी सुयोग्य रस्ते उपलब्ध नाहीत. त्यामुळे ते न केल्यास भावी काळात कोपरगावच्या आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

गृहितकांची पडताळणी

प्रस्तुत प्रबंधाची मांडणी करताना संशोधकाने या अध्ययनात ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे पुढील गृहितके तपासून पाहिली आहेत.

१. **कोपरगाव परिसर धार्मिक, पौराणिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.**

हे गृहितक स्वयंसिद्ध असून प्रस्तुत प्रबंधाच्या प्रकरण क्र. २ मध्ये याविषयीची पडताळणी झाली आहे. गोदावरी नदीचा उल्लेख दक्षिण गंगा म्हणून विविध वैदिक साहित्यामध्ये आला आहे. महर्षी शुक्राचार्यांची कथा कोपरगावमधील बेट येथील मंदिराशी निगडीत आहेत. गोदावरी नदीकाठी बेट येथे पुराणांमध्ये नोंद असलेल्या ऋषींचे आश्रम व समाधी आजही दाखविल्या जातात.

२. **कोपरगाव परिसराला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.**

यादव कालखंडापासून उपलब्ध झालेल्या विविध प्रकाशित व अप्रकाशित साधनांच्या आधारे हे गृहितक सिद्ध झाले आहे. बहमनी साम्राज्याच्या काळातील अवशेष, शिवकाळातील कागदपत्रे, विविध घटना त्याचप्रमाणे मंदिर स्थापत्यातील यादवकालीन मंदिरांचे अवशेष उपलब्ध असल्याने त्या परिसराला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. म्हणजेच कोपरगाव परिसराला प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत साधनांची सलगता लाभली आहे.

३. **पेशवे कालखंडात राजकीय व लष्करीदृष्ट्या कोपरगावला महत्त्व प्राप्त झाले होते.**

हे गृहितक पेशवेकाळातील विशेषतः नानासाहेब पेशवे, राघोबादादा, आनंदीबाई, दुसरा बाजीराव, चिमाजी आप्पा द्वितीय यांचे कोपरगावशी विशेष संबंध असल्याचे कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. राघोबादादा व आनंदीबाई यांचा कोपरगावमध्ये असलेल्या ग्रंथसंग्रहाची चर्चा प्रस्तुत प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये ग्रंथसंपदा या घटकात केली आहे. लष्करीदृष्ट्या कोपरगाव हे महत्त्वपूर्ण असून त्याठिकाणी राघोबादादा, मल्हारराव होळकर, माधवराव पेशवे, उदाजी पवार या सर्वांनी

आपआपले लष्करी तळ उभारुन औरंगाबाद व वैजापूर परिसरातून ठग आणि पेंढारी कोपरगाव परिसरात जे आक्रमण व लुटालुट करत त्याचा प्रतिबंध करण्यासाठी यंत्रणा तयार केली होती. बाजीरावाच्या लष्करासाठी आवश्यक असलेले घोडे कोपरगावमधील मुर्शतपूर येथे पागा उभारुन सांभाळले जात असल्याचे लेखी उल्लेख उपलब्ध झाले आहेत. याविषयीची चर्चा शिवकालीन व पेशवेकालीन कोपरगाव या प्रकरणात केली आहे.

४. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये कोपरगावमधील नागरिकांचा भरीव सहभाग होता.

हे गृहितक साध्य झाले आहे. याविषयीची चर्चा 'आधुनिक कोपरगाव' या प्रकरणामध्ये स्वातंत्र्य आंदोलनातील कोपरगाव परिसराचा सहभाग या उपघटकामध्ये केली आहे. १९२० ते १९४७ पर्यंतच्या विविध आंदोलनामध्ये सहभागी असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे या प्रकरणाची मांडणी केली आहे.

५. सहकार चळवळ अल्प कालावधीतच कोपरगाव परिसरामध्ये रुजली आहे.

हे गृहितक साध्य झाले आहे. त्याविषयीची चर्चा करण्यासाठी स्वतंत्रपणे 'कोपरगाव मधील सहकार चळवळ' अशा शीर्षकाचे चौथे प्रकरण मांडले आहे. कोपरगाव परिसरामध्ये सहकारी साखर कारखाने, विविध सहकारी सोसायटी, बँका, पतसंस्था, शेती उत्पन्नावर आधारित सहकारी संस्था यांची साधार माहिती या प्रकरणात दिली आहे.

६. सहकार चळवळीमधून कोपरगाव परिसरातील ग्रामीण नेतृत्त्वाचा उदय झाला आहे.

हे गृहितक सिद्ध झाले आहे. सहकार चळवळीमधून कोपरगाव परिसरात के. बी. रोहमारे, पंडीतराव जाधव, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, नामदेवराव परजणे,

गणपतराव औताडे, दौलतराव होन, काका कोयटे इत्यादींच्या नेतृत्त्वाची जडणघडण सहकाराच्या माध्यमातून झाली.

७. कोपरगाव परिसराला दारणा धरणामधून पाटपाणी मिळाल्यामुळे या क्षेत्राचा संपूर्ण कायापालट झाला आहे.

याविषयीची मांडणी 'आधुनिक कोपरगाव' व 'सहकार चळवळ' या दोन्ही प्रकरणांमध्ये कोपरगाव परिसरात जलसिंचनाने कोणते व कसे बदल झाले याविषयीची चर्चा केली आहे.

८. कोपरगावच्या आर्थिक विकासाबरोबरच येथे सामाजिक विकास घडून आला आहे.

जलसिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने, जिरायती शेतीचे रूपांतर बागायती शेतीत झाल्याने शेतमजूरी, औद्योगिकीकरण यांची वाढ झाल्याने महाराष्ट्राच्या विविध भागातून सर्व जाती धर्माचे लोक कोपरगाव येथे स्थायिक झाल्याने एक सामाजिक समता, समाज विकासाचे भान समाजात उभे राहिले.

९. पर्यटन व्यवसायाच्यादृष्टीने हा परिसर अनुकूल आहे.

कोपरगाव परिसरामध्ये शिर्डी, कोपरगाव परिसरातील साई बाबांची तपोभूमी, साखर कारखाना, माहेगाव देशमुखचे देवीचे मंदिर, जुनी गंगा येथील देवीचे मंदिर व जनार्दन स्वामींची समाधी, साकुरीचे उपासनी महाराज, जेऊर कुंभारी येथील उत्तर मराठाकालीन मंदिरस्थापत्य, कुंभारी येथील यादवकालीन शिवमंदिर, कोकमठाणचे यादवकालीन मंदिरस्थापत्य ही आधुनिक काळातही पर्यटकांच्या आकर्षणाची केंद्रे त्याचप्रमाणे धार्मिक पर्यटन म्हणून विकसीत होत आहे. त्यामुळे पर्यटनदृष्ट्या हे गृहितक साध्य झाले आहे.

कोपरगावचे आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण, आर्थिक सक्षमीकरण, विविध क्षेत्रांमधील प्रगती यामुळे कोपरगावची ओळख आता ऊस उत्पादनाचे क्षेत्र व साखरेचे

माहेरघर म्हणून होऊ लागली आहे. साखरेच्या क्षेत्रात ती राष्ट्रीय पातळीवर पोहोचली आहे. प्रस्तुत प्रबंधाच्या सुरुवातीला ठेवलेली उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधकाने केला आहे. प्रस्तुत प्रबंधाद्वारे कोपरगाव परिसराचा भव्य असा पट उलगडून दाखविण्याचा साधार प्रयत्न केलेला आहे. इतिहासाच्या वैश्विकतेचे भान ठेऊन या परिसरातील विशिष्टतेचा वेध यामधून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. इतिहासलेखनशास्त्रामध्ये नव्याने उदयास आलेल्या व विकसित होत असलेल्या स्थानिक इतिहासालेखन प्रवाहाचा अभ्यास व त्याचे महत्त्व लक्षात घेऊन त्यामध्ये अल्पशी भर टाकण्याचा हा लहानसा संशोधकीय प्रयत्न आहे.

परिशिष्ट क्र. १

कोपरगाव तालुक्याचा नकाशा

(संदर्भ : कोपरगाव तहसील कार्यालयातून प्राप्त)

परिशिष्ट क्र. २

कोपरगावमध्ये इंग्रजी गुप्तहेर सापडल्याचे गोविंद गोडबोले या मराठी सरदाराने दुसऱ्या बाजीरावास कळविलेले अप्रकाशित पत्र

(संदर्भ : संशोधनासाठी निवडलेले कागद (सं.नि.का.), पत्र १३३०६)

परिशिष्ट क्र. ३

कोपरगावमधून आनंदीबाईने बारभाई मंडळास पत्र लिहून आपणास पालखीचा मान द्यावा अशा आशयाचे अप्रकाशित पत्र

(संदर्भ : संशोधनासाठी निवडलेले कागद (सं.नि.का.), पत्र ७६७८)

परिशिष्ट क्र. ४

इ.स. १७९५ मध्ये कोपरगावच्या बंदोबस्ताची जबाबदारी मराठी सरदार विसाजी राम याच्याकडे होती तो चोख असून कोपरगावला निजामाचा उपद्रव होणार नाही याविषयी त्याने सवाई माधवरावास लिहिलेले अप्रकाशित पत्र

(संदर्भ : संशोधनासाठी निवडलेले कागद (सं.नि.का.), पत्र १४००८ व १४००९)

परिशिष्ट क्र. ५

कोपरगाव परिसरामध्ये ठग व पेंढाऱ्यांनी कसा दंगा केला याविषयी त्रिंबकराव डेंगळेने सविस्तर वृत्तांत पत्राद्वारे दुसऱ्या बाजीरावास कळविला ते अप्रकाशित पत्र

(संदर्भ : संशोधनासाठी निवडलेले कागद (सं.नि.का.), पत्र १४९२२)

परिशिष्ट क्र. ६

१३ एप्रिल १८१४ रोजी कोपरगाव परिसरातील ठग व पेंढाऱ्यांचा दंगा मिटवून त्यांचा बंदोबस्त करावा अशा आशयाचे दुसऱ्या बाजीरावाने रूपराम चौधरी यास पाठविलेले अप्रकाशित पत्र

(संदर्भ : संशोधनासाठी निवडलेले कागद (सं.नि.का.), पत्र १३९७१)

परिशिष्ट क्र. ७

आपण कोपरगावचा कारभार सुरळीत करीत आहोत याविषयी त्रिंबकजी डेंगळेने दुसऱ्या बाजीरावास लिहिलेले अप्रकाशित पत्र

(संदर्भ : संशोधनासाठी निवडलेले कागद (सं.नि.का.), पत्र ११६०९)

परिशिष्ट क्र. ८

कोपरगावमधील बेटाच्या वाड्यात दुसऱ्या बाजीरावाची मुक्कामाची व्यवस्था कशी केली जात असे याविषयीची माहिती सांगणारे अप्रकाशित पत्र

(संदर्भ : संशोधनासाठी निवडलेले कागद (सं.नि.का.), पत्र २५७६९)

परिशिष्ट क्र. ९

मुलाखतीसाठी वापरलेली प्रश्नावली नमुना

१. मुलाखतदाराचे पूर्ण नाव

२. बालपण व शिक्षण याविषयीची माहिती

३. कौटुंबिक जीवनाबद्दल संक्षिप्त माहिती

४. उच्च शिक्षित असूनही शासकीय नोकरीमध्ये न जाण्याविषयीची माहिती

५. सामाजिक कार्याकडे कसे आकर्षित झालात?

६. आपण राजकारणामध्ये कसा प्रवेश केला?

७. आपण सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी समाजकार्य कोणत्या पद्धतीने केले?

८. आपला सहकार क्षेत्राशी केव्हा व कसा संबंध आला?

९. सहकार क्षेत्रामध्ये आपण अग्रगण्य स्थान कसे प्राप्त केले?

१०. सहकारी संस्था उभारताना आलेल्या आपल्या अनुभवांविषयी थोडक्यात माहिती द्या.

११. सहकारी साखर कारखाना उभारताना कोणत्या अडचणी आल्या?

१२. शासकिय मदतीव्यतिरिक्त आपणास कोणकोणत्या महनिय व्यक्तींची मदत झाली?

१३. कोपरगाव परिसरातील वित्त संस्थांनी एकंदर सहकार विकास व कोपरगावचा विकास कसा साधला ? याविषयी आपले विचार थोडक्यात सांगा.

१४. अहमदनगर जिल्ह्यातील प्रादेशिक व राष्ट्रीय पातळीवरील कोणकोणत्या नेत्यांशी आपले संबंध आले, त्याचा उपयोग स्थानिक विकासासाठी कसा झाला?

१५. सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून परिसर विकासासाठी कोणकोणत्या योजना राबविल्या?

१६. आपल्या शैक्षणिक योगदानाविषयी माहिती द्या.

१७. शेती, जलसिंचन व भावी काळातील कोपरगाव परिसराचा विकास याविषयी आपले विचार सांगा.

१८. कोपरगाव परिसरातील सामाजिक स्थित्यंतराचे आपण साक्षीदार आहात याविषयी आपणास काय वाटते?

१९. राजकीय व सामाजिक कार्याबरोबरच आपण सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रातही अनेक ज्येष्ठ साहित्यिकांशी संबंध कसे जपले? व स्वतःही साहित्यासाठी कसे योगदान दिले.

२०. आजच्या तरुण पिढीला आपण कोणता संदेश देऊ इच्छिता?

२१. कोपरगाव परिसर पर्यटनदृष्ट्या विकसित व्हावा यादृष्टीने शासनाकडे कसा पाठपुरावा करणार आहात.

निवडक संदर्भ-साहित्य-सूची

मूळ साधने

(अ) अप्रकाशित मोडी कागदपत्रे :

शासकीय अभिलेखागार, पुणे येथील साधने :

(१) **चिटणिसी दफ्तर :** रुमाल ७, ९, १०, ११, १२, १३,१४, १५, २६, २७, २८,

(२) **पेशवे दफ्तर :** खंड २, ९, १०, १९, ४३.

(३) **शाहू दफ्तर :** रुमाल ५, ८, १०, १३, १४, २५, २६.

(४) **सं. नि. का.**, दप्तर १, २, ८, ११, १२, १३, १४, १५, २१, २२, २४, २६, २७, २८,३४, ३६, ३८, ४०, ४२, ४४, ४८, ४९, ५०, ५६, ५७,

(आ) प्रकाशित मराठी साधने :

(१) खरे ग. ह. (संपा.), डॉ.गोविंद त्र्यंबक कुलकर्णी (सहसंपा.) **ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ ते ६ (औरंगजेबाच्या दरबारचे अखबार)**, प्रका. चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९७३-१९८४.

(२) जोशी शं. ना., **शिवकालीन-पत्र-सारसंग्रह**, खंड,३, भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र.४४, पुणे, १९३०-१९३७.

(३) पगडी सेतुमाधवराव (संपा.), **मोगल दरबाराची बातमीपत्रे,** खंड-२, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८३.

(इ) प्रकाशित इंग्रजी साधने :

(1) **English Records on Shivaji**, (1659-1682), Shiva Charitra Karyalaya, Poona, 1931.

(2) Joshi Bapu Purushotam, **Selections from the Satara Raja and the Peshwas Diaries,** VII, Peshwa Madhavrao. I, Vol. II, The Poona Deccan Vernacular Translation Society with the Permission of the Government of Bombay, 1911.

(3) Parasnis D. B. (ed.), **Selections from the Satara Rajas and the Peshwas Diaries**, Vol.III, Balaji Bajirav Peshwa, Vol.I, Bombay, 1907.

(4) Wad G.C, and Marathe K.B., **Selections from the Satara Rajas and The Peshwas Diaries**, Deccan vernacular Transalation Society, Poona,1911.

(5) Gazetteers of the Bombay Presidency :

i) **Ahmadnager District**, Vol. XVII.,1884.

ii) **Bombay Gazetteer**., XVI.,1883.

दुय्यम साधने

(अ) ग्रंथ (मराठी) :

(१) अत्रे त्रिंबक नारायण, **गावगाडा,** वरदा प्रकाशन प्रा. लि., चौथी आवृत्ती, पुणे, १९९५.

(२) आपटे वासुदेव गोविंद (संपा.), प्र. रा. अहिरराव, **सम्राट अशोक चरित्र**, (विस्तार व विकास प्र. रा. अहिरराव), वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे, २००२.

(३) आवळसकर शांताराम, **रायगडची जीवनकथा**, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६२.

(४) आंबेडकर बाबासाहेब, **भगवान बुद्ध व त्याचा धम्म**, (अनु. आनंद कौसल्यन.) पिपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, १९६१.

(५) कर्वे चिं. ग., जोगळेकर स. आ. (संपा.), **महाराष्ट्र परिचय,** प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५४.

(६) कुलकर्णी अ. रा., **मराठ्यांचे इतिहासकार (इतिहासलेखन पद्धती)** डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.

(७) कुलकर्णी अ.रा., **मराठे आणि महाराष्ट्र,** डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.

(८) कुलकर्णी अ. रा., **शिवकालीन महाराष्ट्र,** राजहंस प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पुणे, २००४.

(९) कुलकर्णी अ. रा. (संपा.), **आज्ञापत्र रामचंद्रपंत अमात्यांचे,** मोडी-मराठी-इंग्रजी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

(१०) कुलकर्णी मधुकर, **नाना फडणीस व मराठी राज्याचे प्रशासन,** प्रका. मधुरा कुलकर्णी, पुणे, २००३.

(११) केतकर श्री. व्यं., **प्राचीन महाराष्ट्र**, वरदा प्रकाशन प्रा. लि. पुणे, १९३५.

(१२) केतकर कुमार, **कथा स्वातंत्र्याची,** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, १९८५.

(१३) कोठेकर शांता, **इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान**, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.

(१४) कुंटे भ. ग., **अहमदनगरची निजामशाही-बुऱ्हाने मासीरचा अनुवाद**, मुरली प्रकाशन, मुंबई, १९६२.

(१५) कुंटे भ. ग., **बहमनी साम्राज्याचा इतिहास**, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६६.

(१६) खरे ग. ह., व. म.बोराटे, **अशी आमुची वाई, [वाईचा सर्वांगीण इतिहास],** प्रका. गोपाळ बळवंत मोकाशी, वाईकर स्नेह संमेलन, पुणे, १९७९.

(१७) खोबरेकर वि. गो., **मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम**, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९७७.

(१८) गोखले कमल, **शिवपुत्र संभाजी**, नवकमल प्रकाशन, पुणे, १९८१.

(१९) गोखले शोभना, **पुराभिलेखविद्या**, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९९९.

(२०) जोशी शं. ना., **मराठेकालीन समाजदर्शन**, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६०.

(२१) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), **मराठी विश्वकोश,** खंड १ ते १८, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६२ - १९८५.

(२२) दीक्षित मो. गं. (संपा.), पेशवे दफ्तर अभिलेखमाला वर्णनात्मक सूची, खंड १, **शाहू दफ्तरातील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची,** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, नागपूर,१९६९.

(२३) दीक्षित राजा (संपा.), **निवडक शेजवलकर,** साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, २००७.

(२४) धर्माधिकारी अविनाश (संपा.), **चिटणीसी दफ्तराची सूची,** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.

(२५) देशमुख गणेश (संपा.), **ग्रामवेद**, के. बी. रोहमारे गौरव समिती, कोपरगाव, १९९८.

(२६) पगडी सेतुमाधवराव, **हिंदवी स्वराज्य आणि मोगल**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७०.

(२७) पानसे मु. ग., **यादवकालीन महाराष्ट्र**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६३.

(२८) फडके य. दि., **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड ७, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००७.

(२९) भावे वा. कृ., **पेशवेकालीन महाराष्ट्र,**भारतीय इतिहास अनुसंधान परिषद नवी दिल्ली,१९७६.

(३०) माटे म. श्री., **मध्ययुगीन महाराष्ट्र**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००१.

(३१) मेहेंदळे ग. भा., **श्रीराजा शिवछत्रपती**, खंड १, भाग १, गजानन मेहेंदळे, पुणे, १९९८.

(३२) शहा मु. ब. (संपा.), **इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य**, खंड १ ते १३, राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, १९९८.

(३३) सरकार जदुनाथ, **औरंगजेब,** (अनु. श. गो. कोलारकर), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.

(३४) सरदेसाई गोविंद सखाराम, **मराठी रियासत**, खंड १-८, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९८८-१९९३.

(आ) ग्रंथ (इंग्रजी) :

(1) Dunning Robert, **Local History For Biginners**, Phillimore & Co. Ltd., England, 1987.

(2) Grewal J.S., (ed.), **Studies in Local and Regional History,** Guru Nanak University, Amriutsar, 1974.

(3) Gupta Pratul Chadra, **Bajirao and the East India Company, 1796-1818,** Commonwelth Publishers, New Delhi, 1958.

(4) Sreedharan E., **A Textbook of Historiography,** (500 BC to AD 2000), Orient Black Swan, New Delhi, 2012.

(इ) संशोधनपर लेख (मराठी) :

(१) पवार जयसिंगराव, 'प्रादेशिक इतिहासाचे महत्त्व', **शोधनिबंध संग्रह**, महाराष्ट्र इतिहास परिषद, भुसावळ, १९८९.

(२) दीक्षित राजा, '१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्री-जीवन : तळाकडून इतिहास', **पुणे विद्यापीठ वार्ता : महिला सबलीकरण विशेषांक**, पुणे विद्यापीठ, पुणे, जून, २०००.

(३) दीक्षित राजा, 'प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संदर्भ', **इतिहास शिक्षक**, पुणे, ऑक्टोबर २००२.

(४) देव प्रभाकर, 'इतिहास प्राचीन काळ', **संशोधक,** इतिहासाचार्य वि.का.राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, डिसेंबर, २००३.

(ई) अप्रकाशित प्रबंध/प्रकल्प अहवाल :

(१) गायकवाड लहू, 'जुन्नरचा इतिहास' (प्राचीन ते अर्वाचीन), पीएच्.डी. (इतिहास) प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, सप्टेंबर २०१२.


(२) गोरडे विलास सोमा, 'चाकण, ता. खेड गावचा स्थानिक इतिहास', पीएच्.डी. (इतिहास) प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, जुलै २०११.

कोपरगाव दर्शन
















कोपरगावमधील
राघोबादादाचा वाडा



वाड्याचे
शिल्पांकनयुक्त छत




जेऊर कुंभारी येथील
महादेव मंदिर



जगदंबा मंदिराचे
गोमुख



जेऊर कुंभारी येथील
मंदिरातील शिलालेख



कोपरगाव येथील
अमृतेश्वर महादेव
मंदिरातील शिलालेख



कुंभारी येथील
यादवकालीन मंदिराचे प्रवेशद्वार



यादवकालीन
राघवेश्वर
महादेव मंदिर



काशी विश्वनाथ महादेव
मंदिर जुनी गंगा



कोकमठाणचे
जगदंबा मंदिर



मंदिराचे यादवकालीन
शिखर



मंदिराचे गर्भगृह



कोपरगांव बेट
येथील मराठेकालीन
विहीर



जेऊर कुंभारी येथील
मंदिर परिसरातील
स्त्री शिल्प




कुंभारी येथील
महादेव मंदिरातील
गणेशपट्टीयुक्त प्रवेशद्वार



कोकमठाणचे जगदंबा मंदिरातील शिल्प.



कोकमठाणचे जगदंबा मंदिर-अंतरालावरील शिल्पकाम



कोपरगाव बेट
मंदिरातील शिलालेख



जगदंबा मंदिर
यादवकालीन
तलाविन्यास



जगदंबा मंदिर
उत्तरेकडील बाजू
जाळीदार खिडकी



कुंभारी येथील
यादवकालीन शिवमंदिर



बेटातील कचेश्वर
मंदिरातील देवडी



हिंगणी येथील
वाड्याजवळील चुना
मळणीचे दगडी चाक



कोपरगाव बेटातील
मराठेकालीन मंदिरे



हिंगणी येथील
राघोबादादाचा
तीन भिंतींचा वाडा



जेऊर कुंभारी
येथील शिलालेख